# आप्तवाणी

## श्रेणी-1

Marathi

दादा भगवान प्ररूपित

# आप्तवाणी

## श्रेणी-1

मूळ गुजराती संकलन : डॉ. नीरूबहन अमीन

अनुवाद : महात्मागण

**प्रकाशक** : अजीत सी. पटेल
दादा भगवान आराधना ट्रस्ट
'दादा दर्शन', 5, ममतापार्क सोसायटी,
नवगुजरात कॉलेजच्या मागे, उस्मानपुरा,
अहमदाबाद - 380014, गुजरात.
**फोन** - ( 079 ) 39830100

© All Rights reserved with - Dada Bhagwan Foundation Trust,
5, Mamta Park Society, B\h. Navgujarat College, Usmanpura,
Ahmedabad - 380014, Gujarat, India.
**No part of this book may be used or reproduced in any manner whatsoever without written permission from the holder of the copyrights.**

**प्रथम आवृत्ति** : 2000

**भाव मूल्य** : 'परम विनय' आणि
'मी काहीच जाणत नाही', हा भाव!

**द्रव्य मूल्य** : 100 रुपये

**मुद्रक** : अंबा ऑफसेट
B-99, इलेक्ट्रोनीक्स GIDC,
क-6 रोड, सेक्टर-25,
गांधीनगर-382044.
**फोन** : (079) 39830341

# त्रिमंत्र





नमो अरिहंताणं

नमो सिद्धाणं

नमो आयरियाणं

नमो उवज्झायाणं

नमो लोए सव्वसाहूणं

एसो पंच नमुक्कारो

सव्व पावप्पणासणो

मंगलाणं च सव्वेसिं

पढमं हवइ मंगलं ॥ १ ॥

ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥ २ ॥

ॐ नम: शिवाय ॥ ३ ॥

जय सच्चिदानंद





## समर्पण

या भयंकर कलियुगाच्या संसार–सागरात उत्पन्न झालेल्या
अशांतीच्या झंझावातात जागरूक मानव–मनाची नौका
किनाऱ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी मन:शांतीचे बंदर शोधणाऱ्या
जनसामान्यांसाठी,
जगत् कल्याणाच्या भावनेने प्रेरित,
वात्सल्य मूर्ती ज्ञानी पुरुष 'दादा भगवानांच्या' श्रीमुखातून
वाहिलेली ही ज्ञान–सरितारूपी आप्तवाणी,
निश्चितच एक अलौकिक वरदान सिद्ध होईल.
वादळात सापडलेल्यांच्या जीवन–नौकेला दादांचे हे
होकायंत्र ध्येयाची अचूक दिशा दाखवील, या भावनेने
आप्तवाणी श्रृंखलेची ही पहिली कडी
दादांजींचे आश्रित बनलेल्या मुक्त स्वजनांकडून
विनम्र भावाने सर्व मुमुक्षुंना समर्पित.

## आप्त विज्ञापन

हे सूज्ञजन! हे तुझेच 'स्वरूप', आज मी तुझ्या करकमलात येत आहे. कृपा करून त्याचा परम विनय बाळग. त्यामुळे तू आपोआपच 'स्व' प्रति परम विनयात राहून केवळ स्व–सुखाने भरलेल्या, पराधीन नसलेल्या, अशा स्वतंत्र आप्ततेचा अनुभव घेशील.

हीच आहे सनातन आप्तता, अलौकिक पुरुषाच्या आप्तवाणीची.

हाच सनातन आहे धर्म, अलौकिक आप्ततेचा.

जय सच्चिदानंद

# दादा भगवान कोण?

जून 1958 संध्याकाळची अंदाजे सहाची वेळ, सुरत स्टेशनवर अलोट गर्दी होती. रेल्वेच्या प्लेटफॉर्म नंबर तीनच्या बाकावर बसलेल्या श्री अंबालाल मूळजीभाई पटेल रुपी देहमंदिरात नैसर्गिक स्वरुपात कित्येक जन्मांपासून व्यक्त होण्यासाठी आतूर असलेले 'दादा भगवान' संपूर्णपणे प्रकट झाले आणि निसर्गाने सर्जन केले अध्यात्माचे अद्‌भुत आश्चर्य! एका तासात विश्वदर्शन लाभले! मी कोण? भगवंत कोण? जग कोण चालवत आहे? कर्म म्हणजे काय? मुक्ती कशाला म्हणतात? इत्यादी जगातील सर्व आध्यात्मिक प्रश्नांची रहस्ये संपूर्णपणे प्रकट झाली. अशाप्रकारे निसर्गाने विश्वाला प्रदान केले एक अद्वितीय, संपूर्ण दर्शन आणि ह्याचे माध्यम बनले अंबालाल मूळजीभाई पटेल, जे होते गुजरातच्या चरोतर जिल्ह्यातील भादरण गावचे पाटील, कॉन्ट्रॅक्टचा व्यवसाय करणारे आणि तरीही पूर्ण वीतराग पुरुष.

त्यांना प्राप्ती झाली तशी ते फक्त दोन तासात इतर मुमुक्षुनां सुद्धा आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत, त्यांच्या सिद्ध झालेल्या अद्‌भुत ज्ञान प्रयोगाद्वारे. त्याला अक्रम (क्रमविरहीत) मार्ग म्हटले जाते. अक्रम म्हणजे क्रमाशिवायचा आणि क्रम म्हणजे पायरी पायरीने, क्रमाक्रमाने वर चढणे! अक्रम म्हणजे लिफ्ट मार्ग! शॉर्ट कट!

ते स्वत: प्रत्येकाला 'दादा भगवान कोण?' याबद्दलची फोड करून देताना म्हणायचे की, ''हे दिसतात ते 'दादा भगवान' नाहीत. हे तर ए.एम. पटेल आहेत. आम्ही ज्ञानीपुरुष आहोत आणि आत प्रकट झाले ते दादा भगवान आहेत. दादा भगवान तर 'चौदालोक'चे नाथ आहेत, ते तुमच्यात पण आहेत, सर्वांमध्ये आहेत! तुमच्यात अव्यक्त रुपात आहेत आणि 'येथे' माझ्या आत संपूर्णपणे व्यक्त झालेले आहेत! माझ्या आत प्रकट झालेले 'दादा भगवान' यांना मी पण नमस्कार करतो.''

व्यापारात धर्म असावा परंतु धर्मात व्यापार नसावा. या सिद्धांताने त्यांनी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले. संपूर्ण जीवनात त्यांनी कधीही, कोणाकडूनही पैसे घेतले नाहीत, उलट स्वत:च्या व्यवसायातून झालेल्या फायद्यातून भक्तांना यात्रा करवित असत.

# निवेदन

आत्मविज्ञानी श्री अंबालाल मुळजीभाई पटेल, ज्यांना लोक 'दादा भगवान' या नावानेही ओळखतात, त्यांच्या श्रीमुखातून अध्यात्म आणि व्यवहार ज्ञानासंबंधी जी वाणी निघाली, ती रेकॉर्ड करून, संकलन व संपादन करून पुस्तकांच्या रुपात प्रकाशित केली जात आहे. त्याच साक्षात सरस्वतीचे अद्भूत संकलन ह्या पुस्तकात झाले आहे, जे आम्हा सर्वांसाठी वरदानरुप ठरेल.

प्रस्तुत अनुवादाची वाक्यरचना मराठी व्याकरणाच्या मापदंडावर कदाचित खरी ठरणार नाही, परंतु दादाश्रींच्या गुजराती वाणीचे शब्दश: मराठी अनुवाद करण्याचा प्रयत्न केला गेला आहे, की जेणे करून वाचकांना असा अनुभव व्हावा की दादाजींचीच वाणी ऐकली जात आहे. पण तरीसुद्धा दादाश्रींच्या आत्मज्ञानाचे अचूक आशय, जसे आहे तसे तर तुम्हाला गुजराती भाषेतच अवगत होईल. ज्यांना ज्ञानाचा गहन अर्थ समजून घ्यायचा असेल, ज्ञानाचे खरे मर्म जाणायचे असेल, त्यांनी या हेतूने गुजराती भाषा शिकावी अशी आमची नम्र विनंती आहे.

अनुवादातील त्रूटींसाठी आपली क्षमा प्रार्थितो.

## वाचकांना...

❖ 'आप्तवाणी'मध्ये मुद्रित पाठ्यसामग्री मूळत: 'आप्तवाणी श्रेणी-1' या गुजराती पुस्तकाचे मराठी अनुवाद आहे.

❖ जिथे-जिथे 'चंदुभाऊ' या नावाचा उल्लेख केला आहे, तिथे वाचकांनी स्वत:चे नाव समजून वाचन करावे.

❖ पुस्तकातील कोणतीही गोष्ट जर तुम्हाला समजली नाही, तर प्रत्यक्ष सत्संगात येऊन त्याचे समाधान मिळवावे अशी नम्र विनंती.

❖ दादाश्रींच्या श्रीमुखातून निघालेले काही गुजराती शब्द जसेच्या तसे *'इटालिक्स'* मध्ये ठेवले आहेत, कारण त्या शब्दांसाठी मराठीमध्ये तसेच कोणतेही शब्द उपलब्ध नाहीत की ज्यामुळे त्याचा अर्थ पूर्णपणे समजता येईल. पण तरीही त्या शब्दाचे समानार्थी शब्द ( ) कंसात लिहिलेले आहेत.

# दादा भगवान फाउन्डेशनची प्रकाशित पुस्तके

## मराठी

1. भोगतो त्याची चूक
2. एडजस्ट एवरीव्हेर
3. जे घडले तोच न्याय
4. संघर्ष टाळा
5. मी कोण आहे ?
6. क्रोध
7. चिंता
8. प्रतिक्रमण
9. भावना सुधारे जन्मोजन्म
10. कर्माचे विज्ञान
11. पाप-पुण्य
12. आई-वडील आणि मुलांचा व्यवहार
13. पति-पत्नीचा दिव्य व्यवहार
14. समजपूर्वक प्राप्त ब्रह्मचर्य
15. मानव धर्म
16. मृत्युवेळी, आधी आणि नंतर
17. सेवा-परोपकार
18. दान
19. त्रिमंत्र
20. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
21. चमत्कार
22. सत्य-असत्याचे रहस्य
23. वाणी, व्यवहारात
24. पैशांचा व्यवहार
25. क्लेश रहित जीवन
26. निजदोष दर्शनाने...निर्दोष!
27. प्रेम
28. गुरू-शिष्य
29. अहिंसा
30. आप्तवाणी-1

## हिन्दी

1. ज्ञानी पुरुष की पहचान
2. सर्व दु:खों से मुक्ति
3. कर्म का सिद्धांत
4. आत्मबोध
5. मैं कौन हूँ ?
6. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर...
7. भुगते उसी की भूल
8. एडजस्ट एवरीव्हेयर
9. टकराव टालिए
10. हुआ सो न्याय
11. चिंता
12. क्रोध
13. प्रतिक्रमण
14. दादा भगवान कौन ?
15. पैसों का व्यवहार
16. अंत:करण का स्वरूप
17. जगत कर्ता कौन ?
18. त्रिमंत्र
19. भावना से सुधरे जन्मोंजन्म
20. प्रेम
21. माता-पिता और बच्चों का व्यवहार
22. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य
23. दान
24. मानव धर्म
25. सेवा-परोपकार
26. मृत्यु समय, पहले और पश्चात
27. निजदोष दर्शन से... निर्दोष
28. पति-पत्नी का दिव्य व्यवहार
29. क्लेश रहित जीवन
30. गुरु-शिष्य
31. अहिंसा
32. सत्य-असत्य के रहस्य
33. चमत्कार
34. पाप-पुण्य
35. वाणी, व्यवहार में...
36. कर्म का विज्ञान
37. आप्तवाणी-1 से 9 और 13 (पूर्वार्ध-उत्तरार्ध)
38. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य (पूर्वार्ध-उत्तरार्ध)
39. ज्ञानीपुरुष-1

**★ दादा भगवान फाउन्डेशन द्वारे गुजराती आणि इंग्रजी भाषेत सुद्धा बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहे। वेबसाइट www.dadabhagwan.org वर सुद्धा आपण ही सगळी पुस्तके प्राप्त करू शकता।**

**★ प्रत्येक महिन्यात हिन्दी, गुजराती आणि अंग्रेजी भाषेत दादावाणी मेगेझीन प्रकाशित करीत आहे।**

# संपादकीय

'सर्वज्ञ दादा भगवान' यांच्या प्रकट सरस्वती स्वरूप वाणीचे इथे संकलन करण्यात आले आहे. ज्यांच्या सुचरणी काळ, कर्म आणि माया विसावतात. अशा परमात्म स्वरूप ज्ञानींच्या हृदयस्पर्शी प्रकट वाणीने अनेक मुमुक्षुंना दिव्यनेत्रांची प्राप्ती घडविली आहे! आशा आहे की जो कोणी या महाग्रंथाचे 'सत् जाणून घेण्याच्या कामनेने' अध्ययन करेल, त्याला दिव्यचक्षुंची अवश्य प्राप्ती होईलच. अट मात्र इतकीच की त्याची अंत:करणपूर्वक इतकी दृढ भावना असली पाहिजे की मला केवळ 'परम सत्य'च जाणून घ्यायचे आहे, दुसरे काहीच जाणायचे नाही. दुसरे काही जाणण्याची थोडीशी जरी गुप्त आकांक्षा असेल तर ती मताग्रहामुळेच असेल. 'परम सत्य'च जाणून घ्यायची एकमेव तीव्र आकांक्षा आणि 'मताग्रह', हा विरोधाभास आहे! आग्रह आणि मतमतादि बाळगून मोक्ष, मुक्ती प्राप्त होणे हे कधीच शक्य नाही. संपूर्ण निराग्रही, निष्पक्षपाती झाल्यानंतरच कार्य सफळ होईल! मोक्ष तर 'ज्ञानी पुरुषांच्या चरणींच आहे! अशा मोक्षदाता ज्ञानी पुरुषाची जर ओळख पटली आणि त्यांच्याशी तार जोडली गेली तर रोकडा मोक्ष हातात येईल! अशा या रोकड मोक्षाची प्राप्ती अनेक लोकांना झाली आहे आणि ती सुद्धा एका तासातच! जी गोष्ट स्वीकारणे कठीण, पूर्वी कधी ऐकलीही नसेल अशी ही अपूर्व गोष्ट आहे. तरी सुद्धा अनुभवात आलेली ही हकीगत आहे.

मोक्ष अति-अति सुलभ आहे पण 'ज्ञानी पुरुषा'ची भेट होणे हे अति-अति दुर्लभ आहे. आणि भेट झाल्यानंतर त्यांची ओळख पटणे हे तर अति-अति, शंभरदा दुर्लभ, दुर्लभ दुर्लभ आहे!

'परम सत्य जाणून घेण्याची ज्याला कामना' आहे अशा जिज्ञासूला ज्ञानी पुरुषाचे वर्णन, त्यांची ओळख पटण्यासाठी नक्कीच अत्यंत उपयोगी होईल. ज्ञानी पुरुषाची ओळख कशी करावी? त्यांना कसे ओळखावे?

ज्ञानी पुरुषाची ओळख एकमात्र त्यांच्या वीतराग वाणीने घडू शकेल. दुसरे कोणतेही साधन या काळात उपलब्ध नाही. पूर्वीच्या काळी लोक आध्यात्मिक दृष्ट्या इतके डेव्हलप (प्रगत) झालेले होते की त्यांना

ज्ञानींचे नेत्र पाहूनच त्यांच्या वीतरागतेची ओळख पटत होती. ज्ञानी पुरुष क्षणभर सुद्धा वीतरागता विहीन असू शकत नाहीत!

एकंदरीत ज्ञानी पुरुषांना त्यांच्या गुणांमुळेच ओळखले पाहिजे, पण मग त्यांच्या गुणांची ओळख सामान्य मनुष्याला कशी होऊ शकेल?

ज्ञानी पुरुषात 1008 गुण असतात. त्यातील मुख्य चार गुण असे असतात की जे इतर कुणालाही प्राप्त होऊ शकत नाही.

(1) ज्ञानीत सूर्यासारखा प्रताप असतो. अत्यंत प्रतापी पुरुष असतात. प्रताप त्यांच्या डोळ्यातच झळकत असतो. तो प्रताप तर जेव्हा ते दाखवतात तेव्हाच कळतो.

(2) त्यांच्यात चंद्रासारखी सौम्यता असते. त्यांची सौम्यता कशी तर त्यांच्या शीतलतेचा अनुभव घेणाऱ्या व्यक्तीला त्यांच्यापासून दूर होण्याची इच्छाच होत नाही. त्यांची सौम्यता तर सूर्याच्या भयंकर उष्णतेला सुद्धा विरघळून टाकेल अशी असते. कितीही भडकलेला समोर येऊ दे, नेत्रात नितळत असलेली सौम्यता पाहाताच तो बर्फासारखा थंडगार होऊन जातो. प्रताप आणि सौम्यता, हे दोन्ही गुण एकमात्र ज्ञानीतच असू शकतात. नाही तर असे आढळते की कित्येकांजवळ प्रताप असतो पण सौम्यता नसते आणि सौम्यता असेल तर प्रताप नसतो. यथार्थ ज्ञानींच्या एका डोळ्यात प्रताप आणि एका डोळ्यात सौम्यता असते.

(3) सागरासारखी गंभीरता असते. जो कोणी जे काही देईल ते आत सामावून घेतात आणि वर आशीर्वाद देतात.

(4) त्यांची स्थिरता, अचलता तर मेरुपर्वतासारखी असते. कोणताही बाह्य संयोग त्यांच्या आंतरिक स्थिरतेला विचलित करू शकत नाही. ही अचलता आणि संगी चेतना, यात पुष्कळ फरक आहे. काही माणसे दिव्यावर दहा मिनिटांपर्यंत न हलवता हात धरतात, त्यास काही स्थिरता म्हणता येणार नाही. हा तर हठाग्रह आहे, अहंकार आहे. ज्ञानी पुरुष संपूर्ण निर्अहंकारी असतात, सहज असतात. देहावर होणाऱ्या परिणामांशी त्यांना काही देणेघेणे नसते. ज्ञानी तर जिथे भाजले जाईल अशा ठिकाणी

एक तर हात घालतच नाही आणि जर चुकून पडलाच तर लगेच हात मागे घेतात. त्यांचा देह सुद्धा सहज स्वभावातच असतो. बाकी, आतील ज्ञानस्थिरता तर अद्‌भुत असते! कोणत्याही संयोगात आतील एक सुद्धा परमाणू विचलित होत नाही, यालाच खरी स्थिरता म्हटली जाते! आत कसलीही दखल नसते, जरा सुद्धा जळजळ उत्पन्न होत नाही, तीच खरी स्थिरता. बाहेरील जळजळ हा तर देहाच्या स्वाभाविक गुणाचाच परिणाम असतो. तिचा आंतरिक परिणतीशी काहीच संबंध नसतो.

ज्ञानींमध्ये अपार करुणा असते, ते करुणेचे सागर असतात. त्यांच्यात दया किंचितमात्र नसते. दया हा तर अहंकारी गुण आहे, द्वंद्वगुण आहे. जिथे दया आहे तिथे एका कोपऱ्यात निर्दयता असतेच. ती तर जेव्हा बाहेर पडते तेव्हाच कळते. ज्ञानी द्वंद्वातीत असतात. ज्ञानींच्या नेत्रात निरंतर अमृताचाच वर्षाव होत असतो. 'या पेट्रोलच्या अग्नित सतत जळत असणाऱ्या जगातील सर्व जीवांना कशा तऱ्हेने कायमची शीतलता प्रदान करू' अशीच भावना त्यांच्यात निरंतर वाहत राहते.

ज्ञानींमध्ये बालकासारखी निर्दोषता असते. बालकाची निर्दोषता समज नसल्यामुळे असते, ज्ञानी समजदारीच्या शिखरावर असून सुद्धा निर्दोष असतात. ते स्वत: दृष्टी निर्मळ करून स्वयं निर्दोष झालेले असतात आणि संपूर्ण जगास देखील निर्दोषच पाहतात! ज्ञानींमध्ये आडमुठेपणा नावालाही नसतो. आडमुठेपणा, हा अहंकाराचा प्रत्यक्ष गुण आहे. मोक्षाची गल्ली अत्यंत अरुंद असते. त्यात आडवे होऊन जाताच येणार नाही. सरळ होऊन चाललात तर सहज आरपार निघता येईल. आडमुठेपणा हा तर मोक्षमार्गातील सर्वात मोठी अडचण आहे. ज्ञानीची सरळता ही तर वर्ल्डमध्ये टॉपमोस्ट असते. संपूर्ण निर्‌हंकारीपदावर विराजमान असल्यामुळे जसे म्हणाल तसे करण्यास ते तयार असतात. कुणी म्हणाले की, 'या गादीवरुन उठा.' तर ते म्हणतील, 'बरे बाबा, तू म्हणशील तसे करतो.' ज्ञानीला कोणी कितीही डिवचले तरी ज्ञानींवर त्याचा परिणाम होत नाही. डिवचल्यावर कळते की त्यांच्यात किती अद्‌भुत वीतरागता आहे! जर डिवचल्यावर फणा उगारला तर समजून घ्या की हे ज्ञानी नव्हेत. ज्ञानी पुरुषामध्ये आग्रहाचा एक सुद्धा परमाणू

नसतो. ते संपूर्ण निराग्रही असतात, आग्रह हा तर विग्रह आहे आणि निराग्रहतेमुळे मोक्ष आहे. भगवंताने कोणत्याही प्रकारचा आग्रह करण्यास नकार दिला आहे. एकमात्र मोक्ष मिळविण्यासाठीच ज्ञानी पुरुषाचा आग्रह मान्य केला आहे कारण त्यांच्या चरणीच मोक्ष आहे. ज्ञानी पुरुषाची भेट घडली आणि जर त्यांची कृपादृष्टी प्राप्त झाली तर मोक्ष सहज प्राप्त होईल असा आहे!

ज्ञानींचे प्रेम, हे शुद्ध प्रेम आहे आणि तोच परमार्थ प्रेमाचा अलौकिक झरा आहे. हा शुद्धप्रेमाचा झरा संपूर्ण जगाच्या अग्निचे शमन करतो.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्ञानी पुरुष संपूर्ण निष्पक्षपाती असतात. पक्षापक्षात पडणारा तर मतांध म्हटला जातो. मतांध सत्यवस्तूची प्राप्ती कधीच करू शकत नाही. जेव्हा संपूर्ण निष्पक्षता उत्पन्न होते, तेव्हाच सर्वज्ञपदाची प्राप्ती होते. अरे! ज्ञानी स्वत:च्या मन, वचन आणि कायेचा सुद्धा पक्ष घेत नाहीत, संपूर्ण निष्पक्षपाती असतात आणि तेव्हाच तर सर्वज्ञ पदाची प्राप्ती होते. जर एका पक्षाच्या बाजूने असतील तर एकपक्षी म्हटले जातील. सर्वज्ञ म्हटले जाणार नाहीत. ज्ञानी पुरुषाची सभा असेल तिथे तर ख्रिश्चन, मुस्लिम, वैष्णव, जैन, स्वामिनारायण, पारसी, खोजा इत्यादी सर्व धर्माचे लोक अभेद भावाने बसतात. आणि प्रत्येकाला असेच वाटते की ज्ञानी पुरुष माझ्या धर्माचेच आप्तपुरुष आहेत. एका अज्ञानीची लाख मते असतात तिथे लाख ज्ञानींचे एकच मत असते.

ज्ञानी एकीकडे सर्वज्ञ पण असतात आणि दुसरीकडे अबुध पण असतात. बुद्धीचा थेंब सुद्धा आढळणार नाही. जिथे बुद्धीप्रकाशचा संपूर्णपणे अस्त होतो तिथे सर्वज्ञपद वाजत-गाजत, हारतुरे घेऊन उदयास येते! हाच तर नियम आहे की जो अबुध होतो तोच सर्वज्ञ होऊ शकतो.

ज्ञानींची वाणी, वर्तन आणि विनय मनोहारी असते. त्यांची वाणी, वर्तन आणि विनय कुठे पाहायला सुद्धा मिळणार नाही असे अनुपम असते! त्यांच्या वाणीत संपूर्ण स्याद्‌वाद आढळतो ज्यामुळे कोणत्याही जीवाचा दृष्टीबिंदू किंचितमात्रही दुखावला जात नाही. त्यांची वचने

सहजतेने हृदयात उतरतात आणि नंतर योग्य वेळी (गरज असेल तेव्हा) प्रतिबोध रुपाने प्रकटही होतात. ज्ञानींनी पेरलेले बोधबीज थेट मोक्षापर्यंत पोहोचविते. ते कधीही व्यर्थ जात नाही. ज्ञानींचे वचनबळ तर अद्‌भुत असते!

ज्ञानी पुरुष तर कुणाला म्हणायचे की ज्यांना या जगात जाणून घेण्यासारखे काहीच उरलेले नाही, पुस्तके वाचण्याचे किंवा कुठल्याही श्रेणीत उत्तीर्ण होण्याचेही बाकी राहिले नाही! त्यांना माळ जपण्याची गरज नाही, काहीही करण्याचे किंवा समजून घेण्याचे उरले नाही. ते तर सर्वज्ञ असतात आणि मुक्त मनाने संसारात विचरत असतात!

ज्ञानी पुरुषांची दशा कळेनाशी असते. सामान्य माणसांना सहज कळेल अशी नसते. त्यांना आश्रमाचा श्रम नसतो, ध्वजा नसते, पंथ किंवा संप्रदाय नसतो, बोर्ड नसतो, भगवी किंवा पांढरी वस्त्रे नसतात. सरळ, साध्या वस्त्रात वावरत असतात, त्यामुळे सामान्य लोक त्यांना कसे ओळखतील? तरी पण त्यांची ओळख पटण्यात चूकभूल होऊ नये म्हणून शास्त्रे सुचवितात की ज्ञानी पुरुष तर तेच की जे निशिदिनी आत्म्याच्या उपयोगातच असतात, त्यांची वाणी अनुभवगम्य असते, त्यांना अंतरंगी स्पृहा नसते, गर्व किंवा गारवता नसते, जगातील कुठल्याही वस्तूसाठी भिकारी वृत्ती नसते! मानाची, विषयभोगाची, लक्ष्मीची किंवा शिष्यांची सुद्धा भीक नसते. संपूर्ण अयाचक पदाची प्राप्ती झाल्यानंतरच ज्ञानप्रकाश प्रकटतो. जे संपूर्णपणे तरण-तारणहार झालेले असतात, तेच इतरांना तारू शकतात.

ज्ञानी पुरुषांमध्ये तर कित्येक सांयोगिक पुरावे एकत्र झालेले आढळतात, उच्च नामकर्म असते. यशकर्म असते. यश तर काहीही न करता समोरून त्यांच्या पदरी येऊन पडते. सुरेख मनोहर वाणी असते. लोकपूज्य पद असते आणि असे अनेक गुण एकत्र येतात तेव्हा ज्ञानी पुरुष प्रकट होतात.

ज्ञानींना पुस्तक वाचण्याची गरज नसते, माळ जपण्याचीही गरज नसते, तिथे भक्त आणि भगवंत हा भेदच नसतो. भगवंत हा शब्द तर

विशेषण आहे आणि ज्यांना भगवत् गुणांची प्राप्ती होते त्यांच्यासाठी भगवंत हा शब्द विशेषण रूपाने वापरला जातो.

जोपर्यंत चुका आहेत तोपर्यंत माथी देव (वरिष्ठ म्हणून) आहे. चूकरहित झालो की कुठलाही देव आपला वरिष्ठ नाही. ज्ञानी पुरुषात एक सुद्धा चूक शिल्लक नसते, त्यामुळे त्यांचा कुणी वरिष्ठही नाही आणि कुणी अंडरहॅन्ड सुद्धा नाही. स्वतः संपूर्ण स्वतंत्र असतात.

ज्ञानींचे प्रत्येक कर्म दिव्य असते. एकही कर्म कुठेही बंधन करणारे नसते. संसाराचे लौकिक कर्म स्वतःचे बीज पेरून जातात, तिथे ज्ञानींचे कर्म मुक्ती देऊन जातात. अरे, ते स्वतः तर मुक्त पुरुषच असतात, इतकेच नव्हे तर ते कित्येकांना मुक्ती प्रदान करून देण्यासाठी सामर्थ्यवान असतात!

ज्ञानी निर्ग्रंथ असतात. त्यांच्या सर्व ग्रंथींचे छेदन झालेले असते. ज्ञानी पुरुषांना त्यागात्याग संभव नसतो. आणि ही गोष्ट स्वतः भगवंतांनीच उघड केलेली आहे. ज्ञानींमध्ये नावीन्य नसते आणि ज्या स्थितीत ज्ञान प्रकट झाले तीच स्थिती कायमची असते. म्हणून तर इतरांना त्यांची दशा पटकन ओळखता येत नाही. लोक जर त्यागाच्या आधारावर ज्ञानींना शोधायला निघाले तर त्यांना ओळख कशी पटेल?

ज्ञानी पुरुषाचे तीन गुण जर कोणी आत्मसात केले तर त्याचे काम होईल! मग तो मुक्तच होऊन जाईल. ते तीन गुण आहेत– क्रॉम्प्रेसिबल, फ्लेक्सिबल आणि टेन्साईल.

क्रॉम्प्रेसिबल म्हणजे संकोचनशील कितीही प्रेशर आले तरी ते स्वतः संकोचून जाऊन दाब सहन करू शकतात आणि लगेचच यथास्थित होऊन जातात! फ्लेक्सिबल म्हणजे जसे वाकवू तसे वाकतात पण कधी मोडत नाहीत! आणि टेन्साईल म्हणजे कितीही टेन्शन आले तरी ते झेलू शकतात!

या तीन गुणांमुळे संसार व्यवहारात त्यांना कुठेही अडचण येत नाही आणि ते निर्‌अंतरायपणे मोक्ष प्राप्त करू शकतात.

ज्ञानी पुरुष गुरूतम–लघुतम असतात. ज्ञानींना कोणी गाढव म्हटले

तर ते म्हणतील, 'भाऊ, मी तर त्याच्याहीपेक्षा लघु आहे, लघुतम आहे. तू कल्पना पण करू शकणार नाहीस तितका लघुतम आहे.' आणि कुणी जर ज्ञानी पुरुषाला आचार्य म्हटले तर ते त्याला म्हणतील, 'भाऊ, तुला जर याहीपेक्षा अधिक प्राप्त करण्याची इच्छा असेल तर आम्ही याहूनही वरच्या पदात आहोत, आम्ही भगवंत आहोत.' ज्याला जे प्राप्त करायचे असेल तसे जर तो समजेल तेव्हा त्याचे काम होईल! आत्मा स्वत: अगुरू-लघु स्वभावाचा आहे.

जगात 'आप्त पुरुष' फक्त ज्ञानी पुरुषालाच म्हटले जाते. आप्त म्हणजे सर्व प्रकारे विश्वास करण्यास योग्य. संसाराच्या बाबतीतच नव्हे तर मोक्षप्राप्तीसाठी शेवटपर्यंत विश्वास करण्यायोग्य असतात. जोपर्यंत स्वत:ला आत्मभान होत नाही, आत्म्याची ओळख झालेली नाही तोपर्यंत प्रत्यक्ष ज्ञानी पुरुषच स्वत:चा आत्मा आहे. ज्ञानी पुरुष मूर्तीमंत मोक्ष स्वरूप असतात. त्यांना पाहून स्वत:चा आत्मा प्रकट करायचा असतो. ज्ञानी पुरुष पारसमणी म्हटले जातात आणि अज्ञानी म्हणजे लोखंड, तर त्यांचा स्पर्श होताच ते सोने बनून जातात! परंतु मधे पडदा ठेवला नाही तर! ज्ञानी पुरुषांजवळ अनंत प्रकारच्या ज्ञानकला असतात, अनंत प्रकारच्या बोधकला आणि अनंत प्रकारच्या प्रज्ञाकला असतात. म्हणून ज्यांना जे पाहिजे असेल ते घेऊन जा आणि आपले (मोक्षाचे) काम करून घ्या.

आत्मा जाणायचा असेल तर ज्ञानी पुरुषांजवळ जावेच लागेल. जाणकाराशिवाय तर कोणतीही वस्तू मिळत नाही. म्हणून निर्विकल्प समाधिस्थ अशा ज्ञानी पुरुषाकडे जावेच लागेल. ज्ञानी पुरुष 'शुद्ध चैतन्य' तळहातावर ठेऊन देतात. ज्ञानी पुरुष वाटेल ते करू शकतात आणि तरीही निमित्त भावातच राहतात. ज्ञानी कोणत्याही वस्तूचे कर्ता नसतात.

प्रत्येक शास्त्राचे सार तर शेवटी हेच निघते की प्रकट आत्मा प्राप्त करायचा असेल तर तू ज्ञानींकडे जा. प्रज्वलित दिवाच दुसऱ्या दिव्याला प्रज्वलित करू शकतो. म्हणून 'गो टू ज्ञानी'. कारण, ज्ञानी सदेह आत्मस्वरुप झालेले असतात अर्थात तरणतारणहार असतात!

ज्ञानी निरंतर वर्तमानातच राहत असतात. भूतकाळात किंवा

भविष्यकाळात नसतात. निरंतर वर्तमानातच वर्तत असतात. त्यांच्या दृष्टीने ग्लास फुटला तर तो भूतकाळ आणि आता काय होईल याचेच विचार आणि चिंता करणे हा भविष्यकाळ. ज्ञानी '*समय*' अर्थात काळाच्या लहानात लहान अविभाज्य लघुतम अंशातच राहतात. संपूर्ण ब्रह्मांडातील प्रत्येक परमाणू बद्दल ते अवगत असतात. प्रत्येक ज्ञेयाचे ज्ञाता-द्रष्टाच असतात. *समय* आणि परमाणूपर्यंत पोहोचणे हे तर केवळ ज्ञानींचेच काम!

'गत वस्तूचा विचार नाही, भविष्याची वांछना नाही,
वर्तमानात वर्ततात तेच ज्ञानी.'

'परम विनय' आणि 'मी काहीच जाणत नाही' या दोनच वस्तूसहित जो ज्ञानींजवळ येतो, तो अवश्य भवसागर तरून पार होतोच. अरे, फक्त एकदाच जरी ज्ञानींच्या चरणीं सर्व भाव समर्पण करून परम विनयपूर्वक नतमस्तक झाला तर त्याचाही मोक्ष होतो, असे प्रचंड आश्चर्य आहे!

या 'दादा भगवानांनी' कधीच, स्वप्नात सुद्धा कुणाची विराधना केली नाही, केवळ आराधनाच केली आहे. म्हणून 'दादा भगवान' यांच्या नामोच्चाराने, सद्भावनेने जे काही केले जाते ते अवश्य फळते.

ज्ञानींचे वर्णन करण्यास वाणी असमर्थ आहे. तिथे लेखणी थांबते.

ज्ञानी तर अतुलनीय असतात. त्यांचे मोज-माप काढू नका. त्यांचे मोज-माप काढायला गेलात तर कोणी सोडवू शकणार नाही, असे चारही बंध पडतील, स्वत:च्या तराजूने ज्ञानींचे मोज-माप काढणे शक्य आहे का? त्यांचे मोज-माप काढायला जाशील तर तुझ्याच मतीचे माप निघून जाईल! ज्याचे एक अक्षरही माहीत नाही त्याचे माप कसे काढाल? ज्ञानींना बुद्धीने तोलले जाऊ शकत नाही. ज्ञानींजवळ तर अबुध व्हावे लागते. बुद्धी तर उलटच दाखवते. जर ज्ञानींची वाणी समजली नाही तर असे समजावे की तेवढाच आडमुठेपणा आपल्या आत भरलेला आहे. जर चुकून सुद्धा ज्ञानींपुढे आडमुठेपणा केला तर कधीच मोक्ष प्राप्त होणार नाही. अरे, मोक्ष तर ज्ञानींच्या चरणी आहे आणि तिथेच जर सरळ वागला नाहीत तर मोक्ष कुठून मिळेल?

डाकीण सुद्धा एक घर सोडते. म्हणून फक्त एक ज्ञानींना सोडून दुसऱ्या कुठल्याही ठिकाणी ढवळाढवळ केलीस तरी सुटण्याचा काही तरी मार्ग सापडेल, पण ज्ञानींजवळ असे काही चालणार नाही. तिथे मग भयंकर कर्म बंध पडेल.

ज्ञानींचा विरोध चालेल पण विराधना चालणार नाही. ज्ञानींची आराधना झाली नाही तरी हरकत नाही, परंतु विराधना होता कामा नये, हे सदैव लक्षात ठेवावे. ज्ञानींचे पद हे अजब पद म्हटले जाते. त्यांच्या विराधनेत पडूच नये.

ज्ञानी पुरुषावर अभाव उत्पन्न होणे यालाच विराधना म्हणतात. आणि ज्ञानी पुरुष म्हणजेच स्वत:चा आत्मा. म्हणून ज्ञानींची विराधना म्हणजे स्वत:च्या आत्म्याचीच विराधना झाली असे म्हटले जाईल. अर्थात स्वत: 'स्वत:चाच' विराधक झाला!

वाकडा स्वभाव असेल त्याने तर फार सावध राहावे. ज्ञानींची एक विराधना असंख्य काळाची नरकगती बांधण्यास कारण ठरते!

ज्यांना 'तीनलोकांचे' नाथ वश आहेत, तिथेही जर सरळ झाला नाहीस तर मग कुठे सरळ होशील? ज्ञानी पुरुषाकडे तर पूर्णपणे सरळ होशील तरच काम होईल.

प्रस्तुत ज्ञानग्रंथ प्रकाशनाचे प्रयोजन प्रामुख्याने सात्त्विक विचारकवर्ग, वैज्ञानिक मानसिकता असलेला विचारकवर्ग आणि संसारी ज्वालांनी तप्त झालेले लोक, यांना आत्मशांती मिळो, हेच आहे. अशी हार्दिक भावना आहे की या भयंकर कलियुगी तपाग्निमध्ये सत्‌युगसमान आत्मशांतीची अनुभूती करविण्यास हे प्रस्तुत प्रकाशन प्रबळ निमित्त सिद्ध होवो. शुद्ध भावनेसह हीच प्रार्थना!

**- डॉ. नीरूबहन अमीन**

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| धर्माचे स्वरुप | 1 |
| जगाची निर्मिती | 3 |
| जग एक कोडे | 4 |
| 'व्यवस्थित शक्ती' | 6 |
| भगवंताचा ॲड्रेस | 6 |
| भगवंत उपरी आणि मोक्ष | 8 |
| रिलेटिव्ह धर्म : रियल धर्म | 9 |
| क्रमिक मोक्षमार्ग : अक्रम... | 11 |
| कॉमनसेन्स | 12 |
| सांसारिक संबंध | 13 |
| सुख आणि दु:ख | 14 |
| प्रारब्ध-पुरुषार्थाचे विरोधाभासी... | 14 |
| अविरोधाभासी अवलंबन | 17 |
| आत्मा-अनात्मा | 19 |
| दिव्यचक्षुंनी मोक्ष | 20 |
| पुनर्जन्म | 21 |
| मन-वचन-काया, इफेक्टिव | 22 |
| आधि-व्याधि-उपाधि | 24 |
| जगत् आणि ब्रह्म | 25 |
| मन-वचन-कायेची भुताटकी | 26 |
| आगम-निगम | 28 |
| पूरण आणि गलन | 28 |
| संसारविघ्ने निवारक 'त्रिमंत्र' | 30 |
| चिंता आणि अहंकार | 32 |
| प्राप्ताला उपभोगा | 34 |
| ध्यान आणि अपध्यान | 35 |
| 'ध्यान आणि हेतू' या... | 39 |
| बुद्धी वापरण्याची मर्यादा | 40 |
| अविरोध वाणी प्रमाण | 41 |
| ज्ञानी आणि धर्माचे स्वरुप | 42 |
| निर्दोष दृष्टी | 44 |
| नशा आणि मोक्ष | 45 |
| मन-वचन-काया यांची लफडेबाजी | 45 |
| मोक्षच उपादेय आहे | 46 |
| थोतांड जग | 48 |
| मनुष्यांचा निराश्रितपणा | 50 |
| नैसर्गिक तंत्र संचालन... | 51 |
| भौतिक डेव्हलपमेंट... | 53 |
| प्राकृतिक साहजिकता | 54 |
| साधक दशा | 56 |
| पुण्य आणि पाप | 56 |
| संकल्प-विकल्प | 60 |
| सर्जन-विसर्जन | 60 |
| पुरुष आणि प्रकृती | 61 |
| त्रिगुणात्मक प्रकृती | 62 |
| आत्मा : सगुण-निर्गुण | 64 |
| प्राकृत पूजा - पुरुष पूजा | 65 |
| प्रकृतीधर्म - पुरुषधर्म | 65 |
| प्राकृत - बाग | 66 |
| वैराग्याचे प्रकार | 67 |
| आत्म्याचा उपयोग | 67 |
| मनुष्यपणाचे डेव्हलपमेंट | 70 |
| माया आणि मुक्ती | 70 |
| सुखाचा प्रकार | 71 |
| मळ-विक्षेप-अज्ञान... | 72 |
| वाणीचे विज्ञान | 74 |
| मौन - परमार्थ मौन | 77 |
| अंत:करण | 78 |
| मन कसे आहे? विचार म्हणजे... | 79 |
| कार्य प्रेरणा मनामुळे होते | 82 |
| ज्ञाता - ज्ञेयचा संबंध | 83 |
| मनावर स्वार व्हा | 84 |
| लक्ष्मीजींचा वास कुठे? | 86 |
| मनाचा संकोच - विकास | 87 |
| मनाचे वक्र परिणाम | 88 |
| मनाचा स्वभाव | 89 |
| मनाच्या गाठी वितळतील कशा? | 91 |
| मन फिजिकल आहे | 93 |
| मनाचे प्रकार | 93 |
| मन-आत्म्याचा ज्ञेय-ज्ञाता संबंध | 94 |
| बुद्धी प्रकाश - ज्ञान प्रकाश | 95 |
| बुद्धीचे प्रकार | 96 |

| | |
|---|---|
| बुद्धीचा आशय | 97 |
| गणपती : बुद्धीचे अधिष्ठाता देव | 98 |
| बुद्धीजन्य अनुभव आणि... | 99 |
| मतभेद कशामुळे? | 101 |
| व्यापार चोख करा | 105 |
| लक्ष्मीची कमतरता कशामुळे? | 107 |
| बुद्धीक्रिया आणि ज्ञानक्रिया | 107 |
| बुद्धीभेद तिथे मतभेद | 109 |
| अवधानाची शक्ती | 111 |
| अंत:करणाचे तिसरे अंग : चित्त | 113 |
| ज्ञानीच शुद्ध आत्मा देऊ शकतात | 115 |
| चित्त प्रसन्नता | 117 |
| अहंकार | 118 |
| त्याग कशाचा करावा? | 119 |
| कोण भोगत आहे? | 121 |
| अहंकाराचा रस खेचून घ्या | 122 |
| हसत मुखाने विष पितो | 123 |
| अदीठ तप म्हणजे काय? | 126 |
| मान-अपमानाचे खाते | 127 |
| अहंकाराचे विष | 128 |
| अहंकाराचे समाधान | 130 |
| अटकण आणि सेन्सिटिवनेस | 131 |
| अंत:करणाचे संचालन | 132 |
| ऐच्छिक आणि अनिवार्य | 136 |
| जगाचे अधिष्ठान | 138 |
| निश्चेतन चेतन | 144 |
| मनुष्य देह मोक्षाचा अधिकारी | 147 |
| इच्छा | 149 |
| भाव म्हणजे काय? | 152 |
| सज्जनता - दुर्जनता | 153 |
| देहाचे तीन प्रकार | 154 |
| देहाध्यास केव्हा तुटेल | 158 |
| देहाच्या तीन अवस्था | 159 |
| मनुष्य देहाचे प्रयोजन | 162 |
| आचार, विचार आणि उच्चार | 162 |
| उद्वेग | 165 |
| निद्रा | 168 |
| स्वप्न | 169 |
| भय | 173 |
| हिताहिताचे भान | 175 |
| लाईफ एडजस्टमेंटस् | 176 |
| संघर्ष | 177 |
| इकॉनॉमी | 178 |
| विषय | 180 |
| प्रेम आणि आसक्ती | 188 |
| नॅचरल लॉ - 'भोगतो त्याची... | 191 |
| निजदोष दर्शन | 196 |
| चुका | 200 |
| आडमुठेपणा - स्वच्छंद | 205 |
| शंका | 210 |
| मताग्रह | 211 |
| दृष्टीराग | 212 |
| वैरभाव | 213 |
| संसारसागराची स्पंदने | 213 |
| क्लेश | 217 |
| वास्तवात सुख-दु:ख म्हणजे... | 221 |
| दोषदृष्टी | 223 |
| स्मृती | 224 |
| असुविधेत सुविधा | 225 |
| चार्ज आणि डिस्चार्ज | 227 |
| मोहाचे स्वरूप | 233 |
| माया | 236 |
| क्रोध | 238 |
| लोभ | 239 |
| कपट | 241 |
| क्रोध-मान-माया-लोभाचा आहार | 241 |
| होम डिपार्टमेंट : फॉरेन... | 243 |
| संयोग | 244 |
| प्राकृत संयोग | 252 |
| योग-एकाग्रता | 254 |
| निर्विकल्प समाधी | 256 |
| ध्याता-ध्येय-ध्यान | 257 |
| गुरूकिल्ली | 261 |
| 'अक्रम ज्ञान' - 'क्रमिक ज्ञान' | 262 |
| लक्षचौऱ्यांशी-चार गतींची... | 262 |
| प्रज्ञा | 265 |

# आप्तवाणी

## श्रेणी - 1

### धर्माचे स्वरुप

'धर्म' म्हणजे काय?

'वस्तू स्वगुणधर्मात परिणमित होते तो धर्म.'

धर्म म्हणजे वस्तूचा स्वभाव आणि तोच त्याचा धर्म म्हणायचा.

उदाहरणार्थ सोने हे सोने केव्हा म्हटले जाईल? जेव्हा त्याचे गुणधर्म सोन्याचे आढळतील तेव्हा. ही द्राक्षे जर कधी कडू लागली तर काय म्हणाल? द्राक्षे त्यांच्या गुणधर्मात नाहीत. पितळाला जर बफींग करून समोर ठेवले तर ते एक्जेक्ट (तंतोतंत) सोन्यासारखेच दिसेल, पण जर सोनाराकडे नेऊन त्याची तपासणी केली तर समजेल की यात सोन्याचे गुणधर्म नाहीत, त्यामुळे हे सोने नाही.

दोन प्रकारचे आंबे तुमच्या समोर ठेवले आहेत. त्यातल्या एका आंब्याचा सुगंध येतो, जरा सुकलेला, सुरकुत्या पडलेला, थोडा नासायला पण सुरुवात झाली आहे असा आहे, आणि दुसरा आंबा अगदी त्याच्यासारखाच दिसतो पण तो लाकडी आंबा आहे, दिसायला अगदी पहिल्या आंब्यासारखाच दिसतो पण त्याला सुगंध नसतो, तो कोमेजत नाही, त्याला दुर्गंधही येत नाही. दोन्हीही आंबेच आहेत पण लाकडी

आंबा हा नावापुरताच आंबा आहे. तो खऱ्या आंब्याच्या स्वभावात नाही. जेव्हा की खरा आंबा त्याच्या स्वभावात आहे. गुणधर्मात आहे. एखादी वस्तू जेव्हा तिच्या स्वभावात असेल, तिच्या गुणधर्मात असेल तेव्हाच तिला वस्तू (द्रव्य, तत्व) म्हटले जाते. वस्तू तिच्या धर्मात आहे, असे म्हटले जाते. अनात्म्याला, पुद्‌गलला 'मी' मानले जाते, (खरे तर) पुद्‌गल अवस्तू आहे, परधर्म आहे, स्वधर्म नाही. आत्म्याला आत्मा मानले तर आत्मा 'वस्तू' आहे, तोच धर्म आहे, स्वधर्म आहे, आत्मधर्म आहे.

आपण कोण आहात?

**प्रश्नकर्ता :** मी चंदुलाल आहे.

**दादाश्री :** आपले नाव काय?

**प्रश्नकर्ता :** माझे नाव चंदुलाल आहे.

**दादाश्री :** 'मी चंदुलाल' आणि 'माझे नाव चंदुलाल' यात विरोधाभास नाही का? नामधारक आणि नाव, एक कसे असू शकतील? नाव तर तिरडी निघते त्या दिवशी परत घेतात. म्युनिसिपालिटीच्या रजिस्टरमधून नाव काढून टाकतात.

हा हात कुणाचा आहे? हा पाय कुणाचा आहे?

**प्रश्नकर्ता :** माझा आहे.

**दादाश्री :** ते तर या बॉडी (देहा)चे स्पेअर पार्टस् आहेत. त्यात तुमचे काय? तुमच्या आत जे मन आहे ते कुणाचे आहे?

**प्रश्नकर्ता :** माझे आहे.

**दादाश्री :** ही वाणी कुणाची आहे?

**प्रश्नकर्ता :** माझी आहे.

**दादाश्री :** हा देह कुणाचा आहे?

**प्रश्नकर्ता :** माझा आहे.

**दादाश्री :** 'माझा आहे' असे म्हटल्याबरोबर त्याचा मालक कोणी वेगळा आहे, असा विचार येतो की नाही?

**प्रश्नकर्ता :** येतो.

**दादाश्री :** होय, तर मग तुम्ही स्वत: कोण आहात? याचा कधी विचार केला आहे?

**प्रश्नकर्ता :** नाही.

**दादाश्री :** हे घड्याळ आणले तेव्हा रियलाइज (तपासणी) करून घेऊन आलात ना की ते बरोबर आहे की नाही, हे कापड आणले ते सुद्धा रियलाइज करून आणले. बायको आणली ती सुद्धा रियलाइज करून आणलीत ना?

**प्रश्नकर्ता :** हो, दादाजी.

**दादाश्री :** तर मग सेल्फ, म्हणजे स्वत:चेच रियलाइजेशन का केले नाही? या सर्व वस्तू टेम्पररी (विनाशी) असतील की परमनन्ट (अविनाशी)? ऑल दीज आर टेम्पररी एडजस्टमेंटस्. यात स्वत: परमनन्ट आहे आणि टेम्पररी वस्तूंशी गुणाकार करतो, मग उत्तर कसे मिळेल? अहो, जिथे तुम्हीच खोटे, तुमची रक्कमच खोटी, तिथे खरे उत्तर कुठून सापडेल?

तेव्हा हे सेल्फ रियलाइजेशन केले नाही, ही छोटी चूक असेल की मोठी?

**प्रश्नकर्ता :** भयंकर मोठी चूक. हे तर ब्लंडर म्हटले जाईल, दादा!

## जगाची निर्मिती

**दादाश्री :** हे जग कोणी बनवले असेल?

**प्रश्नकर्ता :** ........ (विचार करत आहे.)

**दादाश्री :** तुमची जी कल्पना असेल ती सांगा ना! इथे आपण कुणाला पास नापास करायला थोडेच बसलो आहोत?

**प्रश्नकर्ता :** देवाने बनवले असेल.

**दादाश्री :** देवाची मुले काय बिनलग्नाची राहिली होती की त्याला हे सर्व बनवण्याची गरज पडली? देवाचे लग्न झाले असेल की बिनलग्नाचा असेल? त्याचा पत्ता काय? मोक्ष असेल की नाही?

**प्रश्नकर्ता :** मोक्ष तर आहेच ना!

**दादाश्री :** जर देवाने जग बनवले असेल आणि मोक्षही असेल, तर मग हा संपूर्ण विरोधाभास आहे.

**प्रश्नकर्ता :** दादा, यात कसला विरोधाभास?

**दादाश्री :** जर देव तुमचा *उपरी* (वरिष्ठ, मालक) असेल आणि तो जर तुम्हाला मोक्षाला घेऊन जाणारा असेल, तर मग जेव्हा तो म्हणेल ऊठ इथून, तर तुम्हाला लगेच उठावे लागेल. मग याला मोक्ष कसा म्हणता येईल? मोक्ष म्हणजे संपूर्ण स्वातंत्र्य. कोणी वरिष्ठही नाही आणि कोणी अंडरहॅन्ड (कनिष्ठ)ही नाही.

## जग एक कोडे

हे इंग्रज सुद्धा म्हणतात की, गॉड इज क्रिएटर ऑफ धीस वर्ल्ड (भगवंत या जगाचा निर्माता आहे.) मुस्लिम पण म्हणतात, की अल्लाने बनाया. हिंदू पण म्हणतात की, जग देवाने निर्माण केले. पण हे त्यांच्या व्ह्यू व्ह्यू पॉइंट (दृष्टीकोन) प्रमाणे सत्य आहे. परंतु फॅक्ट (हकीगत-वस्तुस्थिती) प्रमाणे खोटे आहे. जर तुला फॅक्ट जाणून घेण्याची इच्छा असेल तर मी तुला सांगतो. जे 360 डिग्रीचा स्वीकार करते, त्यालाच ज्ञान म्हणतात. आम्ही त्या सर्व 360 डिग्री मान्य करतो, म्हणून आम्ही ज्ञानी आहोत. कारण आम्ही सेंटरमध्ये (केंद्रस्थानी) बसलेलो आहोत आणि त्यामुळे आम्ही फॅक्ट सांगू शकतो. फॅक्ट तर अशी आहे की गॉड इज नॉट ॲट ऑल क्रिएटर ऑफ दीस वर्ल्ड. हे जग कोणी बनवलेच नाही. तर मग बनले कसे? 'दी वर्ल्ड इज दी पझल इटसेल्फ.' (जग स्वत:च एक कोडे आहे.) कोड्यासारखे झाल्यामुळे कोडे म्हणावे

लागते. खरे तर, जग आपोआपच निर्माण झाले आहे. आणि हे आम्ही आमच्या ज्ञानात प्रत्यक्ष पाहिले आहे. या जगाचा एकही परमाणू असा नाही की जिथे मी फिरून आलो नाही. जगात राहून आणि त्याच्या बाहेर राहून हे मी सांगत आहे.

जो कोणी हे पझल सॉल्व करू शकतो (कोडे सोडवू शकतो) त्याला परमात्मपदाची डिग्री मिळते आणि ज्यांना हे कोडे सोडवता आले नाही ते या कोड्यातच विरघळून गेले आहेत. आम्ही हे कोडे सोडवून बसलो आहोत आणि परमात्म्याची डिग्री प्राप्त केली आहे. आम्हाला हे चेतन आणि हे अचेतन, दोन्हीही वेगळेच दिसतात. ज्याला वेगळे दिसत नाही तो स्वत: त्यात डिजॉल्व होऊन गेला आहे.

क्रिएटर देव नाही, कधी नव्हता आणि कधी होणारही नाही. क्रिएटरचा अर्थ काय? क्रिएटर म्हणजे कुंभार. तर त्यालाही मेहनत करावी लागते. देव अशी मेहनत करत असेल का? हे अहमदाबादचे शेठ, बिनमेहनतीनेच चार-चार मिलचे मालक होऊन बसले आहेत, मग काय देव मेहनत करत बसणार? मेहनत करणारा म्हणजे मजूर. देव तसा नाही. जर देव सर्वांना घडवित बसला असता तर प्रत्येकाचे चेहरे एकसारखेच दिसायला हवे होते. जसे एकाच साच्यातून काढल्याप्रमाणे, पण नाही, तसे नाही. देवाला जर निष्पक्षपाती म्हटले तर एक माणूस जन्मापासून फूटपाथवर आणि दुसरा महालात, असे का?

तेव्हा हे सर्व कसे घडत आहे, याचे उत्तर मी तुम्हाला एका वाक्यात देतो. नंतर तुम्ही सविस्तर शोधून काढा. हे जग फक्त 'सायन्टिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्स'ने चालत आहे. चालविणारा कोणीही बाप वरती रिकामा बसलेला नाही. आम्ही त्यास 'व्यवस्थित शक्ती' म्हणतो. ती सर्वांना व्यवस्थितच ठेवते. सकाळी तुम्ही जागे होता की जाग येते?

**प्रश्नकर्ता :** मीच जागा होतो ना!

**दादाश्री :** केव्हा तरी असे नाही का घडत की झोपायची इच्छा असूनही झोप लागत नाही? सकाळी चार वाजता उठायचे असेल तेव्हा

अलार्म का लावावा लागतो? ठरवून झोपलो की सकाळी पाच वाजून दहा मिनिटांनी उठायचे आहे, तर बरोबर त्याच वेळेला उठायला पाहिजे. पण तसे घडते का?

## 'व्यवस्थित शक्ती'

स्वत: करत नाही तिथे आरोप करतोय की मी केले. याला सिद्धांत कसे म्हणायचे? हा तर विरोधाभास आहे. तर मग तुम्हाला जागे कोण करतो? 'व्यवस्थित' नावाची शक्ती तुम्हाला जागे करते. हे सूर्य, चंद्र, तारे सर्व काही 'व्यवस्थित शक्ती'च्या नियमाच्या आधाराने चालत आहेत. या सर्व गिरण्या सतत धुराचे लोट सोडतच जातात आणि 'व्यवस्थित' शक्ती त्यास स्वच्छ करून परत सर्व 'व्यवस्थित' करते. नाही तर अहमदाबादची माणसे केव्हाच गुदमरून मरण पावली असती! हा पाऊस पडतो तर वरती पाणी बनवण्यासाठी कोण जातो? हे तर नॅचरल एडजस्टमेंट (नैसर्गिक प्रक्रिये)मुळे घडते. दोन 'H' (हाईड्रोजन) आणि एक 'O' (ऑक्सिजन)चे परमाणू एकत्र येतात आणि दुसरे काही संयोग, जसे की हवा इत्यादी सर्व एकत्र येतात त्यामुळे पाणी तयार होते आणि पाऊस रूपाने खाली पडते. आता हे सायन्टिस्ट काय म्हणतात? बघा, मी पाणी बनवले. अरे! तुला मी दोन 'H' चे परमाणू न देता एकच 'H' चा परमाणू देतो. आता पाणी बनवून दाखव की! त्यावर तो म्हणतो नाही, ते कसे शक्य आहे? मग मूर्खा, तू पण त्यातला एक एविडन्सच आहेस. तू कसला मेकर (बनवणारा)? या जगात कोणीही मेकर नाही. कोणीही कर्ता नाही. सर्व निमित्त आहेत. भगवंत सुद्धा कर्ता नाही. कर्ता झाला तर भोक्ता व्हावे लागेल. भगवंत तर ज्ञाता-द्रष्टा आणि परमानंदी आहेत. स्वत:च्या अपार सुखातच मग्न राहतात.

## भगवंताचा ॲड्रेस

भगवंत कुठे राहत असतील? त्यांचा ॲड्रेस काय? कधी पत्र बित्र लिहायचे झाले तर? कोणत्या बोळात राहतात? त्यांचा गल्ली नंबर कोणता असेल?

**प्रश्नकर्ता :** ते तर माहीत नाही. पण सगळे म्हणतात की वरती राहतात.

**दादाश्री :** सर्वांनी सांगितले आणि तुम्ही सुद्धा स्वीकारले? तुम्ही तपास करायला नको का? मी तुम्हाला भगवंताचा खरा पत्ता सांगतो. गॉड इज इन एव्हरी क्रिचर व्हेदर व्हिजिबल ऑर इनव्हिजिबल. (भगवंत प्रत्येक जीवमात्रात आहेत, मग तो जीव डोळ्यांना दिसू शकेल असा असो किंवा नसो.) तुमच्या आणि माझ्या दरम्यान दुर्बिणीने सुद्धा दिसू शकणार नाहीत असे अनंत जीव आहेत. त्यांच्यात सुद्धा भगवंत विराजमान आहेत. या सर्वांमध्ये शक्ती स्वरूपात आहेत आणि आमच्यात व्यक्त झाले आहेत. संपूर्ण प्रकाशमान झालेले आहेत! म्हणून आम्ही प्रकट परमात्मा झालो आहोत! अद्‌भुत प्रकाश झाला आहे!!! हे जे तुम्हाला दिसतात, ते तर अंबालाल मूळजीभाई, भादरण गावचे पाटीदार आणि कॉन्ट्रॅक्टचा व्यवसाय करीत आहेत, परंतु त्यांच्यात जे प्रकट झाले आहेत ते तर अद्‌भुत आश्चर्य आहे! ते 'दादा भगवान' आहेत! परंतु तुम्हाला हे कसे समजणार? हा देह तर पॅकिंग (खोका) आहे, आणि आत बसले आहेत ते भगवंत आहेत. हे तुमचे सुद्धा चंदुलालरूपी पॅकिंग आहे आणि आत भगवंत बसलेले आहेत. हे जे गाढव आहे, ते गाढवाचे पॅकिंग आहे आणि आत भगवंत बसले आहेत. परंतु या दुर्भागी लोकांना हे समजत नसल्यामुळे गाढव समोर आले तर ते त्याला शिव्या देतात, तर आत बसलेले भगवंत त्याची नोंद करतात, 'हंम्म.... मला गाढव म्हणतोस काय? जा मग, एक जन्म तुला पण गाढवाचा मिळेल.' हे पॅकिंग तर कोणतेही असू शकते. काही सागाचे असतात, काही आंब्याच्या लाकडाचे असतात. हे व्यापारी पॅकिंग बघतात की आतील माल बघतात?

**प्रश्नकर्ता :** माल बघतात.

**दादाश्री :** बरोबर, पॅकिंग काय कामाचे? काम तर आतल्या मालाशी आहे. एखादे पॅकिंग सडलेले असेल, तुटलेले असेल, पण माल तर चांगला आहे ना!

आम्ही या अंबालाल मूळजीभाईबरोबर क्षणभरही तन्मयता केली

नाही. जेव्हापासून आम्हाला ज्ञान प्रकट झाले तेव्हापासून धीस इज माय फर्स्ट नेबर (हे माझे पहिले शेजारी आहेत.) आम्ही शेजाऱ्याप्रमाणे राहतो.

## भगवंत उपरी आणि मोक्ष

तेराव्या वर्षी मला विचार आला होता की आपल्यावर कोणी *उपरी* नको. देव सुद्धा *उपरी* म्हणून नको. ते मला जमणार नाही. म्हणजे हे मी माझे डेव्हलपमेंट (विकास) घेऊनच आलो होतो आणि अनंत जन्मांची इच्छा ती या जन्मी फलित झाली. जर डोक्यावर देव *उपरी* म्हणून बसला असेल आणि तो मोक्षदाता असेल तर बसल्या जागेवरून तो आपल्याला उठवू शकतो आणि आपल्याला उठणे भाग पडेल. ते जमणार नाही. याला मोक्ष कसे म्हणता येईल? मोक्ष म्हणजे 'मुक्त भाव.', डोक्यावर कोणी *उपरी*ही नाही आणि (खाली) कोणी अंडरहॅन्डही नाही.

इथे जिवंतपणीच मोक्षाचा अनुभव केला जाऊ शकतो. एक सुद्धा चिंता-उपाधी होत नाही. इन्कमटॅक्सची नोटिस आली तरी पण समाधि तुटत नाही, तोच मोक्ष. मग वरचा मोक्ष तर त्यानंतर पाहू. पण आधी इथे मुक्त झाल्यानंतरच ती मुक्ती मिळेल!

माझे लग्न सोळाव्या वर्षी झाले. लग्नाच्या वेळी डोक्यावर बांधलेला फेटा थोडा सरकला आणि माझ्या मनात विचार आला की आम्हा दोघांपैकी एकाला तर वैधव्य येणारच, हे तर नक्कीच आहे ना!

अनंत जन्मांपासून सगळे तेच तेच शिकत राहतात आणि परत त्यावर आवरण येते. अज्ञान काही शिकवावे लागत नाही. अज्ञान तर सहज येते. ज्ञान शिकवावे लागते. मला आवरण कमी होते, त्यामुळे तेराव्या वर्षी भान आलेले. शाळेत शिक्षक लघुतम साधारण विभाजक शिकवताना म्हणाले की अशी संख्या शोधून काढा की जी लहानात लहान असेल आणि सर्वात अविभाज्य रूपाने असेल. मी लगेच त्यावरून भगवंताला शोधून काढले. हे सारे (मनुष्य) संख्याच आहेत ना! त्यांच्यात भगवंत अविभाज्य रूपाने राहिलेले आहेत!

मी जी वाणी बोलत आहे त्या वाणीने तुमचे आवरण तुटते आणि

आत प्रकाश होतो, त्यामुळे तुम्हाला मी जे बोलतो ते समजते. नाही तर यातला एक शब्द सुद्धा समजण्याची तुमची शक्ती नाही. बुद्धीचे यात कामच नाही. हे सर्व जे बुद्धिमान मानले जातात, ते सर्व रॉंग बिलिफमुळे (चुकीच्या मान्यतेमुळे) आहे. आम्ही अबुध आहोत. आमच्याजवळ नावालासुद्धा बुद्धी नसते. बुद्धी म्हणजे काय? ज्ञान म्हणजे काय? संपूर्ण जगातील अनंत सब्जेक्टस् (विषय) जाणून घेतले तरी त्या सर्वांचा समावेश बुद्धीतच होतो. आणि 'मी कोण आहे?' इतकेच जरी जाणले तर ते ज्ञान आहे. याशिवायचे तुझे जाणलेले सर्व निरर्थक आहे. अहंकारी ज्ञान म्हणजे बुद्धी आणि निर्‌हंकारी ज्ञान म्हणजे ज्ञान स्वरूपाचे ज्ञान तेच ज्ञान.

मतभेद मिटवण्याचा मार्ग कोणता? जीवन कसे जगावे? करोडो रुपये गाठीशी असून सुद्धा मतभेद होतात. आणि मतभेदातून अनंत दु:खांची उत्पति होते.

## रिलेटिव्ह धर्म : रियल धर्म

सर्कल (वर्तुळ) असते, त्यात 360 डिग्री असतात. इंग्रज 110 डिग्रीवर, मुस्लिम 120 डिग्रीवर, पारसी 140 डिग्रीवर, हिंदू 220 डिग्रीवर असतात. ते सर्व आपापल्या व्ह्यू पॉइंटने पाहतात. त्यामुळे प्रत्येक जण आपण पाहिलेले तेच खरे असे म्हणतात. जर मी 120 डिग्रीवर बसलेल्यांना उठवून 80 डिग्रीवर बसवले आणि मग विचारले की आता बोला की कोण खरे आहे? सगळे आपापल्या व्ह्यू पॉइंटवर, डिग्रीवर बसलेले असतात. आणि आम्ही 360 डिग्री पूर्ण करून सेंटरमध्ये बसलेले पूर्ण पुरुष आहोत. ज्ञानी पुरुष सेंटरमध्ये स्थित असल्यामुळे वस्तूला यथार्थ रुपाने पाहू शकतात, समजू शकतात. आणि तुम्हालाही यथार्थ ज्ञान देऊ शकतात. हे सर्व धर्म खरे आहेत पण ते रिलेटिव्ह धर्म आहेत, व्ह्यू पॉइंट अनुसार आहेत. आणि जर फॅक्ट जाणायचे असेल तर सेंटरमध्ये यावे लागेल. सेंटरमध्येच रियल धर्म, आत्मधर्म असतो. सेंटरमध्ये बसलेलाच सर्वांचे व्ह्यू पॉइंट पाहू शकतो. त्यामुळे त्याचा कोणत्याही धर्माशी मतभेद नसतो. म्हणून तर आम्ही सांगतो की जैनांचे आम्ही महावीर आहोत, वैष्णवांचे कृष्ण आहोत, स्वामीनारायणांचे सहजानंद

आहोत, ख्रिश्चनांचे क्राईस्ट आहोत, पारसींचे जरथोस्त आहोत, मुस्लिमांचे खुदा आहोत. ज्यांना जे पाहिजे असेल ते घेऊन जावे. आम्ही संगमेश्वर भगवंत आहोत. तुम्ही आपले काम पार पाडून घ्या. एका तासात तुम्हाला भगवंतपदाची प्राप्ती करवून देतो. पण त्यासाठी तुमची तयारी हवी. मी तर एका तासात तुम्हाला केवळज्ञान देत आहे पण ते तुम्हाला पचणार नाही. काळाच्या प्रभावामुळे आम्ही सुद्धा 356 डिग्रीवर येऊन थांबलो आहोत. पण तुम्हाला देत आहोत संपूर्ण 'केवळज्ञान.'

हे रताळे जर भट्टीत टाकले तर किती बाजूंनी होरपळून निघेल? तर चोहोबाजूंनी. तसे हे संपूर्ण जग होरपळले जात आहे, अरे, पेट्रोलच्या अग्नित जळत असलेले आम्हाला आमच्या ज्ञानात दिसते! त्यामुळे या लोकांचे कल्याण कशा प्रकारे होईल हेच आम्हाला पाहायचे आहे. आणि त्यासाठीच आमचा हा जन्म झाला आहे. या अर्ध्या जगाचे कल्याण आमच्या हातून होईल आणि उरलेल्या अर्ध्या जगाचे कल्याण आमच्या फॉलोअर्सच्या (महात्म्यांच्या) हातून होईल. आम्ही याचे कर्ता नाही, आम्ही निमित्त आहोत.

हे जर्मनीवाले ॲब्सोल्युटीजम (परमतत्त्व)चा शोध घेत आहेत. इथून ढीगभर शास्त्र घेऊन गेले आणि शोधत बसले आहेत. अहो! ते काय असे हाती लागेल असे नाही. आज आम्ही स्वत:च प्रत्यक्ष ॲब्सोल्युटीजममध्ये आहोत. सारे जग थियरी ऑफ रिलेटिव्हीटीमध्ये आहे. हे आमचे महात्मा थियरी ऑफ रियालिटीमध्ये आहेत आणि आम्ही स्वत: थियरी ऑफ ॲब्सोलिटीजममध्ये आहोत. थियरीच नव्हे तर थियरममध्ये आहोत. आम्ही जेव्हा जर्मनीली जाऊ तेव्हा त्यांना सांगू की तुम्हाला जे हवे ते घेऊन जा. हे पहा, आम्ही स्वत:च आलो आहोत.

दीस इज कॅश बँक इन दी वर्ल्ड. (जगात ही रोकड बँक आहे.) एका तासात तुझ्या हातात रोखच देऊन टाकतो. रियलमध्ये बसवून देतो. बाकी सगळीकडे उधारच आहे. हप्ते भरतच रहा. अनंत जन्मांपासून तू हप्तेच भरत आला आहेस तरी अजून सुटका का होत नाही? कारण रोख तुला कोणत्याही जन्मात मिळालेच नाही.

## क्रमिक मोक्षमार्ग : अक्रम मोक्षमार्ग

मोक्ष प्राप्तीचे दोन मार्ग : एक मुख्य मार्ग, ज्यात स्टेप बाय स्टेप, एक-एक पायरी चढत जायची. सत्संग मिळाला तर पाचशे पायऱ्या चढून जाईल आणि एखाद्या जन्मात कुसंग मिळाला तर पाच हजार पायऱ्या घसरून पडेल. फार कष्टदायक मार्ग. जप-तप-त्याग करत करत चढायचे, तरी भरवसा नाही की केव्हा घसरून पडेल? आणि दुसरा अक्रम मार्ग, लिफ्ट मार्ग. यात पायऱ्या चढायच्या नाहीत, सरळ लिफ्टमध्ये बसून, बायकामुलांसकट, मुलामुलींची लग्ने वगैरे, सर्व काही उरकत मोक्षही साधायचा. हे सर्व करून सुद्धा तुमचा मोक्ष चुकणार नाही. असा हा अक्रम मार्ग आहे, हा अपवाद मार्ग सुद्धा म्हटला जातो आणि हा मार्ग दर दहा लाख वर्षांने प्रकट होत असतो.

भरत राजाला एकट्यालाच हे अक्रम ज्ञान प्राप्त झाले होते. ऋषभदेव दादा भगवानांनी स्वत:च्या शंभर मुलांपैकी एकट्या भरतालाच हे अक्रम ज्ञान दिले होते. त्यांच्या शंभर मुलांपैकी अठ्ठ्याण्णव पुत्रांनी दीक्षा घेतली होती. राहिले होते बाहुबलीजी आणि भरत. त्या दोघांवर राज्याची जबाबदारी सोपवली. मागाहून बाहुबलीजींनीही वैरागी बनून राज्य सोडून दीक्षा घेतली. त्यामुळे राज्याची जबाबदारी भरताच्या माथी पडली. आणि भरताला राण्या किती, माहीत आहे का? तेराशे राण्या होत्या. ते अगदी कंटाळून गेले होते. आजकाल तर एका पत्नीपासून सुद्धा कंटाळून जातात ना? भरत राजाला तर फार उपाधी होती. राणीवासात गेले तर पन्नास राण्यांच्या तोंडावर हास्य आणि पाचशेंची तोंडं फुगलेली. त्यात आणखी राज्यकारभाराचा ताण, लढाया लढायच्या. त्यामुळे फार वैतागून गेले होते. म्हणून ते ऋषभदेव भगवंतांकडे जाऊन म्हणाले, भगवंत, मला राज्य नको. तुम्ही अन्य कुणाला राज्य सोपवून द्या आणि मला दीक्षा द्या. मला पण मोक्ष हवा आहे.' तेव्हा भगवंत म्हणाले, 'तू हे राज्य चालवण्यास निमित्त मात्र आहेस. जर राज्य सांभाळले नाहीस तर राज्यात भांडणतंटे, मारामाऱ्या होऊन अराजकता माजेल. जा, आम्ही तुला असे ज्ञान देत आहोत की तुला राज्य बाधक ठरणार नाही, तेराशे

राण्या सुद्धा बाधक ठरणार नाहीत, लढाया सुद्धा बाधक ठरणार नाहीत.' ऋषभदेव भगवंतांनी भरत राजाला असे ज्ञान दिले, तेच हे अक्रम ज्ञान. ते आम्ही तुम्हाला इथे एक तासात देतो. अहो, भरत राजाला तर या ज्ञानाचा विसर पडू नये म्हणून चोवीस तास नोकर ठेवावे लागत होते, जे एका मागून एक येऊन घंटा वाजवून बोलत असायचे, 'भरत, सावधान, सावधान, सावधान!' पण या काळात तुम्ही स्वतःच दीडशेची नोकरी करता तेव्हा नोकर ठेवणे कसे शक्य आहे? त्यामुळे आम्ही तुमच्या आतच सावध करणारा बसवून देतो की जो क्षणोक्षणी आत बोलत राहील 'सावधान, सावधान, सावधान!'

असे अद्‌भुत ज्ञान तर कोणत्याही काळात ऐकायला किंवा पाहायला मिळाले नाही. हे तर अकरावे आश्चर्य आहे या काळाचे!

## कॉमनसेन्स

कॉमनसेन्स म्हणजे काय? याची व्याख्या काय?

कॉमनसेन्स म्हणजे एवरीव्हेअर ॲप्लीकेबल, थियरिटिकली ॲज वेल ॲज प्रॅक्टिकली. (अशी व्यावहारिक समज की जी सर्वत्र वापरू शकतो, सिद्धांतिक आणि व्यावहारिक दोन्ही प्रकारे.)

कॉमनसेन्स ही फार उच्च वस्तू आहे. ती जिथे आवश्यकता असेल तिथे वापरू शकतो. आमच्यात शंभर टक्के कॉमनसेन्स असतो. तुमच्यात एक टक्काही कॉमनसेन्स नसतो. गुंता होईल तिथे दोरा न तोडता, गुंता सोडवणे म्हणजे कॉमनसेन्स आहे. आणि लोक तर एक गुंता सोडवता सोडवता नवीन पाच गुंते तयार करतात, अशी स्थिती आहे. मग त्यांना कॉमनसेन्सचे मार्कस (गुण) कसे देता येईल? अरे, मोठमोठया विद्वानांत सुद्धा विद्वत्ता असते परंतु कॉमनसेन्स आढळत नाही. आमच्यात बुद्धी नावालाही नसते. आम्ही अबुध आहोत. आमची बुद्धी संपूर्ण प्रकाशमान झालेली असते परंतु ज्ञानप्रकाशापुढे ती एका कोपऱ्यात जाऊन बसते. एका काठावर अबुधपद प्राप्त होते तिथे समोरच्या काठावर सर्वज्ञपद हारतुरे घेऊन नियमानेच समोर येऊन उभे राहते. 'आम्ही अबुध आहोत, सर्वज्ञ आहोत.'

## सांसारिक संबंध

वडिलांबरोबर, आईबरोबर, बायकोबरोबर तुमचे जे संबंध आहेत ते रियल संबंध आहेत?

**प्रश्नकर्ता :** हो, रियलच की!

**दादाश्री :** तर मग वडील वारल्यावर तुम्हाला सुद्धा नियमाने मेले पाहिजे. पण या मुंबईमध्ये वडिलांच्या मागे असे किती मेले? बघा, मी तुम्हाला समजावून सांगतो. आई–वडील, भाऊ–बहिण, बायको–मुले या सर्वांशी संबंध असतो पण रियल नाही, केवळ रिलेटिव्ह संबंध असतो. रियल कधीही फ्रॅक्चर होणार नाही. इथे तर जर मुलगा वडिलांना म्हणाला की 'तुम्हाला अक्कल नाही' की झाले, संपले! बाप म्हणेल, 'चालता हो इथून, जन्मभर तुझे तोंड दाखवू नकोस. मी तुझा बाप नाही आणि तू माझा मुलगा नाहीस.' तुम्ही या बायकोलाही खरी मानली, पण तिथेही डिवोर्स होतो की नाही? असे आहे हे जग. ऑल दीज आर टेम्पररी एडजस्टमेंटस्. अहो, हा देह सुद्धा तुमचा नाही. तो पण दगा देतो. जर ठरवले असेल की आज इतका वेळ सामायिक करायची आहे, तर मेलं डोकं दुखायला लागते, नाही तर पोटात कळा मारू लागतात सामायिकही करू देत नाही. स्वतः परमनन्ट (कायमचा) आणि हे सर्वच टेम्पररी (विनाशी), मग कसा मेळ बसेल? म्हणून तर सर्व जग अडचणीत सापडले आहे. अशा रिलेशन्समध्ये तर रिलेशनप्रमाणेच वागायला हवे. सत्य–असत्याचे शेपूट धरुन बसण्यात काही अर्थ नाही. जास्त ताणल्याने तुटेल. समोरच्याने जरी संबंध तोडले तरी पण आपल्याला जर संबंध टिकवायचे असेल तर जुळवून घेतले पाहिजे, तरच संबंध टिकून राहील. कारण हे सर्व संबंध रिलेटिव्ह आहेत. उदाहरणार्थ बायको म्हणाली की आज पौर्णिमा आहे, तुम्ही म्हणाल की आज अमावस्या आहे, तर दोघांचा वाद चालूच राहील. व संपूर्ण रात्र बिघडेल, आणि सकाळी ती चहाचा कप टेबलावर आपटून ठेवेल, मनात तंत ठेवेल. त्यापेक्षा आपण समजून घ्यावे की हिने ताणायला सुरुवात केली आहे म्हणजे आता तुटेल. तेव्हा हळूच पंचांग काढून पाने जरा इकडेतिकडे

फिरवून मग सांगावे, 'होय, तुझे म्हणणे बरोबर आहे. आज पौर्णिमाच आहे.' असे जरा नाटक करून मगच 'तुझे बरोबर आहे' असे तिला सांगावे. नाही तर काय होईल? जास्त ताणलेली दोरी एकदम सोडून दिली तर ती (बायको) खाली पडेल. म्हणून दोरी हळूहळू समोरचा खाली पडणार नाही अशा प्रकारे काळजीपूर्वक सोडावी, नाही तर समोरची व्यक्ती पडेल आणि त्याचा दोष आपल्याला लागेल.

## सुख आणि दु:ख

जगात प्रत्येक जण सुख शोधत आहे पण सुखाची व्याख्याच ठरवत नाही. 'सुख असे असायला हवे की ते आल्यानंतर दु:ख केव्हाही येणार नाही.' असे एक पण सुख या जगात असेल तर शोधून काढ बरे. शाश्वत सुख तर स्वत:मध्ये - स्वमध्येच आहे. स्वत: अनंत सुखाचा धाम आहे आणि लोक नाशवंत वस्तूंमध्ये सुख शोधायला निघाले आहेत. संसारी लोकांचे सुख कसे असते? हिवाळ्याचा दिवस, गच्चीवरचा पाहुणा, गारठून टाकण्याऱ्या कडक थंडीला सुरुवात, तोकडी गोधडी, आणि स्वत: लंबू, डोके झाकले की पाय उघडे पडतात आणि पाय झाकले तर डोके उघडे पडते. बिचारा इकडे तिकडे करत जेमतेम रात्र घालवतो. असे हे संसाराचे सुख आहे. खरी हकीगत अशी आहे की या जगात दु:ख नावाची कोणती वस्तूच नाही. म्हणजे अवस्तू आहे. कल्पनेने उभारलेली आहे. जिलेबीमध्ये दु:ख आहे अशी कल्पना केली तर त्याला त्यात दु:ख वाटेल. आणि सुखाची कल्पना केली तर सुख वाटेल. म्हणून ते यथार्थ नाही. ज्यास खरे सुख म्हटले तर ते सर्वांनी स्वीकारायलाच हवे. ते युनिवर्सल ट्रुथ असायला हवे. पण तुम्हाला ज्यात सुख वाटते त्यात दुसऱ्याला अपार दु:ख वाटते, असे हे जग आहे.

## प्रारब्ध-पुरुषार्थाचे विरोधाभासी अवलंबन

लोक प्रारब्धाला पुरुषार्थ म्हणतात. खरे तर, दळलेल्यालाच परत दळतात आणि अर्धा शेर वाया घालवतात. कित्येक लोक प्रारब्ध-प्रारब्ध म्हणतात तर कित्येक जण पुरुषार्थ-पुरुषार्थ म्हणतात, ही दोन्हीही पंगू

अवलंबने आहेत. हे मजूर सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत मिलमध्ये पुरुषार्थ करतात आणि मिळवतात काय? तर (जेमतेम) कांदा-भाकर की अजून काही? प्रारब्धवादी जर नुसते हातावर हात ठेऊन बसून राहिले तर?

लाख मिळवले तर म्हणेल 'मी कमावले' आणि तोटा झाला तर म्हणतो 'देवाने धाडले. माझी ग्रहदशा वाईट होती. भागीदार नालायक भेटला.' वर म्हणतो, 'मी काय करू!' अरे मूर्खा, तू जिवंत आहेस की मेलास? चांगले घडले तेव्हा 'मी केले' असे बोलणारा तूच होतास मग आता बोल की 'मी केले.' आता तर देवाने केले असेच बोलतोस. देवावर आरोप लावून देवाला का बदनाम करतोस? आणि ग्रह सुद्धा काहीच करत नाहीत, तुझेच ग्रह तुला नडतात. तुझ्या आतच सर्व नऊ ग्रह बसलेले आहेत, तेच तुला नडतात. हठाग्रह, कदाग्रह, दुराग्रह, मताग्रह, सत्याग्रह वगैरे वगैरे. आम्ही निराग्रही झालो आहोत. आग्रह असतो तिथे विग्रह होतो. आम्हाला आग्रहच नाही तर विग्रह कसला? हे तर अनुकूल असेल तर सफलता मिळते आणि प्रतिकूल असेल तेव्हा देवावर टाकतो. अनुकूल आणि प्रतिकूल या दोहांच्या साखळीला लोक पुरुषार्थ म्हणतात. जर स्वतः पुरुषार्थ करत असेल तर कधीही नुकसान होणार नाही. पुरुषार्थ कशास म्हणतात की जिथे निष्फळता नसते. हा तर विरोधाभास आहे. तू स्वतः पुरुष बनला नाहीस, मग तू पुरुषार्थ कसा करशील? खरा पुरुषार्थ तर तो म्हणायचा की जो पुरुषार्थ स्वपराक्रमासह असतो. इथे तर प्रकृती नाचवेल तसा नाचत राहतो आणि म्हणतो की 'मी नाचलो!'

कृष्ण भगवान काय म्हणाले, की 'उद्धवजी अबला काय साधन करू शकेल!' जैनांचे सर्वात मोठे आचार्य आनंदघनजी महाराज पण स्वतःला अबला (स्त्री) म्हणतात. कारण पुरुष कुणाला म्हणतात की ज्याने क्रोध-मान-माया-लोभ यावर विजय मिळवला आहे. आणि इथे तर क्रोध-मान-माया-लोभ यांनीच विजय मिळवला आहे. मग अशांना अबलाच म्हणावे लागेल ना?

मी पुरुष झालो आहे. पुरुषार्थ आणि स्वपराक्रमासहित आहे. ज्योतिष आणि पुरुषार्थ हे दोन्ही विरोधाभासी आहेत. ज्योतिष शास्त्र हे

खरे आहे परंतु ज्यास पुरुषार्थ मानले जाते ती मात्र भ्रांती आहे. मग नुकसान होते तेव्हा ज्योतिषाकडे कशाला धाव घेता? तेव्हा करा ना पुरुषार्थ! ह्यांचा पुरुषार्थ तर पुढच्या जन्माचे बीज पेरतो. ह्यांचा

या ॲलेम्बिकच्या केमिकल कारखान्यात किती तरी माणसे काम करतात, तेव्हा केमिकल्स् तयार होतात. तो तर एकच कारखाना आहे उलट हा देह तर अनेक कारखान्यांनी बनलेला आहे. लाख ॲलेम्बिकच्या कारखान्यांनी बनलेला आहे, आणि तो आपणहूनच चालत राहतो. अरे, शहाण्या, रात्री थालीपीठ खाऊन झोपल्यावर आत किती पाचकरस पडला, किती पित्त पडले, काय काय पडले, याची चौकशी करायला जातोस का? मग तिथे तू किती सावध राहतोस? तिथे तर सकाळी सर्व क्रिया आपणहूनच घडून येतात. पाण्याच्या जागी पाणी, संडासाच्या जागी संडास, सर्व वेगळे होऊन बाहेर निघून जाते आणि तत्त्व सारे रक्तात खेचले जाते. तर हे सर्व करायला तू गेला होतास का? अरे, आतील सर्व कार्ये आपणहूनच चालतात तर बाहेरची का नाही चालणार? मग 'मी करतो' असे का मानतोस? ते तर चालतच राहील. रात्री झोपेत देह सहज असतो. पण हे तर असहज होतात. दिवसा म्हणे मी श्वास घेतो, बरोबर श्वास घेतो. मोठा श्वास घेतो, लहान घेतो. मग शहाण्या रात्री श्वास कोण घेतो? रात्री जे श्वासोच्छवास चालतात ते नॉर्मल असतात. त्यामुळे चांगल्या तऱ्हेने पचन होते.

माणसे केवळ भोवरे आहेत. मी ज्ञानी आहे पण हा देह भोवरा आहे. हे जे भोवरे आहेत ते श्वासामुळेच चालतात. श्वासाची दोरी गुंडाळल्यानंतर भोवरा फिरतो. फिरता फिरता मधून पलटी सुद्धा मारतो तेव्हा आपल्याला वाटते की हा आता 'गेला, गेला' पण तितक्यात परत सरळ होऊन फिरायला लागतो, असे आहे हे सर्व!

कडुनिंबाचे पानन् पान, फांदीन् फांदी कडू असते. त्यात त्याचा काय पुरुषार्थ? ते तर जे बीजात आहे ते बाहेर प्रकट होते. त्याच प्रमाणे माणसे स्वत:च्या प्राकृत स्वभावाप्रमाणेच वागतात आणि 'मी केले' याचा अहंकार करतात. त्यात त्यांनी काय केले?

जगात लोक ज्याला पुरुषार्थ म्हणतात, ती तर भ्रांत भाषा आहे. रिलेटिव्ह भाषा आहे. उदय कर्मानुसार घडत असते आणि त्यास 'मी केले' असे म्हणतो तो तर गर्व आहे, अहंकार आहे. रियल भाषेचा पुरुषार्थ की जो यथार्थ पुरुषार्थ आहे, तो पुरुषार्थ पुरुष झाल्यानंतरच, स्वरूपाचे भान झाल्यानंतरच सुरू होतो. त्यात 'मी केले' हा भाव संपूर्णपणे नष्ट झालेला असतो. संपूर्ण अकर्तापद असते. रिलेटिव्ह ही सर्व प्रकृती आहे आणि रियल स्वत:च पुरुष आहे. रियल पुरुषार्थ कशास म्हणावे ? तर कोणी आपला हात कापत असेल तेव्हा 'स्वत:' ज्ञाता–द्रष्टा पदातच राहील त्यास म्हणतात रियल पुरुषार्थ! फक्त ज्ञानक्रिया आणि दर्शनक्रियाच आत्म्याच्या क्रिया आहेत. अन्यत्र सर्व जागी आत्मा अक्रियच असतो, दुसरी कोणतीही क्रिया आत्मा करत नाही. आणि 'आत्मा' ज्ञान–दर्शनातच राहील तोच खरा पुरुषार्थ.

कबीरजींच्या पत्नीला मूल होणार होते. मूल होण्यापूर्वीच दुधाच्या कुंड्या भरून गेल्या आणि बालकाचा जन्म झाला तेव्हा पान्हा फुटला. हे पाहून कबीरजींच्या तोंडातून शब्द उमटले,

*'प्रारब्द तो पहेले बना, पीछे बना शरीर,*
*कबीर अचंभा ये है, मन नहीं बांधे धीर.'*

('प्रारब्ध तर आधी बनले, नंतर बनले शरीर,
कबीरा, अचंबा हाच की, मनास नाही धीर.')

## अविरोधाभासी अवलंबन

प्रारब्ध–प्रारब्ध असे म्हणून नुसते बसून राहण्यासारखे नाही. कारण फक्त प्रारब्धाचाच आधार घेऊन बसून राहिलात तर अगदी निष्क्रिय होऊन जाल. त्या अवलंबनाने मन शांतपणे बसू देणारच नाही. आणि जर तुमचे हे प्रारब्धाचे अवलंबन खरे असेल तर तुम्हाला एकही चिंता व्हायला नको. पण तुम्ही तर तर चिंतेचे कारखानेच उभारले आहेत. म्हणून ते अवलंबन सुद्धा पंगू आहे, फॅक्ट नाही, सायन्टिफिक नाही.

त्यामुळेच सर्वांना मार पडतो (त्रास होतो). लोकांना अशी खोटी अवलंबने दिली गेली, म्हणून तर हिंदुस्तानची अशी दैना झाली. आणि सगळी प्रगती अवरोधली गेली. आम्ही करोडो जन्मांच्या शोधाच्या परिणाम स्वरूप जगाला जे एक्जेक्ट जसे आहे तसेच सांगत आहोत की, प्रारब्ध आणि पुरुषार्थ, दोन्हीही पंगू अवलंबने आहेत आणि 'व्यवस्थित शक्ती' हेच खरे अवलंबन आहे, यथार्थ गोष्ट आहे, सायन्टिफिक आहे.

'व्यवस्थित शक्ती' म्हणजे काय? सायन्टिफिक सरकमस्टेन्सियल एविडन्सच्या आधारे जे काही घडते ती 'व्यवस्थित शक्ती' आहे. 'व्यवस्थित शक्ती'चे ज्ञान सर्व अवस्थांमध्ये संपूर्ण समाधान देणारे ज्ञान आहे. त्याचे मी तुम्हाला साधे उदाहरण देतो. हा काचेचा ग्लास आहे, तो जर तुमच्या हातातून निसटू लागला तर तुम्ही त्याला इकडून–तिकडून हात हलवून अगदी शेवटपर्यंत त्यास वाचवण्याचा प्रयत्न केला. पण तरीही तो खाली पडलाच आणि फुटला. आता तो कोणी फोडला? तुमची तर अजिबात इच्छा नव्हती. की ग्लास फुटावा. उलट तुम्ही शेवटपर्यंत त्यास वाचवण्याचा प्रयत्न केला. मग काय ग्लासाची फुटायची इच्छा होती? नाही, त्याला तर अशी इच्छा होऊच शकत नाही ना? आणि दुसरा कोणी फोडणारा तिथे हजरही नव्हता, मग कोणी फोडला? तर 'व्यवस्थित शक्तीने.' 'व्यवस्थित शक्ती' ही एक्जेक्ट नियमानुसार चालते. तिथे अंधेरनगरी नाही. जर 'व्यवस्थित शक्ती'च्या नियमात हा ग्लास फुटायचाच नसेल तर काचेचे ग्लास बनवणारे कारखाने कसे चालतील? हे तर 'व्यवस्थित शक्ती'ला तर तुमचेही चालवायचे आहे, आणि कारखानेही चालवायचे आहेत. आणि हजारो मजुरांना रोजी–रोटी पण मिळवून द्यायची आहे. म्हणून नियमाने काचेचा ग्लास फुटेलच, फुटल्याशिवाय राहणारच नाही. तिथे हा दुर्भागी धुमाकूळ घातल्याशिवाय राहात नाही. अरे, नोकराने फोडला असेल आणि जर दोन–चार पाहुणे बसले असतील तर मन वरखाली होते की कधी हे पाहुणे जातील आणि कधी मी नोकराच्या दोन–चार थोबाडीत मारीन. आणि तो तसे करतो सुद्धा. पण जर त्याला हे समजत असेल की हा ग्लास नोकराने फोडला नाही, 'व्यवस्थित शक्ती'मुळे फुटला आहे, तर असे काही घडेल का? मग तर संपूर्ण समाधानच राहील की नाही? खरे

तर नोकर बिचारा निमित्त आहे, त्याला हे शेठजी चावायला धावतात. निमित्ताचा चावा कधीच घेऊ नये. अरे मूर्खा, निमित्ताचा चावा घेऊन तू स्वत:चेच भयंकर अहित करीत आहेस. त्यापेक्षा मूळ रूट कॉज (मूळ कारण) शोधून काढ ना! तरच तुझा प्रश्न सुटेल.

लहानपणी मी खोडकर स्वभावाचा होतो. त्यामुळे काही ना काही तरी कळ काढून गंमत करायचो. एका शेठजींना आपल्या कुत्र्याच्या पिल्लाशी खेळण्याची आवड होती. मी काय करायचो, हळूच कुणाला समजणार नाही अशा प्रकारे मागून पिल्लाचे शेपूट जोरात आवळायचो. पिल्लाला समोर शेठजी दिसायचे त्यामुळे ते पटकन शेठजींचाच चावा घ्यायचे. त्यावर शेठजी आरडाओरड करू लागायचे. याला म्हणतात निमित्ताचा चावा घेणे.

## आत्मा-अनात्मा

तुझ्या शरीरात आत्मा आहे हे तर नक्की ना?

**प्रश्नकर्ता :** होय.

**दादाश्री :** तर मग तो कोणत्या स्वरुपात असेल? मिक्स्चर की कंपाउंड? हे आत्मा आणि अनात्मा मिक्स्चर स्वरुपात असतील की कंपाउंड स्वरुपात?

**प्रश्नकर्ता :** कंपाउंड स्वरुपात आहे का?

**दादाश्री :** जर कंपाउंड स्वरुपात असेल तर तिसरा नवीनच गुणधर्माचा पदार्थ उत्पन्न होईल. आणि आत्मा व अनात्मा आपले स्वत:चे गुणधर्म गमावून बसतील. जर असे झाले तर कोणताही आत्मा परत स्वत:च्या मूळ स्वभावात येऊच शकणार नाही आणि कधीच मुक्त होऊ शकणार नाही. हे बघ, मी तुला समजावून सांगतो. हा आत्मा आहे तो मिक्स्चर स्वरुपात आहे, आत्मा आणि अनात्मा दोन्हीही आपापल्या गुणधर्मांसहित राहिले आहेत आणि म्हणून त्यांना वेगळे केले जाऊ शकते. सोन्यात तांबे, पितळ आणि चांदी, या सर्व धातूंचे मिश्रण झाले असेल तर कोणी सायन्टिस्ट त्यांच्या गुणधर्मांप्रमाणे त्यांना वेगळे करू

शकेल की नाही? सहज वेगळे करू शकेल. त्याचप्रमाणे जे आत्मा व अनात्म्याचे गुणधर्म पूर्णपणे जाणतात आणि जे अनंत सिद्धीधारक आहेत, सर्वज्ञ ज्ञानी आहेत ते त्यांचे पृथक्करण करून त्यांना वेगळे करू शकतात. आम्ही जगातले सर्वात मोठे सायन्टिस्ट आहोत. आत्मा आणि अनात्म्याच्या प्रत्येक परमाणूंचे पृथक्करण करून, दोघांना वेगळे करून निर्भेळ आत्मा एका तासातच तुमच्या हाती देतो. ज्ञानींच्या प्रकट वाणीशिवाय बाहेर जे 'आत्मा, आत्मा' म्हणून बोलले जाते किंवा वाचण्यात येते, तो भेसळयुक्त आत्मा आहे. शब्द ब्रह्म! हो, पण निर्भेळ नाही.

हे जे सर्व धर्म पाळतात ते अनात्म्याचे धर्म पाळतात. ते सर्व रिलेटिव्ह धर्म आहेत. निर्भेळ-शुद्ध आत्म्याचे धर्म नाहीत. आत्म्याचा तर एकही गुणधर्म जाणून घेतला नाही, मग आत्मधर्माचे पालन कसे काय होईल? ज्ञानी पुरुष जोपर्यंत तुम्हाला थियरी ऑफ रिलेटिव्हीटीमधून रियालिटीमध्ये आणत नाहीत तोपर्यंत रियल धर्माचे पालन होऊ शकत नाही. हे आमचे महात्मा तुमच्यातील भगवंताला पाहू शकतात, त्यांचे दर्शन पण करू शकतात. कारण आम्ही त्यांना दिव्यचक्षु प्रदान केले आहेत. तुमचे जे चक्षु आहेत ते चर्मचक्षु आहेत, ते सर्व विनाशी पदार्थ पाहू शकतात. अविनाशी भगवंत तर दिव्यचक्षुंनीच दिसतात.

## दिव्यचक्षुंनी मोक्ष

कृष्ण भगवंतांनी महाभारताच्या युध्दाच्या वेळी अर्जुनाला दिव्यचक्षु प्रदान केले होते. ते सुद्धा अर्जुनाचे वैराग्य दूर करण्यासाठी पाचच मिनिटांपुरते दिले होते, आणि नंतर परत घेतले होते. आम्ही तुम्हाला परमनन्ट दिव्यचक्षु देत आहोत. जेणे करून जिथे पाहाल तिथे तुम्हाला भगवंत दिसतील. आमच्यात दिसतील, यांच्यात दिसतील, वृक्षवेलीत दिसतील आणि गाढवात सुद्धा दिसतील. जीवमात्रांमध्ये भगवंताचे दर्शन होईल. आत्मवत् सर्व भुतेषू, असेच सर्वत्र दिसू लागेल. मग तर काही अडचणच नाही ना!

तीनशे वर्षांपूर्वी झालेले जैनांचे सर्वात मोठे आचार्यश्री आनंदघनजी महाराज यांनी सांगितले होते की, 'या काळात दिव्यचक्षुंचा निश्चयाने

वियोग झाला आहे.' त्यामुळे सर्वांनी दरवाजे बंद करून टाकले. हे तर नैसर्गिकरित्या अद्‌भुत असे ज्ञान प्रकट झाले आहे. नॅचरल एडजस्टमेंट आहे. ज्या योगे एका तासातच दिव्यचक्षु सुलभतेने प्राप्त होत आहेत!

भगवंत काय सांगतात? मोक्षमार्ग अति, अति, अति शंभरवेळा अति दुर्लभ, दुर्लभ, दुर्लभ आहे, परंतु जर ज्ञानी पुरुष भेटले तर खिचडी बनवण्यापेक्षाही सोपा आहे!

हे आमचे बोलणे तुमचा आत्माच कबूल करेल. कारण तुमच्या आत मीच बसलो आहे, पण जर तुम्ही आडमुठेपणा केला नाही तर! आम्ही तुमच्याशी अभेदच आहोत. तुमच्यात आणि आमच्यात भेद नाही. हे सर्व लोक 'श्रद्धा ठेवा, श्रद्धा ठेवा' असे नेहमीच सांगत असतात परंतु बाबांनो, माझी श्रद्धाच बसत नाही, त्याचे काय? प्रवचन, व्याख्यान ऐकून बाहेर पडलो की कपड्यांवरची धूळ झटकावी तसे ऐकलेले सर्व झटकून विचार करतो की आज तर वांगी फार स्वस्त आहेत. (संसाराकडेच लक्ष असते.) आमच्यावर (दादांवर) श्रद्धा ठेवायची नसते. जर तुझ्या आत आत्मा असेल आणि आडमुठेपणा नसेल तर तुझी श्रध्दा अवश्य बसलीच पाहिजे. कारण ही तर ज्ञानींची डायरेक्ट ज्ञानवाणी आहे, म्हणून तुझी सर्व आवरणे भेदून सरळ तुझ्या आत्म्यापर्यंत पोहोचते आणि त्यामुळे तुझ्या आत्म्याला कबूल करावीच लागते! आमची गोष्ट तुला नक्कीच समजेल!

श्रध्दापूर्वकची गोष्ट आणि समजपूर्वकची गोष्ट यात फरक आहे. समजपूर्वकची गोष्ट असेल तरच समोरचा मनुष्य स्वीकारेल.

## पुनर्जन्म

आम्ही औरंगाबादहून विमानाने परत येत होतो. त्यावेळी एक फ्रेंच सायन्टिस्ट मायक्रोबायोलॉजिस्ट होता, तो आम्हाला भेटला. तो आम्हाला विचारू लागला की, 'तुम्ही इंडियन लोक रिबर्थला (पुनर्जन्माला) मानता तसे आम्ही मानत नाही. तर तुम्ही मला समजावून सांगू शकता की ते कसे शक्य आहे? तुम्ही सांगाल तितके दिवस मी तुमच्याबरोबर इंडियात राहायलाही तयार आहे.' आम्ही विचारले, 'किती काळापर्यंत राहू

शकशील?' फ्रेंच सायन्टिस्ट म्हणाला, 'पाच वर्ष, दहा वर्ष.' मी म्हटले 'छे, छे, आमच्याजवळ इतका वेळच नाही.' त्यावर तो म्हणाला, 'सहा महिने?' आम्ही म्हणालो, 'अरे, बाबा, आम्ही कुठे रिकामे बसलो आहोत? आम्हाला बरीच कामे उरकायची आहेत. संपूर्ण जगाचे कल्याण करायचे आहे. त्यासाठी आम्ही निमित्त आहोत. तेव्हा तू असे कर, तासाभरात आपण सांताक्रुज एरपोर्टवर उतरू, तोपर्यंत तू पुनर्जन्माला मानू लागला असशील.' आम्ही त्याला विमानातच सायन्टिफिकली समजावून सांगितले आणि तो खरोखर समजला सुद्धा! आणि जेव्हा आम्ही सांताक्रुजला उतरलो तेव्हा तो 'सच्चिदानंद, सच्चिदानंद' बोलू लागला. अरे, स्वत:च्या बायकोला सुद्धा विसरून गेला. आमचे फोटो काढून सोबत घेऊन गेला!

## मन-वचन-काया, इफेक्टिव

मन-वचन-काया इफेक्टिव (परिणामकारक) आहेत की अनइफेक्टिव? इफेक्टिव आहेत. जन्मापासूनच इफेक्टिव आहेत. गर्भात सुद्धा इफेक्टिव आहेत. इफेक्टिव कशा प्रकारे? तर सकाळी जर कुणी म्हटले की तुम्हाला अक्कल नाही, तर रात्री दहापर्यंत सुद्धा मन झोपू देणार नाही, आणि इफेक्ट सुरू होतो ते कशामुळे? तर, मन इफेक्टिव आहे म्हणून. दुसरे म्हणजे वाणी तर प्रत्यक्ष इफेक्टिव आहे. कुणाला एक शिवी देऊन बघा म्हणजे लगेच कळेल. आणि तिसरा हा देह सुद्धा इफेक्टिव आहे. थंडीच्या दिवसात थंडी वाजते, गरमीच्या दिवसात गरम वाटते. जन्मापासूनच इफेक्टिव आहे. नवजात शिशुचे पांघरलेले पांघरूण जरा सरकले तर तोही रडू लागतो आणि आपण परत पांघरूण नीट केले तर गप्प होतो. तोंडात काही तरी गोड ठेवले तर चाटू लागतो आणि कडू ठेवले तर तोंड वाकडे करतो. अरे, गर्भात सुद्धा इफेक्टिव असतो, त्याचे मी स्वत: पाहिलेले उदाहरण सांगतो.

पन्नास वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. आमच्या भादरण गावात एक बाई आठ महिन्याची गरोदर होती. रस्त्यावरुन जात असताना तिला गाईने शिंग मारले आणि त्या शिंगाचा मार गर्भाशयात बसला आणि आतून बाळाची करंगळी थोडीशी बाहेर निघाली. कित्येक डॉक्टरांना बोलावले.

त्यावेळी मिशनरी डॉक्टरांना मोठा प्रश्नच पडला की आता या परिस्थितीत काय करावे ? बाईची स्थिति गंभीर होऊ लागली होती. इतक्यात गावातल्या एका 70-80 वर्षाच्या म्हाताऱ्या आजींना ही गोष्ट कळली. त्या काठी टेकत टेकत तिथे आल्या. त्यांनी सर्वांना सांगितले की 'तुम्ही आता इथून दूर व्हा आणि निवांत बसून, देवाचे नाव घ्या आणि काय घडते ते पाहा.' मग आजींनी एक सूई घेतली आणि त्या सुईचे टोक थोडेसे गरम केले आणि बाहेर निघालेल्या करंगळीला जरासे लावले की लगेचच करंगळी आत ओढली गेली. आतल्या बाळावर त्याचा इफेक्ट झाला आणि त्याने करंगळी आत ओढून घेतली!

इफेक्ट आहे तर कॉज अवश्य असायलाच पाहिजे. कॉजेस आहेत तर इफेक्ट आहे. आणि इफेक्ट आहे तर कॉजेस असायलाच हवेत. अशा प्रकारे कॉजेस आणि इफेक्ट, इफेक्ट आणि कॉजेस यांची शृंखला चालतच राहते.

कारणाशिवाय कार्य नसते आणि कार्य असेल तिथे कारण असायलाच पाहिजे. पूर्वजन्माच्या कारणांमुळे या जन्माचा देह तो कार्यस्वरुपाचा देह आहे. जन्म होतो तेव्हा स्थूल शरीर आणि सूक्ष्म शरीर, अशी दोन शरीरे एकमेकांच्या सोबतच असतात. पण नंतर त्यापासून जो इफेक्ट येतो त्यात राग-द्वेष करून मनुष्य दुसरी नवीन कारणे उत्पन्न करतो आणि पुढच्या जन्माचे बीज पेरतो. अगदी मरेपर्यंत कारण शरीर उत्पन्न करत राहतो. मृत्यू होतो तेव्हा कारण शरीर इथेच पडून राहते. त्या कारण शरीरातून पुन्हा लगेचच त्याला कार्य शरीर मिळते, ऑन दी व्हेरी मोमेन्ट. (त्याच क्षणी).

जर पुनर्जन्मच नसता आणि जर देवानेच सर्वांना घडविले असते तर सर्व जण एकसारखेच घडले गेले असते. एकाच साच्यातून निघाले असतील असे एकसारखेच दिसले असते. परंतु तसे तर नाही. इथे तर एक मोठा तर एक लहान, एक लंबू तर दुसरा ठेंगणा, एक गोरा, एक काळा, एक गरीब, एक श्रीमंत असे वेगवेगळे असतात. या सर्वांमध्ये जो फरक दिसतो, तो त्यांच्या पूर्वजन्मांवर आधारित आहे. पूर्वीच्या

कॉजेसच्या आधाराने आजचे हे वेगवेगळे इफेक्टस्‌च आहेत. प्रत्येकाचे कॉजेस वेगळे त्यामुळे इफेक्टस्‌ सुद्धा वेगवेगळे आढळतात. पुनर्जन्म नाही हे सिद्ध करण्यासाठी एक तरी पुरावा दाखवा. हे इंग्रज 'लकी' आणि 'अनलकी' असे बोलतात ते कशामुळे? मुसलमान सुद्धा तकदीर आणि तदबीर हे शब्द वापरतात, ते काय सुचवतात? सर्वांची भाषा पूर्ण आहे परंतु बिलिफ (मान्यता) अपूर्ण आहे.

जसे कॉजेस उत्पन्न केले असतील तसेच इफेक्टस्‌ येतात. चांगल्याचे चांगले आणि वाईटाचे वाईट. पण शेवटपर्यंत यातून सुटका होत नाही. जर कॉजेस होण्याचे बंद झाले तरच इफेक्टस्‌ बंद होतील. परंतु जोपर्यंत 'मी चंदुभाऊ आहे' हे तुमच्या बिलिफ मध्ये (मान्यतेत) आहे, ज्ञानातसुद्धा 'मी चंदुभाऊ आहे' हेच आहे तोपर्यंत कॉजेस बंद होणारच नाहीत. ते केव्हा बंद होतात? तर जेव्हा ज्ञानी पुरुष गदागदा हलवून जागे करतात आणि स्व स्वरूपाचे भान करवितात तेव्हा कॉजेस उत्पन्न होणे बंद होते. आम्ही कारण शरीराचा नाश करून टाकतो. नंतर या चंदुलालच्या पदरी जितके इफेक्टस्‌ आहेत त्यांचा निकाल करून टाकावा. मग त्या इफेक्टस्‌चा निकाल करताना तुम्हाला राग-द्वेष होत नाही आणि त्यामुळे नवीन बीजे पडत नाहीत. होय, एवढे मात्र खरे की इफेक्टस्‌ तर भोगावेच लागतील. इफेक्टस्‌ तर या जगात कोणीच बदलू शकत नाही! ही पूर्णपणे सायन्टिफिक गोष्ट आहे. मोठमोठ्या सायन्टिस्टांनासुद्धा माझी ही गोष्ट मान्य करावीच लागेल.

या कलियुगात, या दूषमकाळात हे अद्‌भुत आश्चर्यज्ञान प्रकट झाले आहे! या आश्चर्यकाळाचे आम्ही अक्रम ज्ञानी आहोत आणि हे आम्हाला स्वत:लाच सांगणे भाग पडले आहे. कारण हिऱ्यालाच स्वत:ची ओळख पटवून देण्यासाठी स्वत:च बोलावे लागते, असा हा वर्तमान आश्चर्यकाळ आहे!

## आधि-व्याधि-उपाधि

संपूर्ण जग त्रिविध तापात जळत आहे! अरे, पेट्रोलच्या अग्निज्वालेत जळत आहे!! हे तीन ताप कोणते? तर, आधि, व्याधि आणि उपाधि.

पोटदुखी झाली तर ती व्याधि, भूक लागली तर ती व्याधि. डोळे दुखायला लागले तर ती सुद्धा व्याधि. शारीरिक दु:खांना व्याधि म्हटले जाते.

मानसिक दु:खांना आधि म्हटले जाते. दिवसभर चिंता करत राहणे त्यास म्हणतात आधि, आणि जी दु:खे बाहेरून येऊन धडकतात त्यांना म्हणतात उपाधि. आत्ता इथे बसलो आहोत आणि कोणी दगड मारला ती उपाधि. कुणी आपणास बोलवायला आले तर ती म्हणायची उपाधि. उपाधि बाहेरून येते, आतून येत नाही.

सारे जग, मग ते साधू असो किंवा संन्यासी, सगळेच त्रिविध तापाग्नित जळत आहेत. आम्ही ज्यांना ज्ञान दिले आहे त्यांना मात्र निरंतर समाधि वाटते. कारण ते तर प्रत्येक अवस्थेला 'पाहतात' आणि 'जाणतात'.

हे कशासारखे आहे? चुकून जर तुम्ही दुसऱ्या कोणाच्या घरात शिरलात तर तुम्हाला भीती वाटणार की नाही? वाटणारच. मला कुणी हाकलून देईल, खडसावेल, सतत अशी भीती वाटत राहते. पण जर तुम्ही स्वत:च्याच घरात बसले असाल, तर भीती वाटेल? स्वत:च्या घरात तर शांतीच असते, नाही का? तसेच हे सुद्धा आहे. चंदुलाल, हे तुमचे घर नव्हे. तुम्ही स्वत: क्षेत्रज्ञ पुरुष आहात आणि भ्रांतीमुळे परक्या क्षेत्रात क्षेत्राकार होऊन गेलात. पर वस्तूचे स्वामी होऊन बसला आहात, आणि परत भोक्ता सुद्धा होऊन बसला आहात. त्यामुळे निरंतर काळजी, चिंता, उपाधि, आकुळता, व्याकुळता वाटत राहते. पाण्यातून बाहेर काढलेला माशासारखे निरंतर तडफडतच राहता. हे शेठ लोक डनलॉपच्या गाद्यांवर झोपतात, मच्छरदाणी बांधतात, व एक एक ढेकूण बाहेर काढायला लावून मग झोपतात, तरी सारखी कुशी बदलत राहतात. रात्रभर अडीच मणाचे पोते (शरीर) इकडून तिकडे फिरवत राहतो. काय करणार बिचारा?! पलंगावर अधांतरी तर झोपू शकत नाही ना!

## जगत् आणि ब्रह्म

हे जग सत्य असेल की इल्युजन (मिथ्या)?

**प्रश्नकर्ता :** इल्युजन.

**दादाश्री :** नाही. तसे नाही. हे बघा, इल्युजन म्हणजे काय हे मी तुम्हाला समजावून सांगतो. इल्युजन म्हणजे समोर पाणी दिसते म्हणून आपण धोतर वर ओढून घेतो पण खरे तर धोतराला पाणी शिवलेसुद्धा नसते. सर्व काही प्रचंड आगीत जळत आहे असे वाटते पण भाजले जात नाही, हे आहे इल्युजन. काही लोक म्हणतात, 'ब्रह्म सत्य, जगत मिथ्या.' जर मिथ्या आहे तर विस्तवावर हात ठेवून बघ की! लगेच कळेल की मिथ्या आहे की नाही! आणि जर मिथ्या असेल, तर कुणी सांगितले की 'चंदुलालला अक्कल नाही'! तर ती गोष्ट तिथल्या तिथेच मिथ्या सिद्ध व्हायला पाहिजे. मिथ्या कशास म्हणता येईल की ती गोष्ट जिथल्या तिथे मिथ्या सिद्ध होईल. उदाहरणार्थ भिंतीवर विटेचा तुकडा फेकला तर तो लगेच तुटून भिंतीवर त्याचा परिणाम होऊन लाल डाग पडेलच. पण इथे तर चंदुलाल रात्री दोन वाजता जागा झाल्याबरोबर त्याचा इफेक्ट सुरू होतो, की तो मला असे म्हणाला होता. मग त्यास मिथ्या कसे म्हणता येईल? आम्ही तर म्हणतो की जगत् पण सत्य आहे आणि ब्रह्म पण सत्य आहे. जगत रिलेटिव्ह सत्य आहे आणि ब्रह्म रियल सत्य आहे. ही आमची त्रिकाळ सत्वाणी आहे. या जगाचे रिलेटिव्ह सत्य केव्हा असत्य होईल हे सांगता येत नाही. ऑल धीस आर टेम्परारी एडजस्टमेंटस् आणि ब्रह्म हे रियल सत्य आहे. परमनन्ट आहे, शाश्वत आहे!

## मन-वचन-कायेची भुताटकी

मनुष्यमात्राला मन-वचन-काया, या तिन्ही भुतांनी धरले आहे. त्यामुळेच तो बोलत राहतो की 'मी चंदुलाल आहे, कलेक्टर आहे, हिचा नवरा आहे, याचा बाप आहे.' अरे शहाण्या, तू काय कायमचा कलेक्टर आहेस? तर म्हणतो, 'नाही, रिटायर होईन की!' ही परत नवीन भुताटकी! एखाद्या दारूड्या दारू पिऊन गटारीत लोळतो आणि बोलतो काय? 'मी सयाजीराव गायकवाड आहे, मी राजा आहे, महाराजा आहे.' तेव्हा आपण समजतोच ना की, तो बोलत नाही, तर दारूची नशा बोलत आहे! त्याच प्रमाणे मन-वचन-कायेची जी भुताटकी लागली आहे, त्याची नशा बोलत आहे. की 'मी चंदुलाल आहे, कलेक्टर आहे' आणि त्या धुंदीतच तो नाचत आहे.

एक सत्य घटना मी तुम्हाला सांगतो. काशी नावाची एक बाई होती. ती आपल्या शेजारणींशी गप्पागोष्टी करत बसली होती आणि अचानक अंगात वारा आल्यासारखी वागू लागली. विचित्रपणे डोळे फिरवू लागली. सर्व जणी घाबरल्या. त्यांच्यातली एक म्हणाली, 'हिला तर भुताने झपाटले आहे. भुताटकी काढणारा तांत्रिक आपल्या गावात आहे त्याला बोलावून आणा.' तिचा नवरा जाऊन त्या तांत्रिकाला घेऊन आला. हिला भुताटकीच झाली आहे हे त्या तांत्रिकाच्या लक्षात आले. त्याने तिला सटाक-सटाक चाबूक मारण्यास सुरुवात केली. ती जोरात किंचाळू लागली. त्या तांत्रिकाने विचारले 'कोण आहेस तू?' तर काशी म्हणाली 'आय ॲम चंचल, आय ॲम चंचल.' त्या तांत्रिकाने तिला विचारले, 'तू इथे कशाला आली आहेस?' तर ती काशी म्हणाली, 'या काशीने माझ्या नवऱ्यावर भुरळ घालून त्याला आपल्या रूपाने फसवले आहे' अरेच्चा! या काशीला तर इंग्रजीची ए-बी-सी-डी सुद्धा येत नाही आणि ही सराव असल्यासारखी इंग्रजी भाषा कशी बोलू लागली 'आय ॲम चंचल, आय ॲम चंचल.' नंतर चौकशी केली तेव्हा कळले की चंचल इंग्रजी शिकलेली होती आणि चांगली इंग्रजी बोलत होती. त्यावर भुताटकी काढणाऱ्या त्या माणसाने तिला मारले, समजावले आणि नंतर तिने सांगितलेल्या सर्व वस्तू घेऊन तो गावाच्या सीमेवरील वडाच्या झाडाच्या ढोलीत ठेवून आला आणि चंचलच्या भुताटकीतून काशीला मुक्त केले.

अशी असते ही भुताटकी. चंचल तर नंतर निघून गेली पण तिच्या निमित्ताने काशीच्या अंगावर वळ उमटले ते मात्र तसेच राहिले. ते घाव भरेपर्यंत बिचारीला वेदना सहन करावी लागली!

मन-वचन-काया, या तीन भुतांची जी भुताटकी तुम्हाला लागली आहे, त्यास हाकलून लावणारे आम्ही तांत्रिक आहोत. या तिन्ही भुतांपासून आम्ही तुम्हाला मुक्त करतो. एवढे मात्र खरे की चाबकाचे उमटलेले घाव जोपर्यंत भरून निघत नाहीत तोपर्यंत त्यांचा इफेक्ट राहील. पण भुतांपासून तुमची कायमची मुक्ती होईल.

हे मन-वचन-काया म्हणजे एक प्रकारची भुताटकीच आहे एवढेच

जर तुमच्या लक्षात आले, तर पंचेचाळीस आगमापैकी पंचवीस आगम (जैन शास्त्र) तुम्ही शिकलातच, असे समजा!

घर-दार, बायको-मुले किंवा कपडे वगैरे काहीही सोडण्याची गरज नाही. या तीन भुतांच्या भुताटकीपासून सुटण्याचीच गरज आहे.

## आगम-निगम

आगम (शास्त्र) तर गुरू विना वाचायचेच नसतात. आगमची गम (समज) ज्ञानींनाच असते. स्वतः अगम (अज्ञानी) मग त्याला आगमाची गम कशी काय असणार? आम्हाला आगम-निगम हे सर्व सुगमच असतात.

## पूरण आणि गलन

रियल 'मी' ला शोधून काढ. 'मी मी' काय करतोस? ही बकरी सुद्धा में में करते आणि तू सुद्धा 'मी आहे, मी आहे' करतोस. पण कुणाला मी म्हणतोस? या देहाला? हे तर पूरण-गलन आहे. चढणे-उतरणे हा तर संसाराचा स्वभाव आहे. प्रत्येकाची मान्यता आहे की पैसे गोळा करायचे. पण ते सुद्धा पूरण-गलनच आहे. या बँक अकाउंटमध्ये दोन खाती असतात की एक? दोन. क्रेडिट आणि डेबिट. मग शहाण्या, तू नुसते क्रेडिटचे खातेच का ठेवत नाहीस? नाही ठेवता येत. नियमानेच ज्याचे-ज्याचे पूरण होत आहे त्याचे गलन होणारच. हे आपण खाणे खातो ते पूरण आहे आणि संडासला जातो ते गलन आहे. पाणी पितो ते पूरण आहे आणि बाथरुमला जातो ते गलन आहे. मनात विचार येतात आणि जातात, ते सुद्धा पूरण-गलनच आहे.

भोजनालय-शौचालय, पूरण-गलन आणि शुद्धात्मा! या खेरीज ज्ञानींना या जगात दुसरे काही दिसतच नाही. भोजनालय म्हणजे उपभोग घेण्याची, वापरण्याची वस्तू, शौचालय म्हणजे भोग घेतल्यानंतर सोडून देण्याची वस्तू. बाकी उरले ते पूरण-गलन आणि शुद्धात्मा. यात सर्व काही सामावून जाते.

हा करंटा खा-खा खातो आणि मग जुलाब होतात. आणि जर

त्याचे गलन झाले नाही तर काय होईल? अपचन आणि गॅस. तसेच पैशांचेही आहे. त्याचे तर कुणाला भान सुद्धा नाही. कुणाला कुठल्याही प्रकारचे गलन झाले नसेल असा माणूस शोधून काढा. महीसागर नदी सुद्धा नर्मदेला म्हणते 'माझ्याकडे पुष्कळ पाणी येते आणि जाते. पण उन्हाळा आला की मग तिथेही कोरडेच असते.' मी बऱ्याच डॉक्टरांना विचारले की ही नखे वाढतात त्याचे कारण काय? त्यावर वाटेल ते उत्तर देऊ लागले, की कॅल्शियममुळे वाढतात वगैरे. पण खरे तर तसे नाही. यथार्थ सांगायचे तर ते एक प्रकारचे गलनच आहे. आहारात हाडांचे सांयोगिक घटक येऊन मिळतात त्यायोगे हाडांचे पूरण होत राहते. त्याचे मग नखांद्वारे गलन होत असते. जे निरुपयोगी असेल त्याचे गलन नियमाने होतेच. त्याच प्रकारे देहातसुद्धा परमाणूंचे पूरण-गलन होतच राहते. मनुष्य दहा वर्षाचा असताना त्याच्यात जे परमाणू होते, त्यातला एकही परमाणू पंचविसाव्या वर्षी नसतो. जुन्या परमाणूंचे गलन होते आणि नवीन परमाणूंचे पूरण होते. पूरण-गलन, पूरण-गलन ही साखळी चालतच राहते.

पापाचे पूरण करीत आहेस, परंतु जेव्हा त्याचे गलन होईल तेव्हा तुझे धाबे दणाणतील किती भयंकर परिस्थिती होईल! अगदी विस्तवावर बसवल्यासारखेच वाटेल! पुण्याचे पूरण करशील आणि त्याचे जेव्हा गलन होईल तेव्हा अपार सुखाचा अनुभव होईल. म्हणून ज्याचे ज्याचे पूरण कराल, तेव्हा समजून, विचारपूर्वक करा की जेव्हा त्याचे गलन होईल तेव्हा परिणाम काय होतील! पूरण करताना सतत सावधानी बाळगा. पाप करताना, कुणाला लुबाडून पैसे कमावताना नेहमी लक्षात असू द्या की याचेही गलन होणार आहे. ते पैसे बँकेत ठेवाल तरी ते जाणारच आहेत. त्याचेही गलन तर होणारच. आणि ते पैसे मिळवताना जे पाप केले, जे रौद्रध्यान केले ते त्याच्या कलमांसोबत (परिणामसह) येणार आहे. आणि जेव्हा त्याचे गलन होईल तेव्हा तुझी काय दैना होईल? लक्ष्मीला कोणीच अडवू शकत नाही. लक्ष्मी तर भगवंताची पत्नी आहे. तिला सुद्धा अडवून ठेवतोस? लग्नानंतर बायकोला माहेरी जाऊ न देता घरातच कोंडून ठेवलीस तर त्या बिचारीची काय अवस्था होईल? तसेच हे लोक लक्ष्मीच्या बाबतीत सुद्धा करू लागले आहेत.

त्यामुळे लक्ष्मीसुद्धा आता कंटाळून गेली आहे. आम्हाला तर बडोदा स्टेशनवर लक्ष्मीजींची जेव्हा जेव्हा भेट होते तेव्हा तेव्हा आम्ही हात जोडून त्यांना नम्रपणे सांगतो की, आमचा पत्ता मामांची पोळ आणि सहावे घर, जेव्हा यायची इच्छा असेल तेव्हा यावे, आपले स्वागत आहे आणि जेव्हा जायची इच्छा असेल तेव्हा जाऊ शकता. तेव्हा लक्ष्मी मला सांगते की, या शेठजींच्या घरी मी फार कंटाळून गेले आहे. तेव्हा आता मी तुमच्या महात्म्यांच्या घरीच जाईन. कारण जेव्हा मी तुमच्या महात्म्यांच्या घरी जाते तेव्हा ते फुलांच्या हाराने माझे स्वागत करतात आणि जेव्हा परत जायला निघते, तेव्हा सुद्धा फुलांच्या हाराने सन्मानपूर्वक मला निरोप देतात. जी-जी माणसे मला डांबून ठेवण्याचा प्रयत्न करतात त्यांच्याकडे मी आता जाणार नाही. आणि जे माझा तिरस्कार करतात त्यांच्याकडे तर किती तरी जन्मांपर्यंत मी जाणार नाही! पैसा तर येतो आणि जातो. दहा वर्षांनंतर ती लक्ष्मी टिकत नाही, परिवर्तन होतच राहते.

विश्व सारे आकुळतेत आणि व्याकुळतेत फसलेले आहे. मग तो त्यागी असो किंवा संसारी, निराकुळता कोणत्याही जीवात दिसतच नाही. निराकुळता तर स्वत:च्या स्वरूपाचे भान झाल्यानंतरच उत्पन्न होते. क्रमिक मार्गात तर निराकुळता प्राप्त करण्यासाठी संपूर्ण संसारसमुद्र ओलांडून समोरच्या किनाऱ्यावर जाता तेव्हाच निराकुळतेचा तट समोर येतो. किती मेहनत करावी लागते? आणि या अक्रम मार्गात आम्ही तुमच्या मस्तकावर हात ठेवला, की तुम्हाला कायमची निराकुळता उत्पन्न होते!

## संसारविघ्ने निवारक 'त्रिमंत्र'

मंत्र याचा खरा अर्थ काय? मंत्र म्हणजे जे मनाला शांत ठेवते ते साधन. भगवंताची भक्ती करताना संसारात विघ्न येऊ नये म्हणून भगवंतांनी तीन मंत्र दिले होते. (1) नवकार मंत्र (2) ॐ नमो भगवते वासुदेवाय (3) ॐ नम: शिवाय. परंतु अहंकारी माणसांनी नवीन नवीन संप्रदाय स्थापन करून मंत्र सुद्धा वाटून घेतले. भगवंतांनी सांगितले होते की, तुमच्या सोयीसाठी देवळे-जिनालय इत्यादी वाटून घ्यायची असतील तर तुम्ही वाटून घ्या, परंतु मंत्राना मात्र वाटू नका, ते एकत्रच ठेवा. तरी

सुद्धा लोकांनी मंत्र वाटून घेतले. हे लोक तर इथपर्यंत गेले की एकादशीच्या सुद्धा वाटण्या केल्या. शैवांची एकादशी वेगळी आणि वैष्णवांची वेगळी. अशाने देव कसे खुश होतील? जिथे भांडणे आणि मतभेद असतील तिथे भगवंताचा वास नसतो. आम्ही दिलेल्या या त्रिमंत्रात तर अजब शक्ती आहे. मागाल ते मिळेल इतकी शक्ती आहे. सर्व देवी-देवता प्रसन्न असतात आणि विघ्नेही येत नाहीत. सूळीचा घाव सूईने सरतो. (मोठे नुकसान छोट्या स्वरूपात येऊन निघून जाते.) हा त्रिमंत्र संपूर्णपणे निष्पक्षपाती आहे.

हा आम्ही दिलेला त्रिमंत्र सकाळी आमचा (दादाजींचा) चेहरा आठवून पाच वेळा बोललात तर तुम्ही कधी बुडणार नाहीत आणि हळूहळू मोक्ष सुद्धा मिळेल. आणि त्याची जबाबदारी आम्ही घेत आहोत.

आम्ही तर सांगतो की साऱ्या जगाची दु:खे आमच्यावर येवोत. तुमच्यात ताकद असेल तर तुमची सर्व दु:खे आमच्या चरणी जरासुद्धा अंतरपट न ठेवता अर्पण करून टाका. आणि त्यानंतर जर दु:ख आले तर आम्हाला सांगा. पण या काळात मला अशीही माणसे भेटली आहेत की जी म्हणतात तुम्हाला दु:ख देऊन टाकले तर मग आमच्याकडे काय उरेल? पण त्यांना हे माहीत नाही की ते स्वत:च अनंत सुखाचे कंद आहेत. तुम्ही जर दु:ख देऊन टाकलेत तर तुमच्याकडे निव्वळ अपार सुखच उरेल. पण कुणाला दु:ख देखील अर्पण करता येत नाही!

'मनुष्य रूपेण मृगाश्चरंति' असे कुठेतरी लिहिलेले आहे. यात घाबरत घाबरत मृग शब्द वापरला आहे. 32 मार्कांवर गाढवाचा जन्म आणि 33 मार्कांवर मनुष्याचा जन्म होतो. 1 मार्क तर देहासाठी वापरला गेला तर मग उरले काय? गुण तर गाढवाचेच राहिले. पॅकिंग माणसाचे आणि आत गुण जर पाशवी असतील तर तो पशूच आहे. आम्ही स्पष्टच सांगतो, कारण आमच्या मनात स्वार्थ नाही, लालूच नाही. आम्हाला तर फक्त तुमचे हितच पाहायचे आहे. तुमच्यावर आमची अपार करुणा आहे आणि म्हणूनच आम्ही नग्न सत्य तुम्हाला सांगत आहोत. या जगात आम्ही एकटेच नग्न स्वरूपाचे सत्य सांगत आहोत.

## चिंता आणि अहंकार

*श्रीकृष्ण म्हणतात :*

*'जीव तू शीदने शोचना करे,*
*कृष्णने करवुं होय ते करे.'*

(जीवा, तू का विचार करतोस,
श्रीकृष्णाला जे करायचे असेल ते करील!)

तिथे ही संसारी माणसे काय म्हणतात, कृष्णाला जे सांगायचे असेल ते सांगू देत पण आम्हाला तर हा संसार चालवायचा आहे, मग चिंता केल्याशिवाय कसे चालेल? लोकांनी तर चिंतेचे कारखानेच उभारले! पण तो माल खपतच नाही ना! कोण घेणार? ज्याला विकायला जाईल त्याच्याहीकडे चिंतेचा कारखाना असतोच! या जगात एक तरी असा माणूस शोधून काढा की ज्याला कधी चिंता होत नसेल.

एकीकडे बोलतात 'श्री कृष्णः शरणं मम' आणि दुसरीकडे म्हणतात 'हे कृष्णा, मी तुझ्या शरणी आहे.' जर कृष्णाच्या शरणी गेला आहात तर मग चिंता कशासाठी? महावीर भगवंतांनी सुद्धा चिंता करण्यास मनाई केली आहे. त्यांनी तर चिंतेचे फळ म्हणजे तिर्यंचगती असे सांगितले आहे. चिंता म्हणजेच सर्वात मोठा अहंकार. 'हे सर्व मीच चालवत आहे.' असेच ठामपणे वाटत असते, त्याचे फळ म्हणून चिंता उत्पन्न होते.

देवाचा खरा भक्त तर चिंता उत्पन्न झाली तर देवावर सुद्धा रागावतो, आणि म्हणतो 'देवा, तू तर म्हणतोस की चिंता होणार नाही, मग मला का चिंता होत आहे?' जो देवावर रागावत नाही, तो खरा भक्तच नाही. जर काही अडचण आली तर देव तुमच्या आतच विराजमान आहे, त्याच्याशी भांडा, तक्रार करा. देवाशीही भांडते तेच खरे प्रेम. आजच्या काळात खरा देवभक्त सापडणे सुद्धा मुश्किल आहे. सगळेच आपापल्या स्वार्थाच्या रिंगणात फिरत असतात.

'मी करत आहे, मी करत आहे' असेच वाटत राहते म्हणून चिंता होते. नरसिंह महेता काय म्हणतात :

*'हुं करुं, हुं करुं अेज अज्ञानता, शकटनो भार ज्यम श्वान ताणे.'*
*'सृष्टि मंडाण छे सर्व एणी पेरे, जोगी जोगेश्वरा कोक जाणे.'*

(मी करतो, मी करतो हीच अज्ञानता, बैलगाडीचे ओझे जसे श्वान वाहतो, सृष्टिचा प्रारंभ झाला सर्व त्याचप्रकारे, कुणी योगी योगेश्वरच जाणतात.)

हे वाचून सर्व योगी फार खुश झाले. अहो, पण हे तर आत्मयोगी आणि आत्मयोगेश्वरांना उद्देशून सांगितले गेले आहे. आत्मयोगेश्वर हजारो–लाखो वर्षात एखादाच जन्माला येतो. तो एकटाच अखिल ब्रह्मांडाच्या प्रत्येक परमाणूमध्ये फिरून आलेला असतो आणि त्या योगे ब्रह्मांडाच्या आत आणि ब्रह्मांडाच्या बाहेर राहून प्रत्येक परमाणू पाहून सर्व बोलत असतो. त्याला एकट्यालाच सृष्टिची वास्तविकता काय आहे हे उमजलेले असते की हे जग कुणी बनवले, कसे बनवले आणि कशा प्रकारे चालत आहे. आम्ही या काळाचे आत्मयोगेश्वर आहोत. म्हणून तुम्ही या संधीचा फायदा घ्या. आणि आपले कल्याण करून घ्या. एका तासातच तुमची सर्व चिंता मी घेऊन टाकतो. आणि तुम्हाला गॅरंटी देतो की एकसुद्धा चिंता तुमच्या वाट्याला राहिली तर वकील ठेवून कोर्टात माझ्यावर केस करा. आम्ही अशा चौदाशे महात्म्यांना चिंतामुक्त केले आहे. तेव्हा मागा, तुम्ही मागाल ते देण्यास मी समर्थ आहे, पण जरा समजून मागा. असे मागा की जे कधी तुमच्याकडून जाणार नाही. नाशवंत गोष्टींची मागणी करू नका. कायमचे सुख मागून घ्या.

परसत्तेचा वापर केल्याने चिंता उत्पन्न होते. परदेशात मिळवलेले परदेशातच राहील. ही मोटार, हा बंगला, फॅक्टरी, बायको, मुले सर्व काही इथेच सोडून जावे लागेल. (आयुष्याच्या) सर्वात शेवटच्या स्टेशनवर कुणाच्या बापाचेही चालणार नाही. फक्त पाप आणि पुण्य एवढेच सोबत घेऊन जावू देतील. साध्या भाषेत तुम्हाला समजावतो की तुम्ही इथे जे काही गुन्हे केले आहेत त्यांची कलमे तेवढी तुमच्यासोबत येतील. गुन्हे

करून जे कमावले ते इथेच पडून राहील. आणि तुमच्यावर केस दाखल होईल. त्या कलमांनुसार नवीन देह प्राप्त करून पुन्हा नव्याने कमाई करून देणे चुकते करावे लागेल! म्हणून आधीच सावध व्हा ना! स्वदेशात (आत्म्यात) तर अतिशय सुख आहे. पण स्वदेश तर पाहिलाच नाही ना!

हे आपले केस सुद्धा आपले झाले नाहीत, मग दुसरे कोण आपले होईल? हा करंटा दिवसभर डोक्यावर हात फिरवत राहतो. मग न्हाव्याने केस कापून टाकल्यानंतर हात फिरव की? नंतर हात फिरवायला आवडेल का?

चिंता म्हणजेच अहंकार. छोट्या मुलांना चिंता का होत नाही? कारण त्यांना माहीत आहे की हे मी चालवत नाही. कोण चालवीत आहे याची त्याला पर्वासुद्धा नाही. चिंता करतो ती सुद्धा शेजाऱ्याचे पाहून. शेजाऱ्याच्या घरी गाडी आहे आणि आपल्या घरी नाही. अहो! जीवन निर्वाहासाठी किती आवश्यक आहे? ते तुम्ही एकदा ठरवून टाका की माझी आवश्यकता इतकी आहे. उदाहरणार्थ, घरात खायला-प्यायला व्यवस्थित हवे, राहण्यासाठी घर हवे, घर चालवण्यासाठी पुरेशी लक्ष्मी पाहिजे, मग तेवढे तर तुम्हाला मिळेलच. पण जर शेजाऱ्याने बँकेत 10 हजार रुपये जमा ठेवले असतील, तर तुमचे मन खाली वर होत राहील. अशानेच दु:ख उद्‌भवतात. तुम्ही स्वत:च दु:खांना आमंत्रण देता.

एक जमीनदार माझ्याकडे आला. तो मला विचारू लागला की, 'जीवन जगण्यासाठी किती आवश्यक आहे? माझ्याकडे एक हजार एकर जमीन आहे, बंगला आहे, दोन मोटारी आहेत आणि बराचसा बँक बॅलेंससुद्धा आहे. तर मी त्यातील किती माझ्याजवळ ठेवावे?' मी म्हटले, 'बघ बाबा, प्रत्येकाची आवश्यकता किती असावी याचा अंदाज त्याच्या जन्मावेळी किती वैभव होते, त्या वरून ठरवावे. त्यामानाने आयुष्यभरासाठी किती हवे याचे माप तुम्ही ठरवा. हाच खरा नियम आहे. यापेक्षा जास्त सर्व एक्सेस (गरजेपेक्षा जास्त) म्हणायचे आणि एक्सेस हे तर विष आहे, मरण ओढवून घ्याल.

## प्राप्ताला उपभोगा

कृष्ण भगवंतांनी काय सांगितले आहे, की 'तुला जे प्राप्त झाले

आहे त्याचा उपभोग घे. जे प्राप्त नाही त्याची चिंता करू नकोस.' एकदा मी अहमदाबादच्या एका शेठजींच्या घरी गेलो होतो. शेठाणींने सुरेख स्वयंपाक आणि गोडधोड तयार करून ठेवले होते. मी आणि शेठजी जेवायला बसलो. शेठाणी शेठजींना म्हणाल्या, 'आज तरी निवांत जेवा.' मी विचारले 'असे का म्हणता तुम्ही?' तर शेठाणी म्हणाली, 'अहो, हे इथे जेवतात तेव्हा नुसता देह जेवत असतो आणि शेठ तर मिलमध्ये असतात. कधीही निवांतपणे जेवत नाहीत.' 'अरे, हे सुंदर पक्वानांचे ताट प्राप्त झाले आहे. त्याचा उपयोग घ्या ना निवांतपणे! मिल या क्षणी अप्राप्त आहे मग त्याची चिंता कशाला? भूत आणि भविष्य दोन्हीही अप्राप्त आहेत. वर्तमान प्राप्त आहे, त्याचा निवांतपणे उपभोग घ्या. अरे लोक तर इथपर्यंत काळजी करतात की चार वर्षाच्या मुलीच्या लग्नाची काळजी आत्तापासूनच करतात! अरे, ते इथपर्यंत की तो मृत्युशैयेवर पडला असेल, घरच्यांनी पणती वगैरे लावून ठेवली असेल आणि तो अंतिम श्वास घेत असेल, तेव्हा ती बिचारी मुलगी सुद्धा जवळ येऊन कानाशी म्हणते, की 'बाबा, तुम्ही निवांत जा. माझी काळजी करू नका.' तर हा दुर्भागी म्हणतो कसा 'यात तुला काय कळतंय!' म्हणजे त्याला वाटते की हिला जरा अक्कल कमी आहे म्हणून ही असे बोलते. छान! आला मोठा, अकलेचा कांदा! बाजारात विकायला गेलात तर कुणी चार आणे सुद्धा देणार नाही.

आत्मा जसे चिंतन करतो तसे लगेच फळ मिळते. एका-एका अवस्थेत एक-एक जन्म बांधून घेतो, असे आहे हे सर्व!

## ध्यान आणि अपध्यान

भगवंताने सांगितले आहे की सर्व जीव चार प्रकारच्या ध्यानातच असतात. रौद्रध्यान, आर्तध्यान, धर्मध्यान आणि शुक्लध्यान.

**ध्यान-अपध्यान :** जे चारही ध्यानात बसत नाही ते अपध्यान. पूर्वी लोकांना अपध्यान होत असे. परंतु या काळात तर शिपायाला सुद्धा अपध्यान होत असते. या लोकांना आज नाही तरी मी गेल्यानंतर माझ्या वाक्यांनी कापरे भरेल.

अपध्यान तर दुर्ध्यानापेक्षासुद्धा वाईट. अपध्यान या काळातच उत्पन्न झालेले आहे. ज्या ध्यानाचा रौद्र, आर्त आणि धर्मध्यानात समावेश होत नाही ते अपध्यान!

शुक्लध्यान तर या काळात नाहीच, असा शास्त्रांमध्ये उल्लेख आहे. या चारही ध्यानात जे सामावले जात नाही ते अपध्यान.

मुक्त होण्यासाठी केले जाते ते ध्यान जर पद्धतशीरपणे केले नाही तर ते अपध्यानात जाते. सामायिक करताना त्याला वाटते की 'मी केले.' परत सांगतोसुद्धा की 'मी केले!' आणि तेव्हा सारखा घड्याळाकडे बघत राहतो. घड्याळ बघत बसतो त्यास ध्यान कसे म्हणता येईल?

**रौद्रध्यान :** रौद्रध्यान म्हणजे काय? हे व्यापारी एका मीटरचे वीस रुपये सांगतात. आपण विचारले की हे कापड कोणते? तर म्हणतात टेरेलिन. गिऱ्हाईकाला भाव सांगतात वीस रुपये मीटर आणि मग कापड मोजताना काय करतात? कापड मोजताना असे...असे ओढतात ना? यास कसली कसरत म्हणायची? तर हे आहे रौद्रध्यान. गिऱ्हाईकाला कापड मोजून देतात, थोडेफार कमी देऊन, समोरच्या माणसाला फसवून त्याच्या वाट्याचे जे लुबाडून घेतात त्यास म्हणतात रौद्रध्यान. समोरच्याकडून जास्त पैसे घेणे किंवा मोजमापात गडबड करून पैसे लुबाडणे ते सर्व रौद्रध्यानच आहे. आणि भेसळ करतात ते सुद्धा रौद्रध्यानच आहे. स्वतःच्या सुखासाठी, दुसऱ्याचे किंचितमात्र सुख हिरावून घेण्याचा विचार करणे, त्यास रौद्रध्यान म्हणतात. कायदा काय म्हणतो? की, 'तू आधीच आपले पंधरा किंवा वीस टक्के वाढवून धंदा कर. असे केल्यानंतर सुद्धा तू कापड खेचून मापत असलास तर तो गुन्हा आहे. भयंकर गुन्हा आहे. खऱ्या जैनाला तर रौद्रध्यान असूच शकत नाही.

जसा ॲक्सिडंट केव्हा तरीच होतो त्याप्रमाणे रौद्रध्यान कधी तरीच व्हायला हवे. कुणावरही क्रोध केला, शिव्या दिल्या, क्लेश उत्पन्न केला, तर ते सर्व रौद्रध्यानच आहे. केवळी भगवंतांनी रौद्रध्यान अगदी कमीत कमी व्हायला हवे, असे जैनांना सांगितले आहे. पण आजकाल तर

त्याचाच सर्वात जास्त वापर होत आहे. आचार्य, गुरू आपल्यापेक्षा कमी अक्कल असलेल्या शिष्यांवर चिडत राहतात, ते सुद्धा रौद्रध्यान म्हणायचे. मनातल्या मनात चिडत राहतात तेही रौद्रध्यान आहे. हल्ली तर बोलता बोलता क्षुल्लक कारणाने सुद्धा तोंडावर अपशब्द बोलले जातात.

रौद्रध्यानाचे फळ काय? नरकगती.

**आर्तध्यान :** आर्तध्यान म्हणजे स्वत:च्या आत्म्याला पीडा देणारे ध्यान. बाहेरच्या कुठल्याही जीवावर याचा परिणाम होत नाही पण स्वत:च स्वत:साठी अग्रशोच (भविष्याची चिंता)करत राहतो, काळजी करत राहतो, ते आर्तध्यान. तेवढे बरे आहे की समोरच्या व्यक्तीवर याचा काही परिणाम होत नाही. आर्तध्यानात क्रोध-मान-माया-लोभ नसतात. पण या काळात आर्तध्यान नसते. या काळात प्रामुख्याने रौद्रध्यानच आढळते. सत्‌युगात पाच टक्के असते. दहा वर्षाच्या मुलीच्या लग्नाची चिंता करणे ते आर्तध्यान. नको असलेले पाहुणे घरी आले तर मनात वाटते की हे लवकर गेले तर बरे होईल, असे वाटणे हे आर्तध्यान. 'प्रिय व्यक्ती' म्हणजे पैशांसंबंधित, किंवा विषयविकार संबंधित असे कोणी आले तर 'ते जाऊ नयेत' अशी इच्छा करणे हे सुद्धा आर्तध्यान. शिष्य चांगला भेटला नसेल तर गुरू मनातल्या मनात त्याच्यावर चिडत राहतात, ते सुद्धा आर्तध्यान.

आर्तध्यानाचे फळ काय? तिर्यंचगती! (जनावर गती)

**धर्मध्यान :** संपूर्ण दिवसात चिंता न होणे आणि अंतरक्लेशाचेही शमन होणे, ही स्थिति म्हणजे धर्मध्यान. धर्मध्यान म्हणजे आर्तध्यान किंवा रौद्रध्यानात केव्हाही न राहता निरंतर शुभातच राहणे. धर्मध्यानी निर्भय, धैर्यशील, चिंतारहित आणि कधीही अभिप्राय न बदलणारा असतो. स्वरूपाचे भान जरी नसेल तरी हरकत नाही, त्याचा भगवंताला आग्रह नाही, परंतु सदैव क्लेशरहित व्हा, आतून व बाहेरून.

या काळात धर्मध्यान फार कमी लोकांना साधते. शंभरात चार-पाच मिळतील असे. कारण आजच्या या भयंकर कलियुगात चिंता-उपाधि

फक्त गृहस्थी लोकांनाच असते असे नाही. साधू–साध्वी, आचार्य, वैरागी या सर्वांनाही चिंता पाठीशी लागलेलीच असते! अहो, दुसरे काही कारण नसेल तर शेवटी शिष्यांवर सुद्धा मनातल्या मनात चिडत राहतात.

धर्मध्यानाचे फळ काय? केवळ धर्मध्यानच असेल तर त्याचे फळ देवगती, आणि धर्मध्यानाबरोबर आर्तध्यान पण होत असेल तर त्याचे फळ मनुष्यगती.

शुक्लध्यानाचे चार चरण. आत्म्याचे अस्पष्ट वेदन होणे तो पहिला चरण. दुसऱ्या चरणात आत्म्याचे स्पष्टवेदन असते. 'आमचे' पद हे दुसऱ्या चरणाचे शुक्लध्यान आहे. केवळी भगवंतांचे पद हे तिसऱ्या चरणाचे शुक्लध्यान, आणि चौथे चरण म्हणजे मोक्ष.

स्पष्टवेदन म्हणजे तर परमात्म्यास पूर्णपणे जाणून घेतले. परंतु सर्वच ज्ञेय झळकत नाहीत. संपूर्ण केवळज्ञानात सर्व ज्ञेय झळकतात.

अस्पष्ट वेदन म्हणजे काय, तर या खोलीत अंधारात बर्फ ठेवलेला असेल आणि त्याला स्पर्श करून थंडगार वारा वाहत असेल तर त्याला समजते की इथे जवळपास बर्फ आहे आणि स्पष्टवेदन म्हणजे बर्फाला लागूनच बसलो आहोत असे अनुभवास येणे.

आम्ही तुमच्यात, आमच्यात आणि केवळी भगवंतात फारसे अंतर ठेवले नाही. काळाच्या प्रभावामुळे आमचे 360 डिग्रीचे संपूर्ण केवळज्ञान थांबले आहे, त्यायोगे चार डिग्री बाकी राहिल्या, 356 डिग्रीवर येऊन अडकले पण आम्ही तुम्हाला देत आहोत संपूर्ण केवळज्ञान.

शुक्लध्यानाचे फळ काय? तर मोक्ष!

आम्ही मोक्षासाठी खटपट करणारे खटपटे वीतराग आहोत, संपूर्ण वीतराग नाही. आम्ही फक्त एकाच बाजूने वीतरागी नाही बाकी सर्व बाजूंनी संपूर्ण वीतराग आहोत. आम्ही खटपट करतो म्हणजे काय की अमक्याला सांगतो की इथे या आम्ही तुम्हाला मोक्ष देतो. लोकांना मोक्ष मिळवून देण्यासाठी सर्व प्रकारची खटपट करतो.

## 'ध्यान आणि हेतू' या प्रमाणे-गतीफळ

भगवंत काय म्हणतात? आम्ही तुझी क्रिया पाहत नाही. ती तर उदयकर्माप्रमाणे घडत असते. पण सामायिक करत असताना, प्रतिक्रमण करत असताना तुझे ध्यान कुठे आहे याचीच नोंद घेतली जाते. सामायिक करत असेल आणि लक्ष घड्याळाकडे असते किंवा शिष्यांवर रागवत असेल आणि तरी म्हणतो, मी सामायिक केली!

महावीर भगवंतांच्या समोर आचार्य महाराज बसले होते. त्यांना ज्ञान (आत्मज्ञान) दिले होते. फक्त व्यवस्थित शक्तीचेच ज्ञान दिले नव्हते. आचार्य सामायिक करायला बसले होते, तेव्हा दुसऱ्या महात्म्यांनी विचारले की 'महाराज, या आचार्यांची गती कोणती होईल?'

भगवंत म्हणाले, 'या क्षणी देवगतीत जातील.'

नंतर काही वेळाने कुणी विचारले की 'महाराज, आता या वेळी आचार्यांची गती कोणती होईल?

तेव्हा भगवंत म्हणाले, 'अधोगतीत जातील.'

त्यानंतर पंधरा मिनिटानी पुन्हा कुणी विचारले की 'या वेळी आता कोणत्या गतीत जातील?'

तेव्हा भगवंत म्हणाले, 'आता मोक्षाला जातील.'

'भगवंत हे असे का?' हे तर पूर्णपणे ध्यानात आहेत, मग असे का? तेव्हा भगवंत म्हणाले, 'आम्हाला जे दिसत आहे ते तुम्हाला दिसत नाही आणि तुम्हाला जे दिसत आहे ते आम्ही पाहत नाही.' हे बघा, तो बसला होता सामायिक करण्यासाठी पण त्याचे ध्यान कुठे वर्तत आहे हे मात्र आम्हीच पाहू शकतो. पहिल्या ध्यानात देवगतीचे चित्रण (चिंतन) होते. दुसऱ्यावेळी नरकगतीचे चित्रण होते, नंतर त्याने चांगले चित्रण करण्यास सुरुवात केली. आत चांगले फोटो निघण्याची सुरुवात झाली. ते फोटो मोक्षापर्यंत घेऊन जातील असे होते. ध्यान कशा प्रकारचे आहे त्यावर फळ अवलंबून असते. चित्रण पुद्गल करतो पण जर तुम्ही

त्यात तन्मयाकार झालात तर तुमची सही झाली. आणि जर तन्मयाकार न होता जागृतीत राहिलात आणि जे चित्रित झाले असेल त्यास केवळ पाहत आणि जाणत राहिलात तर त्यापासून तुम्ही वेगळेच आहात.

एक व्यापारी कापड खेचून मोजतो आणि वर मनात खुश होतो की 'मी धंद्यात किती हुशार आहे, मी किती मोठी कमाई करतो.' पण त्याला हे माहीत नाही की तो नरकगती बांधत आहे! कारण हे त्याचे रौद्रध्यान आहे. आता दुसरा व्यापारी सुद्धा कापड खेचून मोजतो, तशाच (रोद्र) ध्यानाने पण आत त्याला अपार पश्चाताप होत असतो की, 'हे मी चुकीचे काम करत आहे. महावीरांचा भक्त असे कधी करत नाही.' तो तिर्यंचगती बांधतो. क्रिया दोघांचीही सारखीच आहे परंतु ध्यान वेगवेगळे असल्यामुळे गती वेगवेगळी होत आहे.

या काळात स्वरूपाचे भान तर कुणालाही नाही. जर कोणाला धर्माची समज असती तर धर्मध्यान राहिले असते. आजच्या काळात हे जे लौकिक धर्म आहेत ते पण मूळ पायावर (सिद्धांतावर) नाहीत. त्यामुळे लोकांना धर्मध्यान पण नाही. निव्वळ आर्त आणि रौद्रध्यानातच आहेत. जगातील लोक म्हणतात की या शेठजींनी पन्नास हजाराचे दान दिले, शेठ फार चांगले आहेत. पण शेठजींच्या मनात काय आहे की या नगरशेठजींनी दडपण आणले नसते तर आपल्याला काही द्यावे लागले नसते. हे तर नाईलाजाने द्यावे लागले. अशा प्रकारे ते रौद्रध्यान करीत आहेत, नरकगती बांधून घेत आहेत. दुसऱ्या एका माणसाजवळ पैसे नाहीत तरी पण तो मनात ध्यान करत आहे की केव्हा माझ्याकडे पैसे येतील आणि केव्हा मी धर्मकार्यासाठी खर्च करीन! तर त्याने दान दिले नसतानासुद्धा तो उर्ध्वगती बांधतो आणि शेठजी पन्नास हजार देऊन सुद्धा नरकगती बांधतात.

## बुद्धी वापरण्याची मर्यादा

हे लोक बुद्धीचा दुरुपयोग करून ट्रिक्स-चलाखी करून पैसा कमावतात, हा तर भयंकर गुन्हा आहे. जितक्या ट्रिक्स करतात तितके

हार्ड (कठोर) रौद्रध्यान करतात. ट्रिक्स म्हणजे स्वतःच्या जास्त बुद्धीने कमी बुद्धी असलेल्याचा फायदा घेणे.

बुद्धी तर संसारानुगामी आहे. ती कधीच मोक्षाकडे जावू देत नाही. कृष्ण भगवंतांनी सुद्धा बुद्धीला 'व्यभिचारिणी' म्हटले आहे. बुद्धी संसारातच डांबून ठेवणारी आहे. त्यातून बाहेर पडूच देत नाही. 'स्व'चे संपूर्ण अहित करणारी आहे. जसजशी बुद्धी वाढत जाते तसतसा संतापही वाढत जातो. दोन वर्षाच्या मुलाची आई वारली तर त्याला दुःख होईल का? आणि बावीस वर्षाच्या मुलाची आई वारली तर त्याला किती दुःख होईल? हे कशामुळे? तर त्याची बुद्धी वाढली आहे म्हणून.

भगवंतांनी काय सांगितले की संसारात बुद्धी वापरायचीच नसते. किंवा किती प्रमाणात बुद्धी वापरायची याची लिमिट ठरवून दिली आहे. जर मोठ्या दगडाखाली तुमचा हात सापडला असेल तर हुशारीने हात बाहेर काढून घ्या आणि पुन्हा तसा सापडणार नाही एवढ्यापुरताच बुद्धीचा वापर करा. इथे मात्र लोकांनी पैसे कमावण्यासाठी, काळाबाजार करण्यासाठी बुद्धीचा वापर सुरू केला. ते लोकांना लुबाडण्यासाठी बुद्धीचा वापर करू लागले. इतकेच नव्हे, तर ते ट्रिक्स (चलाखी) देखील करायला शिकले. ट्रिक म्हणजे समोरच्या माणसाला कळणार नाही अशा पद्धतीने त्याला फसवून त्याचे हिसकावून घेणे. अरे, हे तर भयंकर रौद्रध्यान आहे, अशाने तर सातव्या नरकात सुद्धा जागा मिळणार नाही.

## अविरोध वाणी प्रमाण

'स्याद्वाद' कशास म्हणायचे? कुणाचाही विरोध सहन करू शकत नाही, त्यास स्याद्वाद म्हणायचेच कसे? विरोध वाटतो तो तर समोरच्याचा व्ह्यू पॉईंट (दृष्टीकोन) आहे. कुणाच्याही व्ह्यू पॉईंटला खोटे म्हणत नाही, कुणाचेही प्रमाण दुखवत नाही, त्यास म्हणायचे स्याद्वाद. सर्वच व्ह्यू पॉईंट त्यांना मान्य असतात. कारण स्वतः सेंटरमध्ये बसलेले असतात. आम्ही स्याद्वाद आहोत. सेंटरमध्ये बसलेले आहोत.

भगवंतांनी सांगितले आहे की सामायिक, प्रतिक्रमण, प्रत्याख्यान– ह्या ज्या आत्म्यासाठी क्रिया आहेत त्या आमच्या आज्ञेनुसार सरळपणे करत जा.

तात्त्विक दृष्टीने पाहिले तर दोष कुणाचाच नाही. कारण संयोगच तसे आहेत. पण आम्ही जे कडक बोलतो ते समोरच्या व्यक्तीसाठी संपूर्ण करुणा असल्यामुळे, त्याचा रोग काढण्यासाठी बोलत आहोत.

## ज्ञानी आणि धर्मांचे स्वरुप

या जगात कित्येक लोक असे म्हणतात की आमचा व्यवहार धर्म आहे. अरे, जोपर्यंत निश्चय धर्म प्राप्त झाला नाही, तोपर्यंत असे बोलता येत नाही. शुद्धात्म्याची ओळख झाली नाही, तोपर्यंत व्यवहार धर्म आहे असे कसे म्हणता येईल? निश्चय धर्म आणि व्यवहार हे केव्हा वेगळे पडतात की जेव्हा ज्ञानी पुरुष स्वत:ची अनंत सिद्धी वापरुन तुझा 'आत्मा आणि अनात्मा' यात लाईन ऑफ डिमार्केशन (भेदरेषा) आखून देतात. आणि निरंतर वेगवेगळेच ठेवतात तेव्हाच हे समजते. हे स्वत:चे म्हणजे स्वक्षेत्र आणि हे परके म्हणजे परक्षेत्र असे दोन वेगळे करून देतात. अर्थात होम आणि फॉरेन डिपार्टमेंट यांचे विभाजन करून देतात. जोपर्यंत निश्चयाची प्राप्ती झालेली नाही तोपर्यंत व्यवहार धर्म म्हणायचाच कसा? तर मग त्याला काय म्हणायचे? तो तर लौकिक धर्म म्हटला जातो.

लौकिक धर्म म्हणजे लोकांनी मानलेला धर्म. लोकोत्तर धर्म नव्हे. हा धर्म काय करतो? हा धर्म वाईट सवयी काढतो. आणि चांगल्या सवयी लावतो. लौकिक धर्म तर काय म्हणतो की अनुकूल असेल त्याचा स्वीकार कर आणि प्रतिकूल असेल ते सोडून दे. तो काय शिकवतो की चोरी करू नकोस, खोटे बोलू नकोस, जीवनात सुख प्राप्त होईल, अनुकूलता प्राप्त होईल असे कर. जगाने सत्कार्यांनाच खरा धर्म मानले आहे. आम्ही त्यास लौकिक धर्म म्हणतो. लौकिक धर्मामुळे चतुर्गतीच मिळते. अशुभातून शुभात येणे, हा लौकिक धर्म–रिलेटिव्ह धर्म आणि शुभातून शुद्धात येणे हा अलौकिक–रियल धर्म आहे. मोक्ष हवा असेल

तर अलौकिक धर्मात यावेच लागेल. अलौकिक धर्मात तर चांगल्या सवयी आणि वाईट सवयी, अनुकूल आणि प्रतिकूल, चांगले–वाईट या सर्वांपासून सुटका होते आणि तेव्हाच मोक्ष प्राप्त होतो. स्वधर्म हाच खरा धर्म आहे, हाच आत्म्याचा धर्म आहे, हाच अलौकिक धर्म आहे. तो सोडून इतर सर्व देहधर्म आहेत की जे परधर्म, रिलेटिव्ह धर्म, लौकिक धर्म म्हटले जातात. रियल धर्मात म्हणजे अलौकिक धर्मात संप्रदाय नसतात, पंथ नसतात, ध्वजा नसते, ग्रहण–त्याग नसते, मतभेद नसतात, अलौकिक धर्म निष्पक्षपाती असतो. पक्षपाताने केव्हाही मोक्ष होत नाही.

एकीकडे लोकांना मोक्ष हवा आहे आणि दुसरीकडे मतमतांतरात राहून पक्षपातही करायचा आहे. माझेच खरे, म्हटले की, न बोलताच दुसरा खोटा, असे हमखास ठरवूनच टाकतो. कुणालाही खोटे म्हणून तुम्ही कधीच मोक्ष मिळवू शकणार नाही. मतमतांतर सोडून, पक्षपात सोडून, सांप्रदायिक तटबंदी तोडून जेव्हा तुम्ही सेंटरमध्ये (केंद्रस्थानी) याल तेव्हाच अभेद चैतन्याच्या धामाची तुम्हाला प्राप्ती होईल. अरे, इथे तर तुम्ही पक्षात पडून पक्षाचाच पाया मजबूत केला आणि त्यातच तुमचा अनंत जन्मांचा संसार बांधून घेतला! तुम्हाला मोक्ष प्राप्त करायचा आहे की पक्षातच गुरफटून राहायचे आहे? एकाच धर्माचे किती तरी संप्रदाय उभे केले! भांडतच राहिले! जिथे कषाय आहेत तिथे मोक्ष नाही आणि धर्मही नाही. पण इथे तर स्वत:चा पक्ष मजबूत करण्यासाठी कषाय केले. अहो, धर्माला तुम्ही रेसकोर्स बनवून टाकले? शिष्यांची स्पर्धा सुरू केली. त्याचे पाच शिष्य आहेत तर माझे अकरा शिष्य तर हवेच. घरात बायको आणि दोन मुले, या तीन घंटा होत्या, त्यांना सोडलेत आणि इथे अकरा घंटा गळ्याशी बांधल्यात? वर परत शिष्यांवर चिडत राहता, याला मोक्षाचे साधन कसे म्हणता येईल?

अशी कडक वाणी आम्हा वीतरागींना बोलायची नसते, पण काय करणार? त्यांचा रोग काढण्यासाठी अंतरंगात अपार वीतरागतेसह संपूर्ण करुणामयी वाणी बाहेर पडते!! यात त्यांचाही दोष नाही, त्यांची इच्छा तर मोक्ष प्राप्त करण्याचीच आहे परंतु अज्ञानतेमुळे असे सर्व चुकीचे

घडत आहे. काळच फार विचित्र येऊन ठेपला आहे. त्या वावटळीत सर्व गुरफटून गेले आहेत.

आम्हाला तर अपार करुणा असते. आम्हाला सर्व निर्दोषच दिसतात. कारण आम्ही स्वतः निर्दोष दृष्टी करून संपूर्ण जगाला निर्दोष पाहत आहोत!

## निर्दोष दृष्टी

महावीर भगवंतांची सभा, त्यात आचार्य महाराज बसले होते. त्यांना जरा ज्ञानाचा मद चढला होता की 'मी बरेच काही जाणतो.' 'मी जाणतो.' म्हणून त्यांनी भगवंतांना विचारले, 'भगवंत, आपल्यात आणि माझ्यात आता किती फरक राहिला आहे? माझे अजून किती जन्म बाकी राहिले आहेत?' त्या आचार्य महाराजांना असेच वाटत होते की दोन-तीन जन्मात माझा मोक्ष होईल! भगवंत तर वीतराग, पण आचार्य महाराजांच्या मनातला उद्देश त्यांच्या ध्यानात आला होता. ते म्हणाले, प्रश्न तर चांगला आहे, पण चार-पाच जणांचे पुण्य उदयास आले आहे, तेव्हा त्यांना सुद्धा बोलावून घ्या. गावचे नगरशेठ, सती, वेश्या, खिसे कापणारा यांना बोलावून घ्या आणि बाहेर एक गाढव उभे आहे त्याच्या बाबतीत पण मी तुम्हाला सांगतो. 'हे आचार्य महाराज! माझ्यात, तुमच्यात, या नगरशेठात, सतीत, वेश्यात, खिसेकापूत आणि त्या गाढवात जरा सुद्धा फरक नाही.' महाराज म्हणाले, 'हे काय म्हणता भगवंत! तुमच्यात आणि आमच्यात काहीच फरक नाही? फरक तर फार मोठा दिसत आहे ना!

तेव्हा भगवंत म्हणाले, 'हे पाहा, फरक तर तुम्हाला तुमच्या दृष्टीमुळे दिसत आहे. आमचा आजचा जो अवतार आहे त्याच्या तीन अवतारांपूर्वी आम्ही ज्ञानी पुरुषाचे शिष्य होतो. त्यांनी आमची दृष्टी निर्दोष करून दिली. त्या दृष्टीचा आम्ही दोन अवतारात वापर केला आणि या अवतारात संपूर्ण निर्दोष झालो. दृष्टी संपूर्ण निर्दोष केली आणि सर्वांना संपूर्ण निर्दोष पाहिले. त्या निर्दोष दृष्टीने आम्ही सांगत आहोत की तुमच्यात, आमच्यात आणि या सर्वात काहीच फरक नाही!' आचार्य महाराज म्हणाले, 'परंतु प्रभु! आम्हाला तर पुष्कळ फरक वाटतो. तुम्ही सती आणि वेश्या, नगरशेठ

आणि खिसेकापू, मी आणि ते गाढव सर्वांना एकसारखे कसे म्हणू शकता? आम्हाला हे समजत नाही. ही गोष्ट आम्ही स्वीकारू शकत नाही.' भगवंत म्हणाले, 'हे पाहा आचार्य महाराज! तुमच्यात-आमच्यात, नगरशेठ, सती, वेश्या, खिसेकापू आणि तो गाढव सर्वांमध्ये माल एक सारखाच भरलेला आहे. सर्वांमध्ये एकशे वीस काउन्टचे एक तोळे सूत आणि ते सुद्धा न्यु शोरोक मिलचे आहे. सर्वात सारखेच आहे. एकाच मिलचे आणि तेच एकशे वीस काउन्टचे एक तोळे सुत! फरक मात्र इतकाच आहे की तुम्हा सर्वांच्या सुताचा गुंता झालेला आहे आणि माझा गुंता सुटलेला आहे! या सर्वांमध्ये सर्वात कमी जन्म त्या गाढवाचे होणार आहेत, हे आम्ही आमच्या ज्ञानात पाहून सांगतो. कारण आचार्य महाराज, तुम्ही तर अनेक शास्त्रे शिकले आहात, त्याचे मानसिक ओझे उतरवण्यासाठी तुम्हाला पुष्कळ जन्म घ्यावे लागतील आणि या गाढवाला तर पुढच्या जन्मीच ज्ञानी पुरुषांची भेट होईल आणि त्याचा मोक्ष होऊन जाईल!'

## नशा आणि मोक्ष

मानसिक ओझे ही एक प्रकारची नशा आहे. नशा जितकी कमी तितका लवकर मोक्ष होतो.

नशेच्या धुंदीत राहणाऱ्याचा कधीच मोक्ष होत नाही. 'मी सर्व काही जाणतो' असे मानणाऱ्याची नशा तर फार भारी असते. झोपेत सुद्धा नशेतच असतो. ज्याला नशा चढलेली नसेल त्याचा मोक्ष होतो. नशेत राहणाऱ्याचा मोक्ष कधीच होत नाही. शास्त्रे वाचली, धारण केली, ती मोक्षाचे साधन म्हणून की त्याची नशा चढवून जन्मोजन्म भटकण्याचे साधन म्हणून? दारू पिणाऱ्याची नशा तर पाणी शिंपडल्याने लगेच उतरते. पण 'मी काही जाणतो' ही शास्त्राध्ययनाची नशा तर कधीच उतरत नाही.

## मन-वचन-काया यांची लफडेबाजी

तोंडावर एका बाजरीच्या दाण्याइतका जरी फोड उठला असेल तरी सारखा आरशात तोंड पाहत राहतो. कारण तो मानतो की, 'मीच चंदुलाल आहे.' त्यामुळे देहाला सुद्धा 'मीच आहे' असे मानतो. आणि

म्हणून तर आरशात तोंड पाहत राहतो. पण हा देह सुद्धा तुमचा नाही. हा देह म्हणजे एक लफडेच आहे. कोणी मुलगा, मुलीसोबत हिंडत असेल तर बाप म्हणतो हे लफडे कुठून लावून घेतलेस? तर मुलगा म्हणतो कसा, 'काय बोलता तुम्ही? हे काय लफडे आहे? तुम्हाला काय कळते याच्यात!' पण मग काही दिवसानंतर त्या मुलीशी पटले नाही, किंवा ती ठेंगा दाखवून दुसऱ्या मुलाबरोबर हिंडू लागली की मग त्याला बरोबर समजते की खरोखर ते लफडेच होते. तसा हा देह सुद्धा एक प्रकारे लफडेच आहे. देहभावाचा अनुभव गेला की देहभावाचे लफडे सुद्धा सुटते. लफडे दगा दिल्याशिवाय राहतच नाही. या मनाचे, वाणीचे आणि देहाचे हे कसे बंधन आहे, ते तरी पाहा! बंधन म्हणजे काय? तर यातून सुटायचे असेल तरी सुटता येत नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर बंधन हेच लफडे आहे. जेव्हापासून लक्षात येते की हे तर लफडेच आहे, तेव्हापासून त्यातून सुटण्याचे उपाय शोधत राहतो. पण जर लफड्यालाच प्रिय केले तर? तर ते आणखी जोरात चिकटत जाते, आणि मग भयंकर फसगत होते. लफडेबाजी ही राग-द्वेषाच्या अधीन आहे. आम्ही राग-द्वेषापासून सोडवतो त्यामुळे लफडे आपोआपच सुटत जाते. त्यास काय मारझोड करून सोडायचे असते? नाही. वीतरागतेने सोडायचे, अहिंसेने सोडायचे. मन-वचन-काया हे लफडेच आहे. त्यास संपूर्णपणे 'पाहिले' आणि 'जाणले' की ते आपोआपच सुटत जाते.

## मोक्षच उपादेय आहे

केवळ मोक्षाचाच आग्रह करण्यासारखा आहे. अन्य सर्व ठिकाणी निराग्रहीच होऊन जा. वस्तू विष नाही परंतु तुझा आग्रह हेच विष आहे. आम्ही हे स्पष्टच सांगत आहोत की जितका मेहनतीचा मार्ग आहे तो सर्व संसारमार्ग आहे. मोक्षाचीच इच्छा बाळगण्यासारखी आहे. मोक्षाचा विचार एकदा जरी आला असेल तरी लाख जन्मानंतरसुद्धा ज्ञानी पुरुष तुला भेटतील आणि तुझा मोक्ष होईल. मोक्ष म्हणजे 'मुक्त भाव.' सर्व सांसारिक दु:खांपासून मुक्ती. मेहनत तर संसारासाठी करायची असते, मोक्षासाठी नव्हे. मोक्ष तर स्वत:चा स्वभावच आहे. आत्म्याचा स्वभावच

मोक्षस्वरूप आहे. जसे पाण्याचा स्वभाव थंड आहे. त्याला गरम करण्यासाठी मेहनत करावी लागते पण थंड करण्यासाठी मेहनत करावी लागते का? नाही करावी लागत. पाणी तर आपणहूनच, स्वत:च्या स्वभावानेच थंड होईल. पण ही गोष्ट कशी समजेल? स्वत:चा स्वभावच मोक्षस्वरूप आहे हे समजत नाही याचे कारण हेच की तो भयंकर भ्रांतीत सापडलेला आहे. आणि ती भ्रांती कोणत्याही काळी टळेल अशी नाही. जर ज्ञानी पुरुषाची भेट झाली तर ते यातून सोडवतील. म्हणून ज्ञानी पुरुषाला शोधून काढा, जिवंत मूर्ती शोधून काढा.

जे स्वत: मुक्त झाले आहेत, त्यांना शोधून काढा. जे स्वत: तरले आहेत आणि अनेकांना तारण्याचे सामर्थ्य ज्यांच्याकडे आहे, अशा तरणतारण ज्ञानी पुरुषाला शोधून काढा आणि त्यांच्या मागोमाग निर्भयपणे चालत राहा. या काळातील आम्ही एकमेव तरणतारण आहोत. अद्‌भुत ज्ञानावतार आहे. एका तासात मोक्ष देऊ शकतो. तुला काहीच करायचे नाही. काहीच द्यायचेही नाही. कारण आम्ही कोणत्याही वस्तुचे भिकारी नाही. ज्यांचा भिकारीपणा संपूर्ण नष्ट झाला आहे, त्यांच्यातच भगवंत प्रकट होतात. लक्ष्मीची भीक नसलेले कित्येक साधू भेटतील, विषयविकाराची भीक नसलेलेही भेटतील, पण तेव्हा ते मानाचे भिकारी असतील किंवा कीर्तीचे भिकारी असतील किंवा शिष्यांसाठी भिकारी असतील! कुठल्या ना कुठल्या कोपऱ्यात भिकारीपणा हा असतोच. जिथे संपूर्ण अयाचकता प्राप्त होते तिथेच परमात्मा स्वरुप प्रकट होते! आम्ही लक्ष्मीचे, विषयाचे, शिष्यांचे किंवा कीर्तीचे, कशाचेही भिकारी नाही, कुठल्याही वस्तुचे भिकारी नाही. होय, एवढे मात्र खरे, की तुला आमच्याकडून जे हवे असेल ते घेऊन जा. पण जरा सरळपणे माग की ज्यामुळे तुला परत मागण्याची गरजच उरणार नाही.

जगातील भौतिक सुखे बाय-प्रॉडक्ट आहेत आणि आत्मा प्राप्त करणे हे मेन-प्रॉडक्शन आहे. मेन-प्रॉडक्शनचा कारखाना सोडून लोकांनी बाय-प्रॉडक्शनचे कारखाने सुरू केले आहेत. यामुळे दिवस कसे पालटतील? मोक्ष मार्ग माहीतच नसल्यामुळे हे संपूर्ण जग भटकत राहिले

आहे आणि तुम्ही जिथे जाता तिथे वाट चुकता. मोक्ष हवा असेल तर शेवटी ज्ञानींकडेच जावे लागेल. अरे, दादर स्टेशनला जायचे असेल तरी त्या रस्त्याच्या ज्ञानीला विचारावे लागते. मग ही तर मोक्षाची अगदी अरुंद गल्ली, गुंतागुंतीची आणि गोंधळात टाकणारी. तू स्वतः त्यातून मार्ग काढायला जाशील तर कुठल्या कुठे जाऊन पोहोचशील. म्हणून ज्ञानीला शोधून काढ आणि त्यांच्या पदचिन्हांवर चालत रहा. आम्ही मोक्षदाता आहोत. मोक्ष मिळवून देण्याचे लायसन्सदार आहोत. शेवटपर्यंतचे देण्यास समर्थ आहोत. हा तर अक्रम ज्ञानावतार आहे! एका तासात आम्ही तुला भगवंतपद देऊ शकतो! पण तुझी संपूर्ण तयारी असली पाहिजे.

आमच्याजवळ दोनच वस्तू घेऊन या. पहिली 'मी काहीच जाणत नाही' असा भाव आणि दुसरी 'परम विनय'. 'मी काही जाणतो,' ही तर नशा आहे आणि जर खरोखरच जाणले असेल तर त्यास प्रकाश म्हणतात आणि प्रकाश असेल तिथे ठोकर लागत नाही. इथे तर पावलोपावली ठोकर लागते. मग त्यास जाणले असे कसे म्हणता येईल? एक तरी चिंता कमी झाली का? खरे ते जाणले असेल तर एकही चिंता व्हायला नको. जर तू मानत आहेस की 'मी जाणतो' तर मग तुझ्या अर्धवट भरलेल्या घड्यात मी काय ओतू? तुझा घडा रिकामा असेल तर त्यात मी अमृत भरुन देईन. मग तुला जिथे जायचे असेल तिथे जा. मुला-मुलींचे लग्न लाव, संसार कर, पण माझ्या आज्ञेत रहा.

ही गोष्ट अपूर्व आहे. पूर्वी कधी ऐकलेली नसेल, वाचण्यात पण आली नसेल अशी आहे. संपूर्ण जगाचे कल्याण करण्यासाठी आम्ही निमित्त आहोत, कर्ता नाही.

## थोतांड जग

हे संपूर्ण जग थोतांड आहे. हे आम्ही आमच्या ज्ञानात पाहून बोलत आहोत. तू जर जगाला खरे मानून चालत असशील तर ती तुझीच चूक आहे. थोतांड म्हणजे अवकाश-आकाश.

एक वैद्य होता. त्याने आपल्या रोग्याला फार चांगले उपयोगी औषध

दिले. त्याने फक्त मिरची अजिबात खाऊ नकोस असे पथ्य पाळायला सांगितले. कारण तो रोग जास्त प्रमाणात मिरची खाल्यामुळेच उत्पन्न झाला होता. वैद्य बिचारा रोग्याला बरे करण्यासाठी पुष्कळ परिश्रम करत होता. चांगल्यात चांगले औषध देत होता. औषध बदलून बदलून पाहत होता. परंतु दोन महिने झाले तरी रोग्याच्या आजारात काहीच फरक पडत नव्हता. एक दिवस अचानकच वैद्य त्या रोग्याच्या घरी पोहोचला. तर पाहतो काय की, रोगी जेवायला बसला होता आणि त्याच्या ताटात दोन मोठ्या हिरव्या मिरच्या होत्या! वैद्याला भयंकर राग आला. आणि एकदम इमोशनल झाल्यामुळे तिथल्या तिथेच त्याचे हार्ट फेल झाले! यात दोष कोणाचा? अरे, रोग्याने तर विष प्यायले पण तू कशाला विष पितोस? ही तर सर्व पोलंपोल आहे. कुठल्याही स्टेशनवर चिकटून राहण्यासारखे नाही. नाही तर फसलात म्हणून समजा. इथे तर मिरची खाल्ली, रोग्याने आणि डोक्याचा पारा चढून नस फुटली वैद्याची! हे तर पाहिले म्हणून त्रास झाला ना! जर चहाच्या कपात काही घाण पडलेली असेल तर भयंकर चिडतो पण ज्याला हे माहीतच नसेल तो तर चवीने पितो, खरे तर, पाहतो तेव्हा त्याला चुकीचे झाले असे वाटते. याचेच नाव पोलंपोल. खरी गोष्ट माहीत पडल्यावर भडकतो आणि जर माहीत नसेल तर काहीच होत नाही.

एक माणूस माझ्याकडे येत होता. त्याला एक मुलगी होती. त्याला मी आधीच समजावले होते की हे कलियुग आहे. या कलियुगाचा परिणाम मुलीवर सुद्धा होतो. तेव्हा तू सावध रहा. ही गोष्ट त्याला नीट समजली. आणि जेव्हा त्याची मुलगी एका मुलाबरोबर पळून गेली तेव्हा त्या माणसाला माझी आठवण झाली. तो माझ्याकडे आला आणि म्हणाला, 'तुम्ही म्हणाला होता ती गोष्ट खरी आहे. तुम्ही जर अशी समज दिली नसती तर मला विष खाण्याचीच पाळी आली असती.' असे आहे हे जग! पोलंपोल. जे घडले त्याचा स्वीकार करावा लागतो. त्यात काय विष प्यायचे असते? अरे, असे केलेस तर जग तुला वेडाच म्हणेल. हे तर जगात कपडे घालून अब्रू झाकतात आणि म्हणतात आम्ही तर खानदानी आहोत!

याउलट ज्ञानी पुरुष फार समंजस असतात. संपूर्ण सडण्यापूर्वीच

कापून टाकतात. म्हणजे हे जग कंप्लीटली (पूर्णपणे) थोतांड आहे असे पाहता येणे ही काही सामान्य गोष्ट आहे?

हे मेंढपाळ काय करतात? 'टीही, टीही' करून मेंढ्यांना कुंपणात बांधून ठेवतात. त्यानंतर एकालाही निसटू देत नाहीत. मेंढ्यांना वाटते की हा वाघापासून आमचे रक्षण करतोय. आणि मेंढपाळ म्हणतात सुद्धा की मी मेंढ्यांचे रक्षण करत आहे. पण मग ते मेंढ्याचा कशा प्रकारे उपयोग करून घेतात, हे मेंढ्याना कसे समजेल? रोज त्यांना दोहून दूध काढतात. त्यांचे केस ज्यामुळे त्यांचे थंडीपासून संरक्षण होते, ते केसही काढून घेतात. आणि शेवटी घरात पाहुणे आल्यावर त्यांना शिजवून खातात सुद्धा. याचेच नाव थोतांड!

## मनुष्यांचा निराश्रितपणा

या कलियुगातील सर्व मनुष्यांना निराश्रितच म्हटले जाईल. ही सर्व जनावरे आश्रित म्हटली जातात. या माणसांना तर कुणाचा ही आश्रय नाही. ज्याचा आश्रय घ्यायला जातोस तो स्वत:च निराश्रित आहे तिथे तुझे काय भले होणार? आता निराश्रित कसे हे मी तुम्हाला भगवंतांच्या भाषेत समजावून सांगतो.

एक शेठ, एक साधू महाराज आणि त्यांचा पाळलेला कुत्रा, असे तिघेही प्रवासाला निघाले. वाटेत दाट जंगल आले आणि चार लुटारू भाला-बंदूक घेऊन त्यांच्या समोर आले. या परिस्थितीचा तिघांवर काय परिणाम होईल? शेठजींना वाटते की, 'माझ्या गाठीशी दहा हजार रुपयांचा बटवा आहे, या मेल्यांनी तो हिसकावून घेतला तर माझी काय अवस्था होईल? आणि ठारच मारून टाकले तर? बापरे! मग माझे काय होईल? साधूला वाटते की, 'माझ्याजवळ तर लुटण्यासारखे काहीच नाही. हा एक तांब्या आहे तो त्यांनी घेऊन टाकला तर पुढचे पुढे पाहता येईल. पण मेल्यांनी माझे तंगडेच तोडले तर माझे काय होईल? माझी सेवा कोण करेल? आणि कायमचा लंगडा झालो तर माझी काय दैना होईल? आणि तो कुत्रा मात्र एकदा लुटारूंवर भुंकेल आणि त्यांनी जर त्याला

काठीने हाणले तर क्याऊँ क्याऊँ करत स्वत:च्या मालकास मार खाताना एकटक बघत राहील. त्याला काळजी वाटत नाही की माझे काय होईल? कारण तो आश्रित आहे. आणि हे दुर्भागी निराश्रित आहेत. 'आता माझे काय होईल?' असा विचार एकदा जरी आला तर तो निराश्रित आहे. परमेश्वर काय म्हणतो की 'जोपर्यंत तुम्हाला प्रकट (परमात्म्याचे) दर्शन घडत नाही तोपर्यंत तुम्ही निराश्रित आहात. प्रकटचे दर्शन घडले की मग तुम्ही आश्रित आहात.'

प्रकटचे दर्शन घडल्यानंतर आतील किंवा बाहेरील कुठल्याही प्रकारचे संयोग कितीही विपरीत असले तरी माझे काय होईल असे तुम्हाला वाटणार नाही.

ज्यांनी आमचा आश्रय घेतला त्यांचा अनंतकाळापर्यंतचा निराश्रितपणा सुटला.

अतिशय भयंकर परिस्थितीत सुद्धा ज्ञानी पुरुषाच्या आश्रिताला माझे काय होईल? असे वाटत नाही. कारण त्यावेळी 'आम्ही' आणि 'आमचे' ज्ञान, दोघेही तिथे हजरच होऊन जातो आणि तुमचे सर्व प्रकारे रक्षण करतो!

## नैसर्गिक तंत्र संचालन - भौतिक विज्ञान

आजकाल फॉरेनमध्ये भौतिक सायन्स एक्सेस झाल्याचे आढळते, अबॉव नॉर्मल झाले आहे. त्यात नॉर्मालिटी असली पाहिजे, प्रत्येक बाबतीत नॉर्मालिटी असेल तरच तुम्ही सुखी व्हाल. सत्त्याण्णव फॅरनहाइट इज धी बिलो नॉर्मल फिवर, एन्ड नव्याण्णव फॅरनहाइट इज अबॉव नॉर्मल फिवर. अठ्याण्णव इज धी नॉर्मालिटी. ही अमेरिका आणि दुसरे फॉरेनचे देश अबॉव नॉर्मल फिवरमध्ये सापडले आहेत आणि भारत देश हा बिलो नॉर्मल फिवरमध्ये सापडला आहे. नॉर्मालिटी पाहिजे. या फॉरेनच्या देशांचे संशोधन अबॉव नॉर्मल होत राहिले आहे. आणि तरी त्यांना जे हवे आहे ते तर मिळतच नाही. हे काय सुचवित आहे की ते वाट चुकले आहेत. सध्या तर ते इतके अबॉव नॉर्मल झाले आहेत की अडूसष्ठ मैल आणि तीन फर्लांगावर मोटार पंक्चर झाली असेल तर ते कळवण्यासाठी साधने

शोधून काढली आहेत. अहो, मग देहासाठी आवश्यक अशी साधने शोधून काढ की! या पुरुषांना रोज दाढी करावी लागते. तर दाढी उगवणारच नाही असे काही शोधून काढा ना! देहाला विषयाची आवश्यकता आहे तर त्याला तो द्यायला हवा. एकाचवेळी जोराचा पाऊस पडत राहिला तर काय होईल? सगळीकडे नुकसानच होईल ना? अबॉव नॉर्मलमुळे नुकसानच होते. लोक तर उकाडा जरासा वाढला की आरडाओरडा करू लागतात. माझा एक मित्र एकदा फार ओरडाओरडा करत होता, फार उकडते, फार उकडते, तर मी त्यांना म्हणालो, 'या तापमानाच्या कंट्रोल स्टेशनवर तुम्हाला कंट्रोलर म्हणून बसवले, तर आजचे तापमान तुम्ही किती ठेवले असते?' त्यावर तो म्हणाला, 'एवढेच ठेवले असते.' तर मूर्खा, एवढेच तापमान तू पण दाखवशील तर मग बोंबलतोस कशाला? हे सर्व तर नॅचरल आहे. ज्या वेळेस जितके आवश्यक असते तेवढे सहज मिळतच राहते. पण लोक त्याला शाप देऊन त्यात अडथळे निर्माण करतात.

एक व्यक्ती चांगले, इस्त्री केलेले कपडे घालून बाहेर निघाला आणि वाटेत जोराचा पाऊस पडला तर तो पावसाला शिव्या देऊ लागतो. काही म्हणतात, आज माझ्या मुलीचे लग्न आहे तर आज पाऊस आला नाही तर फार उत्तम आणि तिथे शेतात शेतकरी बिचारा चातक पक्ष्यासारखा पावसाची वाट बघत असतो. असा विरोधाभास उत्पन्न झाला की ते निसर्गाला सुद्धा बाधक ठरते. तुमचा मनोभाव आणि निसर्गाची एडजस्टमेंट याच्या आधारावर तर हे सारे तंत्र चालत असते. म्हणून निसर्गात ढवळाढवळ करू नका. नैसर्गिकरित्या आपणहूनच सर्व काही उपलब्ध होईल. 'उद्या सकाळी सूर्य उगवला नाही तर काय होईल?' असा विचार येतो का कुणाला? आणि आला तर काय होईल? ही तर नुसती ढवळाढवळच होत राहिली आहे. निसर्गात ढवळाढवळ करू नका.

या सर्वांनी बाह्य (भौतिक) विज्ञानात इतका एकांगी विकास साधला आहे, इतके अबॉव नॉर्मल होऊन गेले आहेत की आता लोकच कंटाळून म्हणतील की आम्हाला हे सायन्टिस्ट नकोत. म्हणजे ही सारी क्रांतीची तयारी होऊ लागली आहे.

जिथे जिथे एक्सेस झाले, तिथे त्याचा थकवा येऊ लागतो.जास्त वेळ बसून राहावे लागले तर त्यानेही थकवा येतो. आणि जास्त झोपल्यामुळेही थकवा येतो. दु:ख आणि सुख हे रिलेटिव्ह आहेत. कोणी शेठ उन्हात हिंडत असेल तर त्याला बाभळीचे झाड दिसले तरी तो तिथे सावलीसाठी, गारव्यासाठी बसेल. पण जर त्याला तिथे त्या बाभळीच्या झाडाखालीच चार तास बसायला सांगितले तर तो नाही म्हणेल. कारण बसल्या बसल्याही थकून जातो.

हिंदुस्तानात साडे सात फुटाचा माणूस आला तर तो उंच वाटेल. आणि आपण जर सात फूटवाल्यांच्या देशात गेलो तर ठेंगणे दिसू. हे सर्व रिलेटिव्ह आहे. एकाच्या आधाराने दुसरा उंच किंवा ठेंगणा दिसतो.

कुणी एखादा माणूस पंचावन्न वर्षांपर्यंत शिकतच राहिला तर लोक काय म्हणतील? अरे, तू जर नुसता अभ्यासच करत राहिलास मग लग्न केव्हा करशील? हे अबॉव नॉर्मल म्हणायचे. आणि दोन वर्षाच्या मुलाचे लग्न लावले तर ते बिलो नॉर्मल.

## भौतिक डेव्हलपमेंट : आध्यात्मिक डेव्हलपमेंट

फॉरेनवाले हिंदुस्तानातील लोकांचा तिटकारा करतात. त्यांना अंडरडेव्हलप (अविकसित) म्हणतात. तेव्हा मला सांगावासे वाटते की, वेड्यानो, तुम्ही अंडरडेव्हलप्ड आहात. अध्यात्मासाठी तुम्ही अंडरडेव्हलप्ड प्रजा आहात. आणि भौतिकसाठी तुम्ही फुल्ली डेव्हलप्ड (विकसित) आहात. भौतिकतेत तुमचा देश फुल्ली डेव्हलप्ड आहे. तर भारत देश भौतिकतेत अंडरडेव्हलप्ड प्रजा आहे आणि आध्यात्मिकतेत फुल्ली डेव्हलप्ड (पूर्ण विकसित) प्रजा आहे. इथल्या खिसेकापूला सुद्धा मी एका तासात देव बनवू शकतो. बाहेरची सर्व प्रजा आंतरविज्ञानात (अध्यात्मात) अंडरडेव्हलप्ड आहे, हे मी तुम्हाला कसे समजावून सांगू?

तिथल्या लोकांचे क्रोध-मान-माया-लोभ अजून डेव्हलप होत आहेत. याउलट हिंदुस्तानातील लोकांचे क्रोध-मान-माया-लोभ फुल्ली डेव्हलप झालेले आहेत, टोकावर जाऊन पोहोचले आहेत.

फॉरेनमध्ये जर कोणी तुमचा ओळखीचा असेल आणि तुम्ही त्याला सांगितले की मला इथून पन्नास मैल दूर जायचे आहे. तर तो तुम्हाला आपल्या मोटारीत घेऊन जाईल. परत घेऊनही येईल आणि वाटेत हॉटेलचे बील सुद्धा स्वतःच देईल. त्या जागी इथे जर तुमच्या चुलत भावाकडे जर मोटार मागाल तर तो हिशोब लावेल की, पन्नास मैल जायचे आणि पन्नास मैल यायचे, शंभर मैल होतील. पेट्रोलचा खर्च इतका, ऑईल-पाण्याचा खर्च इतका, शिवाय माझी मोटारही घासली जाईल, असा सुद्धा हिशोब मनात काढेल. त्यामुळे तो मेला तोंडावर साफ खोटे बोलेल की 'उद्या तर माझे साहेब येणार आहेत.'

याला काय म्हणायचे? त्या फॉरेनवाल्याचा लोभच डेव्हलप झालेला नाही आणि याचा फुल्ली डेव्हलप झालेला आहे. सात पिढ्यांपर्यंतचा डेव्हलप झालेला आहे. जेव्हा की तिथल्या लोकांचा लोभ केवढा डेव्हलप झालेला असतो? तर स्वतः पुरताच. नवरा-बायको पुरताच. आणि मुलगा अठरा वर्षाचा झाला की तू वेगळा आणि आम्ही वेगळे. आणि जर बायकोबरोबर जरा किटकिट झाली की तू वेगळी आणि मी वेगळा, लगेच डायवोर्स (घटस्फोट). इथे आपल्याकडे तर ममता शेवटपर्यंत डेव्हलप झालेली असते. एक ऐंशी वर्षांची म्हातारी अन् पंच्याऐंशी वर्षाचा म्हातारा, आयुष्यभर दोघांचे रोजचे भांडण, रोजची किटकिट चालूच. आणि एक दिवस म्हातारे बुवा परलोकी गेले तेव्हा म्हाताऱ्या आजीने तेराव्या दिवशी श्राद्ध करताना 'तुझ्या काकांना हे आवडायचे, ते आवडायचे असे आठवून आठवून सर्व वस्तू ताटात ठेवल्या. मी विचारले, 'काकी, तुमचे तर काकांबरोबर रोजच भांडण होत होते ना?' तर त्या म्हणाल्या, 'ते तर असेच असते. पण मला तुझ्या काकांसारखा पुन्हा कोणी भेटणार नाही.' मला तर जन्मोजन्मी तेच हवेत. ममता सुद्धा टोकावर पोहोचलेली असते!

## प्राकृतिक साहजिकता

फॉरेनची प्रजा सहज स्वभावाची असते. सहज म्हणजे गाय मारकुटी नसेल तर लहान मुलाने जरी तिचे शिंग पकडले तर ती मारत नाही. आणि

गाय मारकुटी असेल तर कोणी काही केले नसेल तरीही ती मारायला धावेल. त्या लोकांचे असे सहज वर्तन असते. त्यांच्या मनात तुम्हाला घेऊन जायचे असेल तर लगेच हो म्हणतील आणि तशी इच्छा नसेल तर लगेच नाही म्हणतील. पण खोटे–बिटे बोलणार नाहीत. त्यांच्यात दोन्ही प्रकार आढळतात. सरळ तर एकदम सरळ आणि वाकडे तर तितकेच वाकडे. भारतातील माणसे मात्र असहज. हिंदुस्तानात सुद्धा साहजिकता होती पण ती सतयुगात होती. ती खरोखर आदर्श साहजिकता होती. भारतात पूर्वी चार वर्गांचे विभाजन होते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र, हे विभाजन डेव्हलपमेंटचे निर्देशन करत होते. आत्ता तर हे डेव्हलपमेंट टॉपवर पोहोचलेले आहे. सुताराचा मुलगा सुद्धा तेवढाच हुशार. साहजिकता त्या काळात परिपूर्ण होती. त्यामुळे देशात चढतीचा काळ होता. त्यातून मग हळूहळू उतरता काळ सुरू झाला. हा नियमच आहे. जे चार वर्ग होते, त्यांचा लोकांनी दुरुपयोग केला. हरिजनांचा तिरस्कार केला. बुद्धीचा इतका तीक्ष्ण दुरुपयोग केला की ते असहज होत गेले आणि भारताच्या उन्नतीचा सूर्य मावळला. लोक भयंकर दुराग्रही झाले. अगदी शेवटच्या कोटीचे, राक्षसी कोटीचे आचरण झाले. अरे, कोणी वीस वर्षाची विधवा वाटेत भेटली तर बिचारीला शांती मिळेल असे वर्तन करण्याऐवजी, अपशकुन झाला म्हणणार अरे मेल्या, विधवेला तर गंगास्वरुप म्हणतात तिच्यामुळे अपशकुन कसा होऊ शकतो ? त्यानंतर इंग्रज आले. तेव्हा त्यांच्या सहजतेचे मिश्रण झाले. त्यामुळे इथल्या लोकांची स्थिती थोडी सुधारली.

हे तर सर्व एक्सेस (अति) होऊन गेलेले, त्याचाच हा परिणाम होता. आता भारताचा सूर्योदय होत आहे. या वेळेस फॉरेनमध्ये संध्याकाळचे पाच वाजले आहेत आणि इथे भारतात पहाटेचे पाच वाजले आहेत. तर आता फुल लाईट होणार आहे. आम्ही सन् 1942 पासून सांगत आहोत की 2005 मध्ये हिंदुस्तान वर्ल्डचे केंद्र बनलेले असेल. आता सुरुवात होऊ लागली आहे. नंतर फॉरेनची प्रजा इथे शिकण्यासाठी येईल की जीवन कसे जगावे ? नॉर्मालिटी कशास म्हणावी ? ती माणसे इतकी अबॉव नॉर्मल झाली आहेत की त्यांना जीवन जगता सुद्धा आले नाही ! भौतिक सुखांची इतकी रेलचेल होऊनही रात्री झोपेच्या गोळ्या खाऊन

झोपावे लागते. अरे, विष खात आहेस तू! इतका एक्सेस झालास की झोप तर नैसर्गिक देणगी आहे, ती सुद्धा गमावून बसलास. यास जीवन कसे म्हणावे? अरे, चंद्रापर्यंत जाऊन आलास पण त्यात तुझा काय फायदा झाला? तुझ्या झोपेच्या गोळ्या खाणे बंद झाले का?

## साधक दशा

साधू कुणाला म्हणायचे? ज्याने आत्मदशा साधली तो साधू. साधू तर साधकच असतो. तिथे आज कलियुगात साधू तर साधक–बाधक दशेतच राहतात. जेव्हा सामायिक–प्रतिक्रमण किंवा ध्यान करतात तेव्हा शंभराची कमाई करतात आणि जेव्हा शिष्यांवर उग्र होतात तेव्हा दिडशेचे नुकसानी करून घेतात! निरंतर साधक दशा तर स्वरुपाचे भान झाल्यानंतरच उत्पन्न होते. साधक दशा म्हणजे सिद्धदशा उत्पन्न होऊ लागते. सिद्ध अवस्थेत मोक्ष आणि साधक–बाधक दशेत संसार. तरी यात कुणाचाही दोष नाही. समज नसल्यामुळे ही फसवणूक होत आहे. बाकी त्यांचीही इच्छा तर साधक दशेचीच असते ना!

## पुण्य आणि पाप

जगात आत्मा आणि परमाणू हे दोनच आहेत. कुणाला शांती दिली असेल, सुख दिले असेल तर पुण्याचे परमाणू जमा होतात आणि कुणाला दुःख दिले असेल तर पापाचे परमाणू जमा होतात. आणि नंतर तेच परमाणू दुःख देतात. इच्छेनुसार घडते ते पुण्य आणि इच्छेविरुद्ध घडते ते पाप. पाप दोन प्रकारचे आणि पुण्य दोन प्रकारचे :

(1) पापानुबंधी पाप : सध्या पाप (दुःख) भोगत आहे आणि परत नवीन अनुबंध पापाचाच बांधत आहे. कुणाला दुःख देऊन वर खुश होतो.

(2) पुण्यानुबंधी पाप : पूर्व जन्मीच्या पापामुळे आज दुःख (पाप) भोगत आहे. परंतु नीतिपालन आणि चांगल्या संस्कारांमुळे पुण्याचा अनुबंध बांधत आहे.

(3) पापानुबंधी पुण्य : पूर्वीच्या पुण्यामुळे आज सुख भोगत आहे, परंतु भयंकर पापाचा अनुबंध बांधत आहे. अलीकडे जिथे पाहावे तिथे पापानुबंधी पुण्य दिसते. कुणा श्रीमंत शेठजींचा भला मोठा बंगला असेल पण सुखाने बंगल्यात राहू शकत नाही. शेठ दिवसभर पैसे कमावण्यासाठी बाहेर फिरत असतात. शेठाणी मोहबाजारात सुंदर साड्यांच्या खरेदीच्या नादात असते. शेठजींची मुलगी मोटार घेऊन हिंडायला निघालेली असते. बंगल्यात फक्त नोकरच असतात. म्हणजे घराला घरपणच नसते. पुण्यामुळे बंगला मिळाला, मोटार मिळाली, फ्रिज मिळाला. असे पुण्य असून सुद्धा पापाचा अनुबंध बांधला जाईल अशी करणी करत असतात. लोभात, मोहात रमून वेळ वाया घालवतात आणि जे प्राप्त आहे त्याचा उपभोगही घेऊ शकत नाहीत. पापानुबंधी पुण्यवाले लोक तर विषयभोगांची लुटबाजी करण्यातच मग्न असतात.

(4) पुण्यानुबंधी पुण्य : पुण्याचा उपभोग घेत आहेत आणि त्याचबरोबर आत्मकल्याणासाठी अभ्यास-क्रियाही करत आहेत. पुण्य उपभोगतात आणि नवीन पुण्य बांधतात, ज्यामुळे अभ्युदय होऊन मोक्षफळ प्राप्त करतात.

हट्टाने केलेली सर्व कामे, हट्टाग्रही तपाने, हट्टाग्रही क्रियेने, पापानुबंधी पुण्यबंधन होते. तिथे समजून केलेल्या तपामुळे, क्रियेमुळे स्वतःच्या आत्मकल्याणाच्या हेतूने केलेल्या कार्यांमुळे पुण्यानुबंधी पुण्याची प्राप्ती होते आणि केव्हा न केव्हा ज्ञानी पुरुषांची भेट होऊन मोक्ष प्राप्ती होते.

पुण्याशिवाय लक्ष्मी हाती येत नाही.

या जगात सर्वात अधिक पुण्यशाली कोण? तर ज्याला सहज विचार आला, त्याने ठरवले आणि वर्षानुवर्षे इच्छा केल्याशिवाय, मेहनत केल्याशिवाय मिळतच राहते, तो.

दुसऱ्या नंबरचे लोक इच्छा करतात, पुन्हा पुन्हा ठरवतात आणि संध्याकाळी ते त्यांना सहजपणे येऊन मिळते.

तिसऱ्या नंबरचे लोक इच्छा करतात, प्रयत्न करतात आणि त्यांना प्राप्त होते. चौथ्या नंबरचे इच्छा करतात आणि खूप प्रयत्न केल्यानंतर त्यांना प्राप्ती होते. पाचव्या नंबरवाल्यांना इच्छा होते, खूप खूप प्रयत्न करतात, तरी सुद्धा प्राप्त होत नाही. या मजुरांना किती कठोर परिश्रम करावे लागते, आणि वर शिव्याही खाव्या लागतात, तरी पैसे मिळत नाहीत. मिळाले तरी घरी गेल्यावर खायला मिळेल की नाही याचा भरवसा नाही. ते बिचारे सर्वात अधिक परिश्रम करतात तरी त्यांना प्राप्ती होत नाही. कित्येक असे बोलतात की अजाणतेपणी पाप घडले असेल तर त्याचे फळ येत नाही. नाही कसे? मेल्या, अजाणतेपणी विस्तवावर हाथ ठेव म्हणजे समजेल की फळ येते की नाही? जाणूनबुजून केलेले पाप आणि अजाणतेपणी केलेले पाप दोन्हीही सारखेच असतात. परंतु अजाणतेपणी केलेल्या पापाचे फळ अजाणतेपणी भोगावे लागते आणि जाणून केलेल्या पापाचे फळ जाणतेपणी भोगावे लागते, इतकाच फरक. उदाहणार्थ दोन भाऊ आहेत. एक सोळा वर्षाचा आणि दुसरा दोन वर्षाचा. त्यांची आई मृत्यू पावली. दोघांनाही पापाचे फळ तर भोगावे लागले. पण मोठ्या भावाला जाणून भोगावे लागले तिथे छोट्याने अजाणतेपणी भोगले!

पुण्य सुद्धा अजाणतेपणी होत असते. उदाहरणार्थ साखरेसाठी रेशनच्या दुकानात चार तास रांगेत उभे राहून, पिशवीतून साखर घेऊन तुम्ही घरी निघालात. तुमच्या पिशवीला छोटेसे भोक होते त्यातून नकळत थोडी थोडी साखर वाटेत सांडत राहते आणि त्यामुळे मुंग्यांचे भले होते. हे म्हणजे अजाणतेपणी घडलेले पुण्य. त्याचे फळ सुद्धा अजाणतेपणी भोगले जाते.

पुण्य आणि पाप, पाप आणि पुण्य यांच्या अनुबंधातच प्रत्येक माणूस भटकत राहतो. त्यातून केव्हाही मुक्ती होत नाही. अधिक पुण्य केले तर फार फार तर देवगती मिळते, पण मोक्ष तर मिळतच नाही. मोक्ष तर जेव्हा ज्ञानी पुरुषाची भेट होईल आणि तुमची अनंतकाळाची पापे जाळून ते भस्मसात करतील आणि मोक्ष तुमच्या हाती देतील, तेव्हाच होईल. तोपर्यंत चारगतींमध्ये भटकतच राहायचे.

आत्म्यावर असे थर आहेत, अशी आवरणे आहेत की एखाद्या माणसाला अंधार कोठडीत कोंडून ठेवले आणि त्याला फक्त दोन वेळा जेवण दिले तर तेव्हा त्याला ज्या दु:खांचा अनुभव होतो तशा प्रकारच्या अपार दु:खांचा अनुभव या झाडपानांना, एकेंद्रियापासून पंचेंद्रियपर्यंतच्या जीवांना होतो. या पाच इंद्रिय असलेल्या मनुष्यांना जर इतके दु:ख आहे, तर त्याहून कमी इंद्रिय असलेल्या जीवांना किती दु:ख भोगावे लागत असेल? पाचापेक्षा जास्त सहा इंद्रियेवाला कुणीच नाही. ही झाडपाने आणि जनावरे, त्यांची तिर्यंचगती. तर ती त्यांना भयंकर कैदेची शिक्षा आहे. ही मनुष्यगती म्हणजे साधे कैद आणि नरकगतीत तर भयंकर दु:ख, मी जर त्याचे जसे आहे तसे वर्णन केले तर ते ऐकताच मनुष्य मरून जाईल. उकळी येते तेव्हा तांदूळ उसळतात त्याहीपेक्षा लाखपटीचे दु:ख नरकगतीत होत असते. एका जन्मात पाच-पाचवेळा मरणवेदना भोगायच्या आणि तरीही मरण होत नाही. तिथे देह पाऱ्यासारखा असतो, कारण त्यांना यातना भोगायच्या असतात म्हणून मरण येत नाही. त्यांचे प्रत्येक अंग छेदले जाते व पुन्हा जोडले जाते. वेदना भोगल्याशिवाय सुटकाच नाही. नरकगती म्हणजे जन्मठेपेची शिक्षा.

देवलोकांना नजरकैद असते. पण त्यांनाही मोक्ष तर नाहीच. तुम्ही कुणाच्या लग्नकार्यात जाता तेव्हा सर्व काही विसरता. पूर्णपणे मोहातच तन्मय असता. आईसक्रीम खाता तेव्हा जीभ खाण्याच्या स्वाद सुखात असते. बॅन्ड वाजत असतो तो कानांना प्रिय वाटतो. डोळे नवरदेवाला बघण्यात मग्न असतात. नाक हे उदबत्ती आणि अत्तराच्या सुगंधात मुग्ध असते. अशा प्रकारे पाचही इंद्रिये आपापल्या कामात गुंतलेले असतात आणि मन विचारात गुरफटलेले असते. हे सर्व घडत असते तेव्हा आत्मा कुठला आठवतोय? देवलोकात सुद्धा नेहमी असेच सुख असते. इथल्यापेक्षा अनेक पटीने विशेष सुखोपभोग असतात. त्यामुळे त्यांना भानच नसते. आत्मा त्यांच्या लक्षातच नसतो. पण देवगतीत सुद्धा क्लेश, बेचैनी, ईर्षा होत असते. देवतांना सुद्धा अत्याधिक सुखाचा कंटाळा येतो. ते कसे? तर जसे लग्नात चार दिवसापर्यंत रोजच लाडू खाल्ले

तर पाचव्या दिवशी खिचडी आठवते ना, तसे! तर त्या देवतांना सुद्धा इच्छा होते की केव्हा मनुष्यदेह मिळेल, आणि भरतक्षेत्रात चांगल्या संस्कारी कुटुंबात जन्म होईल आणि केव्हा ज्ञानीपुरुषाची भेट होईल! ज्ञानी पुरुष भेटले तरच मोक्ष मिळू शकेल, नाही तर चतुर्गतीची भटकंती तर कायमचीच आहे.

## संकल्प-विकल्प

विकल्प म्हणजे 'मी' आणि संकल्प म्हणजे 'माझे.' 'मी चंदुलाल' हा सर्वात मोठा विकल्प आणि 'ही माझी बायको,' 'ही माझी मुले' हा माझा बंगला, मोटार वगैरे, हे सर्व संकल्प.

## सर्जन-विसर्जन

स्वतः ब्रह्म आणि रात्री पांघरुण घेऊन झोपला! मग तऱ्हेतऱ्हेच्या योजना घडवतो. त्यावेळी ब्रह्मा बनून सर्जन करतो. विसर्जन त्याच्या हातात नाही. विसर्जन निसर्गाच्या हाती आहे. विसर्जन होते तेव्हा त्याची भ्रमित स्थिती होते. अगदी कावराबावरा होतो. योजना केली, विचार आला, आणि त्यात तन्मयाकार झाला ते सर्जन आणि रुपकात येते ते विसर्जन. विसर्जन कोणीच बदलू शकत नाही. जर विसर्जन स्वतःच्या हातात असते तर आपल्याला न आवडणारे असे काहीच होऊ दिले नसते. सर्व काही आपल्या आवडीचेच घडू दिले असते. परंतु विसर्जन हे परसत्तेच्या हाती आहे. 'व्यवस्थित शक्तीच्या' हातात आहे. तिथे कोणाचेही चालत नाही. म्हणून समजून-उमजून सर्जन कर. एकदा ब्रह्मा होऊन बसलास की मग कधीच ब्रह्मपद मिळणार नाही. हो, जेव्हा तो ज्ञानींना भेटतो तेव्हा ज्ञानी एका तासातच त्याची जगनिष्ठा सोडवून त्याला ब्रह्मनिष्ठेत स्थित करतात. ज्ञानी त्याला ब्रह्मनिष्ठ बनवतात आणि मग तो निरंतर ब्रह्मपदातच स्थित राहतो. मग तो नवीन सर्जन करत नाही आणि जो देह आहे त्याचे विसर्जन होते.

मनुष्य अवतार सर्जनात्मक आहे. त्यातूनच सर्व गतींचे सर्जन होत असते आणि मोक्षाची प्राप्ती सुद्धा इथूनच होऊ शकते.

## पुरुष आणि प्रकृती

सर्व जगत प्रकृती काय आहे हे समजून घेण्याच्या नादातच फसलेले आहे.

पुरुष आणि प्रकृतीचा शोध तर अनादि काळापासून सुरू आहे. पण ती तशी हाती येईल अशी नाही. क्रमिक मार्गात तर प्रकृतीची पूर्णपणे ओळख झाल्यानंतर पुरुषाची ओळख पटते. याचा तर अनंत जन्मानंतर सुद्धा पार येत नाही.तिथे अक्रम मार्गात ज्ञानी पुरुषांनी डोक्यावर हात ठेवला तर स्वत: पुरुष होऊन प्रकृतीला पूर्णपणे समजू शकतो. दोन्ही (प्रकृती आणि पुरुष) कायमचे वेगळेच राहतात. प्रकृतीच्या चक्रव्यूहात भल्याभल्यांची फसवणूक झाली आहे. आणि ते तरी काय करतील! प्रकृतीच्या साधनानेच प्रकृतीचा शोध घ्यायला निघाले आहेत. तर कधी पार येईल? पुरुष होऊन प्रकृतीला ओळखायचे असते, तेव्हाच प्रकृतीच्या प्रत्येक परमाणूंची ओळख पटते.

प्रकृती म्हणजे काय? प्र=विशेष आणि कृती=केलेले. स्वाभाविकपणे केलेली वस्तू नव्हे परंतु विभावात जाऊन विशेषपणे केलेली वस्तू म्हणजे प्रकृती.

प्रकृती तर स्त्री आहे. स्त्रीचे स्वरुप आहे आणि 'स्वत:' (सेल्फ) पुरुष आहे. कृष्ण भगवंतांनी अर्जुनाला सांगितले की 'त्रिगुणात्मकतेतून वेगळा हो.' अर्थात त्रिगुण, प्रकृतीच्या तीन गुणांपासून मुक्त असा पुरुष हो. कारण जर प्रकृतीच्या गुणात राहशील तर तू 'अबला' (स्त्री) आहेस. आणि पुरुषाच्या गुणात राहशील तर 'तू' पुरुष आहेस.

'प्रकृती ही भोवऱ्यासारखी आहे.' भोवरा म्हणजे काय? दोरी गुंडाळली जाते ते सर्जन, दोरी उलगडत असताना भोवरा फिरतो ती प्रकृती. दोरी जेव्हा गुंडाळली जाते तेव्हा कलात्मकतेने गुंडाळली जाते आणि जेव्हा उलगडते तेव्हा सुद्धा कलात्मकतेनेच उलगडते. लहान मूल सुद्धा खाताना घास तोंडाऐवजी कानात टाकते का? सर्पिण अंडी देऊन जरी मुत्यू पावली आणि जरी नंतर तिची अंडी फुटून त्यातून पिल्ले बाहेर पडली तरी ती

सुद्धा लगेच फणा काढतात. नाही का? या सर्वांमागे काय रहस्य आहे? ही तर प्रकृतीची अजब कला आहे! प्रकृतीची कलात्मक कार्यपद्धती ही सर्वांना आश्चर्यचकित करणारी आहे. प्रकृती मागे-पुढे कुठवर होते? सुरुवात झाल्यापासून जास्तीतजास्त मागे-पुढे होण्याची तिची मर्यादा असते. भोवरा फिरतो, तो पण आपल्या लिमिटमध्येच फिरतो. उदाहरणार्थ, विचार येऊ लागले तर ते आपल्या लिमिटमध्येच येतात. मोह झाला तर तो निर्धारित लिमिटमध्येच होतो. प्रत्येक जीवाची बेंबी (नाभी प्रदेश) हा त्याचा सेंटर असतो आणि तिथे आत्मा निरावरण असतो. तिथे शुद्ध ज्ञान प्रकाश असतो. जर प्रकृती लिमिटच्या बाहेर गेली तर त्या ज्ञान प्रकाशावर आवरण चढून तो दगडासारखा होऊन जाईल, जड होऊन जाईल. पण तसे कधी घडतच नाही. लिमिटच्या आतच सर्व घडते. हा मोह होतो, म्हणून त्याचे आवरण येते. मोह जरी वाटेल तितका टोकापर्यंत पोहोचला असेल तरी त्याची लिमिट आली, की तो परत खाली उतरू लागतो. हे सर्व नियमानेच घडते. नियमाबाहेर कधीच जात नाही.

## त्रिगुणात्मक प्रकृती

ब्रह्मा, विष्णु आणि महेश, हे तीन गुणांचे अधिपति देवता आहेत. सत्त्व, रज आणि तमो. तमोगुणवाले महादेवाची भक्ती करतात. सत्त्वगुणी ब्रह्माची भजना करतात आणि रजोगुणी विष्णुची भजना करतात. जो ज्याची भजना करतो त्याला ते गुण प्राप्त होतात. इंडियामध्ये रजोगुणी जास्त असतात परंतु जग तमोगुणाने भरलेले आहे. ह्या तीन गुणांच्या तीन देवता आहेत. त्यांचा जन्म झालेला नाही, पण ते या रूपक स्वरूपात आहेत. वेद सुद्धा 'या तीन गुणांपासून मुक्त होऊन तू पुरुष हो.' असे म्हणतात.

ही प्रकृती नाचवते तेव्हा हा मूर्ख म्हणतो की, 'मी नाचलो.' अरे, भोवरा फिरत आहे त्यात त्याचा काय पुरुषार्थ? लाख मिळवले की म्हणतो, 'मी मिळवले' पण जेव्हा नुकसान होते तेव्हा म्हण ना की मी केले! तेव्हा तर शहाणा देवावर टाकतो. देवाने माझे नुकसान केले. बिचाऱ्या देवाला बाप नाही, त्याची बाजू घेणाराही कोणी नाही म्हणून लोक देवावर खोटा आरोप लावतात.

खरे तर प्रकृती बळजबरीने करवून घेते आणि हा म्हणतो की मी करत आहे. दान देणे, जप-तप, धर्मध्यान, दया, अहिंसा, सत्य हे सर्व प्राकृत गुण आहेत. चांगल्या सवयी आणि वाईट सवयी हे देखील प्राकृत गुण आहेत. प्राकृत जरी कितीही सुंदर असले तरी पण वेष बदलून केव्हा फजिती करेल याचा नेम नाही. एखादा राजा असेल, फार मोठा दानेश्वरी आणि धर्मनिष्ठ, पण जंगलात वाट चुकला असेल आणि चार दिवसांचा उपाशी असेल तर जंगलात भिल्लांकडे भीक मागून खाण्यात त्याला लाज वाटेल का? नाही वाटणार. मग तेव्हा त्याची दानवीरता कुठे गेली? त्याचे राजेपण कुठे गेले? अरे, आतून प्रकृती आरडाओरडा करून मागायला लावते, संयोगाच्या कचाट्यात सापडल्यावर राजा सुद्धा भिकारी बनतो तर मग इतरांचे काय सांगावे? खरे तर प्रकृतीच दान द्यायला लावते आणि प्रकृतीच भीक मागायला लावते, त्यात तू काय केलेस? एक चोर वीस रुपयांची चोरी करतो आणि हॉटेलात जाऊन खाऊन-पिऊन चैन करतो आणि जाता जाता दहाची नोट कोणी कुष्ठरोग्याला देऊन टाकतो, याला काय म्हणावे? ही तर प्रकृतीची माया आहे! समजेल अशी नाही.

कुणी म्हणेल की, मी आज चार सामायिक केली आणि प्रतिक्रमण केले आणि दोन तास शास्त्रे वाचली. अरे, शहाण्या, ते सुद्धा प्रकृती करवीत आहे आणि तू म्हणतोस की 'मी केले.' जर तूच सामायिकचा कर्ता आहेस तर मग उद्याही सामायिक करून दाखव ना! उद्या तर म्हणेल 'आज काय माझ्याने होत नाही.' अरे, असे का बोलतोस? मग यात आणि काल जे बोलत होतास की 'मी केले,' या दोन्हीमध्ये केवढा मोठा विरोधाभास आहे? करणारा जर तूच असशील तर 'माझ्याने होत नाही' असे तू बोलूच शकत नाही. 'होत नाही' याचा अर्थ हाच की तू करणारा नाहीच. संपूर्ण जग अशा चुकीच्या समजुतीमुळेच अडकून राहिले आहे. त्याग करतो तेही प्रकृती करवून घेते आणि ग्रहण करतो तेही प्रकृतीच करवून घेते. हे ब्रह्मचर्य देखील प्रकृती जबरदस्तीने पालन करविते, तरी पण म्हणतो मी ब्रह्मचर्याचे पालन करतो. हा केवढा मोठा विरोधाभास!

राग–द्वेष, दया–निर्दयता, लोभ–उदारता, सत्य–असत्य हे सर्व द्वंद्व गुण आहेत. द्वंद्व गुण हे प्रकृतीचे गुण आहेत आणि 'स्वत:' द्वंद्वातीत आहे.

## आत्मा : सगुण–निर्गुण

काही माणसे भगवंत निर्गुण आहेत असे म्हणतात. अरे! भगवंतांला शिवी कशाला देतोस? वेड्या माणसाला सुद्धा निर्गुणी म्हणतात, वेड्याला निर्गुणी कसे म्हणता येईल? वेडेपणा हा तर एक प्रकारचा गुण आहे. त्याला निर्गुण कसे म्हणता येईल? याचा अर्थ असा झाला की आत्म्याला वेड्यापेक्षाही वाईट दाखवले. जडसारखेच दाखवले. अरे तो जड पण नाही आणि निर्गुणही नाही. त्याचे सुद्धा गुण आहेत. या आत्म्याला–भगवंताला निर्गुण ठरवल्यामुळेच लोक उलट मार्गाला वळले आहेत. इथे माझ्याजवळ ये, मी तुला खरी समज देईन. 'आत्मा प्रकृतीच्या गुणांनी निर्गुण आहे आणि स्वगुणाने भरलेला आहे.' आत्म्याचे स्वगुण तर अनंत आहेत. अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंत शक्ती, अनंत सुखाचा धाम, परमानंदी आहे. अशा आत्म्याला निर्गुण कसे म्हणता येईल? आत्म्याला जर निर्गुण म्हणशील तर आत्मा कधीच प्राप्त होणार नाही. कारण आत्मा स्वत:च्या गुणांपासून वेगळा नाहीच. वस्तुमध्ये वस्तुचे गुणधर्म असतात. म्हणून त्याचे गुणधर्म जाणून घेतलेस तर वस्तुची ओळख पटेल. उदाहरणार्थ सर्व धातुंमध्ये सोने जर ओळखायचे असेल तर त्याचे गुणधर्म जाणावे लागतील तरच त्यास ओळखू शकू. कारण सोने त्याच्या गुणधर्मांपासून वेगळे नसते. जसे फूल आणि त्याचा सुगंध हे भिन्न नसतात. सुगंधावरुन फुलाची ओळख होते. तसेच आत्म्याला आत्म्याच्या गुणधर्मांमुळेच ओळखले जाते. आणि हाच धर्म जाणण्यासारखा आहे. आत्मधर्म जाणून घ्यायचा आहे. प्रकृतीचे धर्म तर अनंत जन्मांपासून जाणतच आलो आहोत पण तरी काहीही निष्पन्न झाले नाही. हे जे रिलेटिव्ह धर्म आहेत, लौकिक धर्म आहेत ते सर्व प्रकृतीचे धर्म आहेत, देहाचे धर्म आहेत. अलौकिक धर्म तोच खरा आत्मधर्म आहे. रियल धर्म आहे.

या देहाला अंघोळ घालतो, खाऊ घालतो, उपवास करायला लावतो, हे सर्व प्राकृत धर्म आहेत. प्राकृत धर्मांचा काही ठावठिकाणा नाही. कारण

ते स्वसत्तेच्या बाहेरचे धर्म आहेत. हे तर कसे, जुलाब होण्याचे औषध घेतले नसेल तरी जुलाब होतात आणि जुलाब बंद करण्याचे औषध घेतले नसेल तरी आपणहूनच बंद होतात. असे प्रकृतीचे काम आहे.

## प्राकृत पूजा - पुरुष पूजा

जगात जी भक्ती होत आहे ती प्राकृत गुणांची भक्ती आहे. प्राकृत गुण म्हणजे ज्याचे अस्तित्व शाश्वत नाही, असे काल्पनिक गुण. प्राकृत गुण हे वात, पित्त आणि कफाच्या अधीन आहेत. स्वत:चे (आत्म्याचे) गुण हे स्वावलंबी आहेत. प्रकृतीचे गुण परावलंबी आहेत. ते तर जेव्हा माणसाला सन्निपात होतो तेव्हा समजते. जगात सर्वत्र प्रकृतीचीच पूजा होत आहे. पुरुषाची पूजा कुठेही आढळत नाही. प्रकृतीच्या पूजेचे फळ संसार आहे आणि पुरुषाच्या पूजेचे फळ मोक्ष आहे!

आपण स्वत: पुरुष स्वरूपाने, शुद्धात्मा स्वरूपाने स्ववश आहोत आणि प्रकृती स्वरूपाने परवश आहोत. प्रकृती आणि रेग्युलेटर ऑफ धी वर्ल्डच्या आधारे हे सर्व चालत आहे. त्यात भगवंत हात घालतच नाही. पुरुष झाल्यानंतर प्रकृतीशी काहीच देणेघेणे नसते. जे घडले ती प्रकृती. त्यावर राग-द्वेष उत्पन्न झाला नाही तो शुद्धात्मा. मारामारी करत असताना सुद्धा राग-द्वेष होत नाही असे आमचे अद्‌भुत ज्ञान आहे!

## प्रकृतीधर्म - पुरुषधर्म

जितके विकल्प झालेत ते सर्वच प्रकृतीत येतात. विकल्प झाले नसतील, ते प्रकृतीत येत नाहीत.

हा वाणी आहे, हा पटेल आहे, हा मुसलमान आहे असे ओळखले जाते ते त्यांच्या प्रकृतीमुळे ओळखले जाते. वाण्याची प्रकृती विचारशील असते आणि समंजस असते. पटेल तर क्षत्रिय म्हटले जातात. त्यांची प्रकृती समोरच्याचे मस्तक कापून घेऊन येईल आणि वेळ आली तर स्वत:चे मस्तक सुद्धा कापून देईल, अशी असते. मुसलमानाची प्रकृती काही वेगळीच असते. खरे तर प्रकृती ही प्रत्येक माणसाची वेगवेगळी असते. याचा काही अंतच नाही.

मन-वचन-काया हे प्रकृतीचे तीन भाग आहेत. या तिन्ही वस्तू इफेक्टिव आहेत. त्या इफेक्टमध्ये भ्रांतीमुळे परत कॉजेस उभे होतात आणि त्यातूनच मग कारण प्रकृती तयार होत असते आणि त्याचा इफेक्ट म्हणजे कार्य प्रकृती.

जोपर्यंत शंका मिटत नाही तोपर्यंत प्राकृतधर्म. जेव्हा शंका मिटते, आत्म्यासाठी संपूर्ण नि:शंक होतो तेव्हा तो पुरुष बनतो. आणि त्यानंतरच कारण प्रकृती बांधण्याचे बंद होते.

## प्राकृत - बाग

जो जो इफेक्ट आहे, कार्य-प्रकृती आहे ती कधीच बदलत नाही. प्रत्येक वडिलांची इच्छा असते की माझा मुलगा माझ्यासारखा व्हावा. अरे, घर बागेसारखे बनवायचे आहे की शेतासारखे? प्रत्येकाची प्रकृती वेगवेगळी. त्यावर येणारी फुले सुद्धा वेगवेगळ्या प्रकारची. आपण इच्छा करायची की दुसऱ्यांच्या रोपावर माझ्यासारखीच फुले आली पाहिजेत, हे कसे शक्य आहे? जर सगळीकडे नुसते गुलाबच असतील तर काय त्यास बाग म्हणता येईल? नाही, त्यास तर गुलाबाचे शेत म्हटले जाईल. जसे बाजरीचे शेत, तसे गुलाबाचे शेत. बागेत तर गुलाबाच्या जोडीला मोगरा असतो, चाफा असतो, जाई-जुई असते आणि काटे सुद्धा असतात, तरच ती बाग म्हटली जाईल. प्रकृती ही तर बाग आहे.

लोकांना गुलाब हवेत पण काटे नकोत. काट्याशिवाय गुलाब कसे असेल?

लिंबाचे रोप लावतात त्याची वाढ कशी होते. पृथ्वी, जल, वायु, तेज आणि आकाश, या तत्त्वांमुळे त्याची वाढ होते. त्याच्या वाढीसाठी जे पोषण दिले जाते तर त्या पोषणात स्वाद आहे का? आंबट रस आहे का? नाही. मग आंबटपणा कुठून आला? शेजारीच कडुनिंबाचे झाड लावले असेल तर त्याच्या प्रत्येक पानात, प्रत्येक फांदीत कडवटपणा कुठून आला? पाच तत्त्वांचे पोषण तर दोन्ही झाडांना सारखेच मिळाले होते. तर काय, पाणी कडू होते? नाही. तर मग हे घडले तरी कसे? कारण बीजातच

आंबटपणा आणि बीजातच कडवटपणा होता त्यामुळे तसे फळ आले. या वटवृक्षाचे बीज मोहरीपेक्षाही लहान असते आणि वटवृक्ष तर किती विशाल असतो. वटवृक्षाच्या बीजातच संपूर्ण वड, फांद्या, पानं, पारंब्या सूक्ष्म स्वरुपात असतात, 'व्यवस्थित शक्ती' संयोग एकत्रित घडवून आणते आणि बीज वटवृक्षात परिणमित होते, ते त्याच्या प्राकृतिक स्वभावामुळेच.

प्रकृतीचे ज्ञान असे अद्‌भुत आहे! नदीच्या पार जाऊ शकतो, पण प्रकृतीच्या पार जाणे शक्य नाही, असे आहे हे.

## वैराग्याचे प्रकार

वैराग्य तीन प्रकारचे असते.

(1) दुःखगर्भित वैराग्य : दुःखामुळे संसार सोडून पळतात आणि बायको-मुलांचे हाल करतात. संसारात बूड बसत नसेल तर काही जण असा विचार करतात की वैरागी (संन्यासी) बनल्याने दोन वेळचे जेवण तरी मिळेल! फक्त अनवाणी चालायचे आणि मागून खायचे एवढेच दुःख ना? मग पुढचे पुढे बघता येईल. असा विचार करून संन्यासी होतात. याचा परिणाम काय? तर कित्येक जन्म भटकतच राहावे लागते.

(2) मोहगर्भित वैराग्य : शिष्य मिळतील, मान मिळेल, किर्ती मिळेल, वाह-वाह होईल, लोक पुजतील, या प्रलोभनाने संन्यासी होतात, तर त्याचे फळ सुद्धा संसारात भटकंतीच आहे.

(3) ज्ञानगर्भित वैराग्य : हेच यथार्थपणे वैराग्य आहे. ज्ञानासाठी वैराग्य घेतले जाते, ते. ज्ञानप्राप्तीसाठी वैराग्य घेणारे क्वचितच असातात. पण ज्ञान मिळणे ही फार कठीण गोष्ट आहे.

ज्ञान तर ज्ञानींकडे गेल्यानंतरच मिळते आणि त्यानंतरच ज्ञानप्रकाशाने यथार्थ वैराग्य उत्पन्न होतो.

## आत्म्याचा उपयोग

आत्म्याच्या उपयोगाचे चार प्रकार आहेत.

(1) अशुद्ध उपयोग : कुणी विनाकारण हरणाची शिकार करतो आणि ते सुद्धा शिकारीचा आनंद मिळवण्यासाठीच आणि वर गर्व करतो की कसा अचूक वार केला! कुठल्याही विशेष कारणाशिवाय फक्त मौज करण्यासाठी मारणे, यास आत्म्याचा अशुद्ध उपयोग म्हटला जातो. कुणाचे घर जाळून वर गर्व करतो. चुकीची कामे करून वर आणि हसत असेल, समोरच्याचे नुकसान करून मिश्यांवर पीळ देत असेल तर ती माणसे थर्ड क्लासच्या पॅसेंजरसारखी म्हणायची. त्याचे फळ नरकगती.

(2) अशुभ उपयोग : घरच्या माणसांनी सांगितले की आज हरीण मारून पोट भरावे लागणार, कारण घरात खाण्यासाठी काहीच उरले नाही. बायको-मुले भुकेने तळमळत असतील. तर अशा परिस्थितित तो हरीण मारून घरात खायला आणतो. परंतु त्याचे त्याला अपार दुःख वाटते, पश्चाताप होत असतो की मी जे केले ते चुकीचे आहे. तर तो आत्म्याचा अशुभ उपयोग. अशुद्ध आणि अशुभ उपयोगात क्रिया सारखीच असते, तरी पण एक केलेल्या क्रियेवर खुश होतो, तिथे दुसरा पश्चातापाचे अश्रू वाहतो. इतका हा फरक! हे जे सर्व अशुभ उपयोगी जीव आहेत ते सेकंड क्लासच्या पॅसेंजरसारखे आहेत. ते तिर्यंच गतीत जातात.

(3) शुभ उपयोग : शुभ उपयोगात घरातले सर्व भुकेने बेजार झाले असतील तरी सुद्धा तो तर हेच म्हणेल की, कुणाचा जीव घेऊन मला माझी भूक भागवायची नाही, हा आत्म्याचा शुभ उपयोग. परक्यांच्यासाठी चांगली भावना करणे, लोकांचे भले करणे, ऑब्लाईज (परोपकार) करणे, चोख मन आणि नीतिमत्ता असणे, तो शुभ उपयोग. केवळ शुद्ध उपयोग हा तर एखाद्यालाच असतो. सर्वत्र शुभाशुभ उपयोगच आढळतो. शुभाशुभ उपयोगवाले फर्स्ट क्लास पॅसेंजर त्याचे फळ मनुष्यगती. परंतु ज्याचा निव्वळ शुद्ध उपयोगच असतो तो तर एअर कंडिशन्ड क्लासचा पॅसेंजर म्हणायचा, तो देवगती प्राप्त करतो.

(4) शुद्ध उपयोग : शुद्ध उपयोग कसा असतो? शुद्ध उपयोगी शुद्धच पाहातो. आतला माल बघतो, पॅकिंग बघत नाही. तत्त्वदृष्टीने पाहणे यास म्हणतात शुद्ध उपयोग. शुद्ध उपयोग आत्मा प्राप्त झाल्यानंतरच

सुरू होतो. उपयोग जेव्हा संपूर्ण शुद्ध होतो तेव्हा केवलज्ञान प्राप्त होते. शुद्ध उपयोगाचे फळ म्हणजे मोक्ष. आम्ही संपूर्ण शुद्ध उपयोगी आहोत. एका साधू महाराजांनी मला विचारले की, 'तुम्ही मोटारीत फिरता तेव्हा तर किती जीवांची हिंसा होत असते, मग तुम्हाला त्याचा दोष नाही का लागत?' मी त्यांना म्हटले, 'महाराज! तुमची शास्त्रे काय सांगतात?'

*शुद्ध उपयोगी आणि समताधारी, ज्ञान-ध्यान मनोहारी रे,*
*कर्म कलंकक दूर निवारी, जीव वरे शिवनारी रे.*

आम्ही शुद्ध उपयोगी आहोत. शुद्ध उपयोगीला हिंसा असते का कधी? महाराज म्हणाले 'नाही.' मी म्हटले की, आम्हाला दोष लागत नाही. तुम्हाला लागतो. कारण 'मी महाराज आहे, हे पाय माझे आहेत. आणि हे जीवजंतू माझ्याकडून मारले जात आहेत.' असे ज्ञान, असे भान, तुम्हाला निरंतर राहत आहे. अहो, झोपेत सुद्धा तुम्हाला तसेच वाटते. त्यामुळे तुम्हाला दोष लागतो. जेव्हा की आम्ही तर निरंतर शुद्ध उपयोगातच असतो. हा देह माझा आहे असे क्षणभर सुद्धा आम्हाला वाटत नाही. आमचा मालकीभाव पूर्णपणे निघून गेलेला असतो. त्यामुळे आम्हाला दोष लागत नाही.

तुमचा एक प्लॉट असेल आणि तो तुम्ही आठ दिवसांपूर्वी लल्लूभाईंना विकून टाकला. विक्रीच्या करारावर सही-शिक्के सुद्धा झाले. आणि एक दिवस पोलिस बेड्या घेऊन तुमच्या दारी येऊन ठेपला आणि म्हणाला! 'चला चंदुभाऊ, तुम्हाला पोलिस ठाण्यावर यावे लागेल.' तेव्हा तुम्ही त्याला विचाराल, 'का रे बाबा, मी काय गुन्हा केला?' तर पोलिस म्हणेल, 'तुमच्या प्लॉटमधून पुरून ठेवलेले दहा लाखाचे तस्करीचे सोने पकडले गेले आहे. हा तुमचा गुन्हा आहे.' हे ऐकल्यावर लगेचच 'सुटलो रे बाबा,' असे म्हणून तुम्ही पोलिसाला लल्लुभाईंना प्लॉट विकल्याचे कागदपत्र दाखवाल. मग ते पाहिल्यावर पोलिसाला हे समजेल आणि तो उलट तुमची माफी मागून तिथून निघून लल्लुभाईंच्या घरी जाईल.

तसेच आमचेही आहे. या देहाचे देखील आम्ही मालक नाही. आम्ही समग्र ब्रह्मांडाचे मालक आहोत परंतु इथल्या एकही प्लॉटवर

आमचा मालकीभाव नाही. संपूर्ण ब्रह्मांड दणाणून सोडण्याची ताकद 'आमच्यात' आहे पण या अंबालाल मूळजीभाईमध्ये भाजलेला पापड तोडण्याचीही शक्ती नाही!

## मनुष्यपणाचे डेव्हलपमेंट

या जगात माणसांचे चौदा लाख स्तर आहेत. त्यातील वरचे पन्नास हजार स्तरच ही गोष्ट ऐकण्यास लायक आहेत. मनुष्यगतिमध्ये जरी असले तरी पण सर्वांची डेव्हलपमेंट एकसमान नसते. प्रत्येकाचे स्टँडर्ड वेगवेगळे असतात, त्यामुळे त्यांच्या डेव्हलपमेंटनुसार त्यांचे देव असतात. नियमानुसारच त्यांना त्या देवाची भक्ती प्राप्त होते आणि शास्त्रे सुद्धा त्यांना त्यांच्या डेव्हलपमेंटनुसार मिळतात. ही सर्व माणसे डेव्हलपमेंटच्या आधारे आपापल्या स्टँडर्डमध्ये असतात आणि त्यांच्या स्टँडर्डनुसार त्यांचे देव पण त्यांच्या स्टँडर्डनुसार असतात. ते स्टँडर्ड लौकिक धर्माचे म्हणजेच रिलेटिव्ह धर्माचे आहेत.

## माया आणि मुक्ती

'माया शिरी शिंगे, लांब नऊ नऊ हात,
पुढून खुपसते शिंगे, आणि मागून मारते लात.'

माया म्हणते कशी? माझा मान नावाचा मुलगा जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत माझ्या बाकी सर्व मुलांना जरी मारून टाकले तरी ते पुन्हा जिवंत होतील. क्रोध-मान-माया (कपट)-लोभ, राग-द्वेष, ही माझी सहा मुले आणि सातवी मी, अशी ही आमची वंशावळची बाग नेहमी हिरवी गारच राहील. तात्पर्य काय? तर ही माया आणि तिची सहा मुले, यांनी मिळून जगाला भांडण-तंट्याच्या कचाट्यात फसवले आहे. अहो, मग ॲटमबॉम्ब फोडायचाच असेल तर त्यांच्यावरच फोडा की! हेच तर भांडणतंटे करवितात आणि हे संसारचक्र चालतच राहते, याचा अंतच नाही. तिच्या सहा मुलांमध्ये क्रोध हा भोळा आहे. लगेच तडफड करून टाकतो. क्रोध सर्वांना सहज ओळखता येतो, त्यामुळे कुणी त्याला सांगणाराही भेटतो की, 'अरे! क्रोध कशाला करतोस?' त्यानंतर मान,

हा पण बरा आहे. परंतु क्रोधापेक्षा कमी लेखला जातो. त्याला सुद्धा कुणी तरी सांगणारा भेटतो की, कशाला छाती फुगवून मिरवतोस? कपट आणि मोह, हे मात्र कुणालाही दिसून येत नाहीत. आणि स्वत:ला सुद्धा त्याचा पत्ता लागत नाही. आणि सर्वात शेवटचा नंबर लोभाचा. कपट, मोह आणि लोभ, यांचा तर देवाला सुद्धा कंटाळा येतो. लवकर मोक्षाला जाऊच देत नाही. अशी ही मायेची भयंकर वंशावळ आहे. अगदी शेवटपर्यंत, या मायेवर मात करून जिंकणे फार कठीणच आहे. क्रमिक मार्गात तर भगवंतपद हारतुरे घेऊन समोर येऊन ठेपले, तरी ही माया! त्याची प्राप्ती होऊ देत नाही. जेव्हा ज्ञानी पुरुषाची भेट होते तेव्हाच मायेपासून सुटका होऊ शकते आणि मग मायेची वंशावळ निर्मूळ होते. आम्ही दुसरे काहीच करत नाही. मान, अहंकार नावाचा जो तिचा सर्वात ज्येष्ठपुत्र आहे, त्यालाच मुळासकट उपटून टाकतो. त्यामुळे ती माया म्हातारी आणि तिचे उरलेले पाचही पुत्र, सर्वच मृत्यू पावतात, ज्यामुळे मग सुटका होते आणि मुक्ती मिळते. आम्ही जेव्हा ज्ञान देतो तेव्हा तुम्हाला सर्व प्रकारच्या मायेपासून मुक्त करतो.

## सुखाचा प्रकार

जगात तीन प्रकारचे सुख आहेत.

(1) इंद्रिय सुख (2) निरिंद्रिय सुख (3) अतींद्रिय सुख.

या पंचेंद्रियांनी जे जे विषय भोग भोगले जातात ते इंद्रियसुख. इंद्रिय सुखाची फांदी तर सोडून दिली आणि अतींद्रिय सुख अजून हाती लागले नाही, म्हणून लोक अधांतरी लोंबकळत राहिले! निरिंद्रिय सुखातच अतींद्रिय सुख, ते तर केवळ स्वत:चे, स्वत:च्या आत्म्याचे अनंत सुख आहे. पण ते तर आत्मा जाणल्याशिवाय प्राप्त होतच नाही.

हिवाळ्याची गारठून टाकणारी भयंकर थंडीची रात्र होती. आणि एका गावाच्या अतिथिगृहात एक इंद्रिय सुखाचा उपभोग घेणारा, दुसरा निरिंद्रिय सुख भोगणारा आणि तिसरा अतींद्रिय सुख भोगणारा, असे तीन प्रवासी त्या भयंकर थंडीत आश्रय घेण्यासाठी आले. तिघांच्याही

जवळ अंथरुण-पांघरुण वगैरे काहीच नव्हते. तर त्या तिघांची रात्र कशी गेली माहीत आहे का? इंद्रिय सुखवाला पाच-पाच मिनिटांनी ओरडत होता, 'अरे बाप रे! मेलो रे! देवा रे!' या भयंकर गारठ्यात तर माझे मरणच ओढवणार! परिणामी सकाळी तो खरोखरच मरण पावला होता.

निरिंद्रिय सुखवाला अधूनमधून बोलत होता, 'अरे, ही तर भयंकर थंडी आहे. छे, छे, पण मला कुठे थंडी वाजते? ही तर देहाला वाजतेय.' अशा प्रकारे अहंकार करत करत त्याने रात्र काढली. आणि सकाळी पाहावे तर त्याचा देह गारठून गेला होता पण त्याचा श्वास मात्र कसाबसा चालत होता!

आणि अतींद्रिय सुखवाल्याची काय स्थिती होती? तो तर बाहेर हिमवर्षा सुरू झाली की आपल्या ज्ञान गुहेतच शिरुन बसला! रात्रभर देहापासून वेगळाच राहिला! स्वतःच्या अनंत आत्मसुखातच स्थिर राहिला! आणि सकाळ झाल्यावर आपला रस्ता पकडून निघून गेला.

निरिंद्रिय सुख भोगणारा अहंकाराच्या मस्तीतच असतो. लोक त्याला महाराज, महाराज करत राहतात, आणि हा आपल्या अहंकाराच्या मस्तीत जगत असतो!

## मळ-विक्षेप-अज्ञान : राग-द्वेष-अज्ञान

वेदांतात म्हटले आहे की, मळ-विक्षेप-अज्ञान हे गेल्यानंतर मोक्ष प्राप्त होतो. तर जैनदर्शनात म्हटले आहे की राग, द्वेष आणि अज्ञान गेल्यानंतर मोक्ष होतो.

देहात असलेला मळ तर जुलाब घेतल्याने निघून जातो परंतु मनात असलेला मळ निघत नाही. आणि चित्तात साठलेला मळ तर काही जात नाही जोपर्यंत अज्ञान आहे तोपर्यंत सर्व विक्षेप उभे राहतील. थोडी तरी शांती मिळावी म्हणून हे लोक सतत मळ, विक्षेप काढत राहतात. ज्ञान मिळाल्यानंतर मग मागे काय उरणार? मळ आणि विक्षेप, ते तर सत्संगात आल्यावर निघून जातात.

या जीवाला बंधन कशामुळे आहे? तर अज्ञानामुळे. आणि सुटतो

कशामुळे? ज्याच्यामुळे बंधनात अडकलेला आहे त्याच्या प्रतिपक्षीमुळे, अर्थात ज्ञानामुळे.

'मी चंदुलाल आहे' याच आरोपीत जागी राग (आसक्ती-मोह) आहे आणि दुसऱ्या जागी द्वेष आहे. म्हणजे स्वरूपा प्रति द्वेष आहे. एका ठिकाणी राग असेल तर त्याच्या समोरच्या जागी एका कोपऱ्यात द्वेष असतोच असतो. आम्ही जेव्हा स्वरुपाचे भान करवितो, शुद्धात्म्याचे लक्ष्य बसवतो त्याच क्षणी तो 'वीतद्वेष' होतो. आणि जसजशी प्रगती करत जातो तसतसा वीतरागी होत जातो. वीतराग म्हणजे तर मूळ स्थानाचे, स्वरूपाचे ज्ञान-दर्शन. आम्ही तुम्हाला संपूर्ण केवळज्ञान आणि केवळदर्शन देत आहोत, त्यामुळे तुम्हाला संपूर्ण केवळदर्शन उत्पन्न होते. आणि केवळज्ञान संपूर्ण तीनशे साठ डिग्रीचे परंतु ते पचत नाही, काळाच्या प्रभावामुळे. अरे, आम्हालाच चार डिग्रीचे अजीर्ण झाले ना! आम्ही तुम्हाला देतो तर तीनशे साठ डिग्रीचे केवलज्ञान पण ते तुम्हाला पचणार नाही. त्यामुळे तुम्ही अंश केवळज्ञानी म्हटले जाता. जितक्या अंशाने आत्मस्वभाव प्रकट होत जातो तितक्या अंशाने ज्ञान प्रकट होत जाते. जेव्हा सर्वांशाने आत्मस्वभाव प्रकट होतो तेव्हा सर्वांशाने केवळज्ञान प्रकट झाले असे म्हणतात.

'भ्रांतीने भ्रांतीला कापावे,' असे क्रमिक मार्गात सांगितले आहे. उदाहरणार्थ कापड मळले तर त्याचा मळ काढण्यासाठी साबणाची गरज पडते. साबण वापरला म्हणजे तो स्वत:चा मळ सोडतो. आता तो मळ काढण्यासाठी परत टीनोपॉल हवा. हा टीनोपॉल साबणाचा मळ तर काढतो पण स्वत:चा मळ सोडत जातो. अशा प्रकारे शेवटपर्यंत ज्या-ज्या साधनांचा उपयोग केला जातो ती साधने स्वत:चा मळ सोडून जातात. निर्मळ कधीच होत नाही. निर्मळ केव्हा होते? तर जेव्हा निर्मळ अशा ज्ञानी पुरुषाची भेट होते तेव्हाच. ज्ञानी पुरुष की जे स्वत: संपूर्ण निर्मळ झाले आहेत, शुद्ध झाले आहेत तेच तुमच्या प्रत्येक परमाणूंना वेगळे करून, तुमच्या पापांना भस्मसात करून, केवळ शुद्धात्मा तुमच्या हाती देतात. तेव्हाच सुटका होते. तेव्हाच मोक्ष होतो. अन्यथा अनंत जन्म

कपडे धूत बसायचे आणि धुण्यासाठी ज्याचा साबण वापरला त्याचाच मळ परत चिकटत राहतो.

## वाणीचे विज्ञान

सासुबाईंची सकाळ–संध्याकाळ किटकिट सुरूच असली की सुनबाई आतल्या आत कुढत राहते. सासुबाई सतत चार तास शिव्या देत राहिल्या आणि जर आपण त्यांना सांगितले की 'सासुबाई पुन्हा त्याच शिव्या, त्याच क्रमात परत एकदा बोलून दाखवाल का?' तर त्या तसे करू शकतील का? नाही. कारण काय? तर मेल्या, ती तर रेकॉर्ड बोलत होती. आता जर ही रेकॉर्ड बोलली की, 'चंचलला अक्कल नाही, चंचलला अक्कल नाही.' तर काय चंचल रेकॉर्डला म्हणेल की 'तुलाच अक्कल नाही?' वाणी ही तर रेकॉर्ड स्वरूप आहे, असे स्पष्टीकरण देणारे आम्हीच आहोत! वाणी ही जड आहे, रेकॉर्डच आहे. ही जी टेपरेकॉर्ड वाजते त्याची टेप आधीच रेकॉर्डिंग झालेली असते की नाही? त्याचप्रमाणे वाणीची जी टेप वाजते त्याची सुद्धा रेकॉर्डिंग पूर्वी झालेली आहे आणि संयोग जुळून आला की लागलीच, जसे रेकॉर्डवर पीन ठेवली की रेकॉर्ड सुरू होते तशीच वाणी सुरू होते, आणि हा शहाणा म्हणतो, 'मी बोलत आहे.' हा वकील जेव्हा कोर्टात केस जिंकून येतो तेव्हा सर्वांना म्हणतो कसा की, मी अशा प्रकारे प्लीडींग केले आणि अशा प्रकारे मी केस जिंकलो. पण मग जेव्हा तू केस हरतोस तेव्हा तुझे प्लीडींग कुठे पळून जाते? तेव्हा तर म्हणतोस की मी अशा प्रकारे प्लीडींग करणार होतो पण ते राहिलेच! अरे, तू नाही बोलत, ही तर रेकॉर्ड बोलत आहे. मूर्खा, जर विचार करून करून बोलायला जाशील तर एक अक्षर सुद्धा निघणार नाही.

बऱ्याचदा असे नाही का घडत की तुम्ही दृढ निश्चय केला असेल की सासुबाईंना किंवा नवऱ्याला उलट उत्तर द्यायचे नाही आणि तरी सुद्धा तुमच्याकडून बोलले जाते. असे घडते की नाही? हे जे बोलले जाते ते कशामुळे? तुमची तर इच्छा नव्हती. तर काय नवऱ्याची इच्छा होती की बायकोने मला शिवी द्यावी? मग हे कोण बोलवून घेतो?

ही तर रेकॉर्ड बोलत आहे आणि एकदा जी टेप रेकॉर्ड झाली आहे त्यात फेरबदल करण्याची ताकद कुणाच्यातही नाही.

पुष्कळदा असेही आढळते की कुणी मनात ठाम ठरवून येतो की आज तर त्याला असा खडसावीन आणि तसे सुनावीन पण जेव्हा त्याच्या समोर येतो आणि तिथे दुसऱ्या दोन-चार व्यक्तींना पाहतो तेव्हा एक अक्षरही न बोलता माघारी येतो की नाही? अरे, बोलण्याचा प्रयत्न करतो तरी पण एक शब्द सुद्धा तोंडून निघत नाही. असे घडते की नाही? जर तुझ्या वाणी वर तुझी सत्ता असेल तर तुला जसे हवे तसेच बोलता आले पाहिजे. परंतु तसे घडते का? कसे घडेल? हे अंबालाल मूळजीभाई, देहधारी असून सुद्धा, आत परमात्मा संपूर्णपणे प्रकट झालेले आहेत तरी सुद्धा त्यांची वाणी पण रेकॉर्ड स्वरूपच आहे. आमच्यात बोलण्याची सत्ताच नाही. आम्ही तर ही रेकॉर्ड कशी वाजत आहे, ते पाहतो आणि जाणतो. वाणी संपूर्ण जड आहे. परंतु आमची वाणी चैतन्याला-परमात्म्याला स्पर्श करून बाहेर येत असते, त्यामुळे त्या वाणीत चैतन्य भाव असतो, ती प्रत्यक्ष सरस्वती आहे. या फोटोमध्ये आहे ती सरस्वती परोक्ष सरस्वती आहे. आमची वाणी तर प्रत्यक्ष सरस्वती आहे. ती वाणी समोरच्या व्यक्तीच्या अनंत जन्मांच्या पापांना जाळून भस्मसात करते.

आमची वाणी संपूर्ण वीतराग असते. स्याद्‌वाद असते. वीतरागांना ओळखण्याची साधी पद्धत म्हणजे त्यांची वाणी. तुमच्यात हिरा पारखण्याची जितकी शक्ती विकसित झालेली असेल तेवढीच तुम्हाला किंमत करता येईल. पण या काळात तसा रत्नपारखी कुठेही आढळत नाही. पाच अब्जाच्या हिऱ्याची किंमत पाच रुपये करतात. अशा परिस्थितीत हिऱ्याला स्वत:च स्वत:ची किंमत सांगावी लागते की माझी किंमत पाच अब्ज आहे. तसे आम्हाला स्वत:लाच सांगावे लागत आहे की आम्ही भगवंत आहोत! अरे, भगवंताचेही वरिष्ठ आहोत. संपूर्ण वीतराग! भगवंतांनी स्वत: हे वरिष्ठ पद आम्हाला दिले आहे. भगवंत म्हणाले की, 'आम्ही योग्य व्यक्ती शोधत होतो. ती पात्रता तुमच्यात पाहायला मिळाली. आम्ही तर आता संपूर्ण वीतराग होऊन मोक्षात बसलो आहोत. आता आम्ही कुणालाही

मदत करू शकत नाही. तेव्हा तुम्ही प्रकट स्वरुपात सर्वशक्तीमान आहात देहधारी असून सुद्धा संपूर्ण वीतराग आहात. म्हणून आम्ही तुम्हाला आमचेही वरिष्ठ बनवित आहोत.' 'चौदालोकाचे' आज आम्ही वरिष्ठ आहोत. सर्व सिद्धीसह हा ज्ञानावतार प्रकट झालेला आहे! अरे, तुझा दिवा पेटवून मार्गाला लाग. जास्त मोजमाप करू नकोस. अतुल्य–अमाप अशा ज्ञानी पुरुषाची तू काय किंमत करणार? घरी बायको सारखी ओरडतच असते की तुम्हाला अक्कलच नाही, आणि तुम्ही निघालात ज्ञानी पुरुषाची किंमत मोजायला? रत्नपारखी दृष्टी आहे का तुमच्याजवळ? अरे, माझी किंमत मापायला निघालास तर तुझ्याच मतीचे माप निघून जाईल. त्यापेक्षा तुझ्या या आडमुठेपणाचे गाठोडे बांधून बांद्र्याच्या खाडीत टाकून ये, आणि शहाणा होऊन, सरळ होऊन 'मी काहीच जाणत नाही, मला अनंतकाळाच्या भटकंतीतून सोडवा,' असे म्हण की. बस इतकेच बोलण्याची गरज आहे, म्हणजे आम्ही तुझी सुटका करून देऊ. ज्ञानी पुरुष वाटेल ते करू शकतात, कारण मोक्षदानाचे लायसन्स त्यांच्या हातात असते! जगात ज्ञानी किती असतील? पाच की दहा? अरे वेड्या, ज्ञानी तर जगात कधी काळीच अवतरतात आणि त्यातही अक्रममार्गाचे ज्ञानी तर दहा लाख वर्षानंतर अवतरतात आणि ते सुद्धा या वर्तमान आश्चर्य युगासारख्या कलिकाळातच! लिफ्टमधूनच वरती चढतात. पायऱ्या चढत–चढत दमायचे कारण नाही. अरे, कडाडणाऱ्या वीजेच्या लख्ख प्रकाशात तुझा मोती ओवून घे! पण तेव्हा हा निघाला दोरा शोधायला! काय करणार? पुण्यच कमी पडते.

केवळ वीतराग वाणीच मोक्षापर्यंत घेऊन जाणारी आहे. आमची वाणी गोड, मधुर असते, अपूर्व असते. पूर्वी कधीच ऐकली नसेल अशी असते, डिरेक्ट (प्रत्यक्ष) वाणी असते. शास्त्रात जी वाणी असते ती इनडिरेक्ट (परोक्ष) वाणी असते. डिरेक्ट वाणी जरी तासभरच ऐकायला मिळाली तर समकित प्राप्त होईल. आमची वाणी स्याद्‌वाद असते. कुणाचेही प्रमाण दुखावले जाणार नाही अशी वाणी म्हणजे स्याद्‌वाद वाणी. सर्वांना संमत असते. सर्व व्ह्यू पॉइंट मान्य करणारी असते. कारण आम्ही स्वत: सेंटरमध्ये असतो. आमची वाणी निष्पक्षपाती असते. हिंदू, मुस्लिम, पारसी, खोजा, सर्वच आमची वाणी ऐकतात आणि त्यांना आम्ही आप्तपुरुष आहोत

असे जाणवते. कारण आमच्यात भेदबुद्धी नसते. सर्वांच्या आत मीच बसलेलो असतो ना! बोलणाराही मी आणि ऐकणारा सुद्धा मीच!

संपूर्णपणे समोरच्याचे आत्मकल्याण कसे होईल ही भावना असलेली वाणी, तीच वीतराग वाणी! आणि ती वाणीच सर्वांचे कल्याण करते, थेट मोक्षापर्यंत घेऊन जाते.

## मौन – परमार्थ मौन

ही आमची रेकॉर्ड दिवसभर चालू असते पण तरीही आम्ही मौन असतो. कारण आमची वाणी आत्मार्थाशिवाय इतर कशासाठीही नसते. म्हणून आम्ही त्यास मौन म्हणतो. मौन पाळतो तो मुनी! परंतु इथे तर मुनी बाहेरचे मौन पाळतो पण आतल्या आत उद्वेग धारण केलेला असतो, त्याला मुनी कसे म्हणता येईल? आम्ही महामुनी आहोत! संपूर्ण मौन आहोत! यास परमार्थ मौन म्हटले जाते.

हित, मित आणि प्रिय – या तिन्हींच्या गुणाकार असलेली वाणी ती सत्य (वाणी) आहे. आणि अन्य सर्व असत्य आहे. व्यवहार वाणीसाठी हा नियम लागू पडतो.

नटुभाई, तुम्ही आमची ही वाणी लिहून घेता पण त्यामुळे तुम्हाला पन्नास टक्के फळ प्राप्त होईल आणि दुसरा कोणी वाचेल त्याला दोन टक्क्याएवढे सुद्धा फळ प्राप्त होणार नाही. हा बुडबुडा जोपर्यंत फुटत नाही तोपर्यंत योग साधून तुमचे (मोक्षाचे) काम करून घ्या. नंतर काहीच उपयोग होणार नाही. आम्ही सर्वांना सांगत असतो की आमच्या माघारी आमचे फोटो किंवा मूर्ती ठेवू नका. हे महावीर आणि कृष्णाचे फोटो आहेतच ना? ते राहू द्या, आमचा फोटो मात्र ठेवू नका. कारण नंतर त्याचा काहीच उपयोग होणार नाही. आम्ही आमच्या माघारी ज्ञानींची वंशावळ ठेवून जाऊ. आमचे वारसदार ठेवून जाऊ.! आणि त्यानंतर ज्ञानींची लिंक सुरूच राहील. तेव्हा सजीवन (जिवंत) मूर्ती शोधून काढा. त्याशिवाय सुटका होणार नाही. (प्रत्यक्षचे महत्त्व समजण्यासाठी दादाश्रींनी असे सांगितले आहे.)

## अंत:करण

संपूर्ण जग ज्या सायन्सच्या शोधात आहे, त्या सायन्सचे सर्वात प्रथम संपूर्ण स्पष्टीकरण आम्ही देत आहोत. मनाला समजून घेणे फार अवघड आहे. मन म्हणजे काय? बुद्धी म्हणजे काय? चित्त म्हणजे काय? अहंकार काय आहे? या सर्वांचे जसे आहे तसे, यथार्थ स्पष्टीकरण आम्ही देत आहोत.

अंत:करण चार वस्तूंचे बनलेले आहे. (1) मन (2) बुद्धी (3) चित्त (4) अंहकार.

हे चारही रूपी आहेत, आणि वाचता येतील असे आहेत. चक्षुगम्य नाहीत पण ज्ञानगम्य आहेत. कंप्लीट फिजिकल आहेत. शुद्ध आत्म्याशी यांचे काहीही देणेघेणे नाही. ते पूर्णपणे वेगळेच आहेत. आम्ही पूर्णपणे वेगळे झालो आहोत, त्यामुळे त्यांचे यथार्थ वर्णन करू शकतो.

प्रत्येकांचे कार्य वेगवेगळे असले तरीही प्रत्येक कार्य चौघांच्याही परस्पर सहकार्यानेच होत असते. मनुष्य देह ज्याच्या आधारावर कार्य करत आहे त्याचे दोन विभाग आहेत : (1) स्थूल - बाह्य विभाग, ज्याला बाह्यकरण म्हणतात. (2) सूक्ष्म - अंतर विभाग, ज्याला अंत:करण म्हणतात.

कोणत्याही कार्याचा पहिला फोटो, पहिली छाप एक्जेक्ट अंत:करणात पडते आणि नंतरच बाह्यकरणात व बाह्य जगात रूपकात येते.

शरीरातून कधीच बाहेर निघत नाही ते आहे मन. मन तर आतल्या आत फार उड्या मारते, वेगवेगळी पॅम्फलेट दाखवते. मनाचा स्वभाव भटकण्याचा नाही. लोक म्हणतात माझे मन भटकत असते पण ते चुकीचे आहे. भटकते ते चित्त आहे. फक्त चित्तच शरीराच्या बाहेर जाऊ शकते. ते जसेच्या तसे फोटो घेत असते. ते आपण पाहू शकतो. बुद्धी सल्ला देते आणि निर्णय घेते आणि अहंकार त्यात सही करतो. मन, बुद्धी आणि चित्त, या तिघांची सौदेबाजी चालत असते. बुद्धी, मन किंवा चित्त, या दोघांपैकी ज्याच्याशी सहमत होते त्यावर अहंकार सही करतो.

उदाहरणार्थ तुम्ही सांताक्रुजमध्ये बसलेले आहात आणि आतून मनाने पॅम्फलेट दाखवले की दादरला जायचे आहे. तर चित्त लगेचच दादरला पोहोचून दादरचा हुबेहूब फोटो इथे बसल्या बसल्या दाखवेल. नंतर मन दुसरे पॅम्फलेट दाखवेल की चला बसने जाऊया, तर चित्त बस पाहून येईल. परत मन तिसरे पॅम्फलेट दाखवेल की टॅक्सीनेच जावू या. नंतर चौथे पॅम्फलेट दाखवेल की, ट्रेनने जाऊया. तेव्हा चित्त ट्रेन, टॅक्सी, बस सर्वच पाहून येते. त्यानंतर चित्त पुन्हा पुन्हा टॅक्सीच दाखवत राहील. शेवटी बुद्धी डिसिजन (निर्णय) घेते की टॅक्सीनेच जाऊया, म्हणून अहंकार इंडियाच्या प्रेसिडेन्टसारखे सही करून देईल. तेव्हा लगेच कार्याला सुरुवात होईल आणि तुम्ही टॅक्सीसाठी उभे राहाल. बुद्धीने एकदा डिसिजन दिले, की मन लगेच पॅम्फलेट दाखवणे बंद करेल. मग परत दुसऱ्या विषयाचे पॅम्फलेट दाखवेल. बुद्धी + मनाच्या गोष्टींवर अहंकार सही करेल किंवा बुद्धी + चित्ताच्या गोष्टींवर अहंकार सही करेल. मन आणि चित्त यांच्यात बुद्धी तर कॉमन रुपात असते. कारण बुद्धी खेरीज कुठल्याही कार्याचे डिसिजन घेतले जात नाही. आणि डिसिजन घेतले की अहंकार सही करतो आणि कार्य घडते. अहंकाराशिवाय तर कुठलेच काम होणार नाही. पाणी पिण्यासाठीही जाता येणार नाही.

हे अंत:करण म्हणजे एक प्रकारची पार्लामेंटरी सिस्टम आहे.

## मन कसे आहे? विचार म्हणजे काय?

आता मन म्हणजे काय? त्याचे स्वरूप कोणते? हे समजावतो.

मन ही ग्रंथी आहे. गाठींचे बनलेले आहे. मन सूक्ष्म आहे. अणू पण नव्हे आणि परमाणू पण नव्हे, दोघांच्या मधली स्टेज आहे. जी जी अवस्था निर्माण होते त्यात तन्मय होतो. त्या अवस्थेत राग किंवा द्वेष केल्याने त्या 'अवस्थेत' अवस्थित होत असतो. म्हणून 'कारण मन'च्या रूपात तयार होते आणि त्याचे जे फळ येते ते फळ 'व्यवस्थित शक्ती' देत असते. ते 'कार्य मन'च्या रूपात असते. प्रत्येकाचे 'कारण मन' वेगवेगळे असते. 'अवस्थेत' जितका जास्त 'अवस्थित' होत जातो तसतसे

त्याचे अधिकाधिक परमाणू एकत्रित होतात आणि त्याचीच ग्रंथी तयार होत जाते. 'मन हे ग्रंथी स्वरूप आहे.' जेव्हा ही ग्रंथी 'व्यवस्थित शक्ती'च्या नियमाच्या आधाराने टाईमिंगचा संयोग प्राप्त झाल्यावर फुटते, तेव्हा त्यास विचार म्हटले जाते. म्हणजे विचारावरुन मनाचे स्वरूप ओळखता येते की आत कोणती ग्रंथी पडलेली आहे. विचार येतात, त्यांना आपण वाचू पण शकतो. आवडीचे विचार येतात, तेव्हा त्यात राग (आसक्ति, मोह) करतात. आणि नावडीचे विचार येतात, तेव्हा त्यात द्वेष करतात आणि वर म्हणतात की आम्ही मनाला वश करू इच्छितो. मन कधीच वश होऊ शकत नाही. मन फक्त ज्ञानानेच बांधले जाते, जसे पाणी सुरईत बांधले जाते तसे. मनाला वश करणे हा सर्वात मोठा विरोधाभास आहे. स्वतः चेतन आहे आणि मन अचेतन आहे, तिथे दोघांचा गुणाकार कसा करता येईल? खरे तर, चेतन चेतनचे कार्य करेल आणि मनाला मनाचे कार्य करू दिले तरच पार येईल. हो, इतकी जागृती ठेवावी की मनाच्या कार्यात ढवळाढवळ करू नये. तन्मयाकार होऊ नये.

या मनाच्या गाठी कशा असतात, ते मी तुम्हाला समजावून सांगतो. उन्हाळ्याच्या दिवसात एखाद्या शेतात गेलात तर शेत तुम्हाला अगदी स्वच्छ दिसेल. म्हणून तुम्हाला वाटते की माझे शेत एकदम स्वच्छ आहे. तिथे मी काय म्हणेन, 'नाही बाबा, आधी पाऊस पडू दे, नंतर बघ.' तर पाऊस पडल्यावर कुंपणावर सर्वत्र वेगवेगळ्या हिरव्या वेली उगवलेल्या दिसतात. कुठे पावटा, कुठे कारली तर कुठे तोंडली, अशा वेगवेगळ्या प्रकारच्या वेली पसरतात. या वेली कशा काय उगवल्या? तर इथे त्या त्या वेलींची गाठ जमीनीच्या आत होती, पावसाचा संयोग प्राप्त झाल्यावर त्या अंकुरीत झाल्या. नंतर तुम्ही तुमचे शेत स्वच्छ करण्यासाठी मुळासकट वेलींना उपटून टाकता आणि मनात खुश होता की आता माझे शेत स्वच्छ झाले. तर मी सांगेन, 'नाही अजून तीन वर्षांपर्यंत पाऊस पडू द्या. मग पाहा.' आणि त्यानंतर जर वेली उगवल्या नाहीत तरच तुमचे शेत स्वच्छ झाले असे म्हणता येईल. त्यानंतरच निर्ग्रंथ होईल. तसेच हे मन सुद्धा गाठींचे बनलेले आहे. जी गाठ मोठी त्याचे विचार जास्त येतात आणि जी गाठ लहान त्याचे फार कमी विचार येतात. उदाहरणार्थ,

एखाद्या वाण्याचा मुलगा असेल, त्याला जर विचारले की तुला मांसाहाराचे विचार किती वेळा येतात? तर तो म्हणेल माझ्या बावीस वर्षाच्या वयात चार–पाच वेळा मांसाहाराचे विचार आले असतील. याचा अर्थ असा की त्याची मांसाहाराची गाठ लहान आहे, सुपारी इतकीच. परंतु जर एखाद्या मुसलमान मुलाला विचारले तर तो म्हणेल, की मला तर मांसाहाराचे विचार रोजच कितीदा तरी येतात, याचा अर्थ असा की त्याची मांसाहाराची गाठ फार मोठी आहे. सुरणाएवढी. आणि जर तिसऱ्या कुणी जैनधर्मी मुलाला विचारले तर तो म्हणेल की, मला आयुष्यात कधीच मांसाहार करण्याचा विचार आला नाही. याचा अर्थ असा की त्याच्यात मांसाहार करण्याची गाठच नाही.

आता जर तुम्हाला सांगण्यात आले की एका महिन्याचा ग्राफ तयार करून आणा. त्या ग्राफमध्ये नोंद करा की सर्वात जास्त विचार कोणत्या विषयावर आले? नंतर त्याच्याहून कमी विचार कोणत्या विषयासंबंधित आले? अशा प्रकारे नोंद करत राहा. मग एका आठवड्याचा ग्राफ तयार करा. नंतर एका दिवसाचा ग्राफ तयार करा. म्हणजे तुमच्या लक्षात येईल कोणकोणत्या गाठी आत पडलेल्या आहेत आणि त्या केवढ्या आहेत. मोठ्या गाठी तर पाच दहाच असतात, की ज्या बाधक असतात. छोट्या–छोट्या गाठी जास्त बाधक नसतात. इतके तरी करता येईल की नाही?

आमच्यात एकही गाठ नाही. आम्ही निर्ग्रंथ आहोत. मनुष्य मात्र गाठी असलेले लाकूड म्हटले जाते. त्याचे फर्निचर सुद्धा होऊ शकत नाही. आता या मनाच्या गाठी फारच एक्सेस (अति प्रमाणात) झाल्या तर देहावर सुद्धा उपसून येतात, त्यांना ट्युमर्स म्हणतात.

स्व–स्वरूपापासून मन अगदीच भिन्न आहे आणि ते कधीच एक होऊ शकत नाही. जेव्हा आवडीचे विचार येतात तेव्हा भ्रांतीमुळे असे वाटते की मी विचार करत आहे, माझे विचार किती चांगले आहेत. आणि जेव्हा नावडते विचार येतात, तेव्हा म्हणतो मला फार वाईट विचार येतात. नको म्हटले तरी पण येतात हे काय सूचित करते? चांगले

विचार करणारा तू आणि जेव्हा वाईट विचार येतात तेव्हा म्हणतोस 'मी काय करू?' स्वत:च जर विचार करणारा असता, विचार करण्याची सत्ता स्वत:चीच असती तर सगळेच चांगलेच विचार करतील. न आवडणारे असे विचार कुणी करणारच नाही! पण तसे घडते का कधी? नाही. आवडते आणि नावडते, असे दोन्ही प्रकारचे विचार येतातच!

## कार्य प्रेरणा मनामुळे होते

कित्येक जण म्हणतात की मला चोरी करण्याची प्रेरणा आतून देव देत आहे. म्हणजे तू चोख आणि देव चोर, असे का! अरे वेड्या, देव कधी असली प्रेरणा देतो का? देव तर चोरी करण्याचीही प्रेरणा देत नाही आणि चोरी न करण्याचीही प्रेरणा देत नाही. देव तुम्हाला अशी प्रेरणा देऊन चोर कशाला ठरेल? कायदा काय म्हणतो की जो चोराला चोरी करण्यासाठी प्रेरित करतो, तो चोर.

देव कधी असल्या गोष्टीत हात घालत असेल काय? तो तर ज्ञाता–द्रष्टा आणि परमानंदी. सर्व काही पाहतो आणि जाणतो. पण मग ही प्रेरणा कुठून आली? अरे वेड्या, ही तर तुझी आतली गाठ फुटते तेव्हा तुला चोरी करण्याचा विचार येतो. गाठ जर मोठी असेल तर जास्त विचार येतात आणि चोरी करतो सुद्धा. वर आणि सांगतो की किती चलाखी वापरुन चोरी केली! असे बोलण्यामुळे, चोरीच्या गाठीला पोषण मिळते. पोषण मिळाल्यामुळे नवीन बीजे पडत राहतात आणि चोरीची गाठ आणखी मोठी होत राहते. आता दुसरा एखादा चोर असेल तो चोरी करतो पण त्याला आतल्याआत पश्चाताप होत असतो की मी चोरी करतो ते फार चुकीचे आहे पण काय करू? पोट भरण्यासाठी मला हे करावे लागते. अशा प्रकारे मनापासून पश्चाताप करत राहतो. त्यामुळे चोरीच्या गाठीला पोषण मिळत नाही. आणि पुढच्या जन्मासाठी चोरी करायची नाही असे बीज टाकतो, त्यामुळे पुढच्या जन्मात तो चोरी करणार नाही.

मन जे जे विचार दाखवते त्यात स्वत: अज्ञानतेमुळे संकल्प–विकल्प करत असतो, त्याचे फोटो निघतात. त्यांची नेगेटिव्ह फिल्म तयार होते आणि जेव्हा केव्हा ती फिल्म रूपकात येते तेव्हा पडद्यावर

चित्रपट बघतो तशी ती दिसते. चित्रपटात जी फिल्म बघतो ती तर तीन तासानंतर 'धी एन्ड' (समाप्त) दाखवते, ती एन्डवाली फिल्म असते, पण मनाची फिल्म तर एन्डलेस असते. आणि जेव्हा त्या फिल्मचा एन्ड होतो तेव्हा मोक्ष होतो. म्हणून तर कवीने औरंगाबादमध्ये सिनेमाच्या ओपनिंगच्या वेळी गायिले होते की,

'तीन तासाचा फिल्म दिखावा जगभरात चालतो,
पण मनाच्या फिल्मच्या 'धी एन्ड'ला मोक्षच म्हटले जाते.'

हे लोक तर मनाला वश करायला निघाले आहेत. म्हणून जेव्हा नावडती फिल्म दिसते, तेव्हा त्यास कापत राहतात. आता कशी कापता येईल? फिल्म निर्माण करतेवेळीच सावध व्हायचे होते ना? मन तर फिल्म आहे. फिल्ममध्ये जे दाखवतात ते पाहायचे आणि जाणायचे. त्यात रडायचे किंवा हसायचे नसते. कित्येक तर फिल्ममध्ये कोणाची बायको मेली तर खुर्चीत बसल्या बसल्या रडू लागतात. जसे काही त्याचीच बायको मृत्यू पावली आहे! अरे वेड्या, यात रडायचे नसते! ही तर फिल्म आहे!

## ज्ञाता - ज्ञेयचा संबंध

आम्ही तर मनाची फिल्म पाहतो आणि जाणतो. कोण कोणते विचार आले आणि गेले ते जाणतो. आमचा आणि विचारांचा संबंध केवळ हस्तांदोलन करण्यापुरताच. आम्ही विचारांशी लग्न नाही लावत. महावीर भगवंत सुद्धा असेच करीत होते. त्यांना तर विचार येत असतानाही दिसत असत आणि जात असतानाही दिसत असत. विचार येतात आणि जातात. त्यांना देखील शेवटपर्यंत विचार येत असत. अरे, विचार आहेत तर तू आहेस! ते ज्ञेय आहेत आणि तू ज्ञाता आहेस. ज्ञेय-ज्ञाताचा संबंध आहे. जर ज्ञेयच नसतील तर तू ज्ञाता कसला? अगदी मोक्ष प्राप्तीच्या शेवटच्या क्षणापर्यंत मनाची फिल्म दिसते आणि ती समाप्त झाली म्हणजे संपूर्ण मुक्ती होते, निर्वाण होते. अंधारात एकटे जात असताना जर चोराचे विचार आले, तर समजून घ्यावे की आज नाही तर केव्हातरी लुटले जाणार आहोत. जर विचारच आले नाहीत तर समजून घ्यायचे

की लूट होणार नाही. विचार येतात ते फोरकास्ट आहे. आत तसा माल भरलेला आहे त्यामुळे तो विचार स्वरूपाने प्रकट होत आहे. असा विचार आला हा एक एविडन्स (संयोग) आहे. 'आपण' तर पाहायचे आणि जाणायचे आणि तिथे विशेष जागृत राहायचे. जगात मनाचे सायन्स खास समजून घेण्यासारखे आहे. सगळेच मनोविलय करण्याच्या प्रयत्नात असतात. अरे, पण मनाचा नाश करायचा नसतो. मनाचा नाश केला तर मेंटल (वेडा) होशील. मनात सर्व चांगलेच आले पाहिजे असे नसावे. जे येईल ते येऊ दे. मनाला आपण काय सांगावे? तुला भोंपू वाजवायचा असेल तर तो वाजव आणि छोटी पिपाणी वाजवायची असेल तर ती वाजव. कार्यमनाला अडवणारे किंवा बदलणारे आपण कोण? कोणीच त्याला बदलू शकत नाही. कारण तो तर इफेक्ट आहे. त्याला घाबरण्याचे काय कारण? त्याने जर वाद्य वाजवले नाही, तर आपण ऐकणार काय? आपण एडजस्टमेंट करून घ्यायची. जे गाणे गायचे असेल ते गा. आम्हाला तर सर्व प्रकाराचे शौक आहेत. ज्ञान प्राप्त होण्यापूर्वी चांगलेच ऐकण्याची आवड होती म्हणून दुसरे काही ऐकायला आवडत नव्हते. आता तर आम्ही तुझ्याशी एडजस्ट झालो आहोत. त्यामुळे तुला जे वाजवायचे असेल ते वाजव. आता आम्हाला राग-द्वेष होणारच नाही.

## मनावर स्वार व्हा

आम्हाला तेव्हा ज्ञान प्राप्त झाले नव्हते तरी पण मनात विचार आले की समजून जायचो की आज काही हे झोपू देणार नाहीत. तेव्हा मी मनाला सांगायचो, 'धाव, धाव, फार छान, फार छान, धाव, धाव, तू घोडा आणि मी तुझ्यावर बसणारा स्वार. तुला ज्या रस्त्याने जायचे असेल त्या रस्त्याने जा. तू आहेस आणि मी आहे.' तर सकाळचे सात वाजेपर्यंत हे चालायचे. या जगात नियम काय आहे? ज्याला अडवाल, ज्याच्यावर कंट्रोल करायला जाल, तो तुमच्यावर चढून बसेल. जसे साखरेवर कंट्रोल आला की साखरेचे भाव वाढतील. मनाचे पण तसेच आहे. मनाला जर अडवण्याचा प्रयत्न केला, तर ते दुप्पट वेगाने धावू लागेल. म्हणून मनाला अडवायचे नाही. आज्ञाधीन मन असेल आणि तुम्ही अडवले तर चालेल.

आणि आज्ञाधीन नसेल तर त्याला सतत धावायला लावायचे. म्हणजे मग मनाची दमछाक होईल. आपल्याला काय? लगाम तर आपल्या हातात आहे ना! तिथे लोक काय म्हणतात? मरू दे या मनाला, हे मन काही आता झोपू देणार नाही. आणि झोप यावी म्हणून मनाला दाबून ठेवण्याचा प्रयत्न करेल. त्याला आडकाठी घालेल. अरे, झोपण्याचे ठेव बाजूला, ही तर चांगली संधी हाती लागली आहे. मनावर स्वारी करण्याची संधी आली आहे, अशी संधी पुन्हा कधी भेटेल?

आम्ही तर मनावर अशा स्वाऱ्या केल्या तेव्हा तर हे असे अविरोधाभास ज्ञान उत्पन्न झाले!

मन हे संसार समुद्रात नावेसमान आहे, पण लोक मनाला फ्रॅक्चर करून निर्विचार भूमिकेत आणून सोडतात. परंतु निर्विचार पद केव्हाही प्राप्त होण्यासारखे नाही. निर्विचार झाला म्हणजे दगडच झाला म्हणायचा. हे लोक निर्विचार पद कशास म्हणतात? काही ठराविक बाबतीत की ज्यात मन फार उड्या मारत असेल त्या बाबतींना दाबून ठेवतात. अरे मूर्खा, अशाने तर ते दुसऱ्या बाजूला उड्या मारु लागेल. निर्विचार पद म्हणजे काय? ते पद म्हणजे प्रत्येक *'समय'ला* (काळचक्राचा सर्वात लहान, अविभाज्य भाग) येणाऱ्या विचारांना स्वतः शुद्धात्मा दशेत राहून संपूर्ण वेगळे राहून पाहणे आणि जाणणे, हेच भगवंताच्या भाषेचे निर्विचारी पद आहे.'

मनाला वश करण्यासाठी एकमात्र लंगोटी बांधून सर्वस्वाचा त्याग करून, घर-दार, बायको-मुले, सर्वांना सोडून निघून गेले. इथे लोकदर्शन सोडून जंगलात जंगली जनावरे आणि झाडपानांचे दर्शन करायला गेले. पण मन तर सोबतच घेऊन गेले. ते मग सर्वच करेल. गाय-बकरी पाळेल, गुलाबाचे रोपटे लावेल, झोपडी बांधेल. मनाचा स्वभावच असा आहे की जिथे जाईल तिथे संसार थाटेल! हिमालयात गेला तर तिथेही संसार थाटेल. अशा या मनाला तुम्ही वश कसे काय करू शकाल? मनास वश करणे हा तर मोठा विरोधाभास आहे. मनाच्या स्वभावाला वश करणे शक्य नाही. पण योगी महाराज वगैरे पूर्व जन्माची अशी ग्रंथी घेऊन आलेले असतात की या जन्मात त्यांना असे वाटते की

आमचे मन आम्हाला वश आहे. पण जेव्हा त्यांचे मन सुद्धा आडवे चालते तेव्हा त्यांना समजते की मन आपल्या ताब्यात नाही. ते वश झालेले नाही. योग्यांना जरासे डिवचले की त्यांच्या लक्षात येते की आपले मन आपल्या ताब्यात किती आहे ते. योग करण्याची त्यांची गाठ आहे. हे तर प्राकृत स्वभावामुळे योग होत आहे आणि ते समजतात की मी योग केला! मी मनाला वश केले!

मन ज्ञानाला वश होत असते म्हणजेच ज्ञानी 'स्वरूप ज्ञानाने' ग्रंथी वितळून टाकतात आणि निर्ग्रंथ पद प्राप्त करतात.

तुमचे मन हेच तुमच्या श्रीमंतीचा फोटो आहे. मनाला नीट ओळखून घ्या. त्याचा स्वभाव कसा आहे, हे पूर्णपणे समजून घ्या.

क्षत्रियांचे मन कसे असते? राजमान राजेश्रींसारखे असते.देवळात गेले की खिशात हात घातल्यावर जितके पैसे निघतील ते सर्व दानपेटीत घालतात. तिथे बघत नाहीत की किती निघाले आणि किती पेटीत टाकले? ज्याची वाणीक बुद्धी असेल त्याचे मन फार संकुचित असते. पाटीदार तर क्षत्रिय म्हटले जातात. त्यांचे मन राजेश्री मन असते. पण त्यांच्यात वाण्यासारखे व्यावहारिक शहाणपण नसते. कोणीही संपूर्ण नसतो.

## लक्ष्मीजींचा वास कुठे?

लक्ष्मीजी काय म्हणतात? जो शंभर जणांना सिन्सियर (प्रामाणिक) राहतो तिथे माझा वास असतो. वास म्हणजे समुद्र जसा भरतीच्या वेळी उसळतो तशी त्यांच्याकडे लक्ष्मी येते. इतर जागी जितके श्रम तितकेच फळ मिळते. सिन्सियर म्हणजे काय? मनाची सिन्सियारिटी कशास म्हणतात? तर म्हणे, मनाला ओळखून घ्या. मनाची सिन्सियारिटी कशी आहे, त्याचा विस्तार केवढा आहे, हे ओळखा.

पैसे मेहनतीने कमावले जात नाहीत. मोठे मन असलेले कमावतात. हे जे शेठ आहेत? ते काय मेहनत करतात? नाही, त्यांची मने राजेश्री असतात. मेहनत तर त्यांचे मुनिमजीच करत राहतात. आणि शेठ मात्र चैन करतात.

मन तर दैवी असायला हवे. दैवी मन म्हणजे अपकारी वर सुद्धा उपकार करते असे. समोरच्याने जरी आपल्याला लुबाडले असेल आणि वर आपल्याला मूर्ख म्हणत असेल तरी जेव्हा तो संकटात सापडलेला असेल तेव्हा दैवी मन असलेलाच त्याला मदत करतो. दैवी मन असलेला तर देवगती प्राप्त करतो.

ही वाणीक बुद्धी कशा प्रकारची? गारठ्यात स्वतःला पांघरुण मिळाले असेल आणि सोबत असणाऱ्याला मिळाले नसेल, तर तो स्वतः अंगभर पांघरुण घेऊन झोपतो. डोक्यापर्यंत पांघरुण ओढून झोपी गेल्याचे सोंग करतो. स्वतः जागा असेल तर समोरचा पांघरुण मागेल ना! तर हे असे मनच त्याला फार त्रास देते. मन जितके राजेश्री तितके सुखदायी. ही दुनिया तुमची आहे. तुम्हाला उपभोग कसा घेता येईल हे समजायला हवे. कबीर फार शहाणा माणूस, तो म्हणत असे की,

'खा-पी, खिलाई दे, कर ले अपना काम,
चलती बखत हे नरो! संग न आवे बदाम.'

(खा-पी आणि खाऊ घाल, मोक्षाचे काम करून घे
जग सोडताना हे माणसा! सोबत एक बदाम सुद्धा येणार नाही.)

'अपना काम करले,' म्हणजेच मोक्षाचे काम करून घे. संकुचित मनामुळेच लक्ष्मीचा अंतराय पडतो. नाही तर लक्ष्मीचा अंतराय पडण्याचे कारणच काय? ही वाणिकबुद्धी फारच समजंस असते परंतु मोक्षप्राप्तीच्या मार्गात बाधक ठरते!

## मनाचा संकोच - विकास

मन जर रोजच्या रोज हिशोब करत राहिले तर दुसऱ्या दिवशी कढी सुद्धा बनणार नाही. दुकानात चार आण्याचीही विक्री झाली नाही तर काय दुसऱ्या दिवशी कढी बनवायची नाही? या मनाचे कसे आहे? जरी पाच फूट रुंदीचा रस्ता असला तरी रस्त्याच्या बाजूची काटेरी झाडी ही लागते. दोन फूट रुंदीचा रस्ता असेल तरी काटेरी झाडी लागते. एकच माणूस निघू शकेल इतका अरुंद रस्ता असेल तरीही लागतेच.

पण तो कसेही करून तिथून निघून जातो. जेवढा रस्ता असेल तेवढ्यातून निघून जातो. आज कोणत्या भगदाडातून निघायचे आहे हे मनाला माहित असते. ते कसेही करून, आकसून आपला रस्ता शोधून काढते. दोन तारांच्यामधून सुद्धा मार्ग काढून निघून जाते. म्हणूनच आम्ही सांगतो की राजासारखे मन झाले असेल त्यास भिकाऱ्यासारखे करू नका. फूल नाही तर फुलाची पाकळी द्या पण मन भिकाऱ्यासारखे करू नका. अरे, वेळ पडली तर राजा सुद्धा भीक मागतो. म्हणून काय त्याचे मन भिकारी झाले? ते तर राजेश्रीच राहते. जितके मन विशाल तितकी मोठी जागा मिळते. जितके मन संकुचित तितकी छोटी जागा मिळते.

खरे तर, ज्याची जशी मनाची गाठ असेल ती गाठच त्याला खेचते. लोभ्याला लोभाची गाठ असते, दानेश्वरीला दानाची गाठ असते. तपस्वीला तपाची गाठ असते, त्यागीला त्यागाची मोठी गाठ असते. ती गाठच त्याला त्याग करण्यास लावते. आणि तो म्हणतो की मी त्याग केला. अरे, असे बोलून तर गाठ आणखी मजबूत केलीस, तर आता कधी पार येईल? गाठीला तर पाहायचे आणि जाणायचे. 'तू' वेगळा, आणि मनाची गाठ वेगळी. मन आपल्यापेक्षा वेगळे आहे, हे तर प्रत्यक्ष अनुभवास येते. कारण ज्यावेळी आपल्याला झोपायचे असेल तेव्हा आत मन उड्या मारुन झोपूच देत नाही. सर्व प्रकारच्या सुख-सोयी असतील तरी पण निवांत झोपू देत नाही.

मनाची शांती शोधण्यासाठी फॉरेनचे लोक इंडियाकडे धावून येतात. पण तशी शांती सहजपणे कशी मिळेल? हे जैन सुद्धा शांतीसाठी शांतीनाथ भगवंताच्या दर्शनाला जातात! पण भगवंत म्हणतात की, माझे दर्शन घेतोस पण सोबत चपलांचेही दर्शन करतोस आणि परत दुकानाचे सुद्धा दर्शन करतोस! अशाने शांती कुठून मिळेल? तर आता लेकीचे नाव 'शांती' ठेव म्हणजे 'शांती, शांती' म्हणत राहशील आणि तितकी तुला शांती वाटेल.

## मनाचे वक्र परिणाम

या काळात मनुष्याचे मन वेगळे, त्याची वाणी वेगळी आणि त्याचे वर्तनही वेगळे.

उदाहरणार्थ चंदु आणि त्याचा मित्र खरेदीला निघाले. चंदुच्या मनात वेगळे होते, वाणी वेगळी होती आणि वर्तनही वेगळे होते. त्याच्या मनात असे होते की कमी किंमतीत मिळवायचे पण वाणी वर्तनात तर तो असेच दाखवायचा की मला वाजवी भावाने घ्यायचे आहे. तिथे त्याच्या मित्राच्या वाणी आणि वर्तनात असेच असते की वाजवी भावाने दिले तर घ्यायचे. त्यामुळे चंदुचा मित्र उर्ध्वगतीत जाणार आणि चंदु अधोगतीत. मन वेगळे का ठेवले? यालाच म्हणतात मनाचे वक्र परिणाम. त्यामुळे त्याला तेवढे बंधन झाले. मन, वचन, कायेची जी भिन्नता असते ती भगवंतांपासून लपून राहत नाही. या कलियुगात वक्र परिणाम सगळीकडेच दिसून येतो, आणि तो जन्मापासूनच कमी-जास्त प्रमाणात प्रत्येकात पाहायला मिळतो!

## मनाचा स्वभाव

मनाचा स्वभाव कसा? तर आपल्यापेक्षा कमी सुखी माणूस दाखवला म्हणजे मनाला जास्त सुख वाटते, की आपण जास्त सुखी आहोत. जर तुझ्याकडे दोन खोल्या आहेत आणि कधीतरी मन उड्या मारु लागले की आपला सुद्धा फ्लॅट असता तर बरे झाले असते. तेव्हा आपण मनाला दाखवायचे की ही शेजारीण एका खोलीतच राहते, मग ती कशी राहत असेल? तिच्या घरी तर बसायला खुर्ची सुद्धा नाही, तर ती कसे करत असेल? म्हणजे मग तुझे मन खुश होईल. मन जर कधी रिकामे पडले, तर ते खायला मागते तेव्हा आपण त्याला अशा प्रकारे समजावले पाहिजे. ज्याचे मन कमकुवत झाले असेल त्याने त्याला जरा बळकट केले पाहिजे. बाकी आम्ही जे ज्ञान देतो ते ज्ञानच असे आहे की इतर कशाचीही गरज उरत नाही. 'व्यवस्थित शक्ती'चे ज्ञान असे आहे की मन उड्या मारणार नाही. मन जिथे जाईल तिथे समाधान, समाधान व समाधानातच राहील. प्रत्येक अवस्थेत संपूर्ण समाधान राहील तेच ज्ञान, तोच धर्म.

मनाचा स्वभाव तर फारच विचित्र आहे. कुणाजवळ खोटे बोलून पाच रुपये पळवून घेईल आणि बाहेर निघाला की कोणाला तरी दोन

रुपये देऊन सुद्धा टाकेल. ज्याच्यावर निरंतर भक्तीभावाने फुलांचा वर्षाव करत असू त्याच्यावर केव्हातरी अभाव सुद्धा उत्पन्न करते, असे हे मन. म्हणून सावधानी बाळगावी. मनाच्या सांगण्याप्रमाणे चालायचे नाही. कबीर साहेब तर काय म्हणतात की, 'मन का चलता तन चले, ताका सर्वस्व जाय.' मन आपल्याला केव्हा फसवेल हे सांगता येत नाही, इतके चंचल आहे. मनात जर आत्म्याची शक्ती शिरली, तन्मयाकार झाली तर सर्व सेबोटेज (उध्वस्त) करून सोडेल. अरे, तळ्यात सुद्धा उडी मारेल आणि मग आरडाओरडा करेल 'वाचवा, वाचवा.'

या काळात माणसांची मने फॅक्चर झालेली असतात, म्हणून परिस्थिती जेव्हा टोकावर पोहोचते तेव्हा समुद्रातही उडी मारायला मागे-पुढे बघत नाही.

मन तर नर्तकीसारखे आहे. लोक म्हणतात बादशाह नर्तकीला नाचवतो. मी म्हणतो नाही, नर्तकी बादशाहला नाचवते, तसे तुमचे मन तुम्हाला नाचवीत आहे.

दोन मित्र रस्त्याने जात आहेत आणि त्यातल्या एकाला हॉटेलातून माशांचा सुगंध येतो. त्याच्या मनात मांसाहार करण्याची गाठ फुटू लागते, मनात गुदगुल्या होतात, त्याला मांसाहार करण्याची तीव्र इच्छा होते. म्हणून तो आपल्या मित्राला म्हणतो कसा, 'मला माझ्या नातेवाईकाला भेटायचे आहे. तू जरा इथे थांब.' असे खोटे बोलून तो मांसाहार करून येतो. अरे, देवाची खोटी शपथ सुद्धा घेतो. गाठ फुटली की सर्व उलटेच बोलू लागतो. यालाच भगवंतांनी कषाय म्हटले आहे. त्यामुळे तो कपटाची गाठ बांधतो, खोटे बोलण्याची गाठ बांधतो आणि मांसाहाराची गाठ बळकट करतो. अज्ञानीची एक गाठ फुटते तेव्हा तो पाच नवीन गाठी बांधतो. त्यापेक्षा जेव्हा मांसाहार करण्याची गाठ फुटते त्यावेळेस जरा नरम पडला तर केव्हा तरी त्याची सुटका होईल. अज्ञान अवस्थेत गाठ सुटत तर नाहीच पण जर खरे बोलून गेला की मी मांसाहार करायला जातोय, तर त्याचा त्याला फार फायदा होईल. समोरचा मित्र खानदानी असेल तर तो त्याला मांसाहाराच्या गाठीतून सोडवू पण शकेल. किंवा

त्यावर काही मार्ग काढेल, त्याला समजावेल आणि स्वत: जर पश्चाताप करत राहिला तर शेवटी त्या सवयीतून सुटेलही. पण जर नरम पडला नाही आणि खोटे बोलून व कपट करून गेला तर ती गाठ कधीच सुटणार नाही. उलट खोटेपणाची आणि कपटाची नवीन गाठ बांधून घेईल. म्हणूनच भगवंतांनी मन-वचन-कायेने चोरी करणार नाही अशा नियमाचे पालन करण्यास सांगितले होते. ज्यामुळे केव्हा तरी ती गाठ वितळेल.

आत तर मनाच्या वेगवेगळ्या प्रकारच्या गाठी असतात लोभाची, मानाची, कपटाची, क्रोधाची, सर्व प्रकारच्या गाठी असतात. लोभाच्या गाठीपेक्षा मानाची गाठ बरी. लोभाची गाठ तर फार वाईट. स्वत:ला सुद्धा त्याचा पत्ता लागत नाही. तिथे मानाची गाठ तर समोरच्या माणसाला दिसते. त्यामुळे कोणीतरी शेरा मारणारा भेटतो की 'काय एवढी छाती काढून हिंडतोस? एवढी अक्कड चांगली नाही!' म्हणजे मग मानाची गाठ छेदली जाते. लोभाची गाठ तर कधी तरी समजते सुद्धा परंतु कपटाच्या गाठीचा तर कधीच थांगपत्ता लागत नाही.

## मनाच्या गाठी वितळतील कशा?

लोभाची गाठ आणि क्रोधाची गाठ स्वत:लाही दु:ख देते. आणि समोरच्यालाही दु:ख देते. भगवंतांनी लोभाची गाठ असलेल्या माणसांना दान देण्यासाठी सांगितले आहे. एखाद्या दिवशी पाच-पंचवीस रुपयांची चिल्लर घेऊन ती रस्त्यात टाकत जायची. मग मन उड्या मारू लागेल, तेव्हा आणखी जास्त टाकायची, म्हणजे मग हळूहळू मन गप्प बसेल. आणि जर विचारपूर्वक समजून लोभाची गाठ छेदली गेली तर त्यासारखे उत्तम काहीच नाही. जर असा विचार केला की मी इतके पैसे गोळा करत आहे ते कोणासाठी? स्वत:च्या कोणत्या सुखासाठी? स्वत:चे सुख तर प्राप्त करत नाही आणि परक्यांच्या सुखासाठी आपण आपले सुख हरवून बसतो. आणि वर जे गुन्हे केले त्याचा दंडही भोगावा लागतो.

जेव्हा ज्ञानी पुरुषाची गाठ फुटते, तेव्हा ते गाठीकडे 'पाहतात' आणि 'जाणतात'. ज्ञानी पुरुषांच्या आज्ञेने, शुद्धात्मा दृष्टीने मनाच्या गाठींवर

दृष्टी ठेवल्याने गाठी हळूहळू वितळत जातात. आमच्याजवळ तर अनंत सिद्धी आहेत म्हणून आम्ही तुमच्या गाठींना वितळवू शकतो. पण शक्य तो आम्ही आमच्या सिद्धीचा निरर्थक वापर करत नाही. आम्ही तुम्हाला उपाय दाखवतो. तुमच्या गाठी फुटल्यावर तुम्हाला अनुभव होईल. आणि तुम्हाला ती फिल्म पाहायला मिळेल. जर ज्ञेयच नसेल तर ज्ञाता काय करेल? जितक्या प्रमाणात मन उमलते तितक्याच प्रमाणात आत्माही उमलतो. जितके ज्ञेय वाढतात तितकी शुद्धात्म्याची ज्ञानशक्ती सुद्धा वाढते.

मनावर जिथे-जिथे चिखल चिकटलेला आहे, तिथे-तिथे आमच्या ज्ञानवाक्यरुपी साबणाचा उपयोग कराल तर मळ धुतला जाईल.

मन जर भजी खाण्याचे दाखवीत असेल तर लगेच जागृत व्हा की हे 'व्यवस्थित शक्ती' मागत आहे की आतले लबाड मागत आहे? (विचारांचे) तीन ठोके पडले तर समजावे की ही 'व्यवस्थित शक्ती' आहे. शरीराला गरजेपुरतेच खाऊ घातले तर मन-बुद्धी ताळ्यावर राहतात. पण तरीही आमच्या ज्ञानात ग्रहण-त्याग नसतो, 'व्यवस्थित शक्ती' तुम्हाला मार्गदर्शन करेल.

मनाला नेहमी आहार हवा असतो, प्रेशर हवे असते. गर्दीतच एकांत असतो, एकांतात तर मन उलट विचलित होते. आमचे ज्ञान प्राप्त केलेले महात्मा तर संसारात निर्लेप राहतात आणि फार गर्दीत सुद्धा एकांताचा अनुभव करतात. फार गर्दी असेल तेव्हा मनाला त्याचा आहार मिळतो आणि मन त्याच्या कामात मग्न होऊन जाते, तेव्हाच 'शुद्धात्मा' एकटा पडतो आणि परमानंद उपभोगतो.

कोणाचे मन जर कमकुवत झाले असेल तर अज्ञानी सुद्धा म्हणतो की हे काय सारखे विचार करत बसला आहेस? चल आता निघ आणि बाहेर पड. मन तर सगळ्याच प्रकारचे बोलते.

प्रत्येकाला मरणाचा विचार येतो की नाही? येतोच. प्रत्येकाला मरणाचा विचार येतोच. पण लोक काय करतात? मरणाचा विचार येताच त्यास हाकलून लावतात. अरे, मग सगळ्याच विचारांना हाकलून लाव

ना? पण नाही, दुसरा आवडता विचार आला तर हाकलून लावत नाही. आमचे ज्ञानच असे आहे की मृत्यूक्षणी 'स्वत:' संपूर्ण प्रकट होऊन जातो. त्यावेळी स्वत:च्या गुहेतच शिरतो. मन-बुद्धी-चित्त-अहंकार सगळेच चुप. बॉम्ब पडणार असेल तेव्हा कसा चुपचाप बसतो? तसे हे सर्व चुप होतात. त्यामुळे मरणाच्यावेळी समाधी अवस्था असते. आमच्या ज्ञानींना (स्वरूपज्ञान प्राप्त महात्म्यांना) समाधी मरण असते!

## मन फिजिकल आहे

मन तर कंप्लीट (पूर्णपणे) फिजिकल आहे, मेकॅनिकल आहे. उदाहारणार्थ, एखादा माणूस एखादी मशिनरी बनवतो. तो जेव्हा मशीन बनवतो तेव्हा त्याचा आत्मा मशीनसोबत एकाकार होऊन जातो आणि जेव्हा मशीन चालू होते तेव्हा तो अहंकार करतो की मी किती छान मशीन बनवले? परंतु जर त्या मशीनला बंद करण्याचे साधन त्यात ठेवले नसेल तर तो त्या मशीनला बंद कसे करू शकेल? आणि चुकून स्वत:च बनवलेल्या मशीनच्या एखाद्या गियरमध्ये त्याचे बोट अडकले तर काय ती मशीन त्याची पर्वा करेल? नाही करणार, फट करून बोट कापून टाकेल, कारण मशीन फिजिकल आहे. त्यात बनवणाऱ्याची सत्ता चालत नाही. तसेच मनाचेही आहे. शरीराच्या परमाणूंपेक्षा हलके परमाणूंपासून वाणी बांधली जाते आणि त्याहीपेक्षा हलक्या परमाणूंनी मन बांधले जाते.

## मनाचे प्रकार

मन दोन प्रकारचे आहे: स्थूल मन आणि सूक्ष्म मन. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर सूक्ष्म मनाला 'भाव मन' आणि स्थूल मनाला 'द्रव्य मन' म्हणतात, म्हणजेच 'कारण मन' आणि 'कार्य मन.' भाव मनाचे स्थान कपाळात, सेंटरमध्ये भुवयांपासून अडीच इंच दूर आहे आणि स्थूल मनाचे स्थान हृदयात आहे. स्थूल मन हे पाकळ्यांचे असते. त्यामुळे बरेच लोक म्हणतात की माझे हृदय कबूल करत नाही. मनाला धास्ती वाटेल अशी बातमी ऐकल्यावर हृदय खळबळून जाते. ते द्रव्य मन आहे. द्रव्य मन कंप्लीट इफेक्ट आहे, डिस्चार्ज स्वरूपात आहे. जेव्हा की भाव मन कॉज उत्पन्न करते, ते चार्ज करते.

भाव मन सहेतुक आहे. त्यामुळे नवीन बीजे पडतात. हेतूवरून भाव मन पकडले जाते पण तो हेतू पाहण्याची दृष्टी स्वत:जवळ नसते ना! जेव्हा 'स्वत:' शुद्धात्मा होतो आणि संपूर्णपणे निष्पक्षपाती होतो आणि मनाला पूर्णपणे वेगळे, फिल्म पाहावी तसे पाहू शकतो, तेव्हा भाव मन म्हणजे काय हे समजते. भाव मनापर्यंत तर सर्वज्ञाशिवाय कोणीच पोहोचू शकत नाही. ज्ञानी पुरुष की जे सर्वज्ञ असतात तेच तुमच्या भाव मनाला बूच लावतात. त्यामुळे मग नवीन मन चार्ज होत नाही आणि फक्त डिस्चार्ज मनच उरते. नंतर त्याच्या इफेक्टलाच पाहायचे आणि जाणायचे.

हे इंग्रज जे सबकॉन्शियस आणि कॉन्शियस माइंड म्हणतात. ते सर्व स्थूल मनच आहे. सूक्ष्म मनाचा एक परमाणू सुद्धा कुणाला पकडता येईल असे नाही. ते तर ज्ञानी पुरुषांचेच काम. कारण सूक्ष्म मन ज्ञानगम्य आहे.

तुम्हा सर्व महात्म्यांना मी स्वरूपाचे ज्ञान दिले आहे त्यामुळे तुम्ही मनापासून संपूर्ण वेगळे झालात. तुमचे चार्ज मन मी बंद करून टाकले आणि डिस्चार्ज मनाचे तुम्हाला ज्ञाता-द्रष्टा बनवले आहे. त्यामुळे आता तुमच्या मनाच्या जरी अनंत गुणिले अनंत अवस्था समोर आल्या तरी तुम्ही स्वस्थ राहू शकता. तेच ज्ञान आहे! आणि जो मनाच्या अवस्थेत अस्वस्थ होतो तिथे तो अवस्थित होऊन जातो, त्यामुळे मग 'व्यवस्थित' येऊन उभे राहते, ते भोगताना पुन्हा अस्वस्थ होतो, आणि अशा प्रकारे ही परंपरा निरंतर चालतच राहते.

## मन-आत्म्याचा ज्ञेय-ज्ञाता संबंध

आपण अचल आहोत आणि विचार हे विचल आहेत. दोन्हीही वेगळेच आहेत. ज्ञाता-ज्ञेयाच्या संयोग संबंधाशिवाय आपला दुसरा कोणताही संबंध नाही.

आणि म्हणूनच आम्ही सर्वांना सांगत आहोत की कोणत्याही परिस्थितीत भाव बिघडू देऊ नका. वेळी अवेळी अचानकच पाहुणा घरी आला तरी तुमचा मनोभाव बिघडू देऊ नका. पोळी भाजी करून वाढा पण मन बिघडवू नका. मनास कमकुवत होऊ देऊ नका.

'मन:पर्यव ज्ञान' म्हणजे समोरच्या व्यक्तीच्या मनात कोणते विचार चालत आहेत त्याचे पडसाद स्वत:च्या अंत:करणात पडतात, ते आधी समजते आणि मग हळूहळू स्पष्टपणे स्वत: वाचतो, पाहतो आणि जाणतो, त्यास मन:पर्यव ज्ञान म्हणतात. वीतरागींच्या भाषेत सांगायचे झाले तर स्वत:च्या मनाच्या प्रत्येक पर्यायाला पाहणे आणि जाणणे ते म्हणजे 'मन:पर्यव ज्ञान.'

जगात आम्ही 'मनाचे' डॉक्टर आहोत. देहाचे डॉक्टर तर ठिकठिकाणी भेटतील परंतु मनाचे डॉक्टर शोधून तर आणा! मनाच्या रोगामुळे देहाचे रोग उत्पन्न होतात. आम्ही तुमच्या मनाचे सर्व रोग बरे करून देतो, आणि नवीन रोग उत्पन्न होण्याचे थांबवतो आणि जे स्वस्थ्य प्राप्त झाले आहे त्यास मेंटेन करतो (जोपासतो). तुमचे मन तुमच्यापासून वेगळे करून देतो आणि 'शुद्धात्मा' रोकड तुमच्या हातात देतो. त्यानंतर मन तुम्हाला त्रास देत नाही. मग तर ते मनच तुम्हाला मोक्षापर्यंत घेऊन जाईल, इतकेच नव्हे तर तेच मन तुम्हाला संपूर्ण वश राहील!

## बुद्धी प्रकाश - ज्ञान प्रकाश

जगातील सर्व विषयांचे ज्ञान बुद्धीत समाविष्ट होते आणि निरहंकारी ज्ञान ते ज्ञानात समाविष्ट होते.

जगातील सर्व सब्जेक्टस्‌चे (विषयांचे) ज्ञान असेल, पण त्यात जर अंहकार असेल तर ते सर्व ज्ञान बुद्धीमध्ये समाविष्ट होते. अहंकारी ज्ञान म्हणजे बुद्धीजन्य ज्ञान, ते केव्हा शून्य होऊन जाईल याचा काही नेम नाही. मोठमोठे बुद्धीशाली संयोगाच्या कचाट्यात येऊन बुद्धू होऊन गेले. बुद्धीवालाच बुद्धू होतो.

बुद्धी तर इंडिरेक्ट प्रकाश आहे. अंहकाराच्या मिडियम थ्रू म्हणजे अंहकाराच्या माध्यमातून येतो. उदाहरणार्थ, सूर्याचा प्रकाश छप्परातील भोकातून येऊन आरशावर पडतो आणि त्यातून परत प्रतिबिंबीत होतो, त्याचप्रमाणे.

त्या उलट ज्ञान हे तर आत्म्याचा डिरेक्ट प्रकाश आहे, फूल लाईट

(संपूर्ण प्रकाश) आहे. जसे आहे तसे यथार्थ दाखवते ते ज्ञान. बुद्धी पर-प्रकाशक आहे, स्वयंप्रकाशक नाही. मात्र ज्ञान स्वयंप्रकाशक आहे, ज्ञान स्वयं ज्योतिर्मय आहे आणि संपूर्ण ब्रह्मांड प्रकाशित करू शकेल इतकी त्याची अनंत शक्ती आहे. उदाहरणार्थ, सूर्य स्व-पर प्रकाशक आहे, तर चंद्र पर-प्रकाशक आहे.

संपूर्ण ज्ञानप्रकाशापुढे बुद्धी ही तर सूर्यासमोर पणतीसारखी आहे. आमच्या जवळ ज्ञानप्रकाश आहे. म्हणून आमच्यात बुद्धी नावाला सुद्धा नसते. आम्ही स्वतः अबुध आहोत. आम्हाला एकीकडे अबुधपद प्राप्त झाले आणि त्याचवेळी दुसरीकडे सर्वज्ञपद येऊन उभे राहिले. जो अबुध होतो तोच सर्वज्ञ होऊ शकतो.

## बुद्धीचे प्रकार

बुद्धीचे दोन प्रकार : (1) सम्यक् बुद्धी (2) विपरीत बुद्धी

1) सम्यक् बुद्धी म्हणजे सरळमार्गी चालणारी बुद्धी. समकित प्राप्त झाल्यानंतरच सम्यक् बुद्धी उत्पन्न होते. आणि मग ती सर्व सरळच दाखवते. जसे आहे तसे दाखवते. क्वचितच कुणाला सम्यक् बुद्धी प्राप्त होते.

2) विपरीत बुद्धी - जिथे सम्यक् बुद्धीचा अभाव असेल तिथे विपरीत बुद्धी अवश्य असतेच. विपरीत बुद्धी म्हणजे मोक्षासाठी विपरीत. बुद्धीचा स्वभावच आहे की ती असेच सर्व दाखवते की ज्यामुळे फक्त संसाराचा पायाच मजबूत होतो. कधीच मोक्षाला जाऊ देत नाही ती विपरीत बुद्धी. बुद्धी संसारानुगामी आहे, म्हणजे संसाराचेच हिताहित दाखवणारी आहे, मोक्षाचे नव्हे.

जसजशी बुद्धी वाढते तसतसा संतापही वाढत जातो. दोन वर्षांच्या मुलाची आई जर मरणासन्न अवस्थेत असेल तर त्याला काहीच वाटत नाही, तो हसत-खेळत असतो. तिथे वीस वर्षांचा मुलगा किती दुःखी होतो. कारण बुद्धी वाढली की उद्वेगही वाढला. या मजुरांना कधीही चिंता होत नाही. ते तर रोज निवांतपणे झोपतात. आणि हे शेठजी सारखे

चिंताच करत राहतात. अरे, रात्री सुद्धा निवांत झोपत नाहीत. ते कशामुळे? बुद्धी वाढली म्हणून. बुद्धी समोर संताप हा काउंटर वेटच असतो.

बुद्धी असेल तिथे 'मी करत आहे' असा अहंकार असतोच आणि म्हणूनच चिंता होत राहते. बुद्धीच भगवंतापासून दूर ठेवते.

कृष्ण भगवंतांनी बुद्धीला व्यभिचारिणी म्हटले आहे. ती तर संसारातच भटकायला लावते, असे सांगितले.

बुद्धीची आवश्यकता कुठपर्यंत? जोपर्यंत ज्ञान प्राप्त झाले नाही तोपर्यंतच बुद्धीची आवश्यकता असते. पण ती किती? संसारात दगडाखाली बोट फसले असेल तर ते हुशारीने बाहेर काढून घेण्यापुरतीच आणि परत बोट फसणार नाही, ते ध्यानात ठेवण्यापुरतीच बुद्धी वापरायची. पैसे कमावण्यासाठी किंवा कोणाला लुबाडण्यासाठी बुद्धी वापरायची नसते. ती तर फार मोठी जोखीम आहे.

लक्ष्मी तर पुण्यामुळे मिळते, बुद्धीचा वापर केल्याने लक्ष्मी मिळत नाही. हे मिल मालक किंवा मोठ्या शेठजींना जरा सुद्धा बुद्धी नसते. तरी लक्ष्मी ढीगभर येत असते. आणि त्यांचा मुनीम मात्र बुद्धी वापरत राहतो. इन्कटॅक्सच्या ऑफिसमध्ये जातो तेव्हा साहेबाच्या शिव्या सुद्धा मुनीमच खातो. शेठ तर आरामात झोपलेला असतो.

## बुद्धीचा आशय

प्रत्येक माणसाला स्वतःच्या घरातच आनंद वाटतो. झोपडीत राहणाऱ्याला बंगल्यात आनंद वाटत नाही आणि बंगल्यात राहणाऱ्याला झोपडीत आनंद वाटत नाही. याचे कारण त्यांच्या बुद्धीचा आशय आहे. बुद्धीच्या आशयात जो जसे भरून आणतो तसेच त्याला मिळते. बुद्धीच्या आशयात जे भरले असेल त्याचे विभाजन दोन भागात होते (1) पापफळ (2) पुण्यफळ. बुद्धीच्या आशयाचे प्रत्येकाने विभाजन केले, त्यात लोकांनी 100 टक्क्यांमधून अधिकांश टक्के मोटार-बंगला, मुले-मुली, बायको इत्यादीसाठी भरले त्यामुळे ते सर्व मिळवण्यात त्यांचे पुण्य खर्च झाले. आणि धर्मासाठी जेमतेम एक-दोन टक्केच बुद्धीच्या आशयात भरले.

दोन चोर चोरी करतात. त्यातला एक चोर पकडला जातो आणि दुसरा सहजपणे मोकळा फिरतो. हे काय सूचित करते? चोरी करायची, असे तर दोन्ही चोरांनी बुद्धीच्या आशयात भरुन आणले होते. पण यात जो पकडला गेला त्याचे पापफळ उदयास आले आणि (पाप) खर्च झाले. त्याउलट दुसरा सुटला त्यात त्याचे पुण्य खर्च झाले. तर अशा प्रकारे प्रत्येकाच्या बुद्धीच्या आशयात जे असेल त्यात त्याचे पुण्य आणि पाप कार्य करते. बुद्धीच्या आशयात लक्ष्मी प्राप्त करायची आहे असे ठरवून आला तर त्याचे पुण्य त्यात खर्च होऊन लक्ष्मी ढीगभर मिळते. दुसरा बुद्धीच्या आशयात लक्ष्मी प्राप्त करायची आहे असेच ठरवून आला पण त्यात पुण्याच्या ऐवजी पापफळ समोर आले, त्यामुळे लक्ष्मी त्याला तोंड सुद्धा दाखवत नाही. हा तर इतका चोख हिशोब आहे की यात कुणाचे काहीच चालत नाही. तेव्हा हे दुर्भागी असेच मानतात की मी दहा लाख कमावले. अरे, हे तर तुझी पुण्याई वापरली गेली. आणि ती सुद्धा चुकीच्या मार्गाने. त्यापेक्षा तुझा बुद्धीचा आशय बदल. धर्मासाठीच बुद्धीचा आशय ठेवण्यासारखा आहे. या जड वस्तूंसाठी मोटार, बंगला, रेडियो या सर्वांची भजना करून त्यासाठी बुद्धीचा आशय ठेवण्यासारखा नाहीच. धर्मासाठीच, आत्मधर्मासाठीच बुद्धीचा आशय ठेवा. सध्या तुम्हाला जे प्राप्त झाले आहे ते असू द्या पण यापुढे मात्र बुद्धीचा आशय बदलून 100 टक्के धर्मासाठीच ठेवा.

आम्ही आमच्या बुद्धीच्या आशयात 100 टक्के धर्म आणि जगत कल्याणाची भावना भरून आणली आहे. दुसऱ्या कोणत्याही हेतूसाठी आमचे पुण्य खर्ची गेले नाही. पैसे, मोटार-बंगला, मुलगा-मुलगी कशातही नाही.

आम्हाला जे कोणी भेटले ते आमच्याकडून ज्ञान प्राप्त करून गेले, त्यांनी दोन-पाच टक्के धर्मासाठी, मुक्तीसाठी ठेवले होते, म्हणून आमची भेट झाली. आम्ही 100 टक्के धर्मासाठी ठेवले होते म्हणूनच आम्हाला सगळीकडून धर्मासाठी 'नो ऑब्जेक्शन' सर्टिफिकेट मिळाले.

## गणपती : बुद्धीचे अधिष्ठाता देव

गणपती हे सर्व गणांमध्ये अधिष्ठाता देव आहेत. बुद्धीचे अधिष्ठाता

देव आहेत. शास्त्र लिहिण्याचा मुख्य अधिकार तर त्यांचाच. त्यांच्या बुद्धीचा प्रकाश सगळीकडेच पडतो. त्यांच्या बुद्धीत किंचितही उणीव नाही. म्हणूनच त्यांना सर्व देवात प्रथम स्थान दिले गेले. पूजा वगैरेत सुद्धा गणपतीला प्रथम ठेवले जाते. त्याच्या पूजेने बुद्धी विनम्र होते, विभ्रम होत नाही, विपरीत होत नाही. महिन्यात दोन जरी अडचणी आल्या असतील तरी पण रोज भीती वाटत राहते, तीच विपरीत बुद्धी. बुद्धी अशी विभ्रम होणार नाही, विपरीत होणार नाही यासाठी गणांच्या पतीला-गणपतीला पूजेत प्रथम स्थान दिले जाते, परंतु नीट समजून घेतल्याशिवायच पूजा केली जाते त्यामुळे हवे तसे फळ मिळत नाही. समजून पूजा केली तर फारच सुंदर फळ मिळते.

गणपती बुद्धीच्या प्रत्येक बंधनातून बाहेर निघालेले देव आहेत. त्यामुळे त्यांची नीट समजून पूजा केल्याने बुद्धीचा भ्रम निघून जातो आणि सद्बुद्धी प्राप्त होते.

## बुद्धीजन्य अनुभव आणि ज्ञानजन्य अनुभव

ज्याने कधी आईसक्रीम खाल्लेच नाही, त्याला अंधारात आईसक्रीम दिले तर तो कल्पनाच करत राहील की आईसक्रीम थंड स्वभावाचेच असेल का? दुधाचा स्वभाव पण असाच थंड असेल का? वेलची सुद्धा थंड स्वभावाची असेल का? परंतु ज्याला आईसक्रीम व त्यात घातलेल्या सर्व जिन्नसांचा भिन्न-भिन्न बुद्धीजन्य अनुभव आहे तो त्या जिन्नसांना त्यांच्या गुणांच्या आधारे भिन्न-भिन्न जाणतो. आणि आईसक्रीम कशामुळे थंड लागते ते सुद्धा जाणतो. बुद्धीगम्य अनुभवाने जाणतो. बुद्धीतत्त्व जर संसारात इतके मोठे काम करते मग आत्मतत्त्व काय काम करणार नाही? तो तर डिरेक्ट प्रकाश आहे.

ज्ञानप्रकाश दिल्यानंतर आम्ही सर्वांना सांगतो की बुद्धीला रिटायर करून टाका. साऱ्या जगाला बुद्धीची गरज आहे. बुध्धीच त्यांचा आधार आहे परंतु स्वरूपज्ञान असे आहे की ज्यात बुद्धीची गरज नाही. आम्ही बुद्धीला लबाड म्हणतो. तिचे कधीच ऐकू नका. तिला तर सरळ सांगा की, 'हे बुद्धीताई! तुम्ही मला जन्मोजन्मी त्रास दिला आहे. ताई, आता

तू आपल्या माहेरी निघून जा. ज्यांना तुमची गरज आहे, त्यांच्याकडे जा. आम्हाला आता तुझी गरज नाही.' म्हणून आता बुद्धीला पेंशन देऊन तिला निरोप द्या. बुद्धीचा तिरस्कार करण्याची गरज नाही. कारण जोपर्यंत किंचितमात्र तिरस्कार असेल तोपर्यंत मोक्ष प्राप्त होणार नाही. म्हणून तिला समजावून उमजावून, पेंशन देऊन निरोप द्या. पेंशन म्हणजे आश्वासन.

जर तुम्हाला मोक्षच हवा असेल तर बुद्धीचे अजिबात ऐकू नका. बुद्धी तर अशी आहे की ती ज्ञानी पुरुषाचे देखील दोष दाखवते. अरे, ज्यांच्यामुळे मोक्ष प्राप्त होणार आहे त्यांचेच दोष पाहता? मग तर तुमचा मोक्ष तुमच्यापासून अनंत जन्म दूर जाईल!

संसारात बुद्धीनेच भांडणतंट्याच्या कचाट्यात अडकवले आहे. अरे, बायकोचे ऐकून चालू लागलास तरी पतन होते, भांडणेतंटे होतात, मग या तर बुद्धीताई! बुद्धीचे ऐकले तर कुठल्याकुठे फेकला जाशील. अरे! रात्री दोन वाजता सुद्धा जागे करून उलट-सुलट दाखवते. बायकोची भेट तर दिवसभरात काही वेळेपुरतीच होते पण बुद्धीताई तर निरंतर सोबतच असते. ही बुद्धी तर डिथ्रोन (पदभ्रष्ट) करणारी आहे.

एक हिरा पाच अब्जाचा आहे आणि तुम्ही जर शंभर रत्नपारखींना बोलावून त्याची किंमत ठरवायला सांगितली तर प्रत्येक जण आपापल्या बुद्धी प्रमाणे किंमत ठरवतील. अरे, हिरा तर तोच आहे मग किंमत का वेगवेगळी? तर प्रत्येकाच्या बुद्धीत फरक आहे म्हणून. म्हणूनच मी सांगतो की 'हा' 'ज्ञानावतार' तुमच्या बुद्धीच्या मापदंडावर मापता येईल असा नाही. तेव्हा माप काढायला जाऊ नका.

ज्ञानी पुरुषापुढे तर चुकून सुद्धा बुद्धी वापरु नये. ज्ञानी पुरुषांचे तर एक एक अंग, त्यांचे एक एक दिव्य कर्म पूजनीय असते. तिथे बुद्धी चालवायची नसते. हे ज्ञानी पुरुष तर देहधारी आहेत पण आतून अद्‌भुत असे अहर्निश जागृत असतात. तुम्हाला जे दिसत आहे ते ह्या देहधारी ज्ञानीच्या नाटकाचा एक भाग आहे. आम्ही संपूर्ण नाटकीय भावातच राहतो. आम्ही अबुध आहोत. अबुधच्या संगतीतच अबुध होता येते.

जगातील लोकांचा व्यवहार बुद्धी चालवते, तेव्हा ज्ञानींचा व्यवहार 'व्यवस्थित शक्ती' चालवते. त्यात मग कोणतीही दखल नसते.

बुद्धी काय आहे? तर तो तुमच्या मागच्या जन्मीचा व्ह्यू पॉइंट (दृष्टीकोन) आहे. उदाहरणार्थ, तुम्ही हायवे वरून जात असाल आणि पहिल्या मैलापर्यंत पोहोचल्यावर तुम्हाला ज्या प्रकारचा व्ह्यू (दृष्य) दिसेल, त्यावर बुद्धी सही करते की आपल्याला तर असेच मिळाले तर उत्तम. तर असा हा पहिल्या मैलाचा व्ह्यू पॉइंट निश्चित होऊन जातो. नंतर त्याहून पुढे गेल्यावर दुसऱ्या मैलावर त्याला काही वेगळेच दृष्य पाहायला मिळते. तेव्हा मग व्ह्यू पॉइंट पूर्णपणे बदलूनच जातो, मग त्या व्ह्यूच्या आधारे बुद्धी पुन्हा सही करते की आपल्याला तर असेच पाहिजे. पण तरी तो मागचा व्ह्यू पॉइंट विसरू शकत नाही त्यामुळे तो व्ह्यू पॉइंट सुद्धा समोर येतोच. जर मागील व्ह्यू पॉइंटचा अभिप्राय घेतला नसता तर काहीच हरकत नव्हती. पण तसे होत नाही. म्हणून तो अभिप्राय पुढे येऊन उभाच राहतो. याला आम्ही गत-दर्शन (मागील दर्शन) म्हणतो. कारण बुद्धीने सही करून शिक्कामोर्तब केले आहे, त्यामुळे आत मतमतांतर सुरू होते. आजची तुमची बुद्धी तो तुमच्या मागच्या जन्माचा व्ह्यू पॉइंट आहे आणि आजचा व्ह्यू पॉइंट तो तुमच्या पुढच्या जन्माची बुद्धी असेल, असे चालतच राहते.

चोर चोरी करतो तो त्याचा मागच्या जन्मी बुद्धीने शिक्कामोर्तब केले आहे, म्हणून तो या जन्मी चोरी करतो, परंतु जर त्याला चांगल्या माणसांचा संग लाभला तर त्याचा व्ह्यू पॉइंट बदलून सुद्धा जातो आणि तो असे ठरवतो की चोरी करणे हे चुकीचे आहे. म्हणजे मागील जन्माच्या व्ह्यू पॉइंटच्या आधारे या जन्मी तो चोरी तर करतो, पण या जन्मी त्याचा व्ह्यू पॉइंट बदलला गेल्यामुळे तो चोरी करणे हे चुकीचे आहे, असे मानू लागतो, त्यामुळे त्याला पुढच्या जन्मी चोरी न करण्याची बुद्धी प्राप्त होते.

## मतभेद कशामुळे?

कुणाशी आपला मतभेद होतो. तो कशामुळे? प्रत्येकाचे व्ह्यू

पॉइंट वेगवेगळे असल्यामुळे प्रत्येक जण वेगवेगळ्या दृष्टीकोनातून पाहतो. चोर चोरी करतो तो त्याचा व्ह्यू पॉइंट आहे. तो स्वत: चोर नाही. कुणाच्या व्ह्यू पॉइंटला खोटे म्हणणे, म्हणजे त्याच्या आत्म्याला खोटे म्हणण्यासारखे आहे. कारण ती त्याची बिलिफ (मान्यता) आहे. तो त्यालाच चेतन मानतो. म्हणून आपण चेतनला खोटे म्हणालो असे म्हटले जाईल. त्याच्या व्ह्यू पॉइंटने ते खरे आहे. कारण जोपर्यंत अज्ञान आहे तोपर्यंत व्ह्यू पॉइंटच त्याचा आधार आहे. ज्ञान मिळाल्यानंतर तो सेंटरमध्ये येतो त्यामुळे अज्ञान आणि व्ह्यू पॉइंट निराधार होतात.

आम्ही कुणालाही 'तू खोटा आहेस' असे म्हणत नाही. चोराला सुद्धा तू खोटा आहेस असे सांगत नाही. कारण त्याच्या व्ह्यू पॉइंटने तो खराच आहे. हो, आम्ही त्याला चोरी केल्याचे फळ काय येईल ते जसे आहे तसे समजावून सांगतो.

जगातील सगळीच माणसे सद्बुद्धी आणि दुर्बुद्धीतच खेळत असतात. सद्बुद्धी शुभ दाखवते आणि दुर्बुद्धी अशुभ दाखवते. शेवटी तर दोन्ही प्रकारच्या बुद्धी संसारानुगामी आहेत. म्हणूनच आम्ही तिला विपरीत बुद्धी म्हणतो. विपरीत बुद्धी तर घेणारा आणि देणारा दोघांचेही अहितच करते. तिथे सम्यक् बुद्धी घेणारा आणि देणारा दोघांचेही हितच करते.

बुद्धी जबरदस्त मार खायला लावते. घरात कुणी आजारी पडले आणि जर बुद्धीने दाखवले की हा मरण पावला तर? बस, झाले मग! बुद्धी रात्रभर रडवत राहील.

वाण्यांमध्ये बुद्धी जास्त असते. त्यामुळे त्यांना पुष्कळ मार पडतो. वाणीक बुद्धीमुळे मोक्षमार्गात सुद्धा अंतराय (विघ्न) निर्माण होतात. मोक्ष प्राप्त करणे हे तर शूरवीरांचे काम आहे, क्षत्रियांचे काम आहे. आत्मा वर्णाने तर भिन्नच आहे परंतु प्राकृत गुण त्याला गोंधळात टाकतात, उलट दाखवतात. क्षत्रिय बलवान असतात. चोवीसही तीर्थंकर क्षत्रिय होते. क्षत्रियांना जेव्हा मोक्षाचा भाव उत्पन्न होतो तेव्हा ते सांसारिक वस्तूंना तोलत बसत नाहीत. उलट वाणी तर मुक्तीचा भाव मनात आला

असेल तरीही सांसारिक वस्तूंना तोलत राहतो. वाणीक बुद्धीवर लक्ष ठेवायला हवे, तिच्यापासून जागृत राहायला हवे. मोक्षमार्गात वाणीक बुद्धी फार गोंधळात टाकते.

वाण्यात लोभाची गाठ फार मोठी असते आणि ती गाठ दिसत सुद्धा नाही. तिथे क्षत्रिय तर रुबाब दाखवतो. जिथे तिथे धुमाकूळ घालतो. पण मग जेव्हा मार खातो तेव्हा ताळ्यावर येतो. आणि वाण्याला ताळ्यावर आणणे हे तर फारच कठीण.

क्षत्रिय देवळात पैसे ठेवण्यासाठी खिशात हात घालतात तेव्हा जितके पैसे निघतील तेवढे दानपेटीत टाकतात. तिथे वाणी तर घरातून निघतानाच ठरवून निघतो की पाच पैसे टाकायचे आहेत, म्हणून रस्त्यात पैसे सुटे करून चिल्लर घेतो आणि प्रत्येक मंदिरात पाच किंवा दहा पैसे टाकतो. जेव्हा दान देण्याचा भाव होतो तेव्हा अशी वाणीक बुद्धी वापरतो.

पैसा-बैसा हे काय आहे? तर पूरण-गलन आहे. पूरण झाले म्हणजे गलन होणारच. वहीखात्यांचे हिशोब आहेत. त्यात लोक बुद्धी वापरुन ढवळाढवळ करतात. पूरण-गलनात शक्ती वाया घालवतात. पैसे तर बँक बॅलेंस आहे, हिशोब आहे, सर्व काही ठरलेलेच आहे. तरी पैसे कमावण्यासाठी जे बुद्धी वापरतात, ते स्वतःचे ध्यान बिघडवतात आणि पुढचा जन्म सुद्धा बिघडवतात.

एवढे पुरेसे नव्हते तर आता ट्रिक्स (चलाखी) करण्याचेही शिकले आहेत. ट्रिक म्हणजे समोरच्या माणसाच्या कमी अक्कलेचा गैरफायदा घेऊन स्वतःच्या जास्त बुद्धीने त्याला फसवून त्याला लुबाडणे. ट्रिक करणारा फार चलाख असतो, आणि चोर सुद्धा चलाख असतो. ट्रिक करणारा तर भयंकर अधोगतीत जातो.

वाणी लोक तर बुद्धी वापरून अशी कुंपणे तयार करतात की स्वतः पुरतेच जपतात. शेजाऱ्यांचे पाहत नाहीत. व्यवहारात ते चांगले कशामुळे दिसतात? तर बुद्धीच्या कुंपणामुळे. त्यांची दृष्टी स्वतःकडेच असते. स्वार्थातच गर्क असतात. जसे आहे तसे स्पष्ट बोलणार नाहीत.

वाण्याला जर न्याय करण्यासाठी बसवले तर त्यात समोरच्याला सुख होईल की दु:ख याचा हिशोब आधी लावतो. म्हणजे न्याय असा करतो की समोरच्याला वाईट वाटणार नाही. समोरच्याला वाईट वाटू नये म्हणून खोटे सुद्धा बोलतो, चुकीचा न्याय करतो. देव तर आत बसलेलाच आहे, तो पाहतो की याने तर दोन्ही बाजूने पडदा टाकला आहे. अरे, स्पष्टच बोलावे. कटू वाटणार नाही असे सत्य बोलावे. पण हा तर पडदा ठेवून चुकीचा न्याय करतो. त्यामुळे भयंकर जोखीम ओढवून घेतो. समोरचा खोटा असूनही त्याला खरा ठरवणे ही तर फार मोठी जोखिमदारी ओढवून घेतली म्हणायची. जसेच्या तसे सत्य सांगितले पाहिजे.

हे सर्व कशामुळे उभे राहिले? तर म्हणे समोरच्याला कळत नाही तोपर्यंत स्वार्थातच गर्क राहतात त्यामुळे. संसारात शांती मिळावी म्हणून वाईटाचा संग्रह केला, पण तोच माल त्याला मोक्षाला जाईपर्यंत अत्यंत दु:खदायी होईल. त्याला फार त्रास सहन करावा लागेल. सहजासहजी मोक्षाला जाऊ देणार नाही.

हे वाणीक बुद्धीचे लोक तर कोणत्याही जीवांना मारत नाहीत आणि कुणाच्या खिशातून पैसे चोरत नाहीत. म्हणजे स्थूल चोरी आणि स्थूल हिंसा बंद केली पण सूक्ष्म चोरी आणि सूक्ष्मतम चोऱ्या तर पुष्कळ करतात. या स्थूल चोरी करण्याऱ्यांची जमात सुद्धा एक वेळ वर येईल परंतु सूक्ष्म चोरी करणाऱ्यांची जमात कधीच वर येऊ शकणार नाही. हा ट्रिक करणारा तर बसला असेल आपल्या घरी पण त्याने अशी सूक्ष्म मशीन बसवलेली असते की ज्यामुळे बिचाऱ्या शेतकऱ्यांची फक्त हाडे आणि चामडीच शिल्लक राहते, रक्ताचा थेंबन् थेंब ट्रिकवाला पिऊन टाकतो. भगवंतांनी याला सूक्ष्म हिंसा म्हटली आहे. बंदुकीने ठार मारणाऱ्यांची केव्हा तरी सुटका होईल परंतु ट्रिकबाजी करणाऱ्यांची सुटका कदापि होणार नाही, असे भगवंतांनी म्हटले आहे.

बंदुकीने मारून टाकणारा तर नरकात जाऊन परत मार्गी लागेल आणि तो मोक्षाचा मार्गही शोधून काढेल. तिथे ट्रिक करणारा संसारात खोलवर रुतत जाईल. लक्ष्मी ढीगभर मिळेल आणि परत दानही करत

राहील. त्यामुळे नवीन बीजे उगवतच राहतील आणि संसारचक्र चालतच राहील. यास पॉलिश केलेल्या ट्रिक्स म्हणतात.

ज्ञानी पुरुषांमध्ये ट्रिक करण्याचा माल नावालाही नसतो. वाणीक बुद्धी ट्रिक वरच उभी आहे ना! त्यापेक्षा काही येत नसेल तेच बरे. ज्ञान होण्यापूर्वी लोकांना मी ट्रिक शिकवत होतो. ते सुद्धा समोरचा कुठे फसला असेल तर त्याच्यावर करुणा येत होती म्हणूनच. पण नंतर ते सुद्धा बंद करून टाकले. आमच्याजवळ ट्रिक नसते. जसे आहे तसेच असायला हवे. मन-वाणी आणि देहाने एकच असावे, वेगळेपणा नसावा.

हे घड्याळ तुम्ही नव्वद रुपयात घेतले आणि एकशे दहा रुपयाला विकायला काढले. ट्रिक वापरणारा म्हणतो कसा की मी तर एकशे दहा रुपये देऊन आणले आहे. तेव्हा एकशे दहामध्येच विकणार. त्यापेक्षा सरळ सरळ सांग की, मी नव्वद रुपयात घेतले आहे आणि एकशे दहामध्ये विकायचे आहे जर समोरच्याला घ्यायचे असेल तर एकशे दहा रुपये देऊन घेऊन जाईल. 'व्यवस्थित शक्ती' अशी आहे की एकशे दहा रुपये तुला मिळणारच आहेत, मग तू ट्रिक वापरलीस किंवा नाही वापरलीस तरीसुद्धा मिळतीलच. जर इतका हिशोब ठरलेलाच आहे तर मग ट्रिक वापरुन विनाकारण जोखीम का पत्करावी? याचे फळ आहे अधोगती.

लक्ष्मीचे अंतराय कशामुळे पडतात? तर ट्रिक वापरत राहतात त्यामुळेच. ट्रिक करण्याची सवयच लागली आहे म्हणून. नाही तर वाणी लोक तर व्यापार करणारे, चोख व्यापार करणारे. त्यांना कधी नोकरी करावी लागते का?

## व्यापार चोख करा

म्हणून आम्ही तुम्हाला परम हिताचे सांगत आहोत. ट्रिक्स वापरणे बंद करा. व्यापार अगदी चोख असू द्या. गिऱ्हाईकाला स्पष्टच सांगा की बाबा, यात माझा पंधरा टक्के नफा आहे. तुम्हाला घ्यायचे असेल तर घ्या. भगवंतांनी काय सांगितले आहे? की जर तुला तीनशे रुपये मिळणार

असतील तर तू चोरी करशील, ट्रिक वापरशील किंवा चोख व्यापार करशील, तरी तुला तितकेच मिळतील. त्यात एक पैसा सुद्धा कमी-जास्त होणार नाही. मग वेड्या, ट्रिक आणि चोरीची जोखीम कशाला वून घेतोस? थोडे दिवस न्यायपूर्वक धंदा करून तर बघा. सुरुवातील सहा-बारा महिने अडचण येईल. पण त्यानंतर मात्र फर्स्ट क्लास चालेल. लोकांना पण समजेल की, या माणसाचा धंदा चोख आहे, भेसळयुक्त नाही. तेव्हा न बोलवता, स्वतःहून ते तुमच्याच दुकानात येतील. आज किती ग्राहक तुमच्या दुकानात येतील ते व्यवस्थित 'व्यवस्थित'च असते. तेव्हा हा करंटा गादीवर बसल्या बसल्या आत्ता गिऱ्हाईक आले तर बरे होईल, गिऱ्हाईक आले तर बरे होईल, असे विचार करत बसतो आणि त्यामुळे स्वतःचे ध्यान बिघडवतो.

मनात जर असे ठरवले असेल की मला भेसळ नसलेला चोख धंदा करायचा आहे, तर त्याला तसा धंदा उपलब्ध होईल. भगवंतांनी सांगितले आहे, की खाण्या-पिण्याच्या वस्तूंमध्ये, किंवा सोन्यात भेसळ करणे हा तर भयंकर गुन्हा आहे.

कच्छी लोकांनाही ट्रिक्स करण्याचा भयंकर रोग आहे. ट्रिक्स करण्यात तर ते वाण्यांना सुद्धा मागे टाकतील!

हल्लीच्या काळात तर ट्रिकवाल्यांसोबतच राहावे लागते. तरी पण या ट्रिक्सपासून आपली सुटका कशी करता येईल याकडेच निरंतर लक्ष असायला हवे. हे जर लक्षात असेल तर पश्चाताप केल्याने मोठ्या जोखीमेतून सुटता येईल आणि असा योगही जुळून येईल की मग तुम्हाला एकही ट्रिक वापरावी लागणार नाही आणि तरी सुद्धा तुमचा धंदा उत्तम प्रकारे चालेल. लोकही तुमच्या धंद्याची प्रशंसा करतील.

आपल्याला जर मोक्षाला जायचे असेल तर ज्ञानींनी सांगितल्यानुसार केले पाहिजे. आणि जर मोक्ष नको असेल तर जगरहाटीनुसार वागावे. परंतु मनात मात्र ही खंत बाळगावी की मला असा ट्रिकवाला धंदा करायचा नाही. तर मग तुम्हाला तसा चोख धंदा मिळेल. व्यापार तर कसा असायला हवा की लहान मूल जरी तुमच्याकडे आले तरी त्याच्या आई-वडिलांना काळजी वाटणार नाही की माझ्या मुलाला हे फसवतील.

## लक्ष्मीची कमतरता कशामुळे?

लक्ष्मी कशामुळे कमी पडते? तर चोरी केल्याने. जिथे मन, वचन, कायेने चोरी होत नाही तिथे लक्ष्मीची कृपा असते. लक्ष्मीचा अंतराय चोरीमुळे होतो.

पैसे कमावण्यासाठी अक्कल वापरायची नसते. अक्कल तर लोकांचे भले करण्यासाठीच वापरावी.

ज्ञान जाणून घेतल्याने ज्ञानाच्या प्रकाशात समजते की काय केल्याने स्वत:ला सुख प्राप्त होईल आणि काय केल्याने दु:ख प्राप्त होईल? अक्कलवाले तर ट्रिकचा वापर करून सर्व बिघडवून टाकतात.

ट्रिक हा शब्दच आपल्या डिक्शनरीमध्ये नसावा. 'व्यवस्थित शक्ती'चे ज्ञान कशासाठी दिले आहे? 'व्यवस्थित'मध्ये जे असेल ते असो. अकराशे रुपयांचा फायदा झाला तरी ठीक आहे आणि तोटा झाला तरी हरकत नाही. सत्ता 'व्यवस्थित शक्ती'च्या हाती आहे, आपल्या हाती नाही. जर आपल्या हातात सत्ता असती तर कोणी डोक्यावरच्या केसांना पांढरे होऊ दिले असते का? वाटेल ती ट्रिक शोधून काढून केसांना नेहमीसाठी काळेच ठेवले असते.

जो कधी ट्रिक करत नाही तो माणूस सरळ दिसतो. त्याचा चेहरा पाहताच आपल्याला प्रसन्नता वाटते. पण ट्रिकवाल्याचे तोंड तर एरंडेल प्यायल्यासारखेच दिसते. स्वत: शुद्धात्मा झाल्यानंतर हा सर्व माल स्वच्छ तर करावा लागेल ना? जितके घेतले, तितके दिले, असे तर करावेच लागेल ना! आणि ट्रिक करून भरलेला माल शेवटी मार खाऊन सुद्धा परत करावाच लागेल ना? म्हणूनच आम्ही सांगतो की 'ऑनेस्टी इज धी बेस्ट पॉलिसी एन्ड डिस्ऑनेस्टी इज धी बेस्ट फुलिशनेस.'

## बुद्धीक्रिया आणि ज्ञानक्रिया

जे जे अशुद्ध, अशुभ किंवा शुभ जाणते ती बुद्धीक्रिया आहे, ती ज्ञानक्रिया नाही. ज्ञानक्रिया तर केवळ शुद्धालाच पाहते आणि जाणते.

बुद्धी ज्ञेयाला ज्ञाता ठरवते. 'मी चंदुलाल आहे' हे ज्ञेय आहे. त्यालाच ज्ञाता ठरवते, ती बुद्धी आहे. त्यात अहंकार मिसळलेलाच असतो. ज्ञेयालाच ज्ञाता मानते. बुद्धीक्रियेलाच जर ज्ञानक्रिया मानून घेतली तर मग मोक्षाचा अनुभव कसा घेता येईल?

बुद्धीमुळे अगदी सामीप्य भाव असलेले दिसते. तरी बुद्धीची ताकद नाही की ज्ञेयाला ज्ञेय आणि ज्ञाताला ज्ञाता पाहू शकेल. कारण बुद्धी स्वतःच ज्ञेय स्वरुप आहे. त्यामुळे रियल सत्य पाहू शकत नाही.

जगाला आदि-अंत नसतोच. या बाबतीत सुद्धा सर्वांनी बुद्धीचा वापरुन गोंधळ निर्माण केला आहे. अरे, हे जाणल्याने तुझा काय फायदा? जग अनादि-अनंत आहे, गोल आहे. मग त्या गोलाला आदि कुठला आणि अंत कुठला? अनादि-अनंत आहे हे तर तू जेव्हा बुद्धीच्या पर होऊन ज्ञानी होशील तेव्हा तुला आपोआपच समजेल.

स्वच्छंद म्हणजे बुद्धीभ्रम, स्वच्छंदामुळे स्वतः स्वतःचेच भयंकर अहित करत आहेत. स्वतःच्या समजुतीनुसार चालणे त्यास स्वच्छंद म्हणतात. मग तो शुभ किंवा अशुभ कार्यात असो किंवा शास्त्रवाचनात असो. शास्त्र वाचताना एक जरी चुकीची समज उत्पन्न झाली तरी ती अनंत जन्म भटकण्याचे कारण ठरते. म्हणून स्वच्छंदतेपासून सावध व्हा.

जिथे विपरीत बुद्धी सुरू झाली तिथे यू आर होल ॲन्ड सोल रिस्पॉन्सिबल फॉर दॅट, पूर्णपणे तुम्हीच जबाबदार आहात, तिथे मग भगवंत हस्तक्षेप करत नाहीत. विपरीत बुद्धी तर देणाऱ्याला आणि घेणाऱ्याला, दोघांनाही दुःखी करते.

बुद्धीचे दोन प्रकार. आंतरिक बुद्धी आणि बाह्य बुद्धी. हिंदुस्तानातील लोकांची आंतरिक बुद्धी असते आणि परदेशी लोकांची बाह्य बुद्धी असते, आंतरिक बुद्धीवाले जास्त दुःखी होतात. कारण बुद्धी जास्त डेव्हलप झाल्यामुळे अंतरदाह वाढतोच. बाहेरची प्रजा साहजिक आहे तिथे भारताची प्रजा काही बाबतीत साहजिक तर काही बाबतीत विकल्पी आहे. अध्यात्मासाठी आंतरिक बुद्धीच उपयोगी पडते.

ही बुद्धी बाहेर शोध घेत राहते परंतु बाहेर तर निव्वळ काटेरी झुडपेच आहेत. आत शोध घेतला तर फायदा आहे. लोकांची बुद्धी निरंतर बाहेरच फिरत असते, म्हणून दमून जाते. मी जेव्हा निरंतर आतच फिरेल अशी बुद्धी देतो तेव्हा त्याचे (मोक्षाचे) काम होऊन जाते. तुमची बुद्धी विपरीत आहे, ती सुखाला हाकलून लावते आणि दुःखाला आमंत्रण देते. तुम्हाला सुख आणि दुःखाचीही ओळख नाही.

बुद्धी तर वक्रच दाखवते. जडात जे अस्थायी सुख आहे. त्यास बुद्धी ग्रहण करते. वास्तवात वस्तूमध्ये सुख किंवा आनंद नसतोच. नवीन मोटारीवर कुणी चार रेघोट्या ओढल्या तर? खाच पडली तर? बुद्धी ग्राह्य जी जी सुखे आहेत ती सर्व शेवटी अनंत दुःखे देणारी आहेत. वस्तूच्या आकर्षणामुळे बुद्धी त्यात सुखाचे आरोपण करते. अनंत वस्तू आहेत. प्रत्येक जीव स्वतःचे सुख शोधण्यासाठी एक वस्तू चाखून बघतो आणि ठरवतो की कोणत्या वस्तूच्या प्रभावामुळे हे सुख उत्पन्न होत आहे? मग त्याचा शोध घेण्यासाठी निघतो. प्रथम हे ठरवले की, पैशात सुख आहे. पैशाच्या प्रभावामुळे सुख मिळते, पण मग तो वेड्यासारखे पैशाच्या मागेच धावतो आणि दुःखी होतो. नंतर दुसरे ठरवतो की स्त्रीमध्ये सुख आहे. स्त्रीने पुरुषाला आणि पुरुषाने स्त्रीला असे एकमेकांना पसंत करून सेक्स आणि पैसे, ह्या दोन वस्तू शोधून काढल्या. या दोन वस्तूंपासूनच सुख मिळते असे ठरवले. पण जर बायकोने विरोध केला तर दुःखाचा वणवा भडकतो. पैसा विरोधी झाला तर? एन्फोर्समेंटवाल्याने दरोडा घातला तर तोच पैसा विरोधी होऊन महादुःखाचे कारण बनतो.

## बुद्धीभेद तिथे मतभेद

आजच्या या जगात घरात तीन सदस्य असतात पण संध्याकाळ होईपर्यंत तेहतीस मतभेद पडतात तिथे पार कसा येईल? अरे शिष्य आणि गुरू, या दोघांमध्येही संध्याकाळपर्यंत किती तरी मतभेद होतात! याचा अंत कसा येईल? जिथे भेदबुद्धी आहे तिथे मतभेद अवश्य होतातच. जर अभेद बुद्धी उत्पन्न झाली तर कामच झाले समजा. स्वतः निष्पक्षपाती होऊन सेंटरमध्ये (केंद्रस्थानी) बसून सर्वांना निर्दोष पाहतो.

बुद्धीने वाकडे दाखवले की लगेच आपण सम्यक् बुद्धीला म्हणावे की जा निकाल लावून ये. तर ती निकाल लावून येते.

आत्मा भ्रमित झाला, तेव्हा संसार उभा झाला. बुद्धी भ्रमित होईल, तेव्हा ज्ञान प्रकट होईल.

मी कोणाच्याही 'बुद्धी'कडे पाहत नाही, मी तर त्याची 'समज' किती आहे हेच पाहतो. बुद्धी तर एका रांगेत तीनशे जागी वाकडी असेल पण समज जर सरळ असेल तर हरकत नाही. बुद्धीवाला तर बुद्धीत उंचीवर जाऊन परत खालीही पडेल. तिथे 'समज' असलेला, दर्शन असलेला वर चढत चढत शेवटपर्यंत पोहोचेल पण पडणार तर नाहीच. बुद्धी हा प्राकृत गुण आहे, स्वगुण नाही. दर्शन हा स्वगुण आहे.

तेज (पित्त) तत्त्ववाल्यांना बुद्धी जास्त असते आणि वात तत्त्ववाल्यांची समज खोलवर असते.

सर्व काही बुद्धीच्या कल्पनेने उभे झाले आहे, लौकिक आहे. सर्व धर्मात, ज्याच्या कल्पनेत जे काही आले ते शास्त्रात लिहिले गेले. शास्त्र हे बुद्धीजन्य ज्ञानच आहे. त्यात चेतन नसते. ज्ञान हा स्वयंप्रकाश आहे, आणि तो ज्ञानींच्या हृदयातच असतो.बुद्धीचे पर्याय असतात. तिच्यात बोधकला पण अपार आहेत. बुद्धी, अवस्थेलाच स्वरूप मानायला लावेल अशी आहे म्हणूनच आम्ही सांगतो की, बुद्धीपासून सावध व्हा. बुद्धीने दाखवले की लगेचच दादांचे स्मरण करून, बोला 'मी वीतराग आहे', तेव्हा बुद्धीताई गप्प बसेल

ज्ञान कुणाच्याही चुका दाखवत नाही. बुद्धी सर्वांच्या चुका दाखवते. बुद्धी तर सख्ख्या भावाच्याही चुका दाखवते आणि ज्ञान सावत्र आईचे सुद्धा दोष दाखवत नाही. मुलगा जेवायला बसला असेल आणि सावत्र आई ने जर करपलेली खिचडी खरडून ताटात वाढली तर बुद्धी त्याला सांगते की ही सावत्र आईच वाईट आहे. बुद्धीमुळे मनात उद्वेग निर्माण होतो. पण मुलाने जर ज्ञान घेतलेले असेल तर ते ज्ञान लगेचच हजर होईल आणि सांगेल, 'अरे, ती पण शुद्धात्मा आहे आणि मी पण शुद्धात्मा

आहे. आणि ही तर पुद्‌गलची बाजी आहे, आणि याचा निकाल होत आहे.' देह मातीचा बनलेला आहे आणि बुद्धी तेजापासून बनलेली आहे. त्यामुळे ती प्रकाश पण देते आणि भाजूनही टाकते. म्हणूनच आम्ही बुद्धीला लबाड म्हणतो. खरे तर, अबुध होण्याची गरज आहे. बुद्धी तर माणसाला कधी अॅबाव नॉर्मल करून टाकते तर कधी बिलो नॉर्मल सुद्धा करून टाकते. जगात प्रत्येक वस्तू नॉर्मालिटीत असायला हवी. 'अबुध' झाल्याशिवाय नॉर्मालिटी कधीच येणार नाही.

आम्ही 'अबुध' झालो आहोत, निराग्रही आहोत, नॉर्मालिटीत आहोत. माझ्या एका केसातच समस्त जगाचे 'ज्ञान' समाविष्ट झाले आहे.

ज्याची बुद्धी कमी असते त्याचे हृदय मृदु–कोमल असते. त्याने (मोक्षाचे) काम केले तर करूनही टाकेल नाही तर उलटही चालेल. आठवड्यातून रविवारी, एकच दिवस जरी बुद्धीचा उपयोग केला नाही तरी तो काम करून घेईल. पुढच्या जन्माचे बीज पेरायचे असेल तर बुद्धीचा वापर कर. बुद्धीचा प्रकाश वाढवणे हे तुझ्या हातात नाही पण डिम करणे हे तर तुझ्याच हाती आहे. म्हणून बुद्धीचा प्रकाश डिम ठेव. बुद्धी सामुदायिकपणे हितकारी नसते. ज्ञान सामुदायिकपणे हितकारी असते.

## अवधानाची शक्ती

कमी बुद्धीवाल्याला द्वेष जास्त असतो. ज्याची बुद्धी विकसित झालेली आहे तो द्वेष करत नाही. आपण संग्रहालय पाहायला जातो तेव्हा कोणत्याही वस्तूंचा द्वेष करतो का? कुसंग म्हणजे बुद्धीचा खटाटोप. नको ते दाखवते.

अवधान लिमिटेड–सीमित आहे. ते बुद्धीच्या शक्तीवर अवलंबून असते. प्रत्येक मनुष्य स्वतःच्या बुद्धीच्या आशयात जो माल भरुन आणतो तोच माल या जन्मात बाहेर निघतो. या खेरीज दुसरे काहीच नाही. या हिंदुस्तानातील चोरांना चोरी करताना एकाचवेळी सोळा–सोळा अवधाने हजर राहतात. चोर चोरी करायला उपाशी पोटी निघतो. त्यामुळे त्याची अवधान शक्ती वाढते. चोरी कुठे करायची? कोणत्या पॉइंटवर करायची? कोणत्या वेळी करायची? पोलीसवाला कुठे आहे? पैशांचे पाकीट

कोणत्या खिशात आहे? खिसा कसा कापायचा? कुठून पळ काढायचा? अशी तर सोळा–सोळा अवधाने एट–अ–टाईम आपल्या हिंदुस्तानातील चोरांना राहतात. अवधान शक्ती संपूर्णपणे बुद्धीजन्य आहे, ज्ञानजन्य नाही. अवधान घटक्यात वाढते आणि अर्धा शेर बासुंदी खाल्ली असेल तर कमी पण होते. असे विचित्र आहे हे सर्व! ज्ञानजन्य असेल तर एकसमानच राहते. चढ–उतार होत नाही.

**प्रश्नकर्ता :** बुद्धी हीच माया?

**दादाश्री :** नाही. माया म्हणजे अज्ञान. ज्ञान प्राप्त झाले की अज्ञान–माया जाते परंतु अंत:करण तर राहतेच. बुद्धी राहतेच. बुद्धी संसारासाठी हितकारी असलेल्या वस्तूंमध्ये हात घालायला लावते आणि संसारातच भटकवत ठेवते. बुद्धी म्हणजे काय? कुणी तुमच्या मुलाला फसवत असेल तर तुमची बुद्धी आडवी येते. (मुलाला वाचवण्याचा प्रयत्न करते.) खरे तर, 'व्यवस्थित शक्ती'च सर्व करत असते तरी सुद्धा बुद्धी दखल करते. प्रथम मन बुद्धीला फोन करते तेव्हा स्वत: आत दखल करू शकतो, बोलून जातो, 'काय म्हणालात? काय म्हणालात?' प्रत्येक बाबतीत आधी बुद्धीचीच दखल असते. रात्री झोपल्यावर स्वप्नात ती दखल करू शकत नाही, त्यामुळे सर्व सरळ चालते. तर शहाण्या हा संसार सुद्धा जागेपणाचे स्वप्नच आहे ना!

एखादा मोटार ड्रायव्हर मोटार चालवत असेल आणि तेव्हा जर समोरून बस आली आणि शेजारी बसलेल्या माणसाने ड्रायव्हरचा हात पकडला तर काय होईल? अरे! धडक बसेल ना! पण लोक फार हुशार असतात. बस आली तरी स्टियरिंग पकडत नाहीत. कारण त्यांना माहीत आहे की स्टियरिंग मोटार चालवणाऱ्या ड्रायव्हरच्या हातात आहे. ज्याचे काम त्यानेच करावे. आता मोटार चालवण्याच्या स्थूल बाबतीत लोकांना हे कळते. पण या 'आतल्या' बाबतीत कसे समजेल? तिथे स्वत: ढवळाढवळ केल्याशिवाय राहतच नाही त्याचीच तर ही झंझट आहे. बाहेर जसे सर्व मोटार ड्रायव्हर वर सोपवतो तसेच 'आतल्या' बाबतीत सुद्धा केले तर काहीच झंझट उरणार नाही.

तत्त्व बुद्धी म्हणजे 'मी शुद्धात्मा आहे' आणि एकदा हे हाती आले की मग देहबुद्धी निघून जाते. देहात जी बुद्धी होती ती आता तत्त्वात परिणमित झाली. तत्त्व बुद्धी म्हणजे सम्यक् बुद्धी. सम्यक् ज्ञान उत्पन्न झाले की सम्यक् बुद्धी, तत्त्व बुद्धी उत्पन्न होते. नाही तर विपरीत बुद्धीच असते!

## अंत:करणाचे तिसरे अंग : चित्त

अंत:करणाचे तिसरे अंग चित्त आहे. चित्ताचे कार्य आहे भटकणे. ते जसे आहे तसा फोटो काढून देते. इथे बसल्या बसल्या अमेरिकेची फिल्म जशी आहे तशी दाखवते, ते चित्त आहे. मन ह्या शरीराच्या बाहेर जातच नाही. जे जाते ते चित्त आहे, आणि जे बाहेर भटकत असते ते अशुद्ध चित्त. आणि शुद्ध चित्त तोच शुद्ध आत्मा.

चित्त म्हणजे ज्ञान + दर्शन.

अशुद्ध चित्त म्हणजे अशुद्ध ज्ञान + अशुद्ध दर्शन.

शुद्ध चित्त म्हणजे शुद्ध ज्ञान + शुद्ध दर्शन.

मन पॅम्फलेट दाखवते आणि चित्त फोटो दाखवते. हे दोन्ही जे दाखवतात त्या आधारे बुद्धी डिसिजन (निर्णय) देते आणि अहंकार सही करतो, तेव्हा कार्य होते. चित्त ही एक अवस्था आहे. चित्त म्हणजे अशुद्ध ज्ञान–दर्शनाचे पर्याय. बुद्धी निर्णय घेते त्या आधी मन आणि चित्ताची ओढाताण चालते, पण मग एकदा डिसिजन आल्यानंतर सर्व चूप. बुद्धीला जर बाजूला सारले तर मन किंवा चित्त काहीच अडचण करत नाहीत.

अनादि काळापासून चित्त निज (स्वत:चे) घर शोधत आहे. आणि म्हणून ते भटकतच राहते. तऱ्हेतऱ्हेचे बघत राहते. त्यामुळे त्याच्याजवळ वेगवेगळे ज्ञान–दर्शन गोळा होत जाते. चित्तवृत्ति जे जे पाहते त्याचा स्टॉक (संग्रह) करते आणि वेळ आल्यावर हे असे आहे, हे तसे आहे, असे दाखवते. चित्त जे काही पाहते त्यात जर चिकटले तर त्याचे परमाणू

खेचले जातात आणि ते परमाणू एकत्रित होऊन ग्रंथी तयार होतात, जे मन स्वरूप आहेत आणि वेळ आल्यावर मन पॅम्फलेट दाखवते, त्यास चित्त पाहते आणि बुद्धी डिसिजन घेते.

तुमच्या ज्या चित्तवृत्ती बाहेर भटकत होत्या आणि संसारात रमत होत्या, त्यांना आम्ही आमच्याकडे खेचून घेतो. त्यामुळे वृत्तींचे इतरत्र भटकणे कमी होते. चित्तवृत्तीचे बंधन झाले तोच मोक्ष आहे!

अशुद्ध चित्तवृत्ती अनंत काळापासून भटकत होत्या आणि त्या ज्या ठिकाणी जात होत्या तिथून त्यांना परत वळवण्याचा प्रयत्न केला तर उलट तिथेच पुन्हा खेचल्या जात होत्या. अशा या चित्तवृत्ती निज घरी परततात हेच तर मोठे आश्चर्य आहे ना! चितवृत्ती ज्या ज्या जागी भटकतील त्या त्या जागी देहाला सुद्धा भटकावे लागेल. क्रमिक मार्गात तर मनाचे अनंत पर्याय आणि परत चित्ताचे अनंत पर्याय पार करत करत रिलेटिव्ह अहंकारापर्यंत पोहोचतात. (आरशात पाहावे तसे) आणि तुम्हाला तर आम्ही या सर्वांना पार करवून सरळ स्वरूपातच बसवले आहे, निज घरात!

निज घर शोधण्यासाठी चित्त सतत भटकत राहते. म्हणून ते जे काही पाहते त्यात सुख शोधत असते. चित्त जिथे स्थिर होते, तिथे अंत:करणाचा उर्वरित भाग शांत राहतो, त्यामुळे सुख वाटते. पण स्थिर राहते किती वेळ? चित्त परत दुसरीकडे जाते. मग त्याला तिथे सुख वाटते आणि आधीचे सुख दु:खदायक वाटते. कारण चित्त जे बाह्यसुख शोधत आहे ते सर्व पारिणामिक रुपाने दु:खदायकच आहे. कारण बुद्धी त्यात आरोप केल्याशिवाय राहतच नाही की यात सुख नाही, यात तर दु:ख आहे. त्यामुळे चित्त पुन्हा भटकत राहते. जोपर्यंत चित्तवृत्ती निज घरात स्थिर होत नाहीत, तोपर्यंत याचा अंत येतच नाही. जेव्हा खरे सुख चाखायला मिळते तेव्हा कल्पित सुखे आपोआपच फिकी पडतात. खरे सुख चाखल्यानंतर जे भटकत आहे ते अशुद्ध चित्त आणि त्यास जसे आहे तसे 'पाहणारे' आणि 'जाणणारे' ते शुद्ध चित्त. अशुद्ध चित्ताचे पर्याय मग हळूहळू कमी होत होत बंदच होतात आणि नंतर केवळ शुद्ध चित्ताचे पर्यायच राहतात, तेच 'केवळज्ञान.'

ज्ञानी पुरुष अशुद्ध चित्ताला हात लावत नाहीत. मात्र स्वत:चे शाश्वत सुख, जो अनंत सुखाचा कंद आहे, त्याचा स्वाद चाखवतात. त्यामुळे निज घर मिळताच शुद्ध चित्त म्हणजेच शुद्धात्मा प्राप्त होतो आणि शुद्ध चित्त जसजसे शुद्ध आणि शुद्धालाच पाहत राहते तसतसे अशुद्ध चित्तवृत्ती फिकी होत होत शेवटी केवळ शुद्ध चित्तच शेष राहते. त्यानंतर अशुद्ध चित्ताचे पर्याय बंद होतात. नंतर राहतात ते केवळ शुद्ध पर्याय.

## ज्ञानीच शुद्ध आत्मा देऊ शकतात

अशुद्ध चित्ताची शुद्धी करण्यासाठी जगातील सर्व धर्म सतत प्रयत्न करत आहेत. साबणाने मळलेले कपडे धुऊन साफ करावे, तसे! पण साबण कापडाचा मळ तर साफ करतो पण मग स्वत:चा मळ सोडत जातो. मग साबणाचा मळ काढण्यासाठी परत टिनोपॉल पाहिजे. टिनोपॉल साबणाचा मळ तर काढतो पण परत स्वत:चा मळ सोडत जातो! तर हे असे शेवटपर्यंत मळ साफ करणारी वस्तू स्वत:चा मळ, साफ होणाऱ्या वस्तूवर सोडत जाते. असेच जगातील सर्व रिलेटिव्ह धर्मात होत आहे! एकूण काय, तर जे चित्त शुद्ध करायला जातात त्यावर सुद्धा शेवटी अशुद्धी, मळ, हा राहतोच. संपूर्ण शुद्ध तर तेच करू शकतात की जे स्वत: संपूर्ण शुद्ध, सर्वांग शुद्ध आहेत. तेव्हा असे ज्ञानी पुरुषच हे करू शकतात. म्हणून तर सारी शास्त्रे शेवटी हेच सांगतात की, 'तुला आत्मा प्राप्त करायचा असेल तर ज्ञानीकडे जा. तेच शुद्ध आत्मा देऊ शकतात. आमच्याजवळ तर भेसळयुक्त आत्मा आहे, अशुद्ध आत्मा आहे, ज्याची काहीच किंमतच नाही.'

मोक्षमार्गात मनाला काहीच करण्यासारखे नाही, मात्र चित्तच शुद्ध करायचे आहे, तरच उकल होईल. काही लोक समजल्याशिवायच मनाच्यामागे लागतात. मन वश करायला जातात. त्यांच्या व्ह्यू पॉइंटने ते बरोबर आहे, पण जर मोक्ष हवा असेल तर फॅक्ट समजून घ्यावी लागेल आणि फॅक्टप्रमाणे तर ते पूर्णपणे चुकीचे आहे. चित्त शुद्ध झाल्यानंतर मनाशी काहीच देणेघेणे राहत नाही. नंतर शुद्ध चित्त मनाची फिल्म पाहत राहते.

या जगात मनाला गुंतवून ठेवणारी स्थाने आहेत पण चित्ताला गुंतवून ठेवणारी अशी स्थाने नाहीत. हे पत्ते खेळतात, ते काय आहे? त्यात काय सुख आहे? लोकांनी चित्ताला रोखण्याचे स्थान तयार केले आहे. परंतु पत्ते खेळण्यात चित्ताला रोखून ठेवणे हे घसरवणारे आहे, त्यात मग हळूहळू आणखी खाली घसरत जातात. पण पत्त्यात सुद्धा चित्त किती वेळ गुंतून राहील? शेवटी ते सुद्धा असुख उत्पन्न नाही का करत?

चित्तच स्वत:च्या आवडीच्या जागी आणि भीती वाटत असेल अशा जागी विशेष भटकत असते. दुपारी खोलीत साप पाहिला असेल तर रात्री झोपताना सुद्धा साप आठवतो. चित्त जेव्हा भयभीत होते तेव्हा सारखे तिथेच जाते. जड पण नाही आणि चेतन पण नाही, असे मिश्रचेतन–अशुद्ध चित्त, जिथे–तिथे भटकत राहते. बिन तिकिटाचे भटकायला मिळते, म्हणून भटकत राहते. तिकिट असते तर बरे झाले असते. मग चित्त असे भटकायला निघाले नसते!

चित्त वरून चेतन झाले आहे. शुद्ध ज्ञान + शुद्ध दर्शन = शुद्ध चेतन.

पूर्वी ज्या ज्या पर्यायांचे खूपच वेदन केले असेल ते आता जास्त प्रमाणात येतात. तेव्हा चित्त तासन् तास तिथेच चिकटून राहते, आणि म्हणून तिथे खूप भारी बीज पडते. जे पर्याय हलके झाले असतील, त्या पर्यायांचे चित्ताला जास्त आकर्षण राहत नाही. तिथे चित्त जाते आणि लगेचच परत येते.

ज्ञान आणि दर्शन, यांना जर एकत्रपणे बोलायचे झाले तर चित्त असे म्हणावे लागेल. चित्त नाशवंत वस्तूच दाखवत राहते. जिथे जिथे वासना असते तिथे चित्त भटकते. जितके ज्ञान असेल तितके दिसते आणि दर्शन असेल तितके अस्पष्ट दिसते. ज्ञानाने एक्जेक्ट दिसते.

देवळात मूर्तीचे दर्शन घेत असताना आतील संयोगाप्रमाणे, जसे की मनाचा परिणाम, चित्तवृत्तीची स्थिती, त्यानुसार दर्शनात सुद्धा फरक दिसून येतो. उदाहरणार्थ, पहिल्या तासात एका प्रकारचे दर्शन घडते, दुसऱ्या तासात दुसऱ्या प्रकारचे दर्शन घडते. बाहेरील आणि आंतरिक

एविडन्स जसे येतील तसे दर्शन घडते. मूर्तीच्या समोरून प्रकाश येत असेल तर वेगळे दर्शन होईल, बाजूने प्रकाश येत असेल तर वेगळे दर्शन होईल. ज्ञानी पुरुषांचे मुखारविंद तर एकसारखेच असते परंतु तुमच्या मनाच्या परिणामानुसार किंवा चित्तवृत्तीच्या चंचलतेनुसार वेगळे दिसते. ज्ञानी पुरुषांचे दर्शन तर एकाच प्रकारे करायचे असते.

## चित्त प्रसन्नता

आनंदघनजी महाराज काय म्हणतात? साऱ्या जगाचे भावाभाव ज्याचे लोप पावले आहेत, असे वीतराग भगवंत जेव्हा ऋषभदेव भगवंतांच्या मूर्तीचे दर्शन घेतात, तेव्हा त्यांना त्यांची मूर्ती हसरी दिसते. नेत्र तर काचेचे आहेत, तरी पण हसरी का दिसते? कारण त्यांची स्वत:ची चित्तवृत्ती, स्वत:ची चैतन्य शक्ती त्यात गुंफली आहे, त्यामुळे हसरी दिसते. यास चित्त प्रसन्नता म्हणतात. जिथे कपटभाव पूर्णपणे नष्ट झाला असेल तिथे चित्त प्रसन्नता असते. चित्त प्रसन्नता आणि कपट या दोन्हींचा गुणाकार होत नाही. कबीर साहेब काय म्हणतात की,

*'मैं जानुं हरि दूर है, हरि हृदय के मांही,*
*आडी त्राटी कपट की, तासें दिसत नाही.'*

(मला वाटते की हरी (ईश्वर) दूर आहे पण तो तर माझ्या हृदयात आहे, परंतु कपटाच्या पडद्यामुळे दिसत नाही.)

आडी त्राटी कपटकी, म्हणजे कपटाचा पडदा आहे त्यामुळे भगवंत दिसत नाहीत. वृत्तींमध्ये अन्य कुठलाही भाव राहिला नसेल तर त्यास शुद्ध म्हटले जाते. आपल्या महात्म्यांच्या वृत्तींमध्ये जर अन्य भाव राहिला नाही तर चित्त प्रसन्नतेची भक्ती उत्पन्न होईल. अवस्थेच्या बंधनात असलेले लोक व्यवहार सुख सुद्धा उपभोगू शकत नाहीत. तासापूर्वी एखाद्या अवस्थेत चित्त एकाग्र झाले असेल तर त्यातच चित्त गुंतलेले राहते. त्यामुळे अवस्थेच्या बंधनाचे ओझे वाटते आणि चहा पिण्याच्या अवस्थेवेळी सुद्धा त्या ओझ्यासकटच चहा पितो. व्यवहारात तर चित्त हेच चैतन्य आहे. ते हजर असेल तरच कामाचे. खाताना जर चित्त हजर नसेल तर ते खाल्लेले काय कामाचे?

'चित्तात क्लेशाचा अभाव, हाच सर्व धर्मांचा धर्म.' जर हे पद प्राप्त झाले तर पुनर्जन्मापासून सुटका होईल.

**प्रश्नकर्ता :** दादाजी, गेल्या रात्री झोपेत एक सूर्यासारखा प्रकाश फार तीव्रतेने दिसला, ते काय असेल?

**दादाश्री :** हा तर चित्त चमत्कार. चित्त चमत्काराची प्रचंड शक्ती आहे.

**प्रश्नकर्ता :** देवळात घंटा का बांधतात?

**दादाश्री :** चित एकाग्र करण्यासाठी. घंटा टणटण वाजली की तिथे मन आणि चित्त थोड्यावेळापुरते एकाग्र होतात. जोपर्यंत स्वरूप ज्ञानाची प्राप्ती होत नाही तोपर्यंत संपूर्ण एकाग्रता होतच नाही.

चित्ताला जे डळमळीत करतात ते सर्व विषयच आहेत. बाहेर हे जे सर्व होत आहे ते सर्व विषयच आहेत. ज्या ज्या वस्तूंमध्ये चित्त जाते ते सर्व विषयच आहेत. भजी खाण्यास हरकत नाही पण जर चित्त चिकटले आणि पुन्हा पुन्हा भजी आठवत राहिली तर तो विषय आहे. ज्ञानाबाहेर जे जाते ते सर्व विषयच आहेत.

परक्या वस्तूमध्ये (स्व खेरीज) चित्त भटकते तेव्हा पुढच्या जन्माचे बीज पडते.

चित्त नेहमी फोटो काढत असते. कधी अस्पष्ट तर कधी स्पष्ट काढते. तुम्ही जसे फोटो काढणार तशी फिल्म तयार होईल आणि ती मग तुम्हाला पाहावी लागेल, भोगावी लागेल. म्हणून चांगले फोटो काढा. तुमची फिल्म वाया जाऊ देऊ नका.

## अहंकार

अंत:करणाचा चौथा आणि शेवटचा भाग तो आहे अहंकार. मन आणि चित्ताबरोबर मिळून बुद्धी जे डिसिजन देते त्यावर शेवटी सही करतो तो अहंकार. जोपर्यंत अहंकार सही करत नाही तोपर्यंत कोणतेही

कार्य होतच नाही. परंतु बुद्धीचा प्रकाश हा अहंकार थ्रू येणारा प्रकाश असल्यामुळे बुद्धीने डिसिजन घेतले म्हणजे अहंकार नियमानेच त्यात सहमत होतो आणि मग ते कार्य होऊनच जाते.

'मी चंदुलाल' यालाच ज्ञानी सर्वात मोठा आणि शेवटचा अहंकार म्हणतात. यामुळे सर्व जग उभे राहिले आहे. हा अहंकार गेला तरच मोक्ष मिळू शकतो. हे जीवन कोणत्या आधारावर उभे राहिले आहे? पायावर की देहावर? नाही, 'मी आहे' यावरच. 'मी शुद्धात्मा आहे,' या शुद्ध अहंकारामुळेच मोक्षाला जाऊ शकतो. बाकी सर्व जन्मोजन्म भटकवणारी साधने आहेत.

अचेतनमध्ये 'मी आहे' असे मानतो, तो अहंकार. चेतनमध्ये जर 'मी आहे,' असे मानले तर त्यास अहंकार म्हणत नाही. 'मी आहे' अर्थात अस्तित्व तर आहेच. त्यामुळे 'मी आहे' असे बोलण्याचा अधिकार तर आहेच. पण 'मी आहे' तो कशात आहे? हे तुम्हाला माहीत नाही अचेतनमध्ये 'मी' बोलण्याचा अधिकार नाही. 'मी कोण आहे?' याचे भानच नाही. याचे भान झाले मग तर कामच झाले ना!

कुणाच्या चालवण्याने काहीच चालत नाही आणि जग तर चालतच राहते. मात्र अहंकारच केला जातो की मी चालवत आहे. जोपर्यंत स्वत:च्या स्वरूपाचे भान नाही तोपर्यंत सर्व चावी दिलेल्या मोटारीसारखेच आहेत!

## त्याग कशाचा करावा?

भगवंतांनी सांगितले आहे की, जर तुला मोक्षाला जायचे असेल तर कशाचाही त्याग करण्याची गरज नाही. फक्त अहंकार आणि ममता, या दोन्हींचा त्याग केला की त्यात बाकी सर्व येऊन गेले. अहंकार म्हणजे 'मी' आणि 'ममता' म्हणजे 'माझे'. 'मी' आणि 'माझे' या दोन्हींचाच त्याग करायचा आहे. आम्ही जेव्हा ज्ञान देतो, तुमच्या स्वरूपाचे भान करवितो तेव्हा तुमचा अहंकार आणि ममता – दोन्हींचाही त्याग करवितो. एका बाजूला त्याग केला तर दुसऱ्या बाजूला काय ग्रहण

करवितो हे माहीत आहे? 'शुद्धात्मा' ग्रहण करवितो. नंतर मग ग्रहण–त्यागाची भानगडच उरत नाही. अहंकार काढण्यासाठीच तर सर्व त्याग करायचा असतो. आम्ही तुमचा संपूर्ण अहंकारच घेऊन टाकतो. नंतर अस्तित्व काय राहिले? तर, जिथे अस्तित्वपणा आहे तिथे, मूळ जागेवर स्थापित केले. कुठल्या तरी एका जागीच अहंकाराचे अस्तित्व असते, तर आम्ही अहंकाराला त्याच्या मूळ स्थानावरच बसवून देतो.

तुम्ही निश्चय केला की, सकाळी पाच वाजता उठायचे आहे, तर उठलेच जाते. निश्चय म्हणजे अहंकार. अहंकार केल्याने काय होऊ शकत नाही? एकदा सहजानंद स्वामी फिरत फिरत काठियावाड (सौराष्ट्र) मध्ये गेले. तिथे त्यांना एक राजा भेटला. राजा म्हणाला, 'माझ्याकडे एक फार मोठा साधू आला आहे. पंधरा दिवस स्वतःला जमिनीच्या आत गाडून घेतो.' त्यावर सहजानंद स्वामी म्हणाले, 'माझ्या समोर त्याला हा प्रयोग करून दाखवायला सांगा.' तो साधू तर पंधरा दिवस अहंकारपूर्वक जमिनीच्या आत खड्डयात राहिला. मग बाहेर निघायच्या वेळी सहजानंद स्वामी म्हणाले की, त्या साधूकडे फक्त दोन पोलीसांनाच पाठवा. प्रत्येक वेळी राजा तुम्ही स्वतःच वाजतगाजत त्याचे स्वागत करण्यासाठी जाता, ते सर्व यावेळी बंद. तर तो साधू जेव्हा बाहेर निघाला तेव्हा त्याने पाहिले की तिथे कोणीच नाही. तो ओरडू लागला. 'कुठे आहे राजा? कुठे आहे पालखी? बॅन्ड–बाजा कुठे आहेत?' असे ओरडत ओरडत तो तिथल्या तिथेच मृत्यू पावला. तो अहंकार करून जमिनीत राहिला होता आणि अहंकाराला पोषण न मिळता तिथल्या तिथेच मरण पावला. जिथे स्वतः नाही तिथे स्वतःचे आरोप करणे तोच अहंकार.

खरे तर, 'स्वतः' मरतच नाही. अहंकारच मरतो आणि अहंकारच जन्म घेतो. जोपर्यंत अहंकाराची सही होत नाही तोपर्यंत मृत्यू येतच नाही. पण हा करंटा सही केल्याशिवाय राहतच नाही. बिछान्यात असह्य यातनांचे दुःख होत असताना किंवा दुसरे भयंकर दुःख ओढवले की सही करूनच टाकतो की, या यातना सहन करण्यापेक्षा मरण बरे. सही होऊनच जाते.

## कोण भोगत आहे?

'आत्मा' स्वत: काहीच भोगत नाही. कोणत्याही विषयाचा उपभोग आत्मा घेऊ शकतच नाही. जर उपभोगणे हा त्याचा स्वगुण असता तर तो नेहमी सोबतच राहिला असता आणि मग कधीच मोक्ष झाला नसता. जो भोगत आहे तो तर निव्वळ अहंकारच करतो की, मी भोगले. इंद्रिये इफेक्टिव आहेत आणि त्यांच्यावर कॉजेसच्या आधारे इफेक्ट होत असतो, तेव्हा भ्रांतीमुळे अहंकार करतो की 'मी करत आहे' 'मी भोगत आहे'. जर ही भ्रांती निघून गेली की 'मी कर्ता नाही,' आणि (खरा) कर्ता कोण आहे हे जर समजले, तर मग मोक्ष काही दूर नाही. देहात राहून सुद्धा मोक्ष अनुभवला जातो.

माणसांची गर्दी नाही पण अहंकाराची गर्दी आहे. ज्ञानामुळे अहंकाराच्या गर्दीत राहता येते. निसर्ग पद्धतशीर आहे. आत्मा सुद्धा पद्धतशीर आहे पण मधे हा जो अहम् आहे तोच फार भयंकर आहे. तो नको तेच करतो. अहम्मुळेच हे जग उभे आहे आणि या चार गती, त्या सुद्धा अहम्मुळेच होत असतात. अहंकारानेच भगवंतापासून वेगळे केले आहे.

मनुष्य सुंदर असून सुद्धा अहंकारामुळे कुरूप दिसतो. सुंदर केव्हा दिसेल? तर म्हणे, प्रेमात्मा होतो तेव्हा. शरीरावर गाठी असलेला मनुष्य कसा कुरूप दिसतो? तसेच, सुंदर असूनसुद्धा अहंकाराच्या गाठींमुळे मनुष्य कुरूप दिसतो.

**प्रश्नकर्ता :** अहंकाराचे प्रकार आहेत का?

**दादाश्री :** रिलेटिव्ह वस्तूला 'मी आहे' म्हटले की तोच अहंकार. गर्व, मद, मत्सर, अभिमान, मान, अपमान, हे सर्व वेगवेगळे शब्द वेगवेगळ्या जागी वापरले जातात. त्या सर्वांचे स्थूल अर्थ समजून घेण्यासारखे आहेत, म्हणून ज्ञानींनी वेगवेगळी नावे दिली आहेत.

कित्येक स्वत:ला निर्मानी म्हणतात. परंतु त्या निर्मानीपणाची जी नशा चढते ती तर स्थूल मानीपेक्षाही जास्त भटकायला लावणारी असते.

निर्मानीचा मानीपणा डोके उचलल्याशिवाय राहतच नाही. स्वरूपज्ञानाशिवाय अहंकार पूर्णपणे जातच नाही. म्हणून तर ते एकाच बाजूला वळले आणि निर्मानीपद प्राप्त करण्याच्या मागे लागले. पण वेड्या, त्याचीच नशा वाढली, त्याचे काय? त्यामुळे जो भयंकर सूक्ष्म अहंकार वर आला त्याचे काय?

स्वरुप ज्ञान प्राप्त झाल्यानंतर अंत:करण जसेच्या तसेच राहते. फक्त जिथे 'स्वत:' नाही, तिथे 'मी आहे' अशा भ्रांतीमुळे आरोप केला होता, ती भ्रांतीच आम्ही उडवून टाकतो आणि 'मी'ला रियल 'मी'मध्ये (मूळ स्थानात) बसवतो. नंतर अंत:करणात जो अहंकार शेष राहतो, तो तुमचा व्यवहार निभावून घेईल. अहंकाराला दाबून ठेवण्याची गरजच नाही, फक्त निरस करावा लागतो.

## अहंकाराचा रस खेचून घ्या

मूळ वस्तूची प्राप्ती झाली, तेव्हा आता अहंकाराचा रस खेचून घ्यायचा आहे. रस्त्याने जाताना कुणी म्हटले, 'अरे, तुम्हाला अक्कलच नाही, जरा सरळ चाला की.' त्यावेळी अहंकार पुढे येतो, सहाजिकच अहंकार दुखावला जातो. राग येतो, रुसतो. पण त्यात रुसण्यासारखे काय आहे? आपल्याला आता रुसण्याचे काही कारणच नाही. अहंकाराचा जो रस आहे तो रसच खेचून घ्यायचा आहे.

अपमान कोणासही आवडत नाही. पण आम्ही म्हणतो की अपमान तर फार उपयोगी आहे. मान–अपमान, हे तर अहंकाराचे कडू–गोड रस आहेत. अपमान करणारा तर तुमचा कडू रस खेचण्यासाठी आला आहे, असे समजायचे. 'तुम्ही बेअक्कल आहात' असे म्हटले की समोरच्याने तो रस खेचून घेतला. जितका रस खेचला जातो तितका अहंकार तुटतो. आणि ते सुद्धा आपल्या मेहनतीशिवाय, दुसऱ्यानेच खेचून काढला. अहंकारात जो रस असतो, त्यास जर कुणी अजाणतेपणी काढला तर फारच झोंबते. म्हणून जाणूनबुजून सहजपणे अहंकार कापू द्यावा. समोरचा जर सहजपणे रस खेचून घेत असेल तर याहून उत्तम काहीच नाही. ही तर समोरच्याने केवढी मोठी मदत केली.

काहीही करून सर्व रसाचा निकाल लावला तर प्रश्न मिटेल. अहंकार तर उपयोगी आहे, त्याशिवाय संसार व्यवहार कसा चालेल? फक्त एवढेच की अहंकाराला निरस करून टाकायचे. आपल्याला जे धुवायचे होते ते दुसऱ्याने धुऊन दिले. आपला तर फायदाच आहे. आम्ही ज्ञानी पुरुष अबुध असतो आणि ज्ञानींजवळ इतकी शक्ती असते की ते स्वत:च अहंकाराचा रस खेचून घेतात. मात्र तुमच्याजवळ इतकी शक्ती नसते, त्यामुळे तुमच्या बाबतीत तर कुणी समोरुन अपमान करून अहंकारचा रस खेचण्यासाठी आले तर उलट खूश व्हावे.तुमची तेवढी मेहनत वाचली! तुमचे तर कामच झाले. आपण तर आपला फायदा झाला हेच पाहायचे. हा तर प्रचंड फायदा झाला म्हणायचा!

जर तुमचा कडू-गोड रस निरस झाला असेल तर अहंकाराचा स्वभाव हा तर नाटकीय आहे, तो तुमची सर्व कामे करून देईल. अहंकाराला ठार मारायचे नाही, निरस करायचे आहे.

जेवताना दुसऱ्याला प्रोत्साहित करण्यासाठी असेही बोलावे लागते की, वाह! कढी तर फार छान झाली आहे!

## हसत मुखाने विष पितो

समोरच्याचा अहंकार आपल्याकडून दुखावला गेला तर त्याला कडू लागेल. (दु:ख वाटेल) पण एकूण फायदा आपल्याला माहीत असल्यामुळे कुणाला कडू वाटेल असे आपल्याकडून झालेच नाही तर उत्तम!

'हसते मुखे झेर पीऐ, नीलकंठी खानदान,
नि:स्पृह अयाचकने, खपत मान-तान.'

('हसत मुखाने विष पितो, नीलकंठी खानदान,
नि:स्पृह अयाचकाला, नकोत मान-पान.')

आम्ही नीलकंठ आहोत. लहानपणापासून ज्यांनी ज्यांनी विष दिले ते आम्ही हसत मुखाने प्यायले, आणि वर त्याला आशीर्वाद दही दिले आणि त्यामुळेच तर नीलकंठ झालो.

विष तर तुम्हाला प्यावेच लागेल. तो तुमचा हिशोबच आहे, त्यामुळे विष नक्कीच समोर येईलच. मग तुम्ही हसत हसत प्या किंवा तोंड वाकडे करून प्या. प्यावे तर लागेलच. अरे, तुम्हाला अजिबात प्यायचे नसेल तरी सुद्धा लोक जबरदस्तीने प्यायला लावतील. त्यापेक्षा हसत हसत पिऊन, वरून त्याला आशीर्वाद देऊन का पिऊ नये? त्याशिवाय नीलकंठ कसे होता येईल? हे जे विष पाजायला येतात ते तर तुम्हाला उच्च पद देण्यासाठी येतात. तिथे जर तोंड वाकडे केले तर ते पद दुरावेल. आम्ही तर या संसारात ज्यांनी ज्यांनी विष दिले ते सर्व हसत मुखाने प्यायलो, वरून आशीर्वाद देऊन प्यायलो आणि महादेव झालो.

'मी चंदुलाल आहे' तोपर्यंत सर्व कडू वाटते. परंतु आपल्यासाठी तर हे अमृत झाले. मान-अपमान, कडू-गोड हे सर्व द्वंद्व आहेत. तर आता आपल्यासाठी द्वंद्व राहिले नाही, आपण द्वंद्वातीत झालो, म्हणून तर हा सत्संग करत आहोत ना! शेवटी सर्वांना द्वंद्वातीत दशाच प्राप्त करायची आहे ना!

समोरचा कडू प्यायला लावतो आणि तुम्ही जर ते हसत हसत आशीर्वाद देऊन पिऊन टाकले तर एका बाजूने तुमचा अहंकार धुतला जातो आणि तुम्ही तितके मुक्त होत जाता आणि दुसऱ्या बाजूने कडू पाजणाऱ्यात सुद्धा रिॲक्शन घडून येते आणि तो सुद्धा बदलतो. त्याच्यासाठीही हे फायद्याचे आहे. त्यालाही समजते की मी कडू पाजतो ती माझी निर्बळता आहे आणि हा तर हसत मुखाने पितो, म्हणजे हा केवढा शक्तिशाली आहे.

आपणच जर स्वत:ला कडू प्यायला लावले तर आपण पिऊ का? हे तर समोरून कोणी कडू पाजले तर ते किती उपकारी म्हणायचे. जी वाढते तिला तर आई म्हणतात. (जे आधी दिले होते) ते परत घेतल्याशिवाय गत्यंतरच नाही. नीलकंठ बनण्यासाठी कडू तर प्यावेच लागेल.

आपण 'चंदुभाऊ'ला (चंदुभाऊच्या जागी वाचकाने स्वत:चे नाव समजावे) सरळ सांगावे की तुला शंभरदा कडू प्यावे लागेल. मग काय,

त्याला सवय होईल. लहान मुलाला कडू औषध बळजबरीने पाजावे लागते. पण जेव्हा त्याला समजते की हे माझ्या हिताचे आहे तेव्हा मग त्याच्यावर बळजबरी करावी लागत नाही. मग तर तो स्वत:हूनच पितो. एकदा ठाम ठरवले की जो कोणी कडू देईल ते सर्व मी पिऊन टाकीन, तर आपण पिऊ शकतो. गोड तर पितो पण कडू सुद्धा पिता आले पाहिजे. कधी ना कधी तर प्यावेच लागेल ना? आणि हे तर उलट फायदेशीर आहे. तेव्हा कडू पिण्याची प्रॅक्टीस करायलाच हवी ना?

जर सर्वांदेखत आपला अपमान झाला तर नुकसान झाले असे वाटते पण त्यात तर मोठा फायदा आहे. हे समजल्यानंतर नुकसान झाले असे मुळीच वाटणार नाही!

'मी शुद्धात्मा आहे' असे तर बोलत आहात, मग त्या पदातच राहायचे आहे ना? त्यासाठी तर अहंकार (कोणाकडून) धुऊन घ्यावा लागेल. कठोर परिश्रम करण्याचा निश्चय केला म्हणजे नक्कीच धुतला जाईल.

एखाद्या डोंबाऱ्याला राजा बनवले असेल आणि राजगादी वर बसल्यानंतर तो जर म्हणाला की 'मी डोंबारी आहे', तर ते किती विचित्र वाटेल? शुद्धात्म्याचे पद प्राप्त केल्यानंतर आपल्याला आता इतर काहीच नसावे.

कडू-गोड अहंकाराच्या पदातून तुम्हाला सुटायचे आहे ना? मग तिथे पाय कशाला ठेवता? एकदा ठरवल्यानंतर दोन्ही बाजूस पाय ठेवता येईल काय? नाही येणार. रुसवा केव्हा होतो? जेव्हा कुणी कडू वाढतो तेव्हा. आपण विधी करताना बोलतो ना की 'मी शुद्धात्मा आहे,' तर मग शुद्धात्म्याचे रक्षण करायचे की दुसऱ्या बाजूचे? अहंकाराला स्वत: निरस करणे हे फार कठीण काम आहे, तेव्हा कुणी दुसरा जर त्यास निरस करून देत असेल तर फारच उत्तम. त्यामुळे अहंकार नाटकीय राहील आणि आतील सर्व चांगले चालेल. हे जर इतके फायदेशीर आहे तर अहंकाराला निरस करण्यासाठी हसत मुखानेच का पिऊ नये?

अहंकार संपूर्ण निरस झाला म्हणजे आत्मा पूर्ण झाला. इतके निश्चित करा की मला अहंकार निरस करायचाच आहे, मग तो निरस होतच राहील.

हे कडू औषध जर मानवले, तर दुसरा कुठलाही व्याप राहणार नाही. शिवाय तुम्हाला आता हेही समजले आहे की यात तर फायदाच आहे! जितके गोड वाटते तितकीच त्यात कटुता भरलेली असते. म्हणून आधी कडू पचवा, मग गोड तर सहज निघेल. त्याला पचवणे फार जड जाणार नाही. कडू औषध पचवले म्हणजे फार झाले! फुलांच्या वर्षावात सर्वच हसतात पण दगड पडतात तेव्हा?

## अदीठ तप म्हणजे काय?

अहंकार हा ज्ञेय स्वरूपी आहे. तुम्ही स्वतः ज्ञाता आहात. ज्ञेय-ज्ञाताचा संबंध आहे, तिथे ज्ञेयाचे रक्षण करायचेच नसते ना? एका अहंकाराचे (ज्ञेयाचे) रक्षण केले की सर्वांचे रक्षण करावे लागेल. कारण सर्वच ज्ञेय आहेत. अनंत ज्ञेय आहेत. आता तर अदीठ तप (जे बाहेर दिसू शकत नाही असे तप) करावे. अहंकार वगैरेत तन्मयाकार होऊ नये, इतके ध्यानात ठेवावे. जागृती ठेवायची तेच तप, अदीठ तप. हे अदीठ तप करावे लागते. कारण अनादी काळापासून तन्मयाकार होण्याचीच सवय लागली आहे. ती हळूहळू कमी होत जाते. अहंकार जसजसा कमी होत जातो तसतसे समाधान येत जाते. एकदा निश्चय केला की मग तप होतच राहते.

ज्या अहंकारात कधी बरकत आली नाही, जिथे तिथे ठोकर लागली, प्रत्येक जागी, सुंदर असूनही कुरूपच दाखवतो, तो अहंकार काय कामाचा? 'ज्ञेय' 'ज्ञाता' न होवो, हीच जागृती. तेच अदीठ तप. अहंकाराचा रस वितळून टाकण्यासाठी जी जागृती ठेवावी लागते तेच अदीठ तप.

अंतराय बाहेरून येतात तसेच आतून सुद्धा येतात. अहंकार अंतराय रूप आहे. त्याच्या समोर तर पूर्णपणे सज्ज राहावे लागेल.

कुणी मान दिला तरी सहन होईल असे नाही. ज्याला अपमान

सहन करता येतो तोच मान पचवू शकतो. कुणी दादांना विचारले की, 'लोक तुमच्यावर फुलांचा वर्षाव करतात तेव्हा तुम्ही त्याचा स्वीकार कशाला करता?' तेव्हा दादा म्हणाले 'घे मग, तुझ्यावर फुलांचा वर्षाव करतो! पण ते तुला सहन होणार नाही.' लोक तर हारांचा ढीग पाहून थक्क होतील! अरे, कुणाच्या पाया पडलो ना, तर ते त्याला सहनच होत नाही, तो लगेच उठून उभा राहतो.

## मान-अपमानाचे खाते

'जेव्हा अपमानाचे भय राहणार नाही तेव्हा कुणी अपमान करणार नाही.' असा नियमच आहे. जोपर्यंत भय आहे तोपर्यंत हा व्यापार आहे. भय गेले की व्यापार सुद्धा बंद. तुमच्या वहीखात्यात मान आणि अपमानाचे खाते असू द्या. जो कोणी मान-अपमान देईल त्यास वहीखात्यात जमा करून टाका, उधार ठेवू नका. कुणी वाटेल तेवढा मोठा किंवा लहान कडू डोस दिला (अपमान केला) तर तो खात्यात जमा करा. तुम्ही ठरवा की मला महिन्याभरात शंभर अपमान जमा करायचे आहेत. मग जितके जास्त येतील तितका जास्त फायदा. आणि शंभरच्या ऐवजी सत्तर मिळाले तर तीसचे नुकसान. मग दुसऱ्या महिन्यात एकशे तीस जमा करायचे. ज्याच्या खात्यात तीनशे अपमान जमा झाले त्याला मग अपमानाचे भय राहत नाही. तो मग पैलतीरी पोहोचतो. पहिल्या तारखेपासूनच खाते सुरू करून टाकायचे. इतके तर करू शकाल ना?

ज्ञानी पुरुषांना हात जोडून नमस्कार केला याचा अर्थ असा की व्यवहार अहंकार शुद्ध केला. आणि चरणी मस्तक टेकवून खरे दर्शन घेतले याचा अर्थ (आपला) अहंकार अर्पण केला. जितका अहंकार अर्पण केला जातो तितके (मोक्षाचे) काम होते.

ज्ञानी पुरुषांमध्ये दया नावाचा गुण नसतो, त्यांच्यात अपार करुणा असते. दया हा तर भयंकर अहंकारी गुण आहे. दया हा अहंकारी गुण कसा? तर दया हा द्वंद्व गुण आहे. द्वंद्व अर्थात जिथे दया असेल तिथे निर्दयता अवश्य असते. ती निर्दयता तर जेव्हा बाहेर निघते तेव्हा कळते.

तेव्हा तर तो संपूर्ण बाग उध्वस्त करून टाकतो. सगळे सौदे करून टाकतो. घर–दार बायको–मुले सर्व काही सोडून देतो. सारे जग द्वंद्वगुणात आहे. जोपर्यंत द्वंद्वातीत अवस्था प्राप्त होत नाही तो पर्यंत जगात दया हा वाखाणण्यासारखा गुण आहे. कारण तो त्याचा पाया आहे. तरी पण दया करावी ती स्वत:च्या सेफ साईडसाठी, भगवंतांच्या सेफ साईडसाठी नव्हे! लोकांवर दया करण्यासाठी निघतो तो तर स्वत:च दयापात्र असतो. अरे, तू स्वत:वरच दया कर की! दुसऱ्यांवर दया करायला कशाला निघालास? कित्येक साधू संसारी गृहस्थांवर दया करतात. अरेरे! या गृहस्थांची काय दशा होईल? असे त्यांना वाटते. अरे बाबा, त्यांचे जे व्हायचे असेल ते होईल, तू कोण त्यांची दया करणारा? तुझे काय होईल? अजून तुमचाच ठावठिकाणा नाही. तिथे लोकांची काळजी कशाला करता? ही तर भयंकर नशा आहे. या संसारी गृहस्थांची नशा तर तेल आणि साखरेसाठी आठ तास रेशनच्या लाईनीत उभे राहिल्यावर सहज उतरेल पण यांची नशा कशी उतरेल? उलट वाढतच जाते. निष्कैफीचा मोक्ष होतो असे भगवंतांनी सांगितले आहे. नशा ही तर अतिशय भयंकर, सूक्ष्म अहंकार आहे, तो तर फार मार खायला लावतो. हा सूक्ष्म अहंकार दाखवणारा तर कोणीतरी भेटेल सुद्धा की 'वेड्या, काय छाती काढून मिरवतोस? जरा विनम्र हो ना?' तेव्हा तो ताळ्यावर येईलही. पण हा सूक्ष्म अहंकार की, 'मी विशेष काही जाणतो, मी काही विशेष साधन प्राप्त केले आहे, मी जास्त जाणतो,' याची नशा तर कधीच उतरत नाही. अरे, जाणले असे केव्हा म्हणता येईल? ज्ञान प्रकाश होतो तेव्हा! आणि प्रकाशात कधी ठोकर लागेल काय? इथे तर पावलोपावली ठोकर लागते, 'मग मी जाणत आहे' असे कसे म्हणता येईल? स्वत:च जर अज्ञान दशेत ठोकरा खात असेल, त्याला दुसऱ्यांवर दया करण्याचा काय अधिकार आहे?

## अहंकाराचे विष

काही प्राप्त केल्याचा अहंकार वाढला की तो घसरलाच समजा. आपल्या ज्ञान घेतलेल्या महात्म्यांना ज्ञानाचा अहंकार आला तर 'दादा'

पाठीशी असल्यामुळे ते घसरणार तर नाहीत, पण ज्ञानावरण येईल. दैवीशक्तीच्या आविर्भाव झाला असेल आणि जर अहंकार वाढला तर जितक्या उंचीवर चढला असेल तितकाच खाली घसरेल. होत असते दैवीशक्तीमुळे आणि तिथे 'मी केले' असा अहंकार केल्याने अधोगतीत जातो. किंवा दैवीशक्तीचा दुरुपयोग केला तरी देखील अधोगतीत जातो. दैवी अहंकाराचे रिॲक्शन येते तेव्हा नरकगतीत जावे लागते.

लहान मुलांचा अहंकार सुषुप्तावस्थेत असतो. अहंकार असतो पण तो कॉम्प्रेस झालेला असतो. ते मग जसजसे वय वाढत जाते तसतसा अहंकार बाहेर येतो. लहान मुलांच्या खोट्या अहंकाराला पाणी पाजले नाही तरच ती मुले शहाणी होतात. त्यांच्या खोट्या अहंकाराला जर पोषण देण्यासाठी तुमच्याकडून खाद्य (पोषण) मिळाले नाही तर मुले सुंदर-सुसंस्कारी होतात.

जगातील लोकांसोबत गुंता निर्माण करूच नका. लोक तर स्वत:च्या अहंकाराचे पोषण शोधत असतात. म्हणून त्यांच्याशी जर गुंता वाढवायचा नसेल तर त्यांचा अहंकार पोसून पुढे निघून जावे. नाही तर तुमच्या प्रगतीच्या मार्गात बाधा येईल. अहंकारी मनुष्य स्वत:च्या अहंकारामुळे गुंता वाढवत राहतो. अहंकारीला लोभाची गाठ पडत नाही.

उच्च विचारशक्ती, समजण्याची शक्ती असेल त्यांना कल्चर्ड म्हटले जाते. कल्चर्ड माणसात अहंकाराचे विष जास्त प्रमाणात असते. ममतेचे विष सुद्धा फार बाधक असते. ममता सुटेल पण अहंकार मात्र सुटण्यातला नाही.

काही माणसे आत्महत्या करतात, हा तर भयंकर अहंकार आहे. अहंकार जेव्हा भग्न होतो, अहंकाराला कुठूनही जरा सुद्धा पोषण मिळत नाही तेव्हा शेवटी आत्महत्या करतो. आणि त्यामुळे भयंकर अधोगती ओढवून घेतो. अहंकार जितका कमी तितकी उर्ध्व गती होते आणि अहंकार जितका जास्त तितकी अधोगती होते.

कुणी जीव मारण्याचा अहंकार करतो तर कुणी जीव वाचवण्याचा

अहंकार करतो, भगवंतांनी दोघांनाही अहंकारीच म्हटले आहे. कारण जीवाला मारण्याची किंवा वाचवण्याची कुणाचीही शक्ती नाही. त्यांची सत्ताच नाही. फक्त अहंकारच करतात की मी जीव वाचवला, मी जीव वाचवला, मारणारा आणि वाचवणारा दोन्हीही अहंकारीच आहेत. वाचवणाऱ्याला उर्ध्वगती मिळते आणि मारणाऱ्याला अधोगती मिळते. दोन्हींमध्ये बंधन तर आहेच.

सिंह जबरदस्त अहंकारी असतो. सिंह तर तिर्यंचांचा (जनावरांचा) इंद्र आहे. तो सर्व योनीत भटकत भटकत आला आहे, पण त्याला कुठेही सुख प्राप्त झाले नाही. तेव्हा आता जंगलात अहंकाराची गर्जना आणि विलाप करतो. सुटण्याची इच्छा आहे, पण मार्ग मिळत नाही. मार्ग मिळणे अति अति दुर्लभ आहे आणि त्यात सुद्धा 'मोक्षदाता' यांचा योग जुळून येणे हे तर अति अति दुर्लभ आहे. अनेक योग जुळून आले आणि विखुरलेही गेले. परंतु ज्ञानींचा योग जुळून आला तरच कायमची मुक्ती मिळेल.

## अहंकाराचे समाधान

हे जे रूपक (दृश्य जगत) दिसत आहे तो संसार नाही. अहंकार हाच संसार आहे. तर अशा संसारात सर्व काही नीट सांभाळू शकलो नाही तरी काय हरकत आहे? एका माणसाने आपल्याला पाचशे रुपयांचा धोका दिला असेल आणि पैसे परत करताना त्याने जर आपल्या अहंकाराचे समाधान केले नाही, तर पैसे वसूल करण्यासाठी आपण त्याच्यावर केस वगैरे करून त्याच्या नाकी नऊ आणतो. आणि नंतर जेव्हा तो आपल्या पाया पडतो, रडतो तेव्हा आपला अहंकार संतुष्ट होतो, मग आपण त्याला सोडून देतो.

हा अहंकार तर असा आहे की कोणालाही, तो जिथे बसला असेल, त्या बैठकीचा अभाव होऊ देत नाही. साध्या मजुराला सुद्धा अहंकारामुळेच स्वत:च्या झोपडीची ममता असते आणि त्यातच तो सुख मानतो. शेवटी असा अहंकार करून सुद्धा स्वत:ला सुखी मानतो की

आपण कुत्र्यांपेक्षा, जनावरांपेक्षा तर सुखी आहोत ना? अहंकारामुळे सगळीच माणसे, त्यांना जे काही प्राप्त झाले आहे त्यात कधी अभाव होऊ देत नाहीत.

अहंकारामुळे भेद पडतो, संप्रदाय अस्तित्वात येतात. ज्ञानी पुरुष निरहंकारी असतात. त्यांच्यामुळे तर सर्व संप्रदाय एक होतात. आधी भेद पाडायचे आणि मग रामराज्य उपभोगायचे, अहंकारी लोकांचे हे कामच आहे.

## अटकण आणि सेन्सिटिवनेस

काही माणसे फार सेन्सिटिव (संवेदनशील) असतात. सेन्सिटिवनेस हा अहंकाराचा प्रत्यक्ष गुण आहे. काही व्यावहारिक गोष्टी चालत असतील आणि जर मी विचारले की, बडोद्याहून येताना काय भानगड झाली होती? तेव्हा मधेच कुणी बोलू लागला तर तो सेन्सिटिव माल म्हणायचा. *अटकण* (अटकाव) सुद्धा विशेष करून अहंकाराचीच असते. *अटकण* म्हणजे काय? तर घोडा खूप ताकदवान असेल पण मस्जिद किंवा कब्रस्तानासारखे काही दिसले की तो तिथेच अडून उभा राहतो, पुढे जातच नाही, त्यास म्हणतात *अटकण.* प्रत्येक मनुष्याला *अटकण* तर असतेच. अटकणीनेच सर्वांना भटकायला लावले आहे. अटकणमुळे भटकण, आणि भटकणमुळे लटकण झाली. आम्ही सटकण (सुटण्याचे मार्ग) दाखवतो. अटकणीचा अहंकार चालेल परंतु सेन्सिटिवचा अहंकार चालणार नाही. तो जोपर्यंत आहे तोपर्यंत प्रगती होतच नाही. *अटकण* तर पाहात राहिल्याने सुटते. परंतु सेन्सिटिविटीच्या गुणाला तर खूप जोर देऊन, फार जागृती ठेवून, जबरदस्त ब्रेक मारून तोडले तरच तुटेल. माल तर जसा भरला असेल तसाच निघेल. पण त्यास पाहात राहा. ज्ञानींनी संपूर्ण प्रकाशधन आत्मा दिला आहे, तरी सुद्धा तोंड बेचव होते याचे काय कारण? तर *अटकण* आणि सेन्सिटिवनेस आहे म्हणून. सेन्सिटिव माणसाचा आत्मा तर एकाकार होऊन जातो, तन्मयाकार होऊन जातो. शुद्धात्मा तन्मयाकार होऊन जातो त्यामुळे बेचवपणाचा अनुभव होतो. तुम्ही कुठे वळला आहात ते ओळखा. तुम्ही प्रकाशमार्गावर चालत असाल, ज्ञानमार्गावर चालत असाल तरीही तिथे काळोख का दिसतो?

तर *अटकण* आणि सेन्सिटिव झाल्यामुळेच. आणि त्यास जाणल्यानेच हा सेन्सिटिव गुण निघून जाईल. तुम्ही जो माल भरून आणला आहे तो 'पाहिल्याने' आणि 'जाणल्याने' निघूनच जाईल, तेव्हा ज्ञाता-द्रष्टा राहा. त्यामुळे *अटकण* नष्ट होईल परंतु सेन्सिटिवनेस लवकर जाणार नाही. सेन्सिटिव झाला म्हणजे आत इलेक्ट्रिसीटी उत्पन्न होते. त्यामुळे आत (शरीरात) ठिणग्या उडतात आणि अनंत जीव मरतात! विशेष जागृती राहिली तर काही अडचण येणार नाही. भरलेल्या मालाचा निकाल होऊन जाईल. गोष्टीत काही दम नाही आणि या *अटकण* व सेन्सिटिविटीच्या मालाची भुताटकी लागली आहे!

## अंतःकरणाचे संचालन

हा संसार कशामुळे उभा राहिला आहे? अंतःकरणात मनाने आरडाओरडा सुरू केला की स्वतः फोन उचलून 'हॅलो, हॅलो' करतो, अहंकार चित्ताचा फोन उचलतो, बुद्धीचा फोन उचलतो म्हणूनच. मन-बुद्धी-चित्त-अहंकार कोणते धर्म निभावतात ते पाहा आणि जाणा. 'आपल्याला' कुणाचाही फोन उचलायचा नसतो. डोळे, कान, नाक वगैरे कोणकोणते धर्म बजावतात त्याचे आपण ज्ञाता-द्रष्टा. जर मनाचा किंवा चित्ताचा किंवा कुणाचाही फोन उचलला तर सगळीकडून त्राही माजेल. खरे तर, ज्याचा फोन असेल त्यालाच उचलू द्यावा. 'स्वतः' फोन उचलू नये.

अरे, तू कधी शोध घेतला आहेस का की खाल्ल्यानंतर आतड्यात किंवा जठरात काय होते ते? प्रत्येक अवयव आपल्या गुणधर्मातच आहे. कान त्याच्या ऐकण्याच्या गुणधर्मात नसेल तर ऐकू येणार नाही, नाक त्याच्या गुणधर्मात नसेल तर सुगंध किंवा दुर्गंध येणार नाही. त्याचप्रमाणे मन-बुद्धी-चित्त-अहंकार सर्व आपापल्या गुणधर्मात बरोबर चालत आहेत की नाही, याकडे लक्ष द्यायचे आहे. 'स्वतः' शुद्धात्म्यात राहिलात तर कसलीच अडचण येणार नाही. अंतःकरण स्वतःच्या गुणधर्मात राहील जसे की मन पॅम्फलेट दाखवण्याचे काम करेल, चित्त फोटो दाखवेल, बुद्धी डिसिजन घेईल आणि अहंकार सही करेल. म्हणजे सर्व सुरळीत चालत राहील. ते त्यांच्या गुणधर्मात राहतील आणि शुद्धात्मा स्वतःच्या

गुणधर्मात राहील, ज्ञाता-द्रष्टा पदात राहील तर काहीच अडचण येण्यासारखी नाही. प्रत्येक आपापल्या गुणधर्मातच आहेत. अंत:करणात कोणकोणते गुणधर्म बिघडले आहेत त्याची चौकशी करायची आणि जर बिघडले असतील तर कसे सुधारायचे इतकेच करायचे आहे. पण हा तर म्हणतो 'मी विचार केला,' 'मीच बोलत आहे,' मीच करत आहे. हे हात-पाय सुद्धा आपापल्या गुणधर्मात आहेत, पण म्हणतो की, मी चाललो. मात्र अहंकारच करत राहतो आणि अहंकारालाच स्वत:चा आत्मा मानून घेतला आहे, त्यामुळेच गडबड झाली आहे.

मनाचे गुणधर्म बिघडले असतील तर कळत नाही का? घरात कुणी म्हातारी बाई आली असेल आणि ती दिवसभर किटकिट करत असेल परंतु पाच-पंधरा दिवस आपण तिच्याशी कोणताही वाद घातला नाही, तर मग सवय होऊन जाते. तसेच या मनात दारुगोळा फुटत असतो आणि आपल्याला त्याची सवय झाली आहे. त्यामुळे आपल्याला कळतच नाही की हा कुठला दारुगोळा फुटत आहे? त्याचा सराव झालेला आहे. उलट-सुलट दारु जमा झालेली आहे. आपल्याला वाटते की ही फुलबाजी आहे पण फुटते हवाईबाणासारखी. तसेच मनात सुद्धा जे उलट-सुलट भरले होते, ते तसेच फुटत आहे. त्या म्हाताऱ्याबाई प्रमाणेच मनाशी काही भानगड केली नाही तर सवय होऊन जाईल. मनाच्या कटकटीचा म्हतारीच्या कटकटीसारखा सराव होऊन जातो. 'आपला' तर या मन-बुद्धी-चित्त-अहंकाराशी 'ज्ञाता-ज्ञेयाचा' संबंध आहे. आपण ज्ञाता आणि अंत:करण हे ज्ञेय. फक्त ज्ञेय-ज्ञाता हाच संबंध, अन्य कुठलाही संबंध नाही. त्यामुळे ते 'आपल्यापासून' पूर्णपणे भिन्नच राहते.

हे जे लोक हिप्नोटाईज करतात ते अंत:करणावर करतात. अंत:करणाच्या सर्व भागांवर झडप घालतात. आधी चित्तावर झडप घालतात नंतर बाकीचे सर्व त्यांच्या ताब्यात येते. अंत:करणावर परिणाम झाला म्हणजे बाह्यकरणावर सुद्धा परिणाम दिसून येतो. प्रथम अंत:करणावर परिणाम होतो. मन शून्य झाले की बाह्यकरण त्याच्या म्हणण्यानुसार

वागते. हिप्नोटाईज झाल्यानंतर स्वत:चे भान राहत नाही. स्वत: शून्यच होऊन जातो. नंतर भान आल्यावर काय घडले होते ते सुद्धा त्याला आठवत नाही. संपूर्ण अंत:करणात शून्यता पसरते, तिथे मग भान कसे राहील! हिप्नोटिजम सर्वांवर होऊ शकत नाही. ते सुद्धा हिशोब असेल तरच होऊ शकते. हे तर रूपक आहे. हिप्नोटिजमचा परिणाम काही काळापुरताच राहतो, जास्त वेळ टिकत नाही.

देहासोबत अंत:करणाची भेट चरणी ठेवून एकच तास ज्ञानी पुरुषांच्या सानिध्यात बसलात तर जगाचे मालक होऊ शकता. आम्ही त्या एका तासातच तुमच्या पापांना जाळून भस्मसात करून टाकतो आणि दिव्यचक्षु तुमच्या हाती देतो, शुद्धात्मा बनवतो. नंतर तुम्हाला जिथे जायचे असेल तिथे जा की! हे ज्ञान तर थेट मोक्षापर्यंत तुमच्या सोबतच राहील. इथे आमच्या उपस्थितीत अंत:करणाची शुद्धी होत राहते. त्यात आणि जर दु:खे असतील तर ती सुद्धा मिटतात. आणि वर शुद्धी होत राहते. त्या शुद्धीमुळे तर खरा आनंद उत्पन्न होतो! कायमची शांती लाभते.

**प्रश्नकर्ता :** हे भक्त माळ जपतात तेव्हा अंत:करणात कोणकोणत्या क्रिया चालत असतात? मनात जप करतात, बाहेर हाताने माळेचे मणी फिरवतात आणि चित्त तर इतर गोष्टीत गुंतलेले असते. हे कसे? त्यावेळी तिथे कोणते मन कार्य करत असते?

**दादाश्री :** मनात एकदा ठरवले की माळ जपायची आहे म्हणजे मग माळ जपणे आपोआपच सुरू होते. हात हाताचे काम करत असते त्यावेळी मन आणि अहंकार अंत:करणात कार्यरत असतात. चित्त जागेवर नसते. चित्त बाहेर भटकत असते, तेव्हा हा म्हणतो 'मी माळ जपली,' असा अहंकार करतो. त्यामुळे पुढच्या जन्मासाठी बीज पेरतो. आज तो जे करत आहे ते पूर्णपणे डिस्जार्च आहे. डिस्चार्ज होत आहे आणि त्यावर तो अभिप्राय देतो. जसा अभिप्राय बांधला जातो तसे फळ येते. चांगल्या भावनेने अभिप्राय दिला की, ही मी माळ जपतो, पण माझे चित्त काही जागेवर राहत नाही. चित्त जपात राहिले तर बरे. त्यामुळे मग पुढच्या जन्मी तसे फळ प्राप्त होते. आणि कुणी म्हटले की ही

माळ लवकर आटोपली तर बरे. तो असा अभिप्राय देतो त्यामुळे पुढच्या जन्मी माळ जपायचे लवकर पूर्ण होईल, असे फळ प्राप्त होते.

जसा अभिप्राय वर्तत असतो त्यानुसार पुढच्या जन्मासाठी बीज पेरतो. तिथेच चार्जिंग होत असते.

ही मुले अभ्यास करतात तेव्हा जर त्यांचे मन-बुद्धी-चित्त-अहंकार चारीही हजर राहिले तर एकदाच वाचन करावे लागेल. परत वाचनाची गरजच उरत नाही! पण हे तर वाचतात इथे आणि चित्त तिथे क्रिकेटमध्ये असते. त्यामुळे वाचलेले सर्वच व्यर्थ जाते. या पलंगाचा एक पाय जर तुटलेला असेल तर काय होईल? कसा परिणाम येईल? तसेच या अंत:करणाचे सुद्धा आहे! कविने गायले आहे की,

*'भीडमां एकांत एवी स्वप्नमयी सृष्टीमां,*
*सूणनारो 'हुं' ज ने गानारो 'हुं' ज छुं'*

('गर्दीत एकांत अशा स्वप्नमयी सृष्टीत,
ऐकणाराही 'मी'च आणि गाणाराही 'मी'च आहे.')

मुंबईच्या लोकल ट्रेनमध्ये संध्याकाळच्या वेळी अलोट गर्दी असते. त्यात इथूनही धक्का लागतो आणि तिथूनही धक्का लागतो. तेव्हा मन-बुद्धी-चित्त-अहंकार, हे सर्व या गर्दीत चेंगरले जातात. सर्व एन्गेज्ड (व्यस्त) असतात. तेव्हा 'स्वत:ला' (शुद्धात्म्याला) पाहाण्या-जाणण्याची खरी मजा असते. तेव्हाच तो एकटा असतो आणि तेव्हाच त्याला खरे स्वातंत्र्य मिळते. खरे तर, जितकी गर्दी जास्त आणि जितकी 'ज्ञेये' जास्ती तितकी 'ज्ञात्याची' 'ज्ञानशक्ती' सुद्धा गजब उमलत जाते. एकीकडे गर्दीत असेल तेव्हा दुसरीकडे 'ज्ञाता' सुद्धा गजब उमलतो, पूर्ण प्रकाशमान होतो. जितका स्कोप वाढला तितकी शक्ती सुद्धा वाढली. कित्येक तर सर्व काही सोडून जंगलात जातात, पण खरी मजा तर गर्दीतच असते. बाहेर गर्दी, आत गर्दी, सगळीकडेच गर्दी असते तेव्हा शुद्धात्म्याला खरा एकांत सापडतो. तेव्हा तो अजिबात कशातही तन्मयाकार होत नाही. परंतु असे तर स्वरूपज्ञान प्राप्त झाल्यानंतरच शक्य असते.

## ऐच्छिक आणि अनिवार्य

जग कसे चालत आहे हे समजणे कठीण आहे. या जगात सर्व काही अनिवार्य आहे आणि त्यास आपण ऐच्छिक समजून चालतो, त्यामुळेच तर फसलो आहोत. जन्म झाला तो अनिवार्य, शिक्षण घेतले ते सुद्धा अनिवार्य, लग्न केले तेही अनिवार्य आणि मृत्यु होईल तो सुद्धा अनिवार्य. एक अंश सुद्धा आपल्या मर्जीनुसार नाही, अरे, एक *समय* (काळचक्राचा सर्वात लहान, अविभाज्य भाग) सुद्धा मर्जीनुसार मिळाले असे सांगणारा माणूस जगात सापडणे दुर्लभ आहे! स्वत: जेव्हा पुरुष पद प्राप्त करतो तेव्हाच त्याला मर्जीचे स्वातंत्र्य लाभते. आणि तेव्हापासूनच अनिवार्य असलेल्या या जगात ऐच्छिकता उत्पन्न होते. पुरुष झाल्यानंतरच पुरुषार्थ होऊ शकतो. जन्मापासून तिरडी निघेपर्यंत सर्व काही अनिवार्यच आहे. अनंत जन्म अनिवार्यतेतच भटकलो आहोत आणि त्यातच भटकणे भाग आहे, जोपर्यंत यातून सोडवणारे ज्ञानी पुरुष भेटत नाहीत, तोपर्यंत!

मुलाबाळांचे पालन–पोषण करणे, त्यांना शिक्षण देणे, लग्न लावून देणे, त्यांना मार्गी लावणे हे वडिलांसाठी अनिवार्यच आहे. अनिवार्य म्हणजे ड्यूटी बाउन्ड – कर्तव्यबद्ध आणि ऐच्छिक म्हणजे विल बाउन्ड – मर्जीनुसार. लोक अनिवार्यलाच ऐच्छिक मानतात. अरे, तुझी विलिंगनेस (सहमती) ज्या बाजूला आहे त्या बाजूने संसार तुला घेरत राहिला आहे. अनिवार्य आहे त्यात ऐच्छिकचे चित्रण करत बसले आहेत. जी बदलता येते ती विलपॉवर आहे. काही मुले वडिलांना उलट उत्तर देतात, तेव्हा वडील रागाच्याभरात त्याला सुनावतात की, 'मी तुला लहानाचे मोठे केले, शिक्षण दिले, मार्गी लावले. अरे, पण त्यात तू नवीन काय केलेस?' ते तर अनिवार्यच होते. तू स्वेच्छेने काय केलेस ते बोल की!

देवगतीत क्रेडिट (पुण्य) उपभोगण्यासाठी जावे लागते ते देखील अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे डेबिट (पाप) भोगणे हे सुद्धा अनिवार्य आहे. ही जी तुम्ही नोकरी करता, ती काय स्वेच्छेने करता? नाही, अनिवार्य आहे म्हणून करता. एखादी गोष्ट तरी तुम्ही तुमच्या इच्छेनुसार केली असे तुम्हाला वाटते का? हे तर जे काही घडत असते ते जर

तुमच्या इच्छेनुसार असेल तर मानून घेता की स्वत:च्या इच्छेने केले आणि इच्छेविरुद्ध घडले तर म्हणता की अनिवार्य आहे. अरे, दोन्हीही अनिवार्यच आहेत. इच्छा सुद्धा अनिवार्य आहे.

या सर्व क्रियांना थांबवणे शक्य नाही. सर्वच अनिवार्य आहे. आणि निरंतर बंधनरूप आहे. मर्जीने केले किंवा मर्जीविरुद्ध केले, ही केवळ एक कल्पनाच आहे. जे ऐच्छिक आहे त्याचे तर भानच नाही. अनिवार्य असेल तिथे कर्तेपणा पूर्णपणे नष्ट होतो! आणि ऐच्छिकतेत स्वत: कर्ता बनून बसतो. ऐच्छिक मानणे हा इगोइजमच आहे. पैसे कमावतो तेव्हा म्हणतो की 'मी कमावले' आणि नुकसान झाले तर 'देवाने केले' असे म्हणतो, हाच तर विरोधाभास आहे, इगोइजम आहे. संसाराला ऐच्छिक मानतात त्यामुळे पाप-पुण्याचे बंधन होत असते. जर अनिवार्य मानले तर कुठलेही बंधन होणार नाही.

लग्न केले ते ऐच्छिक होते की अनिवार्य?

**प्रश्नकर्ता :** आधी ऐच्छिक वाटत होते, पण आता अनिवार्य वाटते.

**दादाश्री :** हे तुमचे नाव आहे ते अनिवार्य आहे की ऐच्छिक? अनिवार्यच. कारण लहानपणापासूनच दिले आहे. तेच नाव चालवून घ्यावे लागते. पसंत असो किंवा नसो, गत्यंतरच नाही ना! हे तर अनिवार्य आहे आणि आपणहूनच घडत राहते. 'संसाराच्या समसरण मार्गात तिसऱ्या मैलाच्या चौथ्या फर्लांगावर असेच होणार,' याचा अर्थ अनिवार्यपणे तसेच करावे लागते. अनिवार्य असते तिथे पोलिस दंडुके मारून करवून घेतो. बाहेर जसे पोलिस आहेत तसेच आत सुद्धा आहेत. तर हे आतले पोलिस या सर्व भोवऱ्यांना (माणसांना) फिरवतात. एक दिवस मी ओट्यावर बसलो होतो. दोन-चार माणसे मिळून एका बैलाला ओढून नेत होते. त्या बैलाचे नाक तर तुटायलाच आले होते, आणि त्याला मागून मारत होते. तरी पण तो बैल हलायलाच तयार नव्हता. म्हणून मी त्यांना विचारले, 'अहो! असे का करता? हा बैल पुढे का जात

नाही?' त्यावर त्यांनी सांगितले 'काल आम्ही या बैलाला दवाखान्यात घेऊन गेलो होतो. त्याची त्याला धडकी भरली आहे. म्हणून तो आज हलायलाच तयार नाही.' काहीही झाले तरी गेल्याशिवाय सुटकाच नव्हती. नाक खेचतील, दंडे मारतील, आरी खुपसतील तरीही जाणे भागच होते तर मग सरळपणे गेलेलेच बरे, नाही का? शेवटी मार खाऊनही करावे तर लागतेच त्यापेक्षा खुशीने का करू नये? अरे, जगात सर्वच अनिवार्य आहे, म्हणून शहाण्यासारखे वाग ना! नाही तर बैलाप्रमाणे तुलाही लोक दंडुके मारतील.

जगाने दिलेले विष तुझी लाख इच्छा नसली तरी तुला अनिवार्यपणे प्यावेच लागेल, शेवटी मार खाऊनही प्यावेच लागेल. रडत रडत पिण्यापेक्षा हसत मुखाने पिऊन, नीलकंठ हो! त्यामुळे तुझा अहंकार रस चांगल्या प्रकारे वितळेल आणि तू महादेव बनशील! आम्ही सुद्धा असेच महादेव बनलो आहोत!

महावीर भगवंतांना सुद्धा त्याग करणे अनिवार्य होते. त्यांचे ऐच्छिक तर वेगळ्याच प्रकारचे होते. ते स्वतः स्वतंत्र झाले होते. पुरुष पद प्राप्त केले होते, आणि ऐच्छिकता उत्पन्न झाली होती. परंतु बाहेरील भागात अनिवार्य होते. म्हणून ते लक्ष्य चुकत नव्हते. पत्नीचा त्याग केला ते सुद्धा त्यांच्यासाठी अनिवार्य होते, म्हणून त्याग केला. लोक त्यास स्वेच्छेने केले असे मानतात. आमचे महात्मा जे अनिवार्य रूपाने करतात ते वैभव आणि स्वेच्छेने करतात तो मोक्ष! वैभवासोबत मोक्ष, असे या दादा भगवानांचे 'अक्रम ज्ञान' आहे!

## जगाचे अधिष्ठान

संपूर्ण जग, 'जगाचे अधिष्ठान' शोधत आहे पण ते सापडणे अवघड आहे. 'प्रतिष्ठित आत्मा' हे या जगाचे सर्वात मोठे अधिष्ठान आहे. आज जगाचे खरे अधिष्ठान नॅचरली प्रकट झाले आहे, आमच्या द्वारे.

तुम्ही स्वतः 'शुद्धात्मा', मग आत दुसरे कोण राहिले? आतील सूक्ष्म क्रिया कोण करतो? तर हे सर्व प्रतिष्ठित आत्म्यामुळे होत असते.

प्रतिष्ठित आत्मा म्हणजे मागील जन्मात जे जे कर्म केले होते, जी जी प्रतिष्ठा केली होती त्यामुळे प्रतिष्ठित आत्मा तयार झाला. प्रतिष्ठा कशी केलेली? तर, 'मी चंदुभाऊ,' 'हा माझा देह,' 'हे माझे मन,' 'जे जे काही झाले, ते मी केले.' अशी सर्व प्रतिष्ठा केली. तो मग परत प्रतिष्ठित आत्मा बनून या जन्मी देहात येतो. दुसऱ्या शब्दात हा 'आरोपित आत्मा' आहे. तो सर्वत्र आरोपण करतो. विसर्जन होत असते तेव्हा सूक्ष्म रित्या सर्जन करतो. पण हे सर्व कसे समजेल? जे सर्जन होत असते ते नव्या प्रतिष्ठित आत्म्याचे होत असते. आता हे कसे कळेल?

प्रतिष्ठित आत्मा केव्हा म्हटला जातो? जेव्हा अहंकार (मी) आणि ममता (माझे) दोघांना एकत्र करतो तेव्हा. 'हा मी नाही' आणि 'हे माझे नाही' हा निर्विकारी संबंध आहे 'हा मी आहे' आणि 'हे माझे आहे' हा विकारी संबंध आहे. विकारी संबंध प्रतिष्ठित आत्म्याचा आहे. शुद्धात्मा तर निर्विकार आहे.

प्रतिष्ठित आत्माच हे सर्व करत आहे. 'शुद्धात्मा' काहीच करत नाही. हिंडणे फिरणे हे सर्व अनात्म्याचे गुणधर्म आहेत, आत्म्याचे नाहीत. आत्मा रात्रीही झोपत नाही आणि दिवसाही झोपत नाही. अनात्मा भागच झोपत असतो. जो क्रिया करतो तोच झोपत असतो. जो क्रिया करतो त्यालाच विश्रांतीची गरज असते. शुद्धात्मा तर क्रिया करतच नाही, मग त्याला विश्रांतीची काय गरज? विश्रांती कोण शोधतो, ज्याला विश्रांतीची गरज आहे तो. तो कोण? तर प्रतिष्ठित आत्मा. या सर्व क्रिया प्रतिष्ठित आत्म्याच्या आहेत. प्रतिष्ठित आत्म्याला झोप चांगली लागली की नाही, हे जाणले कुणी? त्याची क्रिया जाणली कुणी? तर शुद्धात्म्याने. शुद्धात्मा प्रतिष्ठित आत्म्याच्या कोणत्याही क्रियेत दखल करतच नाही. केवळ पाहतो आणि जाणतो. दखल तर प्रतिष्ठित आत्म्याची आहे. प्रतिष्ठित आत्मा जे जाणतो, ते ज्ञेय आहे आणि प्रतिष्ठित आत्म्याला जो ज्ञेय स्वरुपात जाणतो, तो शुद्धात्मा आहे. प्रतिष्ठित आत्मा दखल का करतो? कारण तो इंटरेस्टेड आहे. शुद्धात्म्याला इंटरेस्ट नाही, तो तर ज्ञाता-द्रष्टा आणि परमानंदी आहे. 'शुद्धात्मा' हा स्व-पर प्रकाशक आहे, जेव्हा की

प्रतिष्ठित आत्मा परप्रकाशक आहे. शुद्धात्मा प्रतिष्ठित आत्म्याला सुद्धा पाहतो आणि जाणतो. म्हणून प्रतिष्ठित आत्मा ज्ञेय आहे. शुद्धात्मा आणि प्रतिष्ठित आत्मा, यांचा फक्त ज्ञाता-ज्ञेयाचा संबंध आहे.

अज्ञानी विचारेल की, 'मग दु:ख कुणाला होत आहे?' अरे वेड्या, दु:ख तुलाच होत आहे. तू आत्मा नाहीस का? तू आत्माच आहेस, पण प्रतिष्ठित आत्मा! तुझा आरोपित आत्मा! अस्सल मूळ आत्म्याला, शुद्धात्म्याला तर तू जाणतच नाहीस, ओळखतही नाहीस, तेव्हा तुला ते रूप कसे म्हणता येईल? हो, तू जर शुद्धात्माला जाणलेस, ओळखलेस आणि त्यातच निरंतर राहिलास, तर तू शुद्धात्मा, आणि जर तू चंदुलाल आणि हा देह तुझा, तर तू प्रतिष्ठित आत्मा. अहंकार आणि ममतेची प्रतिष्ठा केलीस म्हणून तू प्रतिष्ठित आत्मा आहेस.

जपानच्या लोकांनी एक मोटार बनवली. तिला अशी चावी दिली की ती पाच किलोमीटर अंतरावर जाऊन थांबेल. नंतर चार माणसे त्या मोटारीत बसली. चावी दिल्यामुळे मोटार तर चालू लागली. आता मोटारीला चावी देणारा ज्याला भेटायला जात होता तो माणूस वाटेतच दीड किलोमीटरच्या अंतरावरच भेटला आणि त्यांना म्हणाला, 'जय सच्चिदानंद, अरे, थांबा, थांबा.' पण हा बापडा कसा थांबू शकेल? एकदा चावी दिल्यावर मोटार कशी थांबेल? ती मग पाच किलोमीटर गेल्यावरच थांबेल ना?

**प्रश्नकर्ता :** मग तर तो यू टर्न मारेल.

**दादाश्री :** ही तर समजण्याची गोष्ट आहे. त्याला म्हणेल, 'तुम्ही थांबा!' आणि मग तिथल्या तिथेच गोल-गोल फिरून बाकीचे अंतर पूर्ण करेल, गोल-गोल गरबा फिरत राहील.

असे आहे हे जग! स्वत: चावी दिली म्हणून, चालवणाऱ्यालाही गरब्यासारखे गोल-गोल फिरावे लागते. प्रतिष्ठा करतो स्वत:च आणि जेव्हा नैसर्गिकरित्या विसर्जन होते तेव्हा मग फसतो.

जो ऐकणारा आहे तो प्रतिष्ठित आत्मा, डोळ्यांनी पाहतो तो

प्रतिष्ठित आत्मा. पाच इंद्रियांनी अनुभव करतो तो प्रतिष्ठित आत्मा. प्रतिष्ठित आत्म्याने काय जाणले, काय अनुभवले त्यास पाहतो आणि जाणतो तो 'शुद्धात्मा'. इंद्रियगम्य ज्ञान तो प्रतिष्ठित आत्मा, अतींद्रिय ज्ञान तो शुद्धात्मा. प्रतिष्ठित आत्मा हे इनडायरेक्ट आणि लिमिटेड ज्ञान आहे. शुद्धात्मा म्हणजे डिरेक्ट आणि अनलिमिटेड ज्ञान आहे. प्रतिष्ठित आत्म्याने चार्ज केलेल्या शक्तीचे गलन होत राहते. शेवटी प्रतिष्ठित आत्मा आणि शुद्धात्मा, दोघेही एकाच वेळी वेगळे होतील. निर्वाण होते तेव्हा शुद्धात्मा निराकारी असून देखील अंतिम देहाच्या दोन तृतीयांश प्रमाणात साकारी असतो. जगात जे स्थूल किंवा सूक्ष्माचे आदान-प्रदान होत असते, ते सर्व प्रतिष्ठित आत्म्याचेच आहे. बाकी तर कुणी कोणाला लुटू शकत नाही आणि कुणी लुटला जातही नाही. ही तर प्रतिष्ठित आत्म्याने केलेल्या प्रतिष्ठेचे आदान-प्रदान सुरू आहे!

प्रतिष्ठित आत्म्याला जाळले तर भयंकर पाप लागते. कशामुळे? कारण तो त्याचा मानलेला (आत्मा) आहे, आरोपित आहे. हे टेबल जाळले तर पाप लागत नाही परंतु जर कुणी असे आरोपण केले असेल, कुणी प्रतिष्ठा केली असेल की हे टेबल माझे आहे तर भयंकर पाप लागेल. भोक्तापदात ममता सामावलेली असते. भोक्तापदात माझेपणाचे आरोपण केलेले असते. भोक्तापदात जी ममता केली आहे त्याचेच हे सामान आहे. जशी प्रतिष्ठा केली जाते तसे फळ मिळते. सुखाची केली तर सुख मिळते. आवडते-नावडते वाटते ते आपण केलेल्या प्रतिष्ठेमुळे वाटते. 'शुद्धात्मा' कधीच वेदक झाला नाही, कर्ताही झाला नाही, भोक्ताही झाला नाही, आणि कधी होणारही नाही. वेदक म्हणजे ममता. 'शुद्धात्मा' आणि वेदक (ममता) हा विरोधाभास आहे. वेदक, कर्ता किंवा भोक्ता जो दिसतो तो प्रतिष्ठित आत्मा आहे. चक्षुगम्य किंवा इंद्रियगम्य, कोणतीही क्रिया शुद्धात्म्याची नाही, या सर्व क्रिया प्रतिष्ठित आत्म्याच्या आहेत. शुद्धात्म्याची क्रिया ज्ञानगम्य असते. अनंत ज्ञानक्रिया, अनंत दर्शनक्रिया वगैरे आहेत. हे तर जेव्हा स्वत: शुद्धात्मा स्वरूप होतो तेव्हाच समजते, तेव्हाच स्वत:ला स्वत: 'शुद्धात्मा' अक्रीय आहे हे समजते. जोपर्यंत स्वत: 'शुद्धात्मा स्वरूप' झालेला नाही तोपर्यंत 'तो' प्रतिष्ठित आत्मा

स्वरूप आहे, म्हणून कर्ता-भोक्तापदात आहे. भोक्तापदात परत कर्ता होऊन बसतो आणि नवीन प्रतिष्ठा करून नवीन प्रतिष्ठित आत्मा उभा करतो, नवीन मूर्ती निर्माण करतो आणि ही परंपरा सुरूच राहते!

शुद्धात्मा तर ज्ञाता-द्रष्टाच आहे परंतु प्रतिष्ठित आत्म्यानेच हे सर्व घडविले होते, म्हणूनच प्रत्येकाला आरशात स्वत:चे तोंड आवडते, नाही तर आवडले नसते. हे सर्व चित्रण प्रतिष्ठित आत्म्याचेच आहे. प्रतिष्ठित आत्मा जोपर्यंत 'मी करत आहे' असे मानतो तोपर्यंत प्रतिष्ठा करतो. प्रत्येक माणूस स्वत:चा पुढचा जन्म स्वत: घडवीत असतो. तुम्ही जशी प्रतिष्ठा कराल तसे व्हाल. तूच केलेली प्रतिष्ठा तोच तुझा प्रतिष्ठित आत्मा आहे आणि तोच या सर्वांचा कर्ता, व्यवहार आत्मा आहे.

सत्य काय आहे याचा शोध घेण्यासाठी सारे जग सतत भटकत आहे. जो परमात्मा स्वत:मध्ये प्रकाशमान होत आहे तोच 'सत्' आहे. परंतु जगात कुणाला आत्मा सापडला असेल असा कुणीही या काळात तरी आढळत नाही, आणि जो सापडला आहे तो रिलेटिव्ह आत्मा आहे. पण तो रिलेटिव्ह आत्मा सुद्धा पूर्णपणे सापडलेला नाही. रिलेटिव्ह आत्मा तोच प्रतिष्ठित आत्मा आहे.

'प्रतिष्ठित आत्म्याच्या हाती भावना करण्याव्यतिरिक्त दुसरी कोणतीच शक्ती नाही.'

अव्यवहार राशीमध्ये जितके आत्मा आहेत ते नेहमी प्रतिष्ठित आत्म्यासोबतच असतात. अव्यवहार राशीचे जीव म्हणजे असे जीव की ज्यांना अजून नाव सुद्धा मिळालेले नाही. जीव जेव्हा व्यवहार राशीत येतो तेव्हा त्याला नाव मिळते, (जसे शेवाळ, मुंगी वगैरे) तेव्हापासून मग त्याच्या व्यवस्थितची सुरुवात होते.

अंत:करणाचा मालक प्रतिष्ठित आत्मा आहे, पण तो अंत:करणापासून भिन्न आहे. मन-बुद्धी-चित्त आणि अहंकार या सर्वांपासून भिन्न आहे. मन म्हणेल की, अमके काम करायचे आहे पण जर प्रतिष्ठित आत्म्याने सांगितले की, हे करायचे नाही, तर ते कार्य होत नाही. यात जो भाव

आहे तो प्रतिष्ठित आत्मा आहे. शुद्धात्मा ज्ञाता-द्रष्टा आहे. आत जी इच्छा होते तिथे प्रतिष्ठित आत्मा काम करत असतो. मनासोबत प्रतिष्ठित आत्मा एकरूप झाला तेही शुद्धात्मा जाणतो आणि एकरूप झाला नाही, वेगळा राहिला, ते सुद्धा शुद्धात्मा जाणतो. अज्ञानी मनुष्य सुद्धा प्रतिष्ठित आत्म्याला मनापासून वेगळा करून योगबळाने ठराविक शक्ती मिळवू शकतो.

'शुद्धात्मा पद' प्राप्त केल्यानंतर आपण आता (नवीन)प्रतिष्ठा करत नाही. पूर्वी केलेल्या प्रतिष्ठेमुळे व्यवहार चालत आहे. आपल्या शब्दात 'निर्‌अहंकार' आहे. नवीन चित्रण करण्याचे बंद झाले, ही केवढी मोठी आश्चर्यकारक गोष्ट आहे! एक जन्म जरी प्रतिष्ठा झाली नाही, तर काम पूर्णच झाले! ज्ञानीचा प्रतिष्ठित आत्मा आणि मिथ्यात्वीचा प्रतिष्ठित आत्मा, यात फरक काय? ज्ञानीचा 'मी' शुद्धात्म्यालाच पोहोचतो, शुद्धात्म्यासाठीच असतो, त्याउलट मिथ्यात्वीचा 'मी' प्रतिष्ठित आत्म्यासाठीच असतो. ज्ञानीत हे सर्व परके आहे असे जो जाणतो तो शुद्धात्मा आहे 'ज्ञानी' प्रतिष्ठित आत्म्याला सुद्धा परके असे जाणतात, आणि मिथ्यात्वीत हे सर्व परके आहे असे जो जाणतो, तो प्रतिष्ठित आत्मा आहे.

**प्रश्नकर्ता :** संसार व्यवहारात जे चेतन वापरले जाते ते शुद्धात्म्याचे आहे?

**दादाश्री :** या संसार व्यवहारात जे चेतन वापरले जाते ते प्रतिष्ठित आत्म्याचे आहे. 'शुद्धात्म्याचे' तर जरा सुद्धा जाणार नाही, काहीच वापरले जाणार नाही. बॅटरी चार्जिंग स्टेशन असते तिथे तो बॅटरी चार्ज करून देतो, त्यात त्याची (शुद्धात्म्याची) शक्ती कमी होत नाही. या सर्वांनी जरी वाटेल तसे कर्म केले, वाटेल त्या योनीत जन्म घेतले, तरी सोने मात्र जसेच्या तसेच राहते, मात्र घडणावळ वाया जाते. रेडा घडला तर रेड्याची घडणावळ गेली. अनंत अवतार नरकात फिरला पण सोने (शंभरचे) नव्याण्णव टक्के झाले नाही. शंभर टक्के शुद्धच राहते. ही जी वाढ आणि घट होत असते ती तर प्रतिष्ठित आत्म्याची होत असते. चार्ज डिस्चार्ज होते ते प्रतिष्ठित आत्म्याचे, मिश्रचेतनचे होत असते, शुद्धात्म्याचे नाही.

या पाषाणाच्या मूर्तीत प्रतिष्ठा करतात ती दीर्घकाळापर्यंत फळ देत राहते ना! प्रतिष्ठेची केवढी मोठी शक्ती आहे! अरे, लोखंडाला सुद्धा उडवू शकते! या जगात विज्ञानाचे जेवढे शोध आहेत ते सर्व प्रतिष्ठित आत्म्याचे आहेत. जर प्रतिष्ठित आत्मा इतका शक्तीशाली आहे, तर शुद्धात्म्याच्या अनंत शक्ती बद्दल तर काय बोलावे? आत्म्यात इतकी प्रचंड शक्ती आहे की, या भिंतीत प्रतिष्ठा केली तर भिंत सुद्धा बोलू लागेल!

प्रतिष्ठित आत्मा सुद्धा इतका शुद्ध आहे की तो विचार करू शकत नाही. विचार, हे तर मनाचे स्वरूप आहे. ग्रंथी फुटते तेव्हा विचार दशा प्राप्त होते. धर्माचे विचार किंवा चोरी करण्याचे विचार येतात त्या मनाच्या गाठी आहेत. प्रतिष्ठित आत्मा जर विचार करू शकला असता तर बुद्धी राहिलीच नसती. मग कंप्युटरसारखेच झाले असते. प्रतिष्ठित आत्मा जी अंत:क्रिया करतो ते अंत:करण, नंतर बाह्यकरणातही तसेच घडते. ज्याला अंत:करण पाहता येते त्याला बाह्यकरण समजते. पण मन-बुद्धी-चित्त आणि अहंकाराला पाहता आले पाहिजे. मन-बुद्धी-चित्त-अहंकार हे प्रतिष्ठित आत्म्याचे विभाग आहेत किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर अंत:करण हे प्रतिष्ठित आत्म्यामुळे आहे. अंत:करण जसे दाखवते तसे बाह्यकरणात-बाहेर रूपकात येते. अंत:करणासोबत मेंदू सुद्धा असतो, पण तो स्थूल आहे, परंतु अंत:करण सूक्ष्म आहे. म्हणूनच अंत:करणात जी जी क्रिया होते, ती सर्व प्रतिष्ठित आत्म्याच्या आधारानेच होत असते.

मूर्तीत प्रतिष्ठा केली तर 'मूर्त' भगवंत प्राप्त होतात, अमूर्तात प्रतिष्ठा केली तर 'अमूर्त' भगवंत प्राप्त होतात.

## निश्चेतन चेतन

जग ज्याला चेतन म्हणते, त्याला आम्ही 'निश्चेतन चेतन' म्हणतो. कारण दिसायला तर चेतनासारखेच दिसते, लक्षणे चेतनाचीच आहेत परंतु त्यात चेतनाचा एक सुद्धा गुण नाही, मग त्याला चेतन कसे म्हणता येईल?

उदाहरणार्थ पितळी वस्तूला बफिंग केले, तर ती सोन्यासारखीच दिसते, सगळी लक्षणे सोन्यासारखीच दिसतात, पण सोनाराकडे घेऊन गेल्यावर कळते. सोनार आधी परीक्षण करतो की त्यात सोन्याचे गुणधर्म आहेत की नाहीत? जर नसतील तर ते सोने नाहीच. लक्षणे सोन्यासारखी असूनसुद्धा सोन्याचे गुणधर्म नसल्यामुळे ते सोने नाही. त्याचप्रमाणे जरी चेतनाची लक्षणे दिसत असतील पण चेतनाचा एकही गुणधर्म त्यात नसेल तर त्याला चेतन कसे म्हणता येईल? आम्ही त्याला निश्चेतन चेतन म्हणतो. पितळ दिसायला सोन्यासारखेच दिसते परंतु जेव्हा गंज लागतो तेव्हा त्याला वाचा फुटते! तसेच सोन्याला सुद्धा वाचा फुटते.

हा जो देह आहे तो निश्चेतन चेतन आहे. 'आपण' शुद्ध चेतन आहोत. पूर्वी प्रतिष्ठा केली होती, तो प्रतिष्ठित आत्मा. तेच प्रतिष्ठित चेतन आहे.

एक तर चेतन बरे किंवा निश्चेतन बरे, पण अर्धचेतन बरे नाही. कारण त्यात सर्व लक्षणे चेतनाचीच असतात. भगवंतांनी सांगितले होते की, विहिरीजवळ जाऊन स्पंदने कर परंतु या मिश्रचेतना (जिवंत व्यक्ती) जवळ स्पंदने करू नकोस. मिश्रचेतनासोबत स्वाभाविक व्यवहार असेल तर हरकत नाही, पण तिथे स्लिप होता (घसरता) कामा नये. कुणी घसरला तर आम्ही त्याला सावध करतो. मिश्रचेतनाशी व्यवहार असेल तिथे आम्ही टोकतो. अचेतन असेल तिथे काळजी नाही, ही बिडी अचेतन आहे. तिच्या बाबतीत आम्ही विरोध करत नाही, पण वहीखात्यात जे लिहिले गेले आहे तो तर हिशोब आहे. हिशोब चुकता केला नाही तर आतून परमाणूंचा कोलाहल सुरू होतो, डोके भणभणून जाते! जिथे या मिश्रचेतनाचा संबंध येतो तिथे आम्ही सावध करतो. अरे, अहंकाराने का असेना, पण तू सावध हो. तिथे गाफील राहून चालणार नाही. सावध राहिला नाहीस तर तुझा पुढचा जन्म बिघडेल.

हा सिनेमा आपल्यावर खटला भरतो की आमचा उपभोग का घेता? नाही. खटला भरत नाही, कारण सिनेमा अचेतन आहे. पण मिश्रचेतन मात्र खटला भरतो कारण त्याला आत शांती नाही, आत

भयंकर आग आहे. म्हणून तो खटला भरतो. आत जर शांती असती तर हरकत नव्हती. मिश्रचेतनसाठी जरा सुद्धा उलटसुलट विचार आला, तर त्यास लगेच हाकलून टाकावा लागतो. प्रतिक्रमण करून धुऊन टाकावा लागतो, पण अचेतनसाठी प्रतिक्रमण केले नाही तरी चालते. मिश्रचेतन मोक्ष तर होऊ देत नाही पण आत जे सुख येत असते त्यातही अडथळा आणतो.

सिनेमा किंवा जिभेची फाईल रोग उत्पन्न करत नाही. पण मिश्रचेतनामुळेच रोग उत्पन्न होतो. भजी रुसणार नाही, परंतु मिश्रचेतन रुसल्याशिवाय राहील काय? मिश्रचेतनामुळे सारा संसार उभा राहिला आहे. मिश्रचेतन हे ब्लॅक होलसारखे आहे. तो व्यवहारच जर बंद झाला तर सगळ्या *उपाधी* संपतीलच ना!

मुक्त मनाने बसता येईल अशी सेफ साईड करून घे. मन आरडाओरडा करू लागले की भजी खायची आहेत, तर भजी खाऊ घातली की मग मुक्त मनाने बसू देईल, पण मिश्र चेतन बसू देत नाही. सत्संगात सुद्धा काट्यासारखे टोचत राहील.

तुम्ही ज्यात वर्तत आहात त्याचे दोन विभाग आहेत. एक तर निश्चेतन चेतन आणि दुसरे चेतन. पण तुम्ही तर निश्चेतन–चेतनालाच चेतन मानता. खरे तर दोन्ही भाग मिश्रण स्वरूपात आहेत, कंपाउंड स्वरूपात नाहीत. जर कंपाउंड स्वरूपात असते तर दोघांचेही गुणधर्म नष्ट झाले असते.

निश्चेतन चेतन हे मेकॅनिकल चेतन आहे. बाहेरचा संपूर्ण भाग सुद्धा मेकॅनिकल आहे. स्थूल मशिनरीला हँडल मारावे लागते त्याउलट सूक्ष्म मशिनरीला तर तू हँडल मारूनच आणले आहेस. आणि आता त्यात इंधन भरतच राहिला आहेस, पण हँडल मारायला लागत नाही. सूक्ष्म मशिनरी हे मेकॅनिकल चेतन आहे, पण त्यात 'मी केले' असे म्हणून गर्व केला जातो म्हणून चार्जिंग होत असते आणि पुढच्या जन्माचे बीज पेरले जाते.

संपूर्ण जग अचेतनालाच चेतन मानते आणि क्रियेमध्ये आत्मा आहे असे मानते. क्रियेत आत्मा नसतो आणि आत्म्यात क्रिया नसते. पण ही गोष्ट कशी समजेल? जगाला तर अचेतन चेतन चालवत आहे. चेतन वेगळे आहे, अचेतन सुद्धा वेगळे आहे, आणि जगाला जो चालवतो तो देखील वेगळा आहे, तो विभाविक गुण आहे, तो अचेतन–चेतन आहे. विभाविक गुण म्हणजे आत्म्याच्या भ्रांतीमुळे उत्पन्न झालेले गुण, चलायमान झालेले मिश्र चेतन.

## मनुष्य देह मोक्षाचा अधिकारी

डार्विनने इवोल्युशन थियरी लिहिली पण ती पूर्ण नाही. ठराविक भागापर्यंतच आहे. मनुष्य गती नंतर वक्र गती सुरू होते. हे तो जाणू शकला नव्हता म्हणून तो संपूर्ण थियरी देऊ शकला नाही. मनुष्य देहाखेरीज दुसरा कोणताही देह असा नाही की जो मोक्षाचा अधिकारी असेल. जर मनुष्य देह मिळाला आणि मोक्षप्राप्तीची साधने आणि संयोग संपूर्णपणे प्राप्त झाले तर (मोक्षाचे) काम पार पडणार, परंतु वर्तमान काळातील मनुष्य निश्चेतन–चेतन आहेत. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर भोवरा स्वरूप आहेत.

लोक ज्याला भावमन, द्रव्यमन मानतात ते तर निश्चेतन–चेतन आहे. शुद्ध चेतन तर ज्ञानी पुरुष देऊ शकतात. बाकी सर्व तर मशिनरी आहे, मेकॅनिकल आहे. म्हणजे मशिनरी तर आपोआप चालत असते आणि म्हटले जातो की, 'मी चालवत आहे.' फक्त इगोइजमच केला जातो की, हे मी केले आहे! मन गाठींचे बनलेले आहे. या गाठींना फळ येणे म्हणजेच रूपकात (दृश्य स्वरुपात) येणे. फळ जर मिश्र चेतनशी जोडलेले असेल तर गडबड! मिश्र चेतनशी जोडलेले म्हणजे आपण जरी सोडले तरी समोरचा सोडत नाही, उलट अचेतनला तुम्ही सोडले की मग काहीच भानगड उरत नाही. माइंड (मन) डॉक्टरला दिसेल असे नसते परंतु ते ज्ञानींना दिसू शकेल असे आहे. माइंड इज कंप्लीटली फिजिकल. मात्र सबकॉन्शियस माइंड आहे ते निश्चेतन–चेतन आहे.

निश्चेतन चेतन पदाला द्वैत पद म्हणतात, त्याला जीव म्हणतात पण चेतन म्हणता येणार नाही. आमच्या महात्म्यांना शुद्ध चेतन मिळाले आहे. आपला देह तर निश्चेतन चेतन आहे आणि आपण 'स्वत:' शुद्ध चेतन आहोत.

जोपर्यंत शुद्ध चेतन झाला नाहीस तोपर्यंत तू निश्चेतन चेतन आहेस. सगळेच निश्चेतन चेतन आहेत, मग ते साधू असोत किंवा संन्यासी! मनुष्य, तिर्यंच, नारकीय जीव, देवगण सर्वच निश्चेतन चेतन म्हणजे भोवरेच आहेत. जोपर्यंत आत्म्याचे भान झाले नाही तोपर्यंत सगळे निश्चेतन चेतन आहेत. जोपर्यंत आत्मज्ञान देणारे ज्ञानी मिळालेले नाहीत, तोपर्यंत तू निश्चेतन चेतन आहेस.

आम्ही ब्रह्मांडाची मालकी नसलेले स्वामी आहोत! कारण आम्ही शुद्ध चेतन आहोत, प्रकट स्वरुपात.

ज्या ज्या अवस्था येतात त्या निश्चेतन चेतन आहेत, आणि आपण शुद्ध चेतन आहोत. अवस्थेला पाहावे आणि जाणावे. तिचा लगेच समभावाने निकाल करून टाकावा. त्वरित निकाल करता आले पाहिजे. अवस्थेत एकाकार झालात तर दु:खी व्हाल, त्यामुळे आनंद मिळणार नाही. निश्चेतन चेतन परसत्तेत आहे. निश्चेतन चेतनात बेचैनी-संताप, आधी-व्याधी-उपाधी सर्व असतात आणि रियल चेतनमध्ये आनंद-परमानंद आणि समाधी असते. चिंता, बेचैनी होते ती निश्चेतन चेतनाला होत असते आणि त्या निश्चेतन चेतनाला 'मी आहे' असे मानतो, त्यामुळे चिंता होते. ज्यांना ज्यांना चिंता, बेचैनी किंवा त्रिविध ताप अनुभवास येतात ते सर्व निश्चेतन चेतन आहेत. ज्ञानभाषेत (रियल भाषेत) सांगायचे झाले तर जगात कुणी चेतन स्वरूपात जगतच नाही, सर्वच निश्चेतन चेतन आहेत, मग ते कोणीही असोत. निश्चेतन चेतनात विशेषण 'निश्चेतन'चे आहे.

भ्रांतीमुळे 'मी चंदुलाल आहे' असा आरोप करतो. 'मी' तर आत्मा आहे. आणि जिथे तो स्वत: नाही तिथे स्वत:ची प्रतिष्ठा करतो,

त्यामुळे निश्चेतन चेतनची निर्मिती निर्माण होतच राहते. जोपर्यंत भ्रांती तुटत नाही तोपर्यंत प्रतिष्ठित रूपात राहायचे. 'मी शुद्धात्मा आहे' असे जर लक्ष्य राहिले तर पुन्हा निश्चेतन चेतनात जात नाही. 'शुद्धात्मा' प्राप्त होतो तेव्हाच शुद्ध चेतन समजते, तेव्हाच गुन्हेगारीच्या पदापासून पूर्णपणे सुटका होते.

निश्चेतन चेतनवाले एका गुन्हेगारीतून मुक्त होतात आणि दुसऱ्या गुन्ह्यात अडकतात.

## इच्छा

इच्छा म्हणजे प्रकट अग्नि आहे, जोपर्यंत पूर्ण होत नाही तोपर्यंत पेटतच राहते. भगवंत काय म्हणतात? इच्छा हेच अंतराय कर्म आहे. इच्छा, एक तर मोक्षासाठी आणि दुसरी ज्ञानी पुरुषांच्या भेटीसाठी करण्यासारखी आहे. त्यामुळे अंतराय पडणार नाही. इतर सर्व इच्छा जाळतच राहतील. त्या साक्षात अग्निच आहेत! त्याला विझवण्यासाठी लोक पाणी शोधतात पण हाती येते पेट्रोल! तर ते शिंपडतात. एक इच्छा अजून पूर्ण होत नाही तेवढ्यात दुसरी येऊन ठाकते. एका पाठोपाठ एक येतच राहतात. कायदा काय म्हणतो की, तुझ्या ज्या ज्या इच्छा असतील त्या अवश्य पूर्ण होतील, पण त्यांचा विचार करत राहिल्याने काही निष्पन्न होत नाही. उलट वाकडेच घडेल. वरचे वर ज्या इच्छा येतात त्या बोचतच राहतात. इच्छा काही सर्वच गोष्टींची होत नाही. हा संसार रस आहे. जो रस त्याच्या आवडीचा असेल त्याची इच्छा होत असते. इच्छा कशाची होते? तर बुद्धीच्या आशयात तू जे घेऊन आला असशील त्याची इच्छा होते. बुद्धीच्या आशयात जे सुख तू घेऊन येतोस ते सुख तुझे पुण्य खर्च होऊन तुला मिळत राहते!

जगाची जी ब्लेड आहे, ती दोन्ही बाजूंनी वापरा, परंतु 'शुद्धात्म्याची' मात्र एकाच बाजूने वापरा! 'मी शुद्धात्मा आहे' या ऐवजी 'मी अशुद्धात्मा आहे' असे वापरले तर? सर्वच कापले जाईल. शुद्धात्म्याला इच्छा नसते पण अंतरात्म्याला असते. अंतरात्मा शुद्धात्म्याचे पूर्ण पद प्राप्त करण्यासाठी

इच्छा वापरतो. जेव्हा पूर्ण दशा प्राप्त होईल तेव्हा इच्छा नावाला सुद्धा उरणार नाही आणि वीतरागता प्राप्त झाल्यामुळे पूर्ण दशा प्राप्त होईल. संपूर्ण वीतरागींना इच्छा नसतात. आमची इच्छा निकाली असते आणि तुम्हा महात्मांची इच्छा ग्रहणीय आहे. ग्रहणीय म्हणजे पूर्ण पद प्राप्त करण्यासाठी आणि दादांची इच्छा निकाली आहे कारण संपूर्ण पद प्राप्त झालेले आहे म्हणून.

**प्रश्नकर्ता :** इच्छा आणि चिंतवन, यात फरक काय?

**दादाश्री :** चिंतवन म्हणजे पुढचा हिशोब लिहिला जातो आणि इच्छा, मागच्या हिशोबात काय काय आहे ते दाखवते. इच्छा आणि अनिच्छा दोन्हीही पेटीत कोणता माल भरलेला आहे ते दाखवतात. पुण्याचा क्रम असेल तेव्हा इच्छा पूर्ण होते आणि अक्रम येईल तेव्हा अनिच्छाच पुढे पुढे येते. उदाहरणार्थ, अंधारात नंबर टाकले आणि अंधारातच उचलले तर जेव्हा क्रमाने असेल तेव्हा एकानंतर दोन, दोन नंतर तीन असे क्रमाक्रमाने आकडे हाती येतात आणि अक्रमाने येतात तेव्हा सात नंतर सत्तावन येऊन उभे राहते. क्रमानुसार होतच नाही.

रत्नागिरीत एक माणूस माझ्याकडे आला आणि मला म्हणाला 'दादा, मी जिथे हात घालतो तिथे सोनेच हाती लागते.' त्यावर मी त्याला म्हणालो, 'भाऊ, सध्या तुझी लिंक (क्रम) चालू आहे म्हणून. पण काही काळानंतर तुझी लिंक तुटेल, तेव्हा माझी आठवण काढ' आणि घडले पण तसेच. त्याला धंद्यात इतके मोठे नुकसान झाले की पति-पत्नी दोघेही विष प्यायले. योगायोगाने दोघेही वाचले. तेव्हा त्यांना मी सांगितलेली गोष्ट आठवली. क्रम आणि अक्रम येतात आणि जातात, याचेच नाव संसार. इच्छा हा तर मागचा हिशोब आहे, जेव्हा की चिंतवनात योजना घडत असतो. तन्मयाकार होऊन कॉज टाकतो. इच्छा ही इफेक्ट आहे, तिथे चिंतवन हे कॉज आहे. चार्जिंग पॉइंट आहे. शास्त्रकार म्हणतात इच्छा आपणहूनच होत असते, करायची गरजच नाही.

सूर्य मावळत असला तरी लोकांना तो उगवत असल्या सारखाच

दिसतो, पण त्याची काळजी करू नका. त्या सर्व मावळत असलेल्या इच्छा आहेत. मी आपल्या महात्म्यांना सांगितले आहे की, आता तुमच्या वांझ इच्छा राहिल्या आहेत, ज्याचे बीज पडत नाही, त्यामुळे तुमच्या मावळत्या इच्छा उरल्या आहेत. लोकांच्या इच्छा तर उगवत्या आणि मावळत्या दोन्ही प्रकारच्या असतात.

या कलियुगात तर चटणीची इच्छा करणारेच असतात, संपूर्ण भोग घेण्याची इच्छावाले नसतात. फक्त जराशा चटणीसाठी संपूर्ण आयुष्य घालवून टाकतात.

अरे, मी तर असे शेठजी सुद्धा पाहिले आहेत की जे महावीर भगवंताच्या सभेत रात्रंदिवस बसून राहायचे. शेठाणीला म्हणायचे की, 'तू पुरी-भाजी इथे सभेतच घेऊन ये, मी इथेच खाऊन घेईन. भगवंतांची वाणी त्यांच्या कानांना इतकी मधुर वाटायची की तिथून हलतच नव्हते पण चटणी खाण्याची इच्छा राहिली, त्यामुळे अजून भटकत आहेत!

जे काही घडणार असेल त्याची आधी इच्छा होते. मॅट्रिक पास होणार असेल तर आधी मॅट्रिक होण्याची इच्छा होते. अंतराय तुटतात तेव्हा आपल्या इच्छेनुसार सर्व प्राप्त होते. सत्संगात पैसे खर्च करायचे आहेत, अशी इच्छा तर फारच असते पण काय करणार? पूर्वीचे अंतराय असल्यामुळे पैसे खर्च करण्याचा योग आला तरी खर्च करू शकत नाही. जेव्हा अंतराय तुटतात तेव्हा सर्व इच्छेनुसार घडते.

इच्छा हा भाव नाही!

**प्रश्नकर्ता :** इच्छा आणि भाव, यात काय फरक आहे?

**दादाश्री :** इथे हा कापसाचा ढीग आहे त्यास हरकत नाही पण जर तो काडी लावून पेटवला तर त्यास इच्छा म्हटली जाते. इच्छा ही प्रकट अग्नि आहे आणि जोपर्यंत ती पूर्ण होत नाही तोपर्यंत जळतच राहते. वस्तूला पेटवली ती झाली इच्छा आणि ती मग तुझ्या आत जळत राहते. आमचे कसे असते, की आमच्या जवळ पेटवायला काडीच नसते.

उगवती इच्छा आणि मावळती इच्छा, म्हणजे चार्ज इच्छा आणि

डिस्चार्ज इच्छा. ही खाण्या-पिण्याची इच्छा ती सर्व मावळतीची डिस्चार्ज इच्छा, त्यास हरकत नाही, पण उगवत असलेली इच्छा बंधनकारक असते आणि ती दु:ख उत्पन्न करते.

## भाव म्हणजे काय?

'शुद्धात्म्यात' कोणत्याही प्रकारचा भाव नाही. प्रतिष्ठित आत्म्याच्या भावाला भाव म्हटले जाते. प्रतिष्ठित आत्मा हा ज्ञानीही आहे आणि अज्ञानीही आहे. अज्ञानीचे भाव, मनाच्या दृढ परिणामात असतात. मला प्रतिक्रमण करायचेच आहे, हा भाव दृढ झाला की तसे द्रव्य उत्पन्न होते आणि त्या द्रव्यातून परत भाव उत्पन्न होतो.

**प्रश्नकर्ता :** भावमन आणि द्रव्यमन म्हणजे काय?

**दादाश्री :** प्रतिष्ठित आत्मा भाव करतो, त्यामुळे भावमनाची सुरुवात होते आणि त्यामुळे मग द्रव्यमन उत्पन्न होते. या भावमनाचेही दोन प्रकार आहेत : डिस्चार्ज आणि चार्ज.

खरे तर भावमन म्हणजे प्रतिष्ठित आत्म्याचे डायरेक्ट चार्ज होणारे मन. हे द्रव्यमन जे दिसते ते तर डिस्चार्ज स्वरुपात आहे. चार्ज तर दिसतच नाही. कळतही नाही. जर चार्ज समजले असते तर कुणी चार्जच होऊ दिले नसते ना! मग तर सर्वांचा मोक्षच झाला असता! भाव सापडेल असा नाही. सापडला तर लगेचच सील करून टाकता येईल. फारच कमी लोक भावाला समजू शकतात पण तिथे ते मूढात्म्याचा भाव आहे असेच समजतात त्यामुळे गडबड होते. 'ज्ञान' असल्याशिवाय भाव पकडणे शक्यच नाही. अत्यंत अत्यंत गहन आहे. लाख वेळा गहन, गहन म्हटले तरी सुद्धा त्याच्या गहनतेचा अंत येईल असे नाही.

शुद्धात्म्याला भाव नसतोच. भाव म्हणजे अस्तित्वपणा. बाकी, हा भाव तर प्रतिष्ठित आत्म्याचाच आहे. लोक तर जे आवडते त्याच्यावर भाव करतात. भावाभाव करतात. हे सर्व प्रतिष्ठित आत्म्याचेच आहे, त्यामुळे कर्म बंधन होते. नाशवंत वस्तूंचा भाव करतात त्यामुळे नाशवंत होतात. आरशाला 'मी आहे' असे मानले तर त्यात काय मिळणार?

## सज्जनता - दुर्जनता

जगात सज्जन आणि दुर्जन, दोघेही एकत्रच आढळतात. दुर्जन आहेत म्हणून सज्जनांची किंमत आहे, जर सगळेच सज्जन असते तर?

सज्जन पुरुष : जो निरंतर उपकारच करत असतो, तो.

दुर्जन पुरुष : जो निरंतर अपकारच करत असतो, तो.

कृतज्ञ : समोरच्या माणसाने केलेले उपकार कधीच विसरत नाही आणि समोरच्या माणसाने केलेल्या अपकारास कधीच आठवत नाही, तो.

कृतघ्न : समोरच्या माणसाने केलेले उपकार विसरून जातो आणि जाणूनबुजून अपकार करतो. स्वत:ला काहीच गरज नसेल, कसलाही फायदा नसेल तरीही अपकार करतो, तो.

समुद्राचा तळ शोधता येईल पण या संसाराचा तळ शोधता येईल असे नाही.

अधिकाराचा जो दुरुपयोग करतो त्याची सत्ता टिकतच नाही. जी सत्ता मिळाली आहे त्याला शोभेनासे कार्य केले तर सत्ता निघून जाते. तुमच्या नोकराने जरी तुम्हाला शिवी दिली त्यावर तुम्हीही त्याला शिवी द्याल तर तुमची सत्ता निघून जाईल.

असत्याला वाचा फुटते आणि सत्याला सुद्धा वाचा फुटते. असत्य लगेच बोलेल. सत्याला वेळ लागेल. आणि असत्य तर दुसऱ्याच दिवशी बोलेल.

हल्दीघाटीचे युध्द करण्यात काही मजा नाही, समाधान आणण्यातच मजा आहे. समजावून उमजावून काम पार पाडा पण भांडू नका. न्याय कशास म्हणायचे? तर कोर्टात जायची जिथे गरजच पडत नाही, त्यास न्याय म्हणायचे. कोर्टात जावे लागते त्यास तर अन्याय म्हणायचे.

मन-वचन- काया आणि आत्मा, यांचा उपयोग लोकांसाठी कर. स्वत:साठी केलास तर पुढच्या जन्मी रायणाच्या झाडाचा जन्म मिळेल.

मग पाचशे वर्ष भोगतच रहा. तुझी फळे लोक खातील, लाकडे जाळतील. कैद्यासारखा तुझा उपयोग होईल. म्हणून भगवंत म्हणतात की, तुझे मन–वचन–काया आणि आत्म्याचा उपयोग इतरांसाठी कर. आणि मग तुला जर कसलेही दु:ख आले तर मला सांग.

अविरोधाभास शोधण्यासाठी ज्याची मती उत्पन्न झाली तिच 'सुमति'.

जे जे कोणी संसाराचा उच्छेद करायला गेले त्यांचा स्वत:चाच उच्छेद झाला. मनुष्यत्व हे तर सर्वात मोठे भयस्थान आहे. टेस्ट एक्जामिनेशन (कसोटी) आहे. तिथे लोक मौज करतात. इथे तर सर्वत्र भयस्थानच आहेत. जिथे क्षणोक्षणी मृत्यूचे भय आहे तिथे एकक्षणही वाया कसा घालवायचा? असे काही कर की ज्यामुळे तुझा पुढचा जन्म सुधारेल. मनुष्यगती हा तर टर्निंग पॉइंट आहे. इथूनच वक्रगती सुरू होते. नरक, तिर्यंच, मनुष्य आणि देव–चारही गतीत इथूनच जावे लागते आणि मोक्ष सुद्धा इथूनच मिळतो. जर ज्ञानी पुरुष भेटले तर तुझे कामच झाले समज!

## देहाचे तीन प्रकार

तीन प्रकारचे देह आहेत : तेजस देह, कारण देह आणि कार्य देह.

आत्म्यासोबत निरंतर राहतो तो तेजस देह. ते सूक्ष्म शरीर आहे, इलेक्ट्रिकल बॉडी आहे. शरीराचे जे नूर आहे, जे तेज आहे ते तेजस शरीरामुळे असते. देहाचे हे नूर चार वस्तूंमुळे प्राप्त होते.

1. कोणी मोठा लक्ष्मीवान (श्रीमंत) असेल आणि सुख समृद्धीत राहत असेल, तर त्याचे तेज असते, ते लक्ष्मीचे नूर.

2. जो फार धार्मिक असेल, तर त्याच्या आत्म्याचा प्रभाव पडतो, ते धर्माचे नूर.

3. कोणी फार विद्याभ्यास केला, रिलेटिव्ह विद्या प्राप्त केली, तर त्याचे जे तेज असते, ते पांडित्याचे नूर.

4. ब्रह्मचर्याचे नूर.

हे चारही प्रकारचे नूर सूक्ष्म शरीर-तेजस शरीरापासून येतात.

जेव्हा मातेचे रज आणि पित्याचे वीर्य एकत्र येतात तेव्हा नवीन इफेक्ट बॉडी (कार्य शरीर) उत्पन्न होते. जीव म्हणजे काय? तर जो जन्म घेतो आणि मरतो तो जीव. हे सर्व जीव जेव्हा मृत्यू पावतात तेव्हा सूक्ष्म शरीर आणि कारण शरीर आपल्या सोबत घेऊन जातात. मन-बुद्धी-चित्त आणि अहंकार इथेच स्वतंत्र होतात आणि जी कॉजल बॉडी (कारण शरीर) सोबत घेऊन जातो त्यापासून नवीन इफेक्ट बॉडी (कार्य शरीर) निर्माण होते. मातेचे रज आणि पित्याचे वीर्य, यापासून उत्पन्न झालेले कार्य शरीर त्यालाच आपले खाद्य बनवते आणि त्याची गाठ बनते. जीव तासभर सुद्धा खाल्याशिवाय राहू शकत नाही. अन्न नसेल तर हवा-पाणी, काही ना काही तर घेतच राहतो.

जे तेजस शरीर आहे तेच सूक्ष्म शरीर किंवा इलेक्ट्रिकल बॉडी आहे. ही इलेक्ट्रिकल बॉडी खाल्लेले पचवते, शरीरात उष्णता उत्पन्न करते. सर्क्युलेशन करते. त्याच्या नलिका शरीरात सर्वत्र पसरतात, त्यामुळेच सर्व मशिनरी काम करू शकते. समजा कर्माची काही कमतरता असेल तर लहानपणापासूनच त्याचे जठर खाल्लेले पचवू शकत नाही. खरे तर देहात असलेली इलेक्ट्रिक बॉडीच कार्य करत असते परंतु स्थूल शरीर त्याला ग्रहण करू शकत नाही. त्यामुळे देह कमजोर होत जातो. सूक्ष्म शरीर तर सर्वांचे सारखेच असते. तुमच्या या देहाचा आकार, त्याचे आर्किटेक्चर पूर्वीचे झालेले असते, त्यास कॉजल बॉडी (कारण शरीर) म्हणतात आणि हा जो स्थूल देह झाला आहे तो इफेक्टिव बॉडी (कार्य शरीर) आहे. शरीरात जो भाग अबॉव नॉर्मल किंवा बिलो नॉर्मल होत असतो, तो त्या भागाचाच दोष असतो आणि तो भागच भोगत असतो. या वरून अंदाज लावता येते की, दुखणे कुठून आले आणि कसे आले.

'कारण देह' समजेल असा आहे. जन्मापासूनच उत्पन्न होतो, आतूनच होतो. हवा खातो तिथूनच सुरुवात होते, तिथूनच राग-द्वेष उत्पन्न होतात. लहानपणापासूनच आवडी-नावडी असतात. राग-द्वेषामुळे परमाणू खेचले जातात. वीतरागता असेल तर परमाणू खेचले जात नाहीत.

परमाणू खेचले गेल्यामुळे, पूरण झाल्यामुळे कारण देह तयार होतो. आत्ता जो देह दिसतो तो पूर्वजन्माचा कारण देह आहे. ज्ञानी पुरुषाला कारण देह दिसतो आणि त्यांच्यात इतके सामर्थ्य असते की ते कारण देह बांधण्याचे थांबवू शकतात, सील करू शकतात. त्यानंतर मग नवीन कारण देह बांधला जात नाही.

आत्मा जेव्हा देहापासून वेगळा होतो तेव्हा कारण देह त्याच्यासोबतच जातो, पाप-पुण्य जाते. पुण्याच्या आधाराने रूप, सिमेट्रिकल बॉडी (सुडौल बांधा), सुख वगैरे सर्व मिळते. पापाच्या आधाराने कुरूपता मिळते. पापाच्या आधारानेच देह अन्‌सिमेट्रिकल (बेडौल) मिळतो. आत्मा जेव्हा देहातून निघतो तेव्हा कारण शरीर आणि सूक्ष्म शरीर सोबतच असतात. सूक्ष्म शरीर आणि कारण शरीराच्या परमाणूंचे संयोगिक पुरावे जेव्हा एकत्रित होतात तेव्हा स्थूल शरीराची निर्मिती होते. आत्मा जेव्हा मृत्यूवेळी स्थूल देहापासून वेगळा होतो तेव्हा तो एका जागेवरून निघून, दुसऱ्या जागी एका '*समयात*'च 'व्यवस्थित शक्ती' द्वारे निश्चित झालेल्या स्थानावर पोहोचतो आणि तिथे गेल्यावर पित्याचे वीर्य आणि मातेचे रज एकत्र होताच देह धारण करतो. आत्मा त्यावेळी एकदम कॉम्प्रेस होऊन जातो. जोपर्यंत नवीन स्थान मिळत नाही तोपर्यंत जुने स्थान शक्यतो सोडत नाही. आपल्या स्थितीस्थापक गुणामुळे लांब होऊन एक टोक जुन्या देहात आणि दुसरे टोक नवीन कार्य शरीरापर्यंत घेऊन जातो. त्यानंतरच जुना देह सोडतो. काही जीव प्रेतयोनीचे असतात, ज्यांना लगेचच दुसरे शरीर मिळत नाही. असे प्रेतयोनीचे जीव प्रेतात्मा होऊन भटकतात आणि त्यांना जेव्हा नवीन देह मिळतो तेव्हा त्यांची सुटका होते.

एकदा मनुष्य देहात आल्यानंतर आठ जन्म दुसऱ्या गतींमध्ये जसे की देव गती, तिर्यंच गती किंवा नरक गतीत जाऊन आल्यानंतर परत मनुष्य देह मिळतो. मनुष्य देहात वक्रगती उत्पन्न होत असते आणि भटकंतीचा अंत सुद्धा मनुष्य देहातच होतो. या मनुष्य देहाला जर सार्थक करता आले तर मोक्ष प्राप्ती सुद्धा शक्य आहे आणि जर सार्थक करता आले नाही तर हाच देह भटकण्याची साधने वाढवणाराही ठरतो. अन्य

गतींमध्ये केवळ सुटका होत असते परंतु या मनुष्य गतीत दोन्हीही होते, सुटकाही होते आणि बंधनही होते. म्हणून दुर्लभ असा मनुष्य जन्म प्राप्त झाला आहे तर त्याने आपले (मोक्षाचे) काम साधून घ्या. अनंत जन्म आत्म्याने देहासाठी व्यतीत केले, एक जन्म जर देहाने आत्म्यासाठी व्यतीत केला तर जन्म सार्थक होऊन जाईल!

मनुष्य देहात असतानाच जर ज्ञानी पुरुष भेटले तर मोक्ष प्राप्तीचा उपाय होऊ शकतो. देवगण सुद्धा मनुष्य देहासाठी आतुर असतात. ज्ञानी पुरुष भेटले, त्यांच्याशी तार जुळली तर अनंत जन्मांपासून शत्रु समान झालेला हा देह परम मित्र बनतो. या जन्मी तुम्हाला ज्ञानी पुरुष लाभले आहेत. तेव्हा पूर्णपणे आपले काम साधून घ्या. पूर्ण संधान करून पैलतीरी पोहोचा.

या देहावर आमची प्रीती किती? या देहाने मोक्ष तर मिळाला, स्वत:चे कल्याण तर झालेच, आता लोकांच्या कल्याणासाठी हा देह खर्च व्हावा, तेवढ्या पुरतेच त्याचे जतन, तेवढ्या पुरतीच त्याची प्रीती! बाकी या देहाला सुद्धा आम्ही एक शेजाऱ्यासारखेच निभावून घेत आहोत!

या देहावर आपला स्वत:चा अधिकार नाहीच. ज्यांचा ज्यांचा अधिकार असेल ते घेऊन जातील. आपण तर या देहाला मित्रासमान मानून आपले कार्य पार पाडायचे आहे. बाकी तर या देहात केव्हा काय होईल ते काही सांगता येत नाही. पण आपल्या (शुद्धात्म्याच्या) प्रदेशाला काहीच होणार नाही. ज्या देहाने मोक्ष प्राप्ती करायची आहे तो देह फार बळकट असतो, निर्वाण प्राप्त करणाऱ्या देहास 'चरम शरीर' म्हणतात.

भगवंत या देहात कुठपर्यंत राहतात? तर प्रतिष्ठित आत्म्याचा मुक्काम आहे तोपर्यंतच राहतात. मूळ आधार तर शुद्धात्म्याचाच आहे. प्राणाच्या आधाराने जगतो तो प्राणी. आठ मिनिटांपर्यंत नाक दाबून ठेवले तर प्राण निघून जाईल, असे आहे हे सर्व! ही तर मशिनरी आहे.

देहभान हा बेभानपणा आहे. देहाध्यास हेच अज्ञान आहे. स्वभावाने मुक्ती आहे.

स्थूल देह वीतरागी आहे. जितके हे टेबल वीतरागी आहे तितकाच हा स्थूल देह सुद्धा वीतरागी आहे. तितकाच आत्मा सुद्धा वीतरागी आहे. सगळ्यासाठी सूक्ष्म देह जबाबदार आहे. सूक्ष्म देह काही ठराविक परमाणूंचा बनलेला आहे. स्थूल देहाच्या कोणत्याही कार्याशी आत्म्याला काहीच देणेघेणे नाही. सर्व दु:ख सुद्धा सूक्ष्म देहच भोगतो. सूक्ष्म देह हा आत्म्याचा आविर्भाव आहे. सूक्ष्म देहानेच 'मी' पणाची प्रतिष्ठा करत असतो, म्हणून सूक्ष्म देह प्रतिष्ठित आत्म्यासारखाच आहे.

कर्मे जास्त असतील तर देह लहान असतो. कर्मे कमी असतील तर देह मोठा असतो. जसे की मुंगी आणि हत्ती. मुंगीला तर रात्री चार वाजताही साखर ओढून नेताना मी पाहिले आहे! आणि हत्ती? तो तर बादशाहासारखा थाटात फिरत असतो.

## देहाध्यास केव्हा तुटेल

जग सारे देहाध्यासात रुतलेले आहे. म्हणतात खरे, की हा देह माझा नाही, मन माझे नाही पण जर कुणी म्हटले की, 'चंदुलाल तुम्हाला अक्कल नाही' तर रात्रभर त्याचा इफेक्ट होत राहतो. खरे तर आत्मज्ञान होईपर्यंत देहाध्यास तुटेल असे नाही. मी चंदुलाल, मी याचा मामा, याचा काका, हिचा नवरा, याचा बाप, हाच देहाध्यास. जोपर्यंत देहाध्यास तुटत नाही तोपर्यंत स्थूल आणि सूक्ष्म वर्गणा (कर्म बंधन) राहते, शुभ आणि अशुभ राहते. 'मी शुद्धात्मा आहे' याचे यथार्थ ज्ञान होते तेव्हा देहाध्यास तुटतो, मग जरी एकुलता एक मुलगा मृत्यू पावला तरी द्वंद्व होत नाही, पंचिग होत नाही. बरे किंवा वाईट असे काही राहत नाही.

जसा देहाध्यास झाला आहे तसा आत्माध्यास झाला पाहिजे. झोपेत, गाढ निद्रेत सुद्धा आत्म्याचे भान राहिले पाहिजे. आम्ही जे ज्ञान देत आहोत त्या ज्ञानामुळे सर्व अवस्थेत आत्माध्यासच राहतो. हे तर अद्‌भुत ज्ञान आहे. दही घुसळल्यावर लोणी आणि ताक जसे वेगळेच राहतात तसे हे ज्ञान आहे. देह आणि अगदी वेगळेच राहतात!

पूर्वी ज्ञानी तेलाच्या घाणीतून पिळून पिळून निघाले होते, ते यासाठी

की तू आत्मा आहेस, मग या देहाला घाणीत पिळायचे असेल तर पिळू देत. देहाचे तेल काढायचे असेल तर काढू देत. आत्मा काही पिळला जाणार नाही. अशा कसोटीतून पार उतरले होते!

## देहाच्या तीन अवस्था

देहाच्या तीन अवस्था - बाल्यावस्था, युवावस्था आणि वृद्धावस्था.

बाल्यावस्थेत परमानंद-सहजानंद असतो. बाळाला काहीच चिंता नसते. जन्म घेण्यापूर्वीच दुधाच्या कुंड्या भरुन उतू जात असतात! या लहान बाळाला आहे का कसलीही चिंता? दूध कुठून येईल? केव्हा येईल? आणि तरीही त्याला सर्व काही अगदी वेळच्या वेळी मिळतच असते ना! ज्ञानी पुरुष बालकासारखे असतात, पण बालकाला समज नसते, तिथे ज्ञानी पुरुष समजेच्या शिखरावर पोहोचलेले असून सुद्धा बालकासारखे असतात. बालकाचे मन डेव्हलप झालेले नसते, बुद्धी डेव्हलप झालेली नसते. फक्त चित्तवृत्तीच कार्य करत असते. त्याची चित्तवृत्ती त्याच्या मर्यादित विषयातच राहते. उदाहरणार्थ, हे खेळणे त्याला दिसले तर त्याची वृत्ती त्यातच रमते, पण ती किती वेळ? थोडाच वेळ. नंतर दुसऱ्या विषयात रमते. एकाच विषयात चित्तवृत्ती मुक्काम करत नाही. मात्र वयस्कर माणसांची चित्तवृत्ती तर दोन-चार विषयातच मुक्काम करते आणि त्यातच फिरत राहते. त्याचीच तर ही सारी भानगड आहे ना! बालक थोड्या वेळानंतर विसरून जाते. कारण त्याची चित्तवृत्ती त्यात स्थिर होत नाही, थोड्या वेळात उडून जाते. लहान बालकामध्ये जोपर्यंत बुद्धी जागृत झाली नाही तोपर्यंत त्याचा सहजानंद व्यवस्थित आहे. नंतर मग जसजशी बुद्धी वाढत जाते तसतसा संतापही वाढत जातो.

युवावस्था ही प्रकट अग्नि समान असते. त्यात बाह्याचार बिघडण्याचे संयोग उत्पन्न होतात. त्यामुळे त्यात विशेष सावध राहणे हितकर आहे. देवांना जन्म, जरा किंवा मृत्यू नसतो. त्यांना निरंतर यौवनच असते.

वृद्धावस्था म्हणजे म्हातारपण. म्हातारपणात जगणे फार कठीण असते. सर्व मशिनरीची नादारी निघालेली असते. दात म्हणतो मी तुटतो,

कान म्हणतो, मी दुखतो. म्हातारपणात फार जपावे लागते. जास्त चिकट कर्म नसतील तर बसल्या बसल्याच मरण येते. नाहीतर सर्व मशिनरींची नादारी निघालेली असते आणि त्यांना विचारले की, काका, आता जायची तयारी आहे ना? तर काका म्हणतील, 'अजून थोडा काळ जगेन!' ही तर चहा-पाण्याची लालसा आहे!

बांधलेली कर्मे तर आतिशबाजीसारखी आहेत. तीसुद्धा म्हातारपणातच फुटतात. एकीकडे बॉम्ब फुटतो तर दुसरीकडे रॉकेट सुटते, आणि सगळीकडे धुमाकूळ माजतो. या देहाने जे शाताचे सुख घेतले ते शेवटी अशाताचे दु:ख देऊन जाते! आणि अशाता भोगली असेल तर शेवटी शाता देऊन जाते, असा नियमच आहे. अशाताच्या प्रमाणात शाता देऊन जाते. एखादाच असा पुण्यवान असतो की शेवटी शाता प्राप्त करून जातो. असा शीलवान तर एखादाच असतो. जगातील लोकांना मौजमजा करताना भान नसते की, याचे पेमेंट करावे लागेल ही तर बिन हक्काची मौजमजा, त्याचे पेमेंट शेवटच्या क्षणीसुद्धा करावे लागते. परंतु सरळ माणसांच्या बाबतीत फार बरे असते. मृत्यूवेळी जर सांगून गेले की 'आम्ही आता निरोप घेतो', तरी चांगले म्हणायचे. त्यांची उच्च गती होते. उच्च पदावर जातात. बेशुद्ध अवस्थेत मृत्यू झाला तर तो बेशुद्धपणात जातो, म्हणजे गाई-म्हशींच्या गतीत जातो. ज्याचे हार्टफेल होते त्याचा तर काही ठिकाणाच नाही. सध्या तर सगळीकडे रौद्रध्यान आणि आर्तध्यानच आढळते, त्यामुळे जगणे सुद्धा कठीण झाले आहे आणि मरण सुद्धा कठीण झाले आहे. तारुण्यात मरतात ते रौद्रध्यान आणि आर्तध्यानात मरतात. म्हातारे मरतात तर कल्पांत करत मरतात, त्यामुळे भयंकर जोखीम ओढवून घेतात. आजच्या काळातील भोजन अप्रामाणिकपणाचे, कपडा-लत्ता सर्वच अप्रामाणिकपणाचा, ते सुद्धा आर्तध्यान आणि रौद्रध्यानाने मिळवलेले. त्यामुळे मरताना सुद्धा फार कष्ट भोगावे लागतात. शरीराचा एक एक परमाणू दु:ख देऊन, चावून जातो, आणि अतिशय दु:ख असेल तर हार्टफेल होऊन मरतो, आणि मग पुढच्या जन्मी कर्मे भोगावी लागतात. हे तर परमाणूंचे सायन्स आहे! वीतरागांचे सायन्स आहे! त्यात कुणाचे काहीही चालत नाही!!

स्वत:च्या कष्टाची फाटलेली साडी बरी, स्वत:च्या प्रामाणिकतेची खिचडी बरी, असे भगवंतांनी सांगितले आहे. अप्रामाणिकतेने मिळवणे, हे तर चुकीचेच आहे ना?

वृद्धावस्था येते आणि जगातून निघायची वेळ येते तेव्हा सर्व फटाके एकदमच फुटतात. जर ज्ञान नसेल तर वृद्धावस्थेत जगणे फार कठीण असते. परंतु जर ज्ञान पक्के झाले असेल तर जे जे फटाके फुटतात त्यांच्या प्रति ज्ञाता–द्रष्टा राहून स्वत:च्या (शुद्धात्म्याच्या) गुहेत राहता येते. आमचे ज्ञानी (महात्मा) शेवटचे श्वास घेत असताना सुद्धा काय बोलतात माहीत आहे का? 'या देहाच्या शेवटच्या श्वासांना तुम्ही पण पाहता आणि मी पण पाहतोय!' शेवटच्या श्वासांचे सुद्धा ज्ञाता–द्रष्टा राहतो! सर्वांना आपले दुकान लवकर किंवा उशीरा बंद तर करावेच लागणार, नाही का? सर्व जण जाण्यासाठीच तर येतात ना? जन्म झाला तेव्हा पासूनच 'वे टू स्मशानाची' सुरुवात होते. अरे, तू कुठे निघालास? तर स्मशानाकडे. अरे! तू निघाला आहेस स्मशानाकडे आणि वाटेत भजी–बिजी खात का बसलास! जरा विचार तर कर! प्रतिक्षण तू स्मशानाकडे जात आहेस, कधी ना कधी तर शेवटच्या स्टेशनवर पोहोचायचेच आहे ना? लवकर किंवा उशीरा कसेही, पण शांतपणे जाता येईल इतकी आशा करू शकतो.

म्हातारपण आले की सर्व दुखण्यांचे एकच दुखणे होऊन जाते. आणि त्याचे औषध जाणून घेतले असेल तर दुखणे सुरू झाले की लगेच घेता येईल. हे तर, शेवटचे दुखणे, जे आपल्याला नेण्यासाठी येते.

जो देह कोमेजतो, नासतो, दुर्गंधी पसरवतो, त्यावर काय प्रीती करायची? हा तर त्वचेने झाकलेला मांसाचा पिंड आहे. या देहाला रोज अंघोळ घालतो, खायला–प्यायला देतो, त्याची किती काळजी घेतो, तरी पण शेवटी दगाच देतो. हा देहच आपला झाला नाही तिथे मग दुसऱ्यांची तर गोष्टच काय करायची? या देहाला कुरवाळत राहतो पण जर त्यातून पू निघू लागला तर? आवडेल काय? अरे, त्याकडे बघावेसेही वाटत नाही, वैराग्य येते. हा तर पू, रक्त आणि मांसाचा पिंडच आहे. आम्हा

ज्ञानी पुरुषांना तर सर्व स्पष्टच दिसते. जसेच्या तसे दिसते, त्यामुळे आम्ही वीतरागच राहतो. देहावर अनंत जन्म राग (आसक्ति, मोह) केला. त्याचे फळ आले जन्म-मरण. तर आता एकदा तरी आत्म्याचा रागी हो, म्हणजे वीतरागी हो, तेव्हा अनंत जन्मांची कसर भरून निघेल.

देह कसा असावा? तर मोक्षाचे साधन होऊ शकेल असा देह असावा. 'चरम शरीर' प्राप्त झाले पाहिजे.

हा देह परमाणूंचा बनलेला आहे, दुसरे काहीच नाही. जसे परमाणू तसा अनुभव देहात होतो.

पशु-पक्षी, वनस्पती, सर्व जीव मनुष्यासाठीच जगत असतात आणि मनुष्य स्वत:साठीच जगत असतो. तरी सुद्धा भगवंत म्हणतात की, मनुष्य देह देवांना सुद्धा दर्शन घेण्यास योग्य आहे. हे ज्याला समजेल, त्याचे कामच होईल!

## मनुष्य देहाचे प्रयोजन

साऱ्या जगात कुणाला हे माहीत आहे की हा देह कशासाठी प्राप्त झाला आहे? हा जो देह प्राप्त झाला आहे त्याचे प्रयोजन काय आहे? याचे भानच नाही. मौजमजा करू, भगवंतांची भक्ती करू, योग करू, तप करू, त्याग करू अशा प्रकारची मान्यता असते. पण हा देह तर गुन्हेगारी टाळण्यासाठी प्राप्त झाला आहे. प्रत्येक प्राप्त संयोगाचा समभावे निकाल करून भगवंताचा साक्षात्कार करण्यासाठी हा देह प्राप्त झाला आहे. म्हणून तर कवीने लिहिले आहे,

'देह जो प्राप्त झाला, गुन्हेगारी टाळण्यासाठी,
कर्म आवरण खपवून, भगवंत निहाळण्यासाठी.'

## आचार, विचार आणि उच्चार

आचार, विचार आणि उच्चार या तिन्ही चंचल वस्तू आहेत. 'आपण' फक्त जाणावे की असा विचार आला. विचार येतात त्याची जबाबदारी आपली नाही. कारण ते पूर्वीच्या गाठीतून फुटतात. पूर्वी सही

केली होती म्हणून विचार येतात. आज त्याची जबाबदारी आपली नाही. पण जर आज पुन्हा सही केली तर भयंकर जोखीम आहे.

'आत्मा' स्वत: अचल आहे, आणि आचार, विचार आणि उच्चार हे चंचल भागात आहेत. जे जे काही कार्य स्वरूपात येतात ते 'चार' मध्ये येतात : आचार, विचार आणि उच्चार. प्रत्यक्ष रूपकात येतो तो आचार. आत ज्या (गाठी) फुटतात तो विचार आणि बोलले जाते तो उच्चार. जर नॉर्मालिटीत राहिलात सम राहिलात तर तो संसार म्हटला जातो. म्हणूनच बाहेरील भागात-बाह्याचारात नॉर्मालिटीत राहावे असे म्हटले आहे.

सत्‌युगात फक्त मनाचा विचारच बिघडत होता. वाणी आणि देहाचा आचार बिघडत नव्हता. या काळात तर सर्व प्रकारचे आचार बिघडलेले दिसतात. जर मनाचा आचार बिघडला असता तर चालवून घेतले असते परंतु वाणीचा आणि देहाचा बिघडलेला आचार चालवून घेण्यासारखे नाही. सर्वच आचार बिघडलेले असतील तर भयंकर प्रत्याघाती वाणी निघते. सर्व घाणच निघते. जे बिघडलेले बाह्याचार होते ते ज्ञानाच्या प्रभावाने बंद होतात. देहाचा आचार चोख असायला हवा. मन आणि वाणीचे आचार बदलत राहतात, परंतु जर देहाचा आचार वाईट असेल तर ती फार मोठी जोखीम म्हटली जाईल. देवी-देवता सुद्धा दु:ख देतील, बाह्याचार शुद्ध असेल तर देवी-देवता सुद्धा प्रसन्न असतात. शासन देवता सुद्धा खूश असतात.

बाह्याचार बिघडण्याचे कारण काय? तर बाहेर सुख मिळत नाही म्हणून. आतील अपार सुख प्राप्त झाल्यानंतर बाहेरचे आचार सुधारत जातात.

ज्ञानींच्या बाबतीत तर त्यांचे सर्व आंतरिक आचार ज्ञेय स्वरुपात असतात आणि स्वत: ज्ञाता-द्रष्टा पदामध्ये राहतात. आपल्याजवळ ज्ञान आहे, त्यामुळे जरी वाटेल तसे दु:खाचे संयोग आले तरी त्यातून आपण चलबिचल न होता बाहेर निघू शकतो. संकटाच्या वेळी वापरायला साखळी आहे, ती ओढली की निकाल होऊन जातो.

हे ज्ञान नसेल तर भोवऱ्यासारखे फिरतच राहायचे. परंतु ज्ञान आहे म्हणून बाह्याचार सुंदर असायला हवा, नाही तर फार मोठी जोखीमदारी येईल. लोकनिंद्य आचार तर असूच नये. जे जे आचार लोकनिंद्य आहेत, ते आपल्या संदर्भात केव्हाही नसावे. वाणी खराब असेल, मन पण खराब असेल तर ते चालवून घेऊ परंतु देहाचा आचार खराब असेल तर मात्र चालणारच नाही, तिथे तर देवी-देवता सुद्धा उभे राहत नाहीत.

मनाचे आणि वाणीचे आपण ज्ञाता-द्रष्टा आहोत आणि ती तर ज्ञेय फिल्म म्हणायची, परंतु बाह्याचाराच्या बाबतीत तर चालणारच नाही. लोकनिंद्य आचारात पडण्यापेक्षा लग्न केलेले बरे. खरे तर, अशा प्रकारची चूक तर दिसल्याबरोबरच मिटवून टाकावी. तिथे जर ज्ञाता-ज्ञेय संबंध ठेवायला गेलात तर ती चूक कुठल्या कुठे नेऊन फेकून देईल त्याचा नेम नाही. एखाद्या दिवशी ज्ञानाला एका बाजूला ढकलून वर चढून बसेल. विषाची पारख करायची नसते. अहंकाराने सुद्धा तोडून टाकावे. कसेही करून त्याचा निकाल लावायलाच हवा. बाहेर तर चालणारच नाही. आपण एकदा ठाम ठरवायचे की बाह्याचार शुद्धच असायला हवा. असे जर ठरवले नसेल तर दोष होतच राहतील. ही तर भयंकर जोखीम आहे. जगात यासारखी दुसरी कोणतीच जोखीम नाही. संसार जोखीम स्वभावाचा नाही पण बिघडलेल्या बाह्याचारात मात्र जोखीम आहे. सुंदर बाह्याचाराने तर देवलोकांची कृपा लाभते आणि ते मोक्षापर्यंत मदत करतात.

बाह्याचाराच्या बाबतीत तर आपण स्पष्ट समजून घेतले पाहिजे की यात तर भयंकर जोखीम आहे, म्हणून तो आपण ज्ञानी पुरुषाच्या चरणी अर्पण करून टाकावा. बाह्याचार बिघडतो कशामुळे? तर सुख नाही म्हणून. जरी जळजळ (दु:ख) गेली नसेल तरी पण आपल्या आत अनंत सुख आहे. तेव्हा आता असे काही नसावे. आपण शुद्धात्मा झालो, तर अहंकाराने सुद्धा त्यापासून दूर राहावे.

बिघडलेला बाह्याचार कशास म्हणावे?

आत्ता तू कोणाच्या खिशातून काही काढून घेतलेस तर तुला भीती वाटत राहते ना, त्यास लोकनिंद्य म्हटले जाते. कुणाला शिवी दिली,

थोबाडीत मारली, तेही लोकनिंद्य मानले जाते. दारु, सट्टा हे सर्वच बिघडलेल्या बाह्याचारात येते, त्यात सुद्धा जोखीमच आहे. तरी ती जोखीम चालवून घेऊ, पण त्यात काय फायदा? प्रामुख्याने ब्रह्मचर्य संबंधात मात्र बिघडलेला बाह्याचार चालणार नाही. आणि दुसरे चोरी संबंधात. जगातला सर्वात उत्तम बाह्याचार म्हणजे ब्रह्मचर्य. त्यामुळे तर देवलोक पण खूश होतात. संसार बाधा देणार नाही. तू एका ऐवजी चार बायका कर, पण तुझा बाह्याचार बिघडू देऊ नकोस. त्याला तर भगवंतांनी अनाचार म्हटले आहे. मोक्ष मिळवायचा असेल तर नुकसान करणाऱ्या गोष्टींना बाजूला सारावेच लागेल ना?

## उद्वेग

उद्वेग म्हणजे आत्म्याचा (प्रतिष्ठित आत्म्याचा) वेग वर मेंदूपर्यंत चढणे.

वेगाचे विचार आले, तर शांतीच राहते आणि उद्वेगाच्या विचाराने अशांती उत्पन्न होते. उद्वेगाचे विचार आले तर समजून घ्या की काही तरी वाईट घडणार आहे.

ही ट्रेन मोशनमध्ये चालते की इमोशनल होऊन चालते?

**प्रश्नकर्ता :** मोशनमध्येच असते.

**दादाश्री :** ट्रेन जर इमोशनल झाली तर?

**प्रश्नकर्ता :** ॲक्सिडंट होईल. हजारो माणसे मरतील.

**दादाश्री :** त्याचप्रमाणे मनुष्य देह जोपर्यंत मोशनमध्ये म्हणजे वेगात चालत आहे तोपर्यंत ॲक्सिडंट होत नाही आणि हिंसाही होत नाही, परंतु मनुष्य जेव्हा इमोशनल होतो तेव्हा देहात जे अनंत सूक्ष्म जीव असतात ते मरतात. क्रोध-मान-माया-लोभ, इमोशनल करवितात. इमोशनल झाल्यामुळे जे जे जीव मरतात, त्यांची हिंसा होते आणि मग त्याचे फळही भोगावे लागते. म्हणूनच ज्ञानी पुरुष सांगतात की बाबा, तू मोशनमध्येच रहा, इमोशनल होऊ नकोस.

उद्वेग, ही सुद्धा इमोशनल अवस्था आहे. उद्वेगाच्या अवस्थेत गाठी फुटतात. गाठी एकदमच फुटत राहिल्याने चित्त त्याच अवस्थेत तन्मयाकार होऊन जाते. असंख्य परमाणू उडाल्यामुळे जबरदस्त आवरण येते. जसे ढग सूर्यप्रकाशाला झाकून टाकतात त्याप्रमाणे उद्वेगाच्या अवस्थेत ज्ञान प्रकाश जबरदस्त आच्छादून जातो. त्यामुळे 'स्वत:ची' अद्‌भुत शक्ती सुद्धा आच्छादली जाते. उद्वेगाच्या अवस्थेत मनाची किंवा देहाची स्थिरता राहत नाही. भाल्याने टोचल्यासारखे वाटते. उद्वेग हे सर्वात मोठे आवरण आहे. त्यास जर जिंकता आले तर स्पष्ट भूमिका तयार होते. जर मोठ्या उद्वेगातून बाहेर निघता आले तर लहान उद्वेगातून सहज बाहेर निघता येईल पण स्वरुपाचे भान असेल तरच उद्वेगाला जिंकणे शक्य आहे. ज्ञान नसेल तर उद्वेग लाख जन्मांपर्यंत न आलेलाच बरा. कारण त्यात भयंकर परमाणू खेचले जातात आणि ते मग फळ तर देतातच ना!

उद्वेगात अधोगतीत जाण्याची बीजे पेरली जातात, त्यामुळे त्यांच्या गाठी पडलेल्या असतात आणि त्या वेगाने फुटतात. जो आग्रही असेल त्याला तर भारी भक्कम गाठी पडलेल्या असतात. त्या 'व्यवस्थित शक्तीच्या' नियमाच्या आधारे फुटतात तेव्हा त्याला काय करू आणि काय नको, असे वाटते! चहाच्या कप-बश्या सुद्धा धाड करून फोडून टाकतो! वाटेल तसा वागतो! पण निराग्रही असेल ज्याला जास्त आग्रह नसेल, त्याला अशा मजबूत गाठी पडलेल्या नसतात.

उद्वेगात मनुष्य वेडापिसा होऊन जातो. उद्वेगाचे विचार येण्यास सुरुवात झाली की, ते काम तिथेच थांबवावे. उद्वेगात काम केले तर ते काम बिघडतेच. वेगात आले तरच काम चांगले होईल.

उद्वेग म्हणजे वर चढवणे. उद्वेग जर सुलट दिशेत चढला तर ज्ञानात एका मैलापर्यंत वर चढवेल पण जर उलट दिशेने चालला तर कितीतरी मैल मागे ढकलून देईल! उद्वेग ज्ञान जागृतीसाठी चांगला आहे पण अट इतकीच की तो सरळ राहिला तर!

महात्मा असेल, तर तो तुमचे मन शांत करेल. तो तुम्हाला

आवेगातून वेगात घेऊन येईल. वेगात असेल तर सर्व सरळ करून देईल. मनुष्याचे मन गतीमध्ये आणायला हवे. मनास आवेगातून वेगात आणतो तोच महात्मा.

या देहाला जर अविनाशी बनवायचे असेल तर त्यावर प्रीती केलेली योग्य, पण यात तर पू भरतो, यावर प्रीती कशासाठी? प्रीती किती असावी? तर या देही ज्ञानी पुरुष भेटलेत म्हणून मोक्षाचे काम साधून घेण्यापुरतीच. बस तेवढ्यापुरतीच! या देहावर प्रीती केल्याने तर उद्वेग उत्पन्न होतो. प्रीती केली तरी तो नष्टच होणार ना? भगवंतांनी सुद्धा देहाला दगा म्हटले आहे. शेवटी देहाची राखच होणार आहे ना? हा देहच राग आणि द्वेष करवितो. भगवंत काय म्हणतात की, अनंत जन्म देहासाठी घालवले, आता एक जन्म आत्म्यासाठी घालव.

उद्वेग होतो तो कारणाशिवाय होत नाही. त्याचा हिशोब असतो आणि आपल्याला ते समजते सुद्धा की कोणत्या कारणाने उद्वेग झाला. परिचित असेल तरच येतो. उगाच काही घडत नाही.

उद्वेग हा ॲक्सिडंट (अपघात) आहे, इन्सिडंट (घटना) नाही. ॲन इन्सिडंट हॅज सो मेनी कॉजेस ॲन्ड ॲन ॲक्सिडंट हॅज टू मेनी कॉजेस. (घटना घडण्यामागे अनेक कारणे असतात आणि दुर्घटना घडण्यामागे अनेकानेक कारणे असतात.)

या जगात आफरीन होण्यासारखी एकच वस्तू आहे आणि ती म्हणजे ज्ञानी! अन्य सर्व ठिकाणी दुःखदायी वस्तूच आहेत. जिथे कायम सुख असेल तिथेच आफरीन होण्यासारखे आहे.

उद्वेग कुठे होतो? जिथे आफरीन होण्याची स्टेशने असतात तिथेच होतो. उद्वेगाचे कारणच आहे ते. चहा-नाश्ता घ्यायला हरकत नाही पण गाडी आली की ते तिथल्यातिथे सोडून सरळ गाडीत बसायचे. पण हा तर ज्या स्टेशनवर आफरीन झाला असेल तिथेच बसून राहतो आणि गाडी निघून जाते. उद्वेग उडी मारायला लावतो पण जर पायरी चुकली तर काय होईल? तसेच जर आमच्या सत्संगात झोकून दिले तर कामच

झाले समजा. एकीकडे सत्संग हा परम हितकर आहे आणि दुसरीकडे जे आकर्षण करविणारे आहेत ते हैराण करून सोडतात.

## निद्रा

झोप ही जीवमात्राची गरज आहे. परंतु झोपेचे प्रमाण कुठेही सांभाळले गेले नाही. या काळातील माणसे सुद्धा कशी झाली आहेत? इथे तर चित्रविचित्र घराणी निर्माण झाली आहेत, नाही तर अशी झोप असते का कुठे? या पक्षुपक्ष्यांना काय माणसासारखी झोप येते? झोपेचे प्रमाण असे असावे की दिवसा झोप यायला नको. हे तर मेले, रात्री दहा तास झोपतात ते थेट सूर्य उगवेपर्यंत पडून राहतात. अरे, हा संसार असा झोपण्यासाठी आहे का? आणि दुसरीकडे काही लोकांना झोपच येत नाही. या अमेरिकेत ऐंशी टक्के लोक झोपेच्या गोळ्या खाऊन झोपतात. अरे, मूर्खा, मरशील. हे तर विषच आहे. हा तर भयंकर रोग म्हणायचा. तुम्ही चंद्रापर्यंत तर पोहोचलात पण तुमच्या देशात झोपेच्या गोळ्या घेण्याचे प्रमाण कमी का करता आले नाही? खरी आवश्यकता तर याचीच आहे. झोपेच्या अभावामुळे तुमच्या देशातील लोक त्रस्त आहेत, मग त्यावर काही तरी उपाय करा ना! झोप ही तर निसर्गाची देणगी आहे, नॅचरल गिफ्ट, ते सुद्धा तुम्ही हरवून बसलात! मग या दुसऱ्या वैभवाचे काय करायचे? त्यांचा काय उपयोग? नॅचरल (नैसर्गिक) झोप लागत नाही, याचे कारण त्यांचे जे खाणे आहे त्या प्रमाणात त्यांचे श्रम नाहीत. श्रम करून दमेल आणि झोप येईल अशा प्रमाणात आहार असावा. श्रमाच्या प्रमाणात आहाराचे एडजस्टमेंट असेल तर नॉर्मल झोप येते. झोपेची मारामारीच झाली आहे! सगळीकडेच झाली आहे ना! फॉरेनमध्ये तर झोप शोधून सुद्धा सापडत नाही, म्हणून तर मी नॅचरल औषधाची व्यवस्था करण्यामागे आहे. आम्ही सर्वांना नॅचरल जीवन जगण्यास शिकवू. नॉर्मल खाणे-पिणे, नॉर्मल झोपणे आणि नॉर्मल मौजमजा करणे.

झोप किती असावी? भगवंतानी तीन तास झोपेची सूट दिली आहे. हे जग झोपा काढण्यासाठी नाही. ज्ञान प्राप्तीनंतर जास्त झोप येत

नसेल तर ते उत्तम. ज्ञाता-द्रष्टापद विशेष प्रमाणात राहील. आम्ही गेली तीस वर्षे दीड तासाहून जास्त झोपलो नाही. ज्ञान जागृतीतच रात्री काढल्या आहेत. झोप किती असावी? तर काम केल्यानंतर या देहाचा थकवा दूर करण्यापुरतीच आणि तितका वेळ पुरेसा असतो.

गौतम स्वामींनी महावीर भगवंतांना विचारले की, 'झोपलेला बरा की जागा असलेला बरा?' भगवंतांनी सांगितले की, 'या जगात एक हजारातून नऊशे नव्याण्णव माणसे झोपत असलेलीच बरी, पण एखादा परोपकारी जीव जागा असलेलाही बरा.'

## स्वप्न

स्वप्न विज्ञान गहन आहे. मोठेमोठे सायन्टिस्ट त्याचा शोध घेण्याच्या प्रयत्नात आहेत. यात कोणता देह कार्य करत असतो ? अंत:करण त्यावेळी कोणते कार्य करत असते? इत्यादींचा शोध घेत आहेत, परंतु स्वप्नाचे सायन्स तसे हाती लागण्यासारखे नाही.

स्वप्नात स्थूल देहाचे सर्वच दरवाजे बंद असतात. तेव्हा सूक्ष्म देह-मन, बुद्धी आणि चित्त कार्य करत असतात. अहंकार काहीच करू शकत नाही. जर अहंकार सुद्धा त्यात कार्य करत असता तर मनुष्य स्वप्नावस्थेत सुद्धा उठून मारामारी करू लागेल, चालू लागेल. स्वप्नात होत असलेल्या सर्व क्रिया करू लागेल, परंतु अहंकाराचे तिथे काहीच चालत नाही. उलट जागृत अवस्थेत त्याला असे भान असते की 'मी करू शकतो.' खरे तर तो कोणत्याही अवस्थेत काहीच करू शकत नाही पण जागृत अवस्थेत सर्व खिडक्या उघड्या असल्यामुळे भ्रांतीमुळे कर्ताभाव येतो.

स्वप्ने खोटी नसतात. खरीच असतात, यथार्थ असतात, इफेक्टिव असतात आणि हे सायन्टिफिक पद्धतीने सिद्ध करता येईल असे आहे. स्वप्नात सूक्ष्म देहावर झालेला परिणाम स्थूल देहावर सुद्धा होत असतो. म्हणून ते इफेक्टिव आहे. ते कसे? पाहा, मी तुम्हाला समजावून सांगतो. भिकाऱ्याला स्वत: महाराजा झाल्याचे स्वप्न पडले तर त्याचे पावशेर

रक्त वाढते आणि राजा स्वप्नात भिकारी झाला तर त्याचे पावशेर रक्त कमी होते. जागृत अवस्थेत त्याला जितके दु:ख होते तितकेच दु:ख स्वप्नात सुद्धा होत असते. तो बापडा रडतो सुद्धा, जाग आल्यावर डोळ्यात पाणी असते. अरे, कित्येकदा तर जाग आल्यानंतर सुद्धा त्याचा इफेक्ट जात नाही, त्यामुळे बराच वेळ रडत राहतो. लहान मुले सुद्धा स्वप्नाच्या इफेक्टमुळे दचकून उठतात आणि बराच वेळ रडत राहतात. भितीदायक स्वप्नात देहावर परिणाम होतो, त्याचे श्वासोच्छ्वास वाढतात. नाडीची धडधड वाढते, ब्लड सर्क्युलेशन इत्यादी सर्वच वाढते. हे सर्व इफेक्टस सायन्टिफिकली सिद्ध करता येतील असे आहेत. जर स्वप्न इतके परिणामकारक आहे तर त्यास खोटे कसे म्हणता येईल?

एक व्यक्ती मला कधी भेटलीच नव्हती तरी सुद्धा त्याने स्वप्नात माझे एक्जेक्ट दर्शन केले होते. आता याचा हिशोब कसा लावायचा? किती कॉम्प्लेक्स आहे हे सर्व!

पूर्वी कधी पाहिली नसेल अशी कोणतीही वस्तू स्वप्नात दिसत नाही. पूर्वी कोणत्याही जन्मात पाहिले असेल तेच दिसू शकते. स्वप्न तर अनेक जन्मांचे संकलन आहे, ते काही नवीन नाही. काही लोक म्हणतात, दिवसा जे विचार येतात तेच स्वप्नात दिसतात. अरे, दिवसा तर अनेक प्रकारचे असंख्य विचार येतात म्हणून काय ते सर्वच स्वप्नात दिसतात? आणि असेही घडतेच ना की ज्याचा कधी विचार सुद्धा आलेला नसतो, तेही स्वप्नात दिसते!

स्वप्नात कारण शरीर आणि सूक्ष्म शरीर - दोनच शरीर काम करत असतात. स्थूल शरीराचे यात कार्य नसते.

एका माणसाला स्वप्न पडले की तो आजारी पडला आहे. डॉक्टर आले. आणि म्हणाले की, ह्याची नाडी चालत नाही, हा मेला आहे. म्हणजे स्वत:ला मेलेला पाहतो आणि शवाला जळत असलेलेही पाहतो आणि घाबरून उठतो! (शवाला जाळून टाकले आणि मी वाचलो, असे त्याला वाटते.)

स्वप्नात तर अविवाहिताचे लग्न सुद्धा होते आणि स्वतःची मुले सुद्धा पाहतो आणि त्यांची लग्ने सुद्धा लावतो.

**प्रश्नकर्ता :** स्वप्न पडण्याचे कारण काय?

**दादाश्री :** हा जो संसार दिसतोय ते जागेपणी केलेल्या कर्माचे फळ आहे. स्वप्ने पडतात, ती सुद्धा पाप-पुण्याच्या उदयानुसारच असतात, पण स्वप्नात त्याचा परिणाम हळवा असतो.

**प्रश्नकर्ता :** स्वप्न ही ग्रंथी आहे का?

**दादाश्री :** स्वप्न, म्हणजे या सर्व ग्रंथीच आहेत. स्वप्न हे दोन देहांचे कर्म आहे, तीन देहाने बांधलेले कर्म नाही. म्हणून दोन देहानेच त्याचे वेदन केले जाते.

**प्रश्नकर्ता :** स्वप्नात कॉजेस पडतात का? (कर्म बंधन होते का?)

**दादाश्री :** नाही, स्वप्न हा कंप्लीट इफेक्ट आहे. त्यात अहंकाराचे कार्य नसल्यामुळे कॉजेस पडत नाहीत.

स्वप्नात कारण देहाचे, आणि सूक्ष्म देहाचे कार्य असते. त्याला पाहणारा प्रतिष्ठित आत्मा असतो आणि प्रतिष्ठित आत्म्याला जसा आहे तसा पाहणारा आणि जाणणारा स्वतः 'शुद्धात्मा'! ज्याला जितके आवरण असेल, त्याला तितके कमी दिसते. आवरण जितके पातळ असेल तितके स्पष्ट दिसते. काही लोक म्हणतात की, मला कधीच स्वप्न पडत नाही, परंतु तसे नाही. त्यांनाही स्वप्ने तर पडतात पण आवरणे गाढ असल्यामुळे त्यांना स्वप्ने आठवत नाहीत.

एकजण मला म्हणाला की, 'दादा स्वप्नात मी दोन तास रडत होतो. तुम्ही आलात आणि तुमचे मी दर्शन घेतल्याने सर्व शांत झाले! हलकाफुलका झालो! मी म्हटले, 'अरे, कपडे ओले झाले होते का?' प्रत्यक्ष भेटण्यापेक्षा असे स्वप्नात दादा आले आणि त्यांच्याजवळ मागणी केली तरी अपार मिळते. स्वप्नात सुद्धा हे दादा येऊन सर्व काही करू शकतील असे आहेत! मागता आले पाहिजे, आमच्या

कित्येक महात्म्यांना तर दादा रोजच स्वप्नात येतात. शास्त्रं काय म्हणतात? की,

*'जेनुं स्वप्ने पण दर्शन थायरे,*
*तेनुं मन न ज बीजे भामे रे.'*

(ज्याला स्वप्नात सुद्धा दर्शन घडते,
त्याचे मन मग इतरत्र भटकत नाही.)

एकदा जरी स्वप्नात ज्ञानी पुरुषांचे दर्शन घडले तरी तुझ्या मनातील सर्व भ्रांती निघून जातील.

ज्ञानी काय म्हणतात की अरे, दोन देहाचे स्वप्न तुला खरे वाटते का? तर नाही! तसे तीन देहांचे स्वप्न सुद्धा ज्ञानींना खरे वाटत नाही. हे तर भ्रांतीजन्य ज्ञानामुळे लोक या तीन देहांच्या स्वप्नाला (संसाराला) सत्य मानून बसले आहेत.

इंद्रिय प्रत्यक्ष म्हणजे इंद्रियांच्या साहाय्याने जे आपण पाहू-जाणू शकतो ते. जी स्वप्ने झोपेत दिसतात ती दोन देहांची असतात, मात्र ज्ञानी पुरुषांना तर जागेपणीसुद्धा हा संसार तीन देहांचे स्वप्नच वाटते.

एखादा भिकारी स्वप्नात राजा झाला असेल तर त्याला किती मस्ती चढते? पण जाग आल्यावर परत तिथल्या तिथेच. त्याचप्रमाणे हे सुद्धा स्वप्नच आहे. संसार स्वप्नवत्‌च आहे. इथून निघून गेलो की परत जसे होते तसेच राहते. इथले सर्व इथे आणि तिथले सर्व तिथे!

हे उघड्या डोळ्यांचे स्वप्न आहे आणि ते बंद डोळ्यांचे स्वप्न आहे. दोन्ही इफेक्टिव आहेत! जागे असताना इगोइजम आहे, इतकाच फरक.

रात्री लाख स्वप्ने येऊ देत, पण जाग आल्यावर माणसावर त्याचा काहीच परिणाम राहत नाही. कारण तिथे स्वप्नात द्रष्टाच्या रुपात राहतो. तिथे इगोइजम कार्य करत नाही. याउलट ज्ञानी पुरुष जागृतच असतात, आणि प्रत्येक '*समयी*' येणाऱ्या अवस्थांचे ज्ञाता आणि द्रष्टा राहतात.

त्यांच्यात इगोइजम नावालाही नसतो. त्यामुळे जागेपणी सुद्धा त्यांना स्वप्नच वाटते. ज्ञानी पुरुष तर संपूर्णपणे ज्ञाता-द्रष्टाच असतात.

## भय

संपूर्ण ब्रह्मांडातील प्रत्येक जीव भयग्रस्त आहे. जीवमात्राला भीती वाटत असते, पण त्यांची भीती नॉर्मालिटीत असते. त्यांना तर भीतीचे संयोग येतात तेव्हाच भीती वाटते. परंतु मनुष्यांच्या बाबतीत तर विपरीत भय शिरले आहे. विपरीत भय म्हणजे एकच भय येणार असेल पण त्याला शंभर प्रकारचे भय दिसतात आणि जे भय येणारच नसेल तेही त्याला दिसते, त्यास सुद्धा विपरीत भय म्हणतात. एखादाच जेवायला येणार असेल पण त्याला वाटते की शंभर जण येणार आहेत, ते आहे विपरीत भय.

भय केव्हा शिरते ? द्वेषपूर्वक केलेल्या त्यागात, तिरस्कारात निरंतर भय वाटत असते. पोलिसवाल्याची भीती कशामुळे वाटते ? कारण तो आवडत नाही म्हणून, त्याचा तिरस्कार आहे म्हणून. कोर्टाची भीती कशामुळे वाटते ? कोर्ट काय कुणाला खाते ? नाही. त्याचा द्वेष असल्यामुळे भीती वाटते. भय हा तर आत दडलेला तिरस्कार मानला जातो. सापाच्या आत भगवंत विराजमान आहेत, ते दिसत नाहीत म्हणूनच त्याची भीती वाटते ना ? साप सरकमस्टेन्शियल एविडन्समुळे येतो. सहजासहजीच साप समोर आला आणि जर त्या मनुष्याला भीती वाटली नाही तर साप एका बाजूने निघून जाईल. हिशोब नसेल तर काहीच करत नाही.

संपूर्ण समसरण मार्ग-संसार मार्ग भ्रांतीजन्य आहे. भयावह आहे. भयावह म्हणजे काय ? रात्री झोपण्यापूर्वी भुताची भीती वाटली किंवा सापाची भीती वाटली, तर रात्रभर धास्ती वाटत राहते. झोप सुद्धा येत नाही आणि सकाळी, म्हणजे उजेडात ती भीती निघून जाते म्हणजे मग धास्तीही निघून जाते. तसेच या संसाराचे सुद्धा आहे.

भुताच्या धास्तीत फरक मात्र इतकाच की त्याला आतून धास्ती

वाटत राहते की माझे काय होईल? भीती वाटत नाही, मात्र संसारात भीती आणि धास्ती दोन्हीही असतात. भीती वाटत असल्यामुळे अज्ञानतेने त्याच्या प्रति राग-द्वेष करत राहतो आणि त्यामुळे धास्ती वाटते. भितीजनक संयोगांना मारण्याचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करत राहतो.

आत्म्याचे अज्ञान आहे म्हणून भय वाटते आणि संगीचेतनेमुळे धास्ती वाटते. धास्ती वाटणे हा संगीचेतनेचा गुण आहे. संगीचेतना म्हणजे आरोपित चेतना. विधी करत असेल किंवा ध्यानात बसला असेल आणि एकदम मोठ्ठा आवाज आला तर देह ऑटोमेटिक दचकतो. त्यास संगीचेतना म्हणतात.

जिथे तुझी सत्ता नाही, तिथे तू हात घातलास तर काय होईल? कलेक्टरच्या सत्तेत कारकुनाने सही केली तर? दिवसभर भीती वाटत राहील, कारण परसत्तेत आहे म्हणून. जगातील माणसे सुद्धा निरंतर परसत्तेतच राहतात. 'मी चंदुलाल' हीच परसत्ता. स्वत:ची सत्ता तर पाहिलीच नाही, जाणलीही नाही आणि परसत्तेतच मुक्काम केला. त्यामुळे निरंतर भय, भय आणि भयच वाटत राहतो.

सर्व काही सहज मिळेल असे आहे पण भरवसा असायला हवा. लोकांना वाटत राहते की, हे नाही मिळाले तर? अमुक झाले नाही तर? बस, हेच विपरीत भय आहे.

बुद्धी कशासाठी आहे? तर सर्वांना शांती देण्यासाठी, घाबरवण्यासाठी नव्हे. जी बुद्धी भय दाखवते ती विपरीत बुद्धी. तिने डोके वर काढताच तिला ठेचून टाकायला हवे.

अरे, तुला जर भयच बाळगायचे असेल तर मरणाचे भय बाळग की! क्षणोक्षणी हे जग मरणाच्या भयाने ग्रासलेले आहे. मग तुला त्याचे भय का वाटत नाही? त्याचे जर भय वाटले तर मोक्षाचा उपाय शोधण्याचे सुचेल. परंतु तिथे तर अगदी जडसमान झाले आहेत.

## हिताहिताचे भान

हिताहिताचे भान तर प्रत्येकाला आपले स्वतंत्र असले पाहिजे की, काय केल्याने मी सुखी होईन आणि काय केल्याने दु:खी होईन. स्वत:ला हिताहिताचे स्वतंत्र भान नसल्यामुळे नक्कल करायला जातो. अरे, नक्कल कुणाची करायची असते? तर अक्कलवाल्याची. अक्कलवाला तर एक सुद्धा दिसत नाही, मग तू कुणाची नक्कल करशील? कारण जोपर्यंत नकली भानात, म्हणजे 'मी चंदुलाल आहे' अशा भानात आहेस तोपर्यंत तू नकली आहेस, असली नाहीस. अस्सलची नक्कल होऊ शकते. नकलीची नक्कल करून काय फायदा? 'वास्तविक' समजेल तेव्हा काम होईल?

फक्त एक ज्ञानच अस्सल असते, बाकी सर्वच नकली. जीवनात कुणाचीही नक्कल करायची नसते. पण आता तर झोपेची सुद्धा नक्कल, हालण्या-चालण्याची सुद्धा नक्कल! अरे, बसायची सुद्धा नक्कलच करतात ना!

सत्युगात लोकांना व्यवहाराच्या हिताहिताचे भान होते. त्या काळात अनाचार नव्हता. लोक सदाचारी होते. सध्या तर बहुतेक सगळीकडे अनाचारच आहे, तिथे हिताहिताचे भान कसे असू शकेल? हे तर लोकांचे बघून बघून विपरीत शिकले आहेत. 'स्वत:चे' काढून तर कधी वापरलेच नाही.

'स्वत:च्या' हितहिताचे भान वाढत जाते, तेव्हा त्याची वाणी काही अंशी वीतरागी म्हटली जाते. वादी-प्रतिवादी दोघेही त्यास कबूल करतात!

क्षणोक्षणी 'स्वत:च्या' हिताहिताचे भान असायला हवे. 'स्वत:' कोण आहे याचे आणि व्यवहाराच्या हिताहिताचे, दोन्हींचे भान ठेवावे लागते. 'स्वत:' अर्थात आत्मा तर कधीच धोका देणार नाही. हा तर केवळ व्यवहारच धोकादायक आहे आणि धोका आहे म्हणून तिथे अधिक सावध राहा आणि हिताहिताचे भान अवश्य ठेवा. कुणी ढेकूण मारण्याचे औषध पीत नाही, असे औषध पिण्याची हौस असते का कुणाला?

# लाईफ एडजस्टमेंटस्

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात काही सिद्धांत असलेच पाहिजेत, पण तरी सुद्धा संयोगानुसार वागले पाहिजे. संयोगांशी जो एडजस्ट होतो, त्याचे नाव माणूस. 'एडजस्टमेंट' जर प्रत्येक संयोगात घेता आली तर थेट मोक्षापर्यंत पोहोचता येईल असे हे अजब हत्यार आहे. एडजस्टमेंट म्हणजे तुझ्याबरोबर जो कुणी डिसएडजस्ट होण्यासाठी येईल, त्याच्याशी तू एडजस्ट होऊन जा. दैनंदिन जीवन व्यवहारात जर सासू-सून, जावा-जावांमध्ये डिसएडजस्टमेंट होत असेल, तर ज्याला या संसार चक्रातून सुटायची इच्छा असेल त्याने एडजस्ट व्हायलाच पाहिजे! नवरा-बायकोत जर एक तोड-तोड करत असेल तर दुसऱ्याने जोडून घ्यावे. तरच संबंध निभावता येईल आणि शांती राहील. ज्याला एडजस्टमेंट घेता येत नाही त्याला लोक मेंटल (वेडा) म्हणतात. या रिलेटिव्ह सत्यात आग्रह किंवा हट्टाची काहीच गरज नाही. माणूस कुणाला म्हणावे? एवरीव्हेर एडजस्टेबल! चोराशीही एडजस्ट होता यायला हवे. आजच्या मनुष्यांची दशा ही घाण्याच्या बैलांसारखी झालेली आहे, पण जाणार कुठे? येऊन फसले आहेत, आता कुठे जाणार?

एकदा आम्ही अंघोळीसाठी गेलो आणि तिथे तांब्या ठेवायचा राहिला होता. हात घातला तर पाणी फारच गरम होते, नळ उघडला तर टाकी खाली होती! एडजस्ट एवरीव्हेर झालो नाही तर मग ज्ञानी कसले म्हणायचे? मग आम्ही हळूहळू हाताने अंगावर पाणी चोपडून-चोपडून, गार करत अंघोळ केली. तर महात्मा म्हणाले, 'आज दादांना अंघोळीला फार वेळ लागला.' पण काय करणार? पाणी गार तर व्हायला हवे ना? आणि आम्ही कुणाला हे आणा, ते आणा, असे म्हणतच नाही. एडजस्ट होऊन जातो. एडजस्ट होणे हाच धर्म आहे. या जगात तर प्लस-मायनस करून एडजस्टमेंट घ्यायची असते. मायनस असेल तिथे प्लस, आणि प्लस असेल, तिथे मायनस करायचे. आम्ही तर आमच्या समंजस पणाला जर कुणी वेडेपणा म्हटले तरी आम्ही म्हणू की, हो, बरोबर आहे. तिथे लगेचच मायनस करून टाकतो.

अक्कलवाला कुणाला म्हणायचे? तर कुणालाही दु:ख देत नाही त्यालाच, आणि जर कुणी दु:ख दिले तर ते जमा करून टाकतो, दिवसभर सर्वांना ओब्लाइज (परोपकार) करत राहतो. सकाळी उठल्यापासूनच त्याचे लक्ष असते, लोकांना मदत कशी करता येईल, असे ज्याला निरंतर वाटत राहते, त्याला मानव म्हणायचे. आणि त्याला मग पुढे जाऊन मोक्ष मार्ग सुद्धा मिळतो.

## संघर्ष

'कोणाच्याही संघर्षात पडू नकोस आणि संघर्ष टाळ.'

आमच्या या एका वाक्याचे जर आराधन कराल तर थेट मोक्षापर्यंत पोहोचाल. तुमची भक्ती आणि आमचे वचनबळ, यामुळे सर्व कार्य पार पडेल. तुमची तयारी असली पाहिजे.

आमच्या एकाच वाक्याचे जर कुणी पालन केले तर तो मोक्षाला जाईलच. अरे, आमचा एक शब्द, जसाच्या तसा पूर्णपणे गळी उतरवाल तरीही मोक्ष हाती येईल. पण त्यास जसेच्या तसे गळी उतरव. त्याला चावत, चघळत बसू नकोस. तिथे तुझी बुद्धी कामी येणार नाही, उलट ती गोंधळात टाकेल.

आमच्या एकाच शब्दाचे एकच दिवस पालन केलेस तरी अद्‌भुत शक्ती उत्पन्न होईल! प्रभाव उत्पन्न होतच राहील. आत इतकी अपार शक्ती आहे की वाटेल तेवढा संघर्ष (वादविवाद, भांडण) निर्माण झाला असेल तरी तो टाळता येईल. जो जाणूनबुजून दरीत उडी घेण्याच्या तयारीत आहे त्याच्याशी जर आपण वादविवाद करत बसलो तर तो स्वत:बरोबर आपल्याला सुद्धा दरीत पाडेल. आपल्याला मोक्ष प्राप्त करायचा आहे की अशा लोकांशी भांडत बसायचे आहे? ते तर कधीच मोक्षाला जाणार नाहीत पण तुलाही आपल्यासोबत बसवून ठेवतील. अरे, हे तर कसे परवडेल? तुला जर मोक्षालाच जायचे आहे तर असल्या लोकांशी जास्त शहाणपणा करण्यात काहीच अर्थ नाही, की बाबा, तुम्हाला लागले का? सर्व बाजूंनी, सर्व प्रकारे जपून चालावे,

नाही तर तुम्हाला जरी लाख या जंजाळातून सुटायचे असेल तरीही हे जग तुम्हाला सुटू देणार नाही. संघर्ष तर निरंतर येतच राहतील, त्यातून आपण जरा सुद्धा घर्षण न करता सहज बाहेर पडायचे! अरे, आम्ही तर इथपर्यंत सांगत आहोत की जर तुझे धोतर काट्यात अडकले असेल आणि तुझी मोक्षाची गाडी सुटत असेल, तर त्या धोतराला सोडवत बसू नकोस! धोतर-बीतर सर्व तिथेच टाकून पळ काढ, अरे, एक क्षण सुद्धा कुठल्याही अवस्थेत चिकटून बसण्यासारखे नाही! तिथे मग इतरांची तर गोष्टच काय करावी? जितका तू चिकटलास तितका तू स्वरूपाला विसरलास.

चुकून जरी तू कुणाच्याही संघर्षात अडकलास तर लगेच त्याचे समाधान करून टाक. त्या संघर्षातून घर्षणाची ठिणगी उडू न देता सहजपणे तिथून पळ काढ.

## इकॉनॉमी

इकॉनॉमी (काटकसर) कशास म्हणतात? तर टाईट असेल तेव्हा टाईट आणि थंड असेल तेव्हा थंड. कधीही कर्ज करून कार्य करू नये. कर्ज काढून व्यापार करता येतो परंतु मौजमजा करू नये. कर्ज करून केव्हा खायचे? तर जेव्हा मरणाच्या दारात असेल तेव्हा. परंतु कर्ज करून तूप प्यायचे नसते.

**प्रश्नकर्ता :** लोभी आणि कंजूष यांच्यात काय फरक आहे?

**दादाश्री :** कंजूष तर फक्त लक्ष्मीच्या बाबतीतच असतो. लोभी तर सर्व बाबतीतच लोभात असतो. मानाचाही लोभ करतो आणि लक्ष्मीचाही लोभ करतो. या लोभ्याला तर सर्व दिशांचा लोभ असतो म्हणून सर्वच खेचून घेतो. किड्याचे पंख असेल तर मुंग्या एकत्र येऊन त्याला खेचून नेतात. लोभ्याचे ध्येय काय? तर गोळा करत राहणे. मुंग्या पंधरा वर्ष चालेल इतके साठवून ठेवतात. गोळा करण्यातच त्या गुंग असतात. त्यात जर कुणी मधे आले तर त्याचा चावा घेऊन मरतात. मुंगी जन्मभर आपल्या वारुळात गोळा करत राहते. आणि

उंदीर मामा फुकटाचे खाणारे, एका मिनिटातच गोळा केलेले सर्व खाऊन फस्त करतात.

**प्रश्नकर्ता :** दादा, कंजूषपणा आणि काटकसर, यात काही फरक आहे का?

**दादाश्री :** होय. पुष्कळ फरक आहे. हजार रुपये महिन्याची कमाई असेल तर आठशे रुपये खर्च करावे आणि पाचशेची कमाई असेल चारशे रुपये खर्च करावे, त्याला म्हणतात काटकसर. त्या उलट कंजूष तर चारशेचे चारशेच वापरतो, मग हवे तर हजार येऊ देत की दोन हजार येऊ देत. तो टॅक्सीने जाणार नाही. काटकसर हे तर इकॉनॉमिक्स (अर्थशास्त्र) आहे. ते तर भविष्यात येणाऱ्या अडचणींना लक्षात ठेवते. कंजूष माणसाला पाहून समोरच्याला चीड येते, की हा तर कंजूष आहे. काटकसरी माणसाला पाहून चीड येत नाही. तसे पहिले तर काटकसर किंवा कंजूषपणा हे रिलेटिव्ह आहे. उधळ्याला काटकसरी माणूस आवडत नाही. ही सर्व भानगड संसारात भ्रांतीच्या भाषेत आहे की, उधळपट्टी करू नये. पण काटकसरी माणसाला कितीही सांगितले तरी तो काटकसर करणे सोडत नाही. आणि उधळपट्टी करणारा जरी काटकसर करायला गेला तरी तो उधळ्याच राहतो. उधळपट्टी किंवा कंजूषी, हे सर्व सहज स्वभावाचे आहे. काही केल्या त्यात बदल होत नाही. प्राकृत गुण सर्वच सहज स्वभावाचे असतात. शेवटी तर सर्वातच नॉर्मालिटी असली पाहिजे.

हे भाऊ आमच्या खिशात पैसे ठेवतात, ते तर या टॅक्सी किंवा गाडीपुरतेच खर्च होतात. खर्च करायचे नाही असेही नाही आणि खर्च करायचे असेही नाही. असे काही ठरलेले नसते. पैसे वाया घालवायचे नसतात. संयोग येतात त्यानुसार खर्च होतात.

हे दादा सुद्धा बारीक आहेत, काटकसरी आहेत आणि उधळणारेही आहेत. अगदीच पक्के उधळणारे आहेत, आणि तरीही कंम्प्लीट एडजस्टेबल आहेत. परक्यासाठी उधळणारे आणि स्वत:साठी काटकसरी

आणि उपदेश देण्यासाठी बारीक आहेत. म्हणून समोरच्याला आमचा बारकाईने केलेला व्यवहार दिसतो. आमची इकोनॉमी एडजस्टेबल असते, टॉपमोस्ट असते. आम्ही तर पाणी सुद्धा काटकसरीने, एडजस्टमेंट घेऊन वापरतो. आमचे प्राकृत गुण सहजभावे राहतात.

## विषय

विषय विकाराच्या बाबतीत जगात फारच चुकीची समज प्रवर्तमान आहे. शास्त्रे म्हणतात की, विषय हे विष आहे. कित्येक लोक सुद्धा म्हणतात की, विषय हे विष आहे आणि ते मोक्ष मिळू देत नाही. आम्ही एकटेच म्हणतो की, 'विषय हे विष नाही पण विषयात निर्भयता हेच विष आहे. म्हणून विषयाला घाबरा.' या सर्व विषयात निर्भय राहणे हेच विष आहे. निर्भय केव्हा म्हणायचे की, दोन-तीन साप येत असतील, त्यावेळी तुमचा पाय खाली (जमिनीवर) असेल आणि तरी तुम्हाला भीती वाटत नसेल तर पाय खाली ठेवा आणि जर भीती वाटत असेल तर पाय वर उचला. परंतु तेव्हा जर तुम्हाला भीती वाटत नसेल आणि पाय वरती उचलले नाहीत तर ती पूर्ण ज्ञानी-केवळज्ञानीची निशाणी आहे. पण संपूर्ण झाले नाहीत तोपर्यंत तुम्ही स्वतःच घाबरून पाय वर घेता. म्हणून तुम्हाला विषयांच्या बाबतीत निर्भय राहण्यासाठी थर्मामिटर देत आहोत. जर सापासमोर तू निर्भय राहू शकत असशील तर विषयात निर्भय हो. आणि जर तिथे भीती वाटत असेल, पाय वर घेत असशील तर विषयालाही घाबरुन रहा. विषयात निर्भय व्हायचेच नसते. महावीर भगवंत सुद्धा विषयाला घाबरत होते आणि आम्ही सुद्धा घाबरतो. विषयांच्या बाबतीत निर्भय राहणे हा तर बेसावधपणा म्हटला जाईल.

जगात असे म्हटले जाते की विषय मोक्षाला जाऊ देत नाहीत. अरे, तसे नाही, इंग्रजीत विषयास सब्जेक्ट म्हणतात. या जगात अनंत सब्जेक्टस् आहेत. विषय जर मोक्षाला जाऊ देत नसतील तर कुणी मोक्षाला जाऊच शकले नसते! महावीर भगवंताचा मोक्ष झाला, त्यांना तर विषय नडला नाही आणि तुम्हालाच का नडतो? विषय नडत नाहीत.

तुमचा वाकडेपणाच तुम्हाला मोक्षाला जाताना नडतो! अनंत विषयांमध्ये भगवंत निर्विषयी राहिले आणि मोक्ष प्राप्त केला!

खरे तर आत्मा स्वत: निर्विषयी आहे. मन-वचन-काया हे विषयी आहेत. ते जर वेगळे झाले तर मन-वचन-कायेच्या अनंत विषयांमध्ये स्वत:, 'शुद्धात्मा' निर्विषयी राहून मोक्ष प्राप्त करू शकतो.

आत्मा स्वत: निर्विषयी आहे, मग तो विषय कसे भोगू शकेल? त्याने जर विषय भोगले तर तो कधीच मोक्ष प्राप्त करू शकणार नाही. कारण तो त्याचा अन्वय गुण (कायम सोबत राहणारा गुण) झाला म्हणावे लागेल. कंपाउंड स्वरुप झाले म्हणावे लागेल. हे तर सिद्धांताच्या विरुद्ध म्हटले जाईल, विरोधाभास म्हटला जाईल. आत्मा कधीही, कोणताही विषय भोगू शकत नाही. मात्र भ्रांतीमुळे भोगल्याचा अहंकार करतो की, मी भोगले. बस, त्यामुळे तर सर्व अडकले आहे. जर ही भ्रांती तुटली तर स्वत: अनंत विषयांमध्ये सुद्धा निर्विषयी पदात राहू शकतो!

विषय कशास म्हणायचे? ज्या ज्या बाबतीत मन प्रफुल्लित होते, ते विषय आहेत. मन-बुद्धी-चित्त आणि अहंकार जिथे जिथे तन्मयाकार होतात, ते सर्व विषय आहेत. जिथे एकाकार होत असतो ते सर्व विषयच आहेत. विषयांचे विचार येणे हे स्वाभाविक आहे. ते परमाणूंचे गलन आहे. पूर्वी केलेल्या पूरणाचेच गलन आहे. परंतु त्यात तू तन्मयाकार झालास, त्यात तुला गोडी वाटली तर तो विषय आहे, आणि नुकसान करणारा आहे. विषय कशास म्हणायचे? तर बिगिनींगला म्हणजे सुरुवातीलाही आवडतो आणि शेवटीही आवडतो, त्याचे नाव विषय! विषय ही वस्तू नाही पण परमाणूंचा फोर्स आहे. ज्या ज्या परमाणूंना तू अत्यंत भावपूर्वक, तन्मय होऊन खेचलेले होते, त्यांचे जेव्हा गलन होते तेव्हा पुन्हा तू तितकाच तन्मयाकार होतोस, तो विषय आहे. मग तो कोणताही सब्जेक्ट असू दे. लोक इतिहासाचा विषय घेतात आणि इतिहासाचे विषयी बनतात. भूगोलाचे विषयी बनतात. त्यातच गुंतून राहतात, ते सर्वच विषय आहेत. त्याचप्रमाणे ज्यांनी तपाचा विषय घेतला, त्यागाचा विषय घेतला आणि त्यातच एकाकार झाले तर तेही विषय

आहेत. अरे, विषयामुळे विषयी होऊन मोक्ष कसा मिळेल? निर्विषयी हो, तर मोक्ष मिळेल.

जे तुम्हाला सतत आठवत राहते, तो विषय. ही भजी किंवा दहीवडे खाण्यास हरकत नाही, पण जर तुम्ही त्यास सारखे आठवत राहिले, की पुन्हा कधी तरी बनवा, असे म्हणालात तर तो विषय आहे. सिनेमा पाहिला, पण नंतर त्यातले काहीच आठवले नाही तर तो विषय नाही, पुन्हा आठवत नाही म्हणजे त्याचा निकाल झाला. आणि पुन्हा आठवले याचा अर्थ तन्मय झालात, म्हणजे तो विषय म्हणायचा. विषय किती प्रकारचे असतात? अनंत प्रकारचे. गुलाबाचे फूल आवडत असेल तर बागेत गुलाब पाहिल्या बरोबर धावपळ करेल, तो विषय. ज्याला जे आठवत राहते तो विषय. हिरे आठवत असतील तर तो विषय. आणि हिरे आणल्यानंतर आठवण बंद झाली तर त्याचा समभावे निकाल होईल. पण जर परत कधी आठवण झाली तर निकाल झाला नाही, म्हणून तो विषयच म्हटला जाईल.

इच्छा होणे हे स्वाभाविक आहे परंतु इच्छा करत राहणे हे अवरोधक आहे, नुकसान करणारे आहे.

बायकांनी साडी पाहिली की ती साडी आठवतच राहते, तो तिचा विषय म्हणायचा. जिथे विषय संबंध तिथे भांडणतंटे होतात.

मोक्षप्राप्ती जवळ येते तेव्हा ढीगभर विषय समोरून येतात. या 'दादा भगवानांचा' मोक्षमार्ग अनंत विषयांमध्ये निर्विषयी पदासहित असलेला मोक्षमार्ग आहे.

विषयांची आराधना करण्यासारखी नाही आणि त्याला घाबरण्यासारखेही नाही, आणि त्यावर चिडण्यासारखेही नाही. साप समोर आला तर तू कसा सावध होऊन चालतोस? तसेच विषयांपासून सावध हो! निर्भय होऊ नकोस.

जोपर्यंत आत्मज्ञान प्रकट झाले नाही तोपर्यंत विषय कोणालाही सोडत नाही. कारण कर्ताभाव, अहंकार जातच नाही.

ज्यांचा सब्जेक्ट वीतरागता असेल ते वीतरागांना समजू शकतात पण ज्यांचा सब्जेक्ट कषाय आहे, ते वीतरागांना कसे समजू शकतील? ज्ञान नसेल आणि जर एका जन्मासाठी विषयाचा व्हीलकॉक (नळ) बंद करून टाकला, तरी पण तो दुसऱ्या जन्मी उघडतो. ज्ञानाशिवाय विषय सुटतच नाही.

विषयाच्या आराधनेचे फळ विषयच मिळतो. ग्रहणाच्या आराधनेचे फळ त्याग मिळतो आणि त्यागाच्या आराधनेचे फळ ग्रहण मिळते. त्यागाचा प्रतिपक्षी ग्रहण आहे. जिथे प्रतिपक्षी आहेत, ते सर्व विषय आहेत.

भगवंत म्हणतात की, कंट्रोलमध्ये नाहीत ते सर्व विषय आहेत. 'मी विषय भोगत आहे' असा अहंकार करतो. जर तू विषय भोगत असशील तर तुला संतोष झाला पाहिजे, पण तसे नाही. विषयास भोगत नाहीस. हा तर परमाणूंचा हिशोब आहे. प्रत्येक इंद्रिय स्वतःच्या विषयात निपुण आहे पण इतर विषयात निपुण नाही. नाकाला जिलेबी चाखायला दिली तर गोड वाटेल काय? परमाणूंचा जो हिशोब आहे तो चुकता होतो, तो विषय नाही, परंतु त्यात तन्मयता तोच विषय आहे. त्यात इंद्रियांचाही काहीच रोल (भूमिका) नाही. इंद्रिय तर कन्व्हे (सूचित) करतात. म्हणूनच आम्ही म्हणतो की जो इंद्रियांचा विषय जिंकतो तो जितेन्द्रिय जिन नाही पण ज्याची दृष्टी द्रष्टात पडली, ज्याचे ज्ञान ज्ञातामध्ये आले तो जितेन्द्रिय जिन आहे! महावीर भगवंत सुद्धा असेच म्हणत होते.

विषयाची सुरुवात कुठून? तर मोहभावाने स्त्रीला पाहणे, मूर्च्छित भावाने पाहणे, तिथून. तर काय प्रत्येक स्त्रीला मूर्च्छित भावाने पाहिले जाते? एकीला पाहून विचार येतात आणि दुसरीला पाहून विचार येत नाहीत, अर्थात देर इज समथिंग रॉँग (काही तरी चुकीचे आहे). जर स्त्रीला पाहताच विष चढत असेल तर प्रत्येक स्त्रीला पाहताच विष चढेल. स्त्रीच जर रूट कॉज (मूळ कारण) असेल तर सर्व स्त्रियांना पाहताच विष चढले पाहिजे, पण तसे नाही. हे तर ठराविक परमाणूंचे

ठराविक परमाणूंशीच आकर्षण होत असते. जोपर्यंत विषयाचा एक सुद्धा परमाणू असेल, तोपर्यंत स्याद्वाद वाणी निघणार नाही.

जनावरांना ज्या विषयांची इच्छाच नसते त्या विषयांची इच्छा मनुष्य निरंतर करत असतात. विषय जर विषयच असेल तर एका जागी दोन स्त्रिया बसल्या आहेत, एक आई आहे आणि एक पत्नी आहे, तिथे आई वर का तसा भाव होत नाही? कारण विषय हा विषय नाहीच. भ्रांती हाच विषय आहे. हे विषय विकार जर बंद करायचे असतील तर त्याचा उपाय सांगतो. हे विषय म्हणजे ऑटोमॅटिक कॅमेरा आहे, त्यात फिल्म उतरू देऊ नका. 'शुद्धात्म्या'चाच फोटो काढा. बाकी, विषय ही तर वस्तूच नाही. यात तर भल्याभल्या ब्रह्मचारींना सुद्धा प्रश्न पडला आहे की, हे आहे तरी काय? जो ज्याच्यात गुंतून राहतो, तो विषय. तिथे पुढून सुद्धा अंध आणि मागून सुद्धा अंध, दुसरे काही दिसतच नाही, त्यास मोहांध म्हणतात!

विषयाची याचना करताना ज्याला मेल्यासारखे वाटते, तो या जगाला जिंकू शकतो. असे जीवन सर्वात उत्तम, सन्मानपूर्ण म्हणायचे.

रोगिष्ट देह जास्त विषयी असतो. निरोगीची स्थिरता जास्त असते.

विषयांमुळे रोग होत नाहीत, परंतु विषयात लोभ शिरतो तेव्हाच रोगाची सुरुवात होते. लोक विषयांना चटके देतात. अरे, विषयांना कशाला चटके देता? विषयात जो लोभ आहे त्यास चटका दे ना? विषय नडत नाही पण विषयाचा लोभ नडतो. जेवणात म्हणतो कसा की, मला मिरचीशिवाय चालणार नाही, अमक्याशिवाय चालणार नाही, हे तर मला पाहिजेच, तोच लोभ आहे. म्हणजे तो विषय आहे आणि म्हणूनच तो रोग आहे. क्रोध-मान-माया-लोभ, हेच रोग उत्पन्न करणारे आहेत.

आत जळजळ (दु:ख) आहे म्हणून लोक विषय भोगतात, परंतु जर विचार केला तर विषय निघू शकेल असा आहे. जर या देहावरची कातडी ओढून काढलेली असेल तर राग (मोह, आसक्ती) होईल काय?

ही तर कातच पांघरलेली आहे ना? आणि पोट तर मलपेटी आहे. कापले तर नुसता मलच निघेल.या हातावरची कातडी निघाली असेल आणि पू निघत असेल तर तिथे स्पर्श करायला आवडेल काय? स्पर्श करणारच नाही. म्हणजे हे सर्व अविचारानेच घडत आहे. मोह हा तर वेडेपणा आहे! अविचार दशेमुळेच मोह आहे. मोह ही तर निव्वळ जळजळ आहे.

गोड खाल्यानंतर चहा घेतला तर फिक्का लागतो ना? मग चहावर अन्याय नाही का करत? चहा तर गोड होता मग फिक्का का लागला? कारण त्याआधी गोड खाल्ले होते, तसेच आम्ही अनुपम गोड असे ज्ञान देत आहोत त्यामुळे तुम्हाला जगातील तमाम विषयी सुख गोड असूनही फिक्के वाटतील. लोकांचा हा अनुभव आहे की, थंडी भरून ताप येतो, मलेरिया होतो तेव्हा खीर कडू लागते. कारण त्याचे तोंड कडू झाले आहे त्यामुळे कडू वाटते. त्यात खिरीचा काय दोष? त्याचप्रमाणे आम्ही दिलेल्या 'अक्रम ज्ञानाने' जसजसा ताप उतरेल, तसतसे जगातील सर्व विषय निरस होत जातील. विषय निरस होत जाणे हे थर्मामीटर आहे, स्वत:ला आलेला ताप तर कळतोच ना?

'क्रमिक मार्गात' सुद्धा विषय निरस वाटतात पण ते अहंकारामुळे निरस वाटतात, म्हणून ते पुन्हा समोर येतील. तिथे आमच्या या अक्रम मार्गात अशी काही भानगडच नाही ना! आम्ही तर विषयांच्या सागरात निर्विषयी आहोत! निर्विषयी म्हणजे जलकमलवत्. आम्ही तर या देहाचे स्वामित्व सोडून दिले आहे, म्हणून आम्हाला काही स्पर्शतही नाही आणि नडतही नाही. आमच्या महात्म्यांचा मालकीपणा सुद्धा आम्ही घेऊन टाकलेला आहे, त्यामुळे ते जलकमलवत् राहू शकतात. चित्रण करतो पुद्‌गल पण तुम्ही 'स्वत:' त्यात तन्मयाकार झालात, तर तुमची सही झाली म्हणायची. जर तन्मयाकार न होता मात्र पाहिले आणि जाणले, तर तो मुक्तच आहे.

कुणी एकाने मला विचारले, 'तुम्ही कोट का घातला आहे?' मी म्हणालो, 'हा आमचा निर्विषयी विषय आहे.'

विषय दोन प्रकारचे आहेत. एक विषयी विषय आणि दुसरा निर्विषयी विषय. ज्या विषयात ध्यान नसते, अजिबात लक्षच नसते, तो निर्विषयी विषय आहे.

ज्याचे ज्या विषयात लक्ष असते, त्यात तो फारच दक्ष असतो, त्यात तो निपुण असतोच. लोक आपापल्या विषयातच मस्त असतात आणि तिथेच ते अगदी वेंधळ्यासारखे दिसतात, कारण त्यातच ते तन्मयाकार झालेले आहेत. आत्मा निर्विषयी आहे. सारे जगत विषयांनी भरलेले आहे. त्यात ज्याला जो विषय पसंत पडला, त्याचीच आराधना करू लागले. उदाहरणार्थ तपस्वींनी तपाचा विषय पसंत केला, त्यागींनी त्यागाचा विषय, व्याख्यानकारांनी व्याख्यानाचा आणि संसारी लोकांनी संसाराच्या विषयांची आराधना सुरू केली आहे आणि परत म्हणतात कसे की, आम्ही पुरुषार्थ करत आहोत! ज्ञानींना विचारून तरी बघ, की हा पुरुषार्थ आहे की काय आहे? लोक अनिवार्यलाच ऐच्छिक मानून बसले आहेत. आराधना विषयांची करता आणि शोधत आहात निर्विषयीला (आत्म्याला)! अरे, मग याचा कधी अंतच येणार नाही. तू जे जे काही केलेस त्यात अहंकार केलास, तन्मय झालास, अबाव्ह नॉर्मल झालास, ते सर्व विषयच आहेत. असे खरे ज्ञान कुणाला समजत नाही. म्हणून चुकीच्या मार्गाने जात आहेत. त्यात त्यांचाही दोष नाही. हे तर जसे आहे तसे सांगणे भाग आहे आणि तेही अत्यंत करुणेपोटी वाणी निघत आहे! नाही तर आमच्यासारख्या ज्ञानी पुरुषाने असे कटू शब्द वापरायचे असतात का? पण काय करणार? या विचित्र काळामुळे खरा मार्ग सापडत नाही, तो दाखवण्यासाठी अशी कडक वाणी निघत आहे. बाकी ज्ञानी पुरुष तर करुणेचे सागर असतात.

विषयांचे आव्हान करण्यासारखे नाही. पोलिसवाला पकडून घेऊन जातो आणि दोन दिवस उपाशी ठेवून मारहाण करून जबरदस्तीने मांस खायला लावतो, तसे विषयाच्या बाबतीत असायला हवे. आणि तरच गुन्हेगारी सहेतुक नाही. विषय नाईलाजाने असले पाहिजेत. विषय-अविषय ही परसत्ता आहे. जाणूनबुजून पोलिसवाल्यासोबत जायची इच्छा

होते का? नाही होत. खरे तर, जबरदस्तीचे विषय हे विषय नाहीत. हा तर भगवंताचा न्याय आहे! देहाने विषय भोगला तर तो मुक्त झाला आणि मनाने विषय भोगला तर बीज पडले. अवस्थित झाला तर व्यवस्थित येईलच. जगात विषयांची बेसुमार जळजळ चालू आहे. चांगले चांगले कपडे घालून दुसऱ्यांच्या मनात (विषयाचे) बीज पाडण्याचे निमित्त झालात, तरी पेमेंट करावे लागेल. बुद्धीने जरी विचार करून विषयांचे पृथक्करण केले तरी घाण वाटेल. जिथे घसरला, तोच विषय.

अचेतनासोबतचा विषय बरा पण मिश्रचेतनासोबतचा विषय चुकीचा आहे. तुम्हाला सुटायचे असेल तरीही समोरील मिश्रचेतन रागी-द्वेषी असल्यामुळे तुम्हाला लवकर सुटू देणार नाही. तिथे अचेतन तर वीतरागच आहे. तुम्ही सोडले की सुटेल. तुमच्या वर अवलंबून आहे.

आयुष्याची पुंजी श्वासोच्छ्वासांच्या काउंट (मोजणी) वर आधारित आहे. जिथे जास्त श्वासोच्छ्वास वापरले जातात तिथे आयुष्याची पुंजी खर्च होत राहते. क्रोध-मान-माया-लोभ-मोह-कपट, यात श्वासोच्छ्वास जास्त वापरले जातात. आणि दैहिक विषयभोगात तर भयंकर वापरले जातात. म्हणूनच मी व्यवहारात अडकलेल्या माणसांना सांगत असतो की, दुसरे काही करू शकत नसाल तर नका करू, परंतु लक्ष्मी आणि वीर्य, यांची इकोनॉमी (काटकसर) अवश्य करा. हे दोन्हीही जगत व्यवहाराचे मुख्य आधार आहेत. दारूला वाईट म्हटले आहे, कारण दारू विषयाकडे घेऊन जाते.

करोडो जन्मानंतर सुद्धा संपणार नाहीत, इतके अनंत विषय आहेत. त्यात राहूनही त्या सर्व विषयांना भोगत असूनही, आम्ही आमच्या महात्म्यांना निर्विषयी बनवले आहे!

लोक विषयासाठी जगत नाहीत, पण विषयाचा अहंकार पोषण्यासाठी जगत आहेत.

ज्या ज्या विषयांचा अहंकार सोबत घेऊन आला आहे, त्यांचे परमाणू देहात आहेत. आम्ही आमच्या महात्म्यांच्या विषयांचा अहंकार

काढून टाकला आहे. तरी पण पूर्वीचे जे परमाणू भरलेले आहेत, ते फळ देऊन निघून जातील. ज्या ज्या विषयांचा अहंकाराचे भरलेला असेल, ते ते विषय समोर येतील. ज्या विषयांच्या अहंकाराचे निर्मूलन झाले असेल ते विषय येणार नाहीत. जेव्हा बाह्य अहंकारचे संपूर्ण निर्मूलन होईल आणि परमाणू सुद्धा फळ देऊन निघून जातील, तेव्हा देहविलय होईल. एक एक परमाणूचा जेव्हा समभावे निकाल होईल, तेव्हा या देहाचाही मोक्ष होईल! जगातील रिलेटिव्ह धर्म अबंधाला बंध मानतात. आणि ज्यामुळे त्यांना बंधन होत आहे, त्याचे तर त्यांना भानच नाही. हे सूक्ष्म वाक्य आहे. समजणे कठीण आहे. संपूर्ण जग विषयांचे ज्ञान जाणत आहे. जो विषय शिकला, त्या विषयाचे त्याला ज्ञान असते. अरे, जो विषय शिकलास त्याचाच विषयी झालास. रिलेटिव्ह धर्मात तर पाचच विषय दर्शविले आहेत, परंतु विषय तर अनंत आहेत. ॲबनॉर्मल म्हणजे, अबाव्ह नॉर्मल किंवा बिलो नॉर्मल झाला तर विषयी झाला. विषयी झाला म्हणजे 'जगत् ज्ञानात' पडला म्हणायचा, तिथे 'आत्माज्ञान' नसते.

## प्रेम आणि आसक्ती

*'घडी चढे घडी उतरे, वह तो प्रेम ना होय,*
*अघट प्रेम हृदे बसे, प्रेम कहीए सोय.'*

*- कबीर*

('घटक्यात चढते घटक्यात उतरते, ते तर प्रेम नाही,
अघट प्रेम हृदयी वसते, तेच प्रेम होय.')

- कबीर

खरे प्रेम कशास म्हणायचे? जे कधी वाढतही नाही आणि कमी पण होत नाही. निरंतर एकसमानच राहते, ते खरे प्रेम. 'शुद्ध प्रेम तेच प्रकट परमेश्वर प्रेम आहे.'

बाकी, जे प्रेम कमी-जास्त होत राहते, त्यास प्रेम म्हणत नाही, आसक्ती म्हणतात.

ज्ञानींचे प्रेम हे शुद्ध प्रेम आहे. असे प्रेम कुठेही पाहायला मिळणार नाही. जगात तुम्ही जिथेही पाहता ते सर्व स्वार्थवाले प्रेम आहे. पती-पत्नीचे, आई-वडिलांचे, पिता-पुत्राचे, आई-मुलाचे, शेठ-नोकराचे प्रत्येकाचे प्रेम स्वार्थपूर्ण असते. स्वार्थ आहे हे केव्हा समजते की जेव्हा ते प्रेम फ्रॅक्चर होते तेव्हा. जोपर्यंत गोडवा आहे तोपर्यंत काही वाटत नाही, परंतु जर कटुता उत्पन्न झाली की मग समजते. अरे, मुलगा आयुष्यभर वडिलांच्या आज्ञेत राहिला असेल आणि एकदाच जर परिस्थितीवश रागाने वडिलांना म्हणाला की, 'तुम्ही बेअक्कल आहात,' तर आयुष्यभरासाठी संबंध तुटतात. वडील म्हणतील, 'तू माझा मुलगा नाहीस आणि मी तुझा बाप नाही.' जर खरे प्रेम असते तर ते कायम तसेच राहिले असते, मग शिव्या दिल्या किंवा भांडण केले, तरी प्रेम तसेच राहते. याशिवायच्या प्रेमाला खरे प्रेम कसे म्हणावे? स्वार्थपूर्ण प्रेमालाच आसक्ती म्हणतात. ते तर व्यापारी आणि ग्राहकासारखे प्रेम आहे, सौदेबाजी आहे. जगातील प्रेमाला आसक्ती म्हणतात. प्रेम तर त्याचे नाव की नेहमी सोबतच राहावेसे वाटते. त्यांच्या सर्वच गोष्टी आवडतात. त्यात ॲक्शन एन्ड रिॲक्शन नसतात. शुद्ध प्रेम तोच परमात्मा आहे. प्रेम प्रवाह तर एकसमानच वाहत राहतो. वाढत-घटत नाही, पूरण-गलन होत नाही. आसक्ती पूरण-गलन स्वभावाची असते.

ज्यावर झोपेल त्याचाच आग्रह होतो. चटईवर झोपत असेल तर चटईचा आग्रह होतो आणि डनलॉपच्या गादीवर झोपत असेल तर त्याचा आग्रह होतो. चटईवर झोपण्याचा आग्रह असणाऱ्याला गादीवर झोपवले तर त्याला झोप लागणार नाही. आग्रह हेच विष आहे आणि निराग्रहता हेच अमृत आहे. निराग्रहीपणा जोपर्यंत उत्पन्न होत नाही तोपर्यंत जगाचे प्रेम संपादन होणार नाही. शुद्ध प्रेम निराग्रहतेमुळे प्रकट होते आणि शुद्ध प्रेम हेच परमेश्वर आहे.

ओळख नसलेले प्रेम नाशवंत आहे आणि ही जी सर्व ओळख आहे ती प्राकृत आहे, प्रकृतीची आहे. आणि त्या प्राकृत गुणांमुळे प्रेम उत्पन्न होते, ते प्रेम काय कामाचे?

शुद्ध प्रेमाने सर्व दरवाजे उघडतात. गुरूंच्या प्रेमाने काय मिळू शकत नाही?

माणसे सुंदर असली तरी अहंकारामुळे कुरुप दिसतात. रूपवान केव्हा दिसतील? तर म्हणे, प्रेमात्मा होतील तेव्हा. तेव्हा तर कुरूप सुद्धा रूपवान दिसतो. शुद्ध प्रेम प्रकट होते तेव्हाच रूपवान दिसू लागतो. जगातील लोकांना काय पाहिजे? मुक्त प्रेम. ज्यात स्वार्थाचा गंध किंवा कोणत्याही प्रकारचा मतलब नसतो.

संसारात भांडणामुळेच आसक्ती होत असते. या संसारात भांडण तर आसक्तीचे विटामिन आहे. भांडण नसेल तर वीतराग होता येते.

भगवंत म्हणतात की द्वेष परिषह उपकारी आहे. प्रेम परिषह कधीच सुटत नाही. संपूर्ण जग प्रेम परिषहात फसलेले आहे. म्हणून प्रत्येकाला दुरून नमस्कार करून निघून जावे. कुणावर प्रेम ठेवू नका आणि कुणाच्या प्रेमात फसूही नका. प्रेमाचा तिरस्कार करून मोक्षाला जाता येत नाही. म्हणून सावध राहा! मोक्षाला जायचे असेल तर विरोधकांचे उपकार मानावे. जे प्रेम करतात तेच आपल्याला बंधनात टाकतात, त्याउलट विरोध करणारे उपकारी-मदतनीस ठरतात. ज्यांनी आपल्यावर प्रेमाचा वर्षाव केला आहे, त्यांचा तिरस्कार होणार नाही असे वागावे, कारण प्रेमाच्या तिरस्कारामुळेच हा संसार उभा राहिला आहे.

आसक्ती हा देहाचा गुण आहे. परमाणूंचा गुण आहे. तो कसा आहे? तर लोहचुंबक आणि टाचणीच्या संबंधासारखा आहे. देहास जुळतील अशा परमाणूंमध्येच देह खेचला जातो, ती आसक्ती आहे.

आसक्ती तर अबाव्ह नॉर्मल आणि बिलो नॉर्मल पण होऊ शकते. तिथे प्रेम नॉर्मालिटीतच असते, एकसमानच असते, त्यात कोणत्याही प्रकारचा बदल होतच नाही. आसक्ती ही तर जडची आसक्ती आहे. चैतन्यात आसक्ती नावालाही नसते.

व्यवहारात अभेदता राहते त्यामागेही कारण आहे. ते तर परमाणू आणि आसक्तीचे गुण आहेत, पण त्यात कोणत्या क्षणी काय घडेल ते

सांगता येत नाही. जोपर्यंत परमाणू जुळतात तोपर्यंत आकर्षण होत राहते, व त्यामुळे अभेदता वाटते आणि जर परमाणू जुळले नाहीत तर विकर्षण होते आणि वैरभाव निर्माण होते. म्हणून आसक्ती असेल तिथे वैर असतेच. आसक्तीमध्ये हिताहिताचे भान नसते. प्रेमात हिताहिताचे संपूर्ण भान असते.

हे तर परमाणूंचे सायन्स आहे. यात आत्म्याचे काही देणेघेणे नाही. परंतु लोक भ्रांतीमुळे परमाणूंच्या आकर्षणालाच मानतात की 'मी ओढला गेलो.' आत्मा कधीच ओढला जात नाही. आत्मा ज्या ज्या बाबतीत तन्मयाकार होत नाही, त्याचा त्याला त्याग वर्तत आहे, असे समजायचे.

कर्तृत्वाचा अभिमान हीच आसक्ती.

आपल्याला तर देहाची आसक्ती आणि आत्म्याची अनासक्ती असते!

## नॅचरल लॉ - 'भोगतो त्याची चूक'

या जगातील न्यायाधीश तर ठिकठिकाणी असतात परंतु कर्म जगाचा नैसर्गिक न्यायाधीश तर एकच आहे, जो 'भोगतो त्याची चूक.' हा एकच न्याय आहे, ज्यामुळे संपूर्ण जग चालत आहे आणि भ्रांतीच्या न्यायाने हा सर्व संसार उभा आहे.

खिसेकापूने एका माणसाचा खिसा कापला तर त्यात भ्रांतीचा न्याय काय करेल की, ज्याचा खिसा कापला गेला त्याला आश्वासन द्यायला सुरुवात होईल. अरेरे! बिचाऱ्यावर दुःख कोसळले! असे म्हणून स्वतःही दुःखी होतात आणि चोरालाही शंभर शिव्या देतात. तिथे निसर्गाचा न्याय, खरा न्याय काय आहे? अरे, पकडा, पकडा याला, ज्याचा खिसा कापला गेला आहे त्याला पकडा. चोर आणि सावकार यांच्यापैकी सध्या कोण भोगत आहे? जो दुःख 'भोगत आहे त्याची चूक.' खिसा कापणारा तर जेव्हा पकडला जाईल तेव्हा त्याला चोर म्हटले जाईल. आज तर तो हॉटेलात बसून मजेत चहा-नाश्ता करत आहे ना! जेव्हा त्याची चूक

पकडली जाईल तेव्हा त्याला भोगावे लागेल, पण या क्षणी कोण भोगत आहे? तर ज्याचा खिसा कापला गेला आहे, तो. म्हणून निसर्गाचा न्याय काय म्हणतो की, चूक याचीच. पूर्वी त्याने चूक केली होती, त्याचे फळ आज मिळाले आणि म्हणूनच तो लुटला गेला आणि त्यामुळेच तो आज भोगत आहे.

नॅचरल कोर्टात जो लॉ चालू आहे - नॅचरल लॉ, तोच आम्ही आज इथे उघडपणे सांगत आहोत की 'भोगतो त्याची चूक.'

स्वतःच्या चुकांमुळेच मार खातात. ज्याने दगड मारला त्याची चूक नाही, जो भोगत आहे, ज्याला लागले आहे, त्याची चूक! तुमच्या शेजारची मुले वाटेल त्या चुका किंवा दुष्कृत्य करत असतील परंतु जर त्याचा परिणाम तुमच्यावर होत नसेल, तर ती तुमची चूक नाही. आणि जर तुमच्यावर परिणाम झाला तर ती तुमचीच चूक आहे, हे नक्कीच समजून जावे.

ज्याचा जास्त दोष असेल तोच या जगात मार खात असतो. मार कोण खात आहे ते पाहायला हवे. जो मार खात आहे तोच दोषी आहे.

जो कडवटपणा भोगतो तोच कर्ता. कर्ता तोच विकल्प.

एखादी मशिनरी तुम्ही स्वतःच बनवली असेल आणि त्यात गियर व्हील असेल, आणि त्यात तुमचे बोट आले, तर त्या मशीनला तुम्ही लाख वेळा सांगितले की, 'बाबा रे, माझे बोट आहे, मी स्वतःच तुला तयार केले आहे ना! तर काय ते गियर व्हील तुमचे बोट सोडून देईल? नाही सोडणार. ते तर तुम्हाला समजावते की, भाऊ यात माझा काय दोष? तू भोगत आहेस म्हणून तुझीच चूक. बाहेर सगळीकडे अशाच मशिनरी चालत आहेत. ही सर्व (माणसे) केवळ गियरच आहेत. गियर नसते तर या मुंबई शहरात कोणत्याही पत्नीने आपल्या पतीला दुःख दिले नसते आणि कोणत्याही पतीने आपल्या पत्नीला दुःख दिले नसते. सगळ्यांनीच स्वतःचे घर सुखी ठेवले असते. पण तसे नाही. ही मुले, पति-पत्नी, सर्व 'मशिनरी'च आहेत, गियरच आहेत.

निसर्गाचा न्याय तर जो गुन्हेगार असेल त्यालाच शिक्षा देतो. घरात सात माणसे झोपली असतील पण साप तर जो गुन्हेगार असेल त्यालाच दंश मारेल. असे आहे हे सर्व, 'व्यवस्थित'!

'भोगतो त्याची चूक' या न्यायात बाहेरच्या न्यायाधीशाचे तर कामच नाही. त्यांना कशासाठी बोलवायचे? बाहेरच्या न्यायाधीशांना लवाद म्हणतात, आणि लवाद काय करतो? येऊन आधी म्हणेल, चहा–नाश्ता आणा. मग हळूच पति–पत्नीला सांगेल बेअक्कल आहात की काय, अशी चूक करता! लवाद स्वत:ची अब्रू–अक्कल झाकून ठेवतो आणि दुसऱ्याची उघडी पाडतो.

या निसर्गाच्या न्यायात तर कोणी न्यायाधीशच नाही! आपणच आपले न्यायाधीश, आपणच वकील आणि आपणच आरोपी. मग न्याय स्वत:च्याच बाजूनेच करणार ना! निरंतर चुकाच करत राहतो हा मनुष्य. न्याय कोणाकडून करवून घ्यायचा असतो? तर ज्ञानी पुरुषाकडून की ज्यांना स्वत:च्या देहासाठी सुद्धा पक्षपात नसतो! हा तर स्वत:च न्यायाधीश, स्वत:च आरोपी आणि स्वत:च वकील, मग तो न्याय कोणाच्या बाजूने करेल? स्वत:च्याच बाजूने. हे असे करून करून तर जीव बंधनात अडकून राहतो. आतील न्यायाधीश म्हणतो की तुमची चूक झाली आहे, पण मग आतला वकील वकिली करतो की यात माझा काय दोष? असे म्हणून स्वत:च बंधनात येतो! स्वत:च्या आत्महितासाठी समजून घ्यायला हवे की, कुणाच्या दोषामुळे हे बंधन आहे. जो 'भोगतो त्याचाच दोष.' लोक भाषेत सांगायचे तर हा अन्याय आहे, परंतु परमेश्वराचा न्याय तर हेच म्हणतो की, 'जो भोगतो त्याची चूक.' या 'दादांनी' ज्ञानात जसे आहे तसे पाहिले आहे की 'भोगतो त्याचीच चूक' आहे.

'भोगतो त्याची चूक'! इतकेच जर पूर्णपणे समजले ना तरी ते मोक्षापर्यंत घेऊन जाईल! ही जी दुसऱ्यांची चूक पाहतात ते साफ चुकीचे आहे. स्वत:च्या चुकीमुळे निमित्त भेटतात. हे तर कुणी जिवंत निमित्त भेटला तर त्याला चावायला धावतात, आणि जर काटा टोचला तर काय

कराल? भर चौकात काटा पडला असेल आणि हजारो माणसे तिथून येत-जात असतील पण कुणालाही काटा रुतत नाही, आणि चंदुभाई निघाले तर तो काटा जरी आडवा पडला असेल तरी त्यांच्या पायात रुतेल. 'व्यवस्थित शक्ती' कशी आहे? ज्याला काटा टोचायचा असेल त्यालाच टोचतो. त्यासाठी सर्वच संयोग एकत्रित करून देईल, पण त्यात निमित्ताचा काय दोष?

एखाद्या माणसाने औषधाची फवारणी केल्यामुळे आपल्याला खोकला आला तर त्यासाठी भांडण होईल, परंतु जेव्हा मिरच्यांची फोडणी उडते आणि खोकला येतो तेव्हा कोणी तक्रार करतो का? हे तर जो पकडला गेला त्याच्यावर चिडतात. निमित्तालाच चावतात. जर हकीगत समजून घेण्याचा प्रयत्न केला की करणारा कोण आहे? आणि कशामुळे होत आहे? हे जर समजून घेतले, की मग कसलीच भानगड नाही.

चिकट मातीत बूट घालून फिरत असशील आणि घसरलास तर त्यात कुणाचा दोष? तर तुझाच! तुला हे समजत नव्हते की अनवाणी पायाने फिरलो तर बोटे मातीत रुततील आणि आपण पडणार नाही! यात दोष कुणाचा? मातीचा, बुटाचा, की तुझा?

समोरच्या माणसाचे तोंड फुगलेले दिसले, तर ती तुमचीच चूक. तेव्हा त्याच्या 'शुद्धात्म्या'ला आठवून सतत त्याच्या नावाची माफी मागत राहिलो तर ऋणानुबंधातून सुटता येईल.

जर दु:ख भोगत असेल तर ती त्याची चूक आणि जर सुख भोगत असेल तर ते त्याचे बक्षीस. भ्रांतीचा कायदा निमित्ताला पकडतो. भगवंताचा कायदा, रियल कायदा एक्जेक्ट आहे, तो तर ज्याची चूक असेल त्यालाच पकडतो. हा कायदा एक्जेक्ट आहे आणि त्यात कुणीही फेरबदल करू शकेल असे नाहीच. जगात असा कुठलाही कायदा नाही जो कुणाला भोगवटा (दु:ख) देऊ शकेल! सरकारचा कायदाही देऊ शकत नाही. ही तर भोगतो त्याचीच चूक.

भोगतो त्यावरुन हिशोब निघतो की केवढी चूक होती!

घरात दहा माणसे असतील, त्यातील दोघा जणांना घर कसे चालत आहे याचा विचारसुद्धा येत नाही, दोघा जणांना घरात मदत करावी असा विचार येतो, आणि दोघे जण मदत करतात. आणि एक तर दिवसभर घर कसे चालवावे त्याच चिंतेत असतो, आणि त्यातील दोन जण मात्र आरामात झोपतात. तर चूक कुणाची? अरे, जो भोगतो त्याचीच, चिंता करतो त्याचीच. जे आरामात झोपतात त्यांना काहीच दु:ख नाही.

सासू सुनेवर चिडत असेल तरी पण सुन सुखातच असते आणि सासूलाच भोगावे लागले तर चूक सासूचीच! आपण जावेला डिवचले आणि आपल्याला भोगावे लागले तर ती आपलीच चूक, आणि डिवचले नसेल तरी पण आपल्याला भोगावे लागले तर तो पूर्व जन्माचा काही हिशोब बाकी राहिला असेल तो चुकता झाला. तेव्हा आता तुम्ही पुन्हा चूक करू नका. नाही तर पुन्हा भोगावे लागेल! अर्थात सुटका करून घ्यायची असेल तर जे जे काही कडू-गोड वाट्याला येईल, (शिवी वगैरे) ते जमा करून टाका, म्हणजे तुमचा हिशोब पूर्ण होईल. या जगात हिशोबाशिवाय तर नजरेस नजर सुद्धा मिळत नाही, तर मग बाकी सगळे काय हिशोबाशिवाय होत असेल? तुम्ही ज्यांना ज्यांना जेवढे जेवढे दिले असेल, तेवढे सर्व ते तुम्हाला परत देतील. तेव्हा तुम्ही खुशाल जमा करून टाका. की, 'बरे झाले! आता हिशोब पूर्ण झाला.' जर पुन्हा चूक केलीत तर पुन्हा भोगावे लागेलच.

संपूर्ण जग 'आपल्या' मालकीचे आहे. आपण 'स्वत:' ब्रह्मांडाचे मालक आहोत! पण आपल्या चुकांमुळे बांधले गेलो आहोत. भोगावे का लागले हे शोधून काढ ना!

हे तर आपण आपल्याच चुकांमुळे बांधले गेलो आहोत. लोकांनी येऊन बांधलेले नाही. चुका मिटल्या की आपण मुक्त. आणि खरे तर मुक्तच आहोत पण चुकांमुळे बंधन आहे.

जिथे असा अगदी चोख-निर्मळ न्याय तुम्हाला दाखवून दिला आहे तिथे मग न्याय-अन्याय अशी विभागणी करण्याची गरजच कुठे

राहते? ही फार खोलवरची गोष्ट आहे. सर्व शास्त्रांचे सार मी तुम्हाला सांगत आहे. हे तर 'तिथले' जजमेंट (न्याय) कशा प्रकारे होत आहे ते अगदी एक्जेक्ट सांगत आहोत की, 'भोगतो त्याची चूक.'

## निजदोष दर्शन

एक व्यक्ती दररोज देवळात जाऊन देवासमोर हात जोडून म्हणते, 'मी तर अनंत दोषांचे भाजन आहे, करुणामय.' परत आणि म्हणतो 'पाहिले नाहीत निजदोष तर तरणार कोणत्या उपायाने!' आता जर त्याला विचारले की, 'भाऊ, तुझ्यात आता किती दोष शिल्लक राहिले आहेत?' तर म्हणतो कसा, 'बस, दोन-तीनच राहिले आहेत! थोडासा क्रोध आहे आणि थोडासा लोभ आहे, बस. इतर कुठलाही दोष शिल्लक राहिला नाही.' अरे, आता तर तू गात होतास ना की, 'मी तर अनंत दोषांचे भाजन आहे करुणामय!' त्यावर तो म्हणतो, 'गाण्यासाठी तर असे गावेच लागते ना! पण माझ्यात दोष नाहीतच.'

अरेच्या! म्हणजे तू देवाला सुद्धा फसवायला निघालास! देव काय म्हणतो की, 'ज्याच्यात दोनच दोष शिल्लक राहिले असतील त्याला तर तीन तासात मोक्ष मिळेल!' हे तर मोठमोठ्या महाराजांना, आचार्यांना कुणी विचारले की, 'तुमच्यात किती दोष आहेत?' तर ते सांगतील की, 'दोन-तीन असतील.' इतक्या दोषांनी तर तीनच तासात मोक्षाला जाईल. हे तर दोषांमुळे इथे अडकून राहिले आहेत आणि जर विचारले की, दुसऱ्यांचे दोष दाखवा, तर ढीगभर दोष दाखवतील पण स्वतःचा मात्र एकही दोष दिसत नाही. प्रत्येकाला दुसऱ्यांचे दोष पाहता येतात. आत्मा प्राप्त झाल्यानंतरच स्वतःचे दोष दिसतात, निष्पक्षपातीपणा उत्पन्न होतो. जर स्वतःचे दोष पाहता आले असते तर कधीच मोक्ष मिळवून घेतला असता आणि जरी नसता मिळवला तरी निदान ज्ञानी पुरुषांइतक्या वरच्या स्टेजवर तर नक्कीच पोहोचले असते.

यात कुणीही दोषी नाही. हा काळच असा आहे. संयोगाने सर्व घडत असते, त्यात त्यांचा काय दोष?

जितके दोष दिसतात, तितके निरोप घेऊ लागतात. ज्ञानी पुरुषाची कृपा झाली म्हणजे दोष दिसू लागतात. सर्वात प्रथम तर स्वतः अनंत दोषांचे भांडार आहे हे समजते, म्हणून दोष शोधू लागतो, तपास सुरू करतो. तेव्हा मग दोष दिसू लागतात. दोष जर दिसले नाहीत तर तो प्रमाद म्हणायचा. स्वतः अनंत दोषांचा भांडार आहे असे जाणल्यानंतर आपणहूनच दोष दिसू लागतात. पण इथे तर स्वतः बहिरा आणि घरात चोर शिरले तर काय होईल? मग भांडी खडखडली तरी पण ऐकू येईल तर ना!

जितके दोष दिसतात तितके निरोप घेऊ लागतात. जे दोष चिकट असतील ते दोन दिवस, तीन दिवस, पाच दिवस, महिना किंवा वर्षभरानंतरही दिसले तरी ते निघू लागतात. अरे, पळू लागतात. घरात चोर शिरला असेल, तर तो कुठपर्यंत लपून बसेल? मालकाला माहीत नाही तोपर्यंत. मालकाला समजताच चोर पळ काढतो.

कोणाचेही दुर्गुण पाहू नये. पाहायचेच असतील तर स्वतःचेच पाहा ना! हे तर दुसऱ्यांच्या चुका पाहिल्यावर डोक्याला किती ताण पडतो. त्यापेक्षा दुसऱ्यांचे गुण पाहिल्यावर किती आनंद वाटतो.

समोरच्याची चूक पाहू नये. स्वतःची चूक सुधारून घ्यावी. हिशोब असल्याशिवाय कुणी वाकडे बोलणारच नाही.

स्वतःची एक जरी चूक सापडली तर भगवंत त्याला माणूस म्हणतात. जर चुकांच्या घोर जंगलात भटकत असलेल्याला स्वतःची चूक समजली आणि त्याची भटकंती थांबली, तर तो मानव आहे. आणि त्याची चूक दाखवणाऱ्याला भगवंतांनी 'अति मानव' (सुपर ह्युमन) म्हटले आहे.

या जगात सर्व काही सापडते पण स्वतःची चूक मात्र सापडत नाही. म्हणूनच स्वतःची चूक कुठे आहे ते समजण्यासाठी ज्ञानींची आवश्यकता असते. ज्ञानी पुरुषच असे सर्वसत्ताधीश आहेत, की जे तुम्हाला तुमची चूक दाखवून त्याचे भान करवितात, आणि तेव्हाच ती

चूक मिटते. असे केव्हा शक्य आहे? तर जेव्हा ज्ञानी पुरुष भेटतात आणि तुम्हाला निष्पक्ष बनवतात तेव्हाच. स्वत:साठी देखील निष्पक्षता उत्पन्न होते तेव्हाच कार्य सिद्ध होते. ज्ञानी पुरुष जोपर्यंत स्वरूपाचे भान करवून देत नाहीत तोपर्यंत निष्पक्षता उत्पन्न होत नाही. 'ज्ञान' कुणाचीही चूक काढत नाही. बुद्धी सर्वांच्या चुका काढते, सख्ख्या भावाचीही चूक काढते.

**प्रश्नकर्ता :** 'दादा', व्यवहारात मोठा, लहानाची चूक काढतो, लहान, त्याच्याहून लहान असलेल्याची चूक काढतो, व्ह्यू पॉइंटच्या संघर्षामुळे, तर असे का?

**दादाश्री :** हे तर असे आहे की मोठा लहानाला खातो. मोठा लहानाची चूक काढेल त्यापेक्षा आपणच म्हणावे, 'की माझीच चूक आहे.' आपणच जर चूक स्वीकारली तर समाधान होईल. आम्ही काय करतो? दुसरा कुणी सहन करू शकत नसेल तर ती चूक आम्ही स्वत: वरच ओढवून घेतो. दुसऱ्यांच्या चुका काढत बसत नाही. दुसऱ्यांवर का ढकलावे? आपल्याजवळ सागराइतके पोट आहे ना. पाहा ना, या मुंबईतील सर्व गटारांचे पाणी सागर सामावून घेतोच ना? तसे आपण सुद्धा पिऊन टाकावे. त्यामुळे काय होईल, की या मुलांवर, इतर सर्वांवर त्याचा प्रभाव पडेल. ते पण शिकतील. मुलांनाही समजेल की यांचे पोट सागराइतके आहे. म्हणून जितके येईल तितके जमा करा. व्यवहारात नियमच आहे की अपमान करणारा स्वत:ची शक्ती देऊन जातो. त्यामुळे हसत मुखाने अपमानाचा स्वीकार करा.

एक डोळा हाताने दाबला गेला असेल तर दोन चंद्र दिसतात ना? त्यात कुणाची चूक? तसेच या जगातील लोकांचे आहे. प्रत्येक मिनिटाला, *समय-समयला* चुका करत असतात. निरंतर पर-*समयातच* असतात. परक्यांसाठी ('स्व'साठी नाही) वेळ काढतात. स्वत:साठी एक *समय* देखील काढत नाहीत. 'स्वत:'ला ओळखले नाही, तो सर्व 'पर-*समय*'. स्वत:ची ओळख झाल्यानंतर 'स्व-*समय*'. (समय = काळचक्राचा सर्वात लहान, अविभाज्य भाग).

लोकांची दृष्टी दोषयुक्त झालेली आहे त्यामुळे ते समोरच्याचे दोष पाहतात, आणि स्वत:चे दोष पाहतच नाहीत. आपल्याला सर्व प्रथम दृष्टी निर्दोष करून घ्यायची आहे. आम्ही निर्दोष झालो आणि निर्दोष पाहिले. तुम्हाला कोणी दोषी दिसला नाही तर तुम्ही सुद्धा मुक्त झालात.

लोक स्वत:च्या चुकीमुळेच बंधनात आले आहेत. फौजदारी चूक केली असेल तर फौजदाराच्या बंधनात येतो. कोणताही माणूस स्वत:ची चूक पाहू शकत नाही.

कर्म, कर्म गात राहतात, पण कर्म म्हणजे नक्की काय याचे त्यांना भानच नाही. स्वत:चे कर्म म्हणजे निजदोष. आत्मा निर्दोष आहे, परंतु निजदोषांमुळे बंधनात आलेला आहे. स्वत:चे जितके दोष दिसत जातात तितकी मुक्ती अनुभवास येते. काही दोषांना तर लाख-लाख थर असतात म्हणून लाख-लाख वेळा पाहिल्याने ते निघू लागतात. दोष तर मन-वचन-कायेत भरलेलेच आहेत.

मन-वचन-कायेचे दोष तर क्षणोक्षणी दिसले पाहिजेत. या दूषमकाळात दोष नसेल अशी कायाच नसते. जितके दोष दिसले तितकी किरणे (ज्ञान जागृती) वाढली म्हणायची. या काळात, हे आश्चर्यकारक अक्रम ज्ञान प्राप्त झाले आहे! तुम्हाला फक्त जागृती ठेवून भरलेला माल रिकामा करायचा आहे, (दोष) सतत धूत राहायचे.

जागृती तर निरंतर असायला हवी. इथे तर दिवसा आत्म्याला पोत्यात कोंडून ठेवले तर कसे चालेल? दोष पाहून त्यांना धूत राहिल्याने पुढची प्रगती करता येते. नाही तर आज्ञेत राहिल्याने लाभ तर आहे, त्यामुळे आत्मा जोपासला जातो. जागृतीसाठी सत्संग आणि पुरुषार्थ हवा. सत्संगात राहण्यासाठी आधी आज्ञेत राहिले पाहिजे.

नाटकातल्या तोट्याचा परिणाम आपल्यावर झाला नाही, तर समजावे की आता शेवटचा नाटकीय जन्म शेष राहिला. नाटकात कुणी शिव्या दिल्या तर तुमच्यावर त्याचा परिणाम होऊ द्यायचा नाही.

हिशोबाशिवाय तर कुणी चांगलेही बोलणार नाही आणि कुणी

वाईटही बोलणार नाही. खऱ्या गोष्टीसाठी अभिप्राय दिला की लगेच कच्चे पडाल, सत्संगात तर वेगवेगळ्या प्रकारचा कचरा बाहेर पडतो. समोरच्याचे दोष पाहिले की तो कचरा (दोष) आपल्यात शिरतो, स्वतःचे दोष पाहिले तर ते दोष निघून जातात. आळशी माणसाला दुसऱ्यांच्या चुका अधिक दिसतात.

## चुका

अंधारातील चुका आणि अंधारात दाबल्या गेलेल्या चुका दिसत नाहीत. जसजशी जागृती वाढत जाते तसतशा अधिकाधिक चुका दिसू लागतात. स्थूल चुका जरी संपल्या तरीही डोळ्यांचे तेज बदलून जाते. भाव शुद्ध ठेवावा. अंधारात केलेल्या चुका अंधारात कशा दिसतील? जसजशा चुका निघत जातात तसतशी वाणी सुद्धा अशी निघत जाते की, कुणी दोन तास ऐकतच राहील.

स्थूल चुका तर समोरासमोर संघर्ष झाल्याने बंद होतात. परंतु सूक्ष्म, सूक्ष्मतर आणि सूक्ष्मतम चुका इतक्या असतात की त्या जसजशा निघत जातात तसातसा माणसाचा सुगंध दरवळतो.

अंधारातील चुका आणि अंधारातील गोष्टी, यापेक्षा तर कठोर माणसाच्या उजेडातील चुका बऱ्या, मग भले त्या ढीगभर असोत.

जेव्हा नावडती परिस्थिती समोर आली असेल, कोणी मारले, कुणी दगड फेकला तेव्हा चुका दिसतात.

'माझ्यात चूकच नाही' असे तर कधीच बोलू नये. असे बोलूच शकत नाही. 'केवळ ज्ञान' झाल्यानंतरच चुका संपूर्णपणे जातात.

या सर्व तर अंधारातील चुका आहेत. ज्ञानी पुरुष प्रकाश फेकतात तेव्हाच दिसतात. त्यापेक्षा उजेडातील चुका बऱ्या. इलेक्ट्रिसीटीवाल्या चुका दिसतात.

पुरुषार्थ कशाचा करायचा? पुरुष झाल्यानंतर 'शुद्धात्म्या'चे लक्ष्य बसल्यानंतर पुरुषार्थ आणि स्वपराक्रम करता येतो.

आत निव्वळ चुकांचे भांडारच भरलेले आहे. क्षणोक्षणी दोष दिसतील तेव्हा काम झाले असे समजा. हा सर्व माल तुम्ही भरून आणला आहे, तो (मला) न विचारताच ना?

शुद्धात्म्याचे लक्ष्य बसले म्हणून चुका दिसतात. चुका दिसल्या नाहीत, तर तो निव्वळ प्रमादच म्हणायचा.

खरी कसोटी आली की ज्ञान हजर होते. आपले कान कापले जात असतील आणि ज्ञान हजर झाले, तर ते खरे म्हणायचे. नाही तर सर्व प्रमादच म्हणायचा.

ज्ञानी पुरुष तर तासभरच झोपतात. निरंतर जागृतच राहतात. आहार कमी झाला असेल, झोप कमी झाली असेल तेव्हा जागृती वाढते, नाही तर प्रमादचर्या असते. झोप जास्त येणे त्यास प्रमाद म्हणतात. 'प्रमाद म्हणजे आत्म्याला पोत्यात कोंडल्यासारखे आहे.'

चूक म्हणजे काय? याचे स्वतःला भानच नाही. स्वपराक्रमाने चुका संपतात.

जेव्हा झोप कमी होते, खाणे कमी होते, तेव्हा समजावे की प्रमाद कमी झाला.

चुका संपतात तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर लाईट (तेज) येते. सुंदर वाणी निघते, लोक त्याच्या मागे–मागे फिरतात.

स्ट्राँग परमाणू असलेल्या चुका लगेचच दिसतात. अशी व्यक्ती फार कडक असते. तो ज्या बाजूला शिरतो तिथे खोलवर जातो. संसारात शिरला तर संसारात खोलवर जातो आणि ज्ञानात शिरला तर ज्ञानात खोलवर जातो.

आत्म्याचा शुद्ध उपयोग म्हणजे काय? तर आत्म्याकडे दुर्लक्ष करू नये. पाव तास डुलकी घ्यायची असेल तर पतंगाचा दोर आंगठ्याला गुंडाळून डुलकी घ्यावी. त्याचप्रमाणे आत्म्याच्या बाबतीतही अजिबात अजागृती असता कामा नये.

अनंत चुका आहेत. चुकांमुळेच झोप येते. नाही तर झोप कसली? झोपेला तर वैरी म्हटले आहे. प्रमादचर्या म्हटली जाते. शुभ उपयोगातही प्रमाद हा अशुद्ध उपयोग मानला आहे.

सर्व चुकांना संपवण्यासाठी एक तर यज्ञ (ज्ञानीच्या आणि महात्म्यांच्या सेवेचा) करावा लागेल किंवा स्वपुरुषार्थ करावा लागेल. नाही तर तुम्ही असेच दर्शन केले तर भक्तीचे फळ मिळेल, परंतु ज्ञानाचे फळ मिळणार नाही.

चूक नाहीच असे मानून बसून राहिला तर त्याला चूक दिसणारच कशी? मग निवांत झोपून राहतो. आपले ऋषि-मुनि झोपत नसत. फार जागृत असायचे.

स्वत:च्या चुका स्वत:ला चावतात (त्रास देतात), अशा चुकांना आम्ही इलेक्ट्रिकल चुका म्हणतो. आणि अंधारातील चुका म्हणजे स्वत:च्या चुका स्वत:ला चावत नाहीत. जी चूक चावत राहते ती तर लगेच दिसून येते पण जी चावत नाही, ती नजरेआड निघून जाते.

**प्रश्नकर्ता :** इलेक्ट्रिकवाल्या चुका म्हणजे काय?

**दादाश्री :** त्या सर्व स्पष्ट दिसून येणाऱ्या चुका. आत घुसमट करवून निघून जातात. त्यामुळे सतत जागृत राहता येते, हे तर उत्तम म्हणायचे. उलट अंधारातील चुका तर कुणाला दिसतच नाहीत. त्यात तो स्वत:च प्रमादी असतो, आणि चुका दाखवणाराही कुणी भेटत नाही. इलेक्ट्रिसिटीवाल्या चुकांना तर कुणी दाखवणारा तरी भेटतो. 'मी जाणतो' ही अंधाराची चूक तर भयंकर मोठी चूक आहे आणि 'आता काही हरकत नाही.' ही चूक तर ठारच मारते. ज्ञानी पुरुषांशिवाय कोणी असे बोलूच शकत नाही की, 'माझ्यात एक सुद्धा चूक शिल्लक राहिलेली नाही.' प्रत्येक चूक पाहून ती संपवायची आहे.

आपण 'शुद्धात्मा' आणि बाहेरच्या बाबतीत 'मी काहीच जाणत नाही' असेच ठेवावे. त्यामुळे मग काहीच हरकत येणार नाही. 'मी जाणतो' हा रोग तर शिरायलाच नको. आपण तर 'शुद्धात्मा,' शुद्धात्म्यात

एकही दोष नसतो पण तुमच्यात-चंदुभाईत जे जे दोष दिसतात, त्यांचा निकाल करत रहायचे.

आपली दृढ इच्छा आहे की ज्ञानींच्या आज्ञेतच राहायचे आहे, तर त्यांच्या कृपेने आज्ञेतच राहता येते. आज्ञा पाळत असताना आज्ञेची मस्ती राहते. ज्ञानाची मस्ती तर कुणाला राहते, की जो दुसऱ्यांना उपदेश देत असतो!

आमची गोष्ट जाणल्यानंतर जर कुणी त्यास 'आत' शिरू द्यायला तयार नसेल, तर समजावे की 'आत' गाठ पडलेली आहे, भयंकर रोग आहे!

चुका पुष्कळच आहेत हे जर समजले, तर चुका दिसू लागतात आणि दिसल्यानंतर चुका कमी होत जातात, आम्ही काही सर्वांचे दोष पाहत बसत नाही. आणि आमच्याजवळ असा रिकामा वेळही नसतो. हे तर तुमचे खूप पुण्य जमा झाले असेल तेव्हा आम्ही सिद्धीबळाने त्याचे ऑपरेशन करून दोष काढून टाकतो. हे डॉक्टर्स ऑपरेशन करतात त्याहीपेक्षा लाखपटीने जास्त मेहनत आमच्या ऑपरेशनमध्ये असते!

ज्याला स्वतःच्या जितक्या चुका दिसतात, तितकाच तो त्यांचा *उपरी* (वरिष्ठ). ज्याच्या सर्व चुका संपल्या असतील, त्याचा कोणीही *उपरी* नसतो. 'माझा कोणी *उपरीच* नाही. त्यामुळे मी सर्वांचा *उपरी. उपरीचाही उपरी*!' कारण आमच्यात स्थूल दोष तर नसतातच, सूक्ष्म दोष सुद्धा निघून गेले. सूक्ष्मतर आणि सूक्ष्मतम दोष आहेत, त्यांचे आम्ही संपूर्ण ज्ञाता-द्रष्टा असतो. महावीर भगवंत सुद्धा हेच करत होते. नावाला सुद्धा चिकटपणा (मळ) राहिला नसेल, तेव्हाच सूक्ष्मतर आणि सूक्ष्मतम दोष दिसतात.

महावीर भगवंतांना केवळज्ञान उत्पन्न झाले तोपर्यंत स्वतःचे दोष दिसत होते. भगवंतांना केवळज्ञान उत्पन्न झाले तो काळ आणि स्वतःचे दोष दिसणे बंद होण्याचा काळ एकच होता! दोन्हीही समकालीन होते!

'अंतिम दोषाचे दिसणे बंद होणे आणि या बाजूला केवळज्ञान उत्पन्न होणे!' असा नियमच आहे.

**प्रश्नकर्ता :** दादा, लहानपणापासूनच मला सगळीकडून मार पडत आला आहे. आता मुलांकडून सुद्धा सहन करण्याची पाळी आली आहे. तर आता कसे सहन करावे? यात चूक कुणाची?

**दादाश्री :** हा चहाचा कप तुमच्या हातून फुटला तर तुम्हाला दु:ख होईल? स्वत:च्या हातून फुटला तर तुम्हाला सहन करावे लागते का? आणि जर तुमच्या मुलाने फोडला तर दु:ख, चिंत्ता-जळजळ होते. स्वत:च्या झालेल्या चुकांचाच हिशोब आला आहे, हे जर समजले तर दु:ख किंवा चिंता होईल का? हे तर परक्यांचे दोष पाहून दु:ख चिंता उत्पन्न करतो आणि त्यामुळे रात्रंदिवस स्वत:चे काळीज जाळत राहतो आणि वर असेच मानतो की, मला फार सहन करावे लागते.

'स्वरूपाचे ज्ञान' असे आहे की ते जसजसे परिणाम पावते तसतसे काहीच सहन करावे लागत नाही. ज्ञाता-ज्ञेय संबंधामुळे सहन करावे लागत नाही. तुझ्याशी तो का भिडला? तर तो तुझाच दोष आहे. आपल्या दोषामुळेच बंधन आहे. स्वत:च्या चुकांपासूनच सुटायचे आहे. हे सर्व संयोग संबंध आहेत. हिशोब असल्याशिवाय कुणी भेटतच नाही. स्वत:च्या दोषामुळेच बंधन आहे. स्वत:चे दोष पाहत राहिल्याने सुटका होणे शक्य आहे. आम्ही आमचे दोष पाहत राहिलो, त्यामुळे तर सुटलो. निजदोष लक्षात आल्यावर मुक्त होत जातो.

स्वत:च्या हातून पाचशे रुपये हरवले तर ते सहन करू शकतो त्याचप्रमाणे स्वत:ची चूक समजली की सहन करण्याची शक्ती आपोआप उत्पन्न होते.

जेव्हा समजते की कुणाचा दोष होता? स्वत:चाच होता, असे जर समजले तर सुटका होते, नाही तर जास्त बंधनात येतो.

लोक सहनशक्ती वाढवण्यास सांगतात, पण ते कुठपर्यंत टिकेल? ज्ञानाची दोरी तर शेवटपर्यंत पोहोचते. सहनशक्तीची दोरी कुठपर्यंत

पोहोचेल? सहनशक्ती मर्यादित असते, ज्ञान अमर्याद आहे. हे आमचे ज्ञानच असे आहे की, किंचितमात्र सहन करावे लागत नाही. सहन करणे म्हणजे लोखंडाला डोळ्याने पाहून वितळवून टाकणे, तितकी शक्ती असावी. तिथे या ज्ञानामुळे तर किंचितमात्र सहन केल्याशिवायच परमानंदासह मुक्ती! शिवाय हेही समजते की हा तर हिशोब पूर्ण होत आहे. आपण मुक्त होत आहोत.

निजदोष दृष्टी म्हणजे समकित, म्हणजेच सरळ मार्गाला लागलेला. एकदाच जरी सरळ मार्गाला लागला, तरी त्याच्या संसाराचे दुकान रिकामे होऊ लागते. सुलट मार्गाला लागलेला नेहमी स्वत:चेच दोष पाहतो. तिथे उलट्या मार्गाला लागलेला म्हणजे काय? तर जो स्वत:ची भांडी खरकटी पडली असताना दुसऱ्यांना म्हणतो, आणा मी तुमची भांडी धुऊन देतो, तो उलट मार्गाला लागलेला.

आम्ही स्वत: ज्ञानात पाहिले आहे की, जग कशामुळे बांधले गेले आहे? केवळ निजदोषांमुळेच बांधले गेले आहे.

शेवटी दृष्टी कशी असावी? तर जेव्हा जीव मात्र निर्दोष दिसतील तेव्हा काम पूर्ण झाले, असे म्हणता येईल. माणसांनाच नव्हे तर झाडाला सुद्धा हे वाकडे आहे असे बोलू नये. अरे, सोड ही झंझट. अनंत जन्मांपासून हेच गाणे गायले ना!

आमच्या या दोन किल्ल्या जर धरून चाललात तर समकित प्राप्त होईल असे आहे.

1) मनाला गाठी म्हटले आहे. मनाला परके म्हटले आहे. मनाला वश करायला गेलो तर मन प्रतिकार करते. आपण तर मन गाठींचे बनलेले आहे असे म्हटल्यावर मग काय उरले?

2) दुसरी किल्ली : 'भोगतो त्याची चूक.'

## आडमुठेपणा - स्वच्छंद

स्वत:मध्ये स्वच्छंद नावाचा एक असा दोष आहे की जो कधीही

पैलतीरी पोहोचू देत नाही. अनंतकाळाचा हिशोब म्हणजे चंदुभाऊचे वहीखाते. अरे, अनादि काळापासून इतकेच मिळवले? आठ प्रकारच्या कर्मांच्या कमाईत अनंत ज्ञानातून एका थेंबाइतके सुद्धा ज्ञान उत्पन्न झाले नाही. अनंत दर्शनातून किंवा अनंत सुखातून सुखाचा एक थेंब सुद्धा उत्पन्न झाला नाही. ज्यास सुख मानले आहे ते तर आरोपित सुख आहे, खरे नव्हे. मानलेला मोक्ष चालणार नाही, यथार्थ मोक्ष पाहिजे. जगात कुणीही आपला *उपरी* नाहीच, असे मुक्ती सुख प्राप्त झाले तरच यथार्थ मोक्ष झाला असे म्हटले जाईल.

स्वच्छंद म्हणजे स्वत:च औषध तयार करणे. स्वत:च रोगाचे निदान करणे, स्वत:च औषध बनवावे आणि स्वत:च प्रिस्क्राईब करावे! अरे, मोक्षमार्गाचे औषध सुद्धा स्वत:च बनवून घेतलेस? तर शहाण्या, औषध म्हणून विष घेतलेस. अरे मूर्खा, ही तर तुझ्यासाठी विषबाधा ठरली. म्हणूनच प्रशंसा झाल्यावर राग होतो आणि दोष दाखवल्यावर द्वेष होतो. धर्मात, जपात, तपात, शास्त्र समजण्यात स्वच्छंद चालत नाही. ज्यास साधन म्हणून स्वीकार कराल ते स्वच्छंदतेने केलेले असेल तर चालणार नाही. स्वत:च्या स्वमतीच्या कल्पनेने करू नका. हे तर स्वत:च अपराधी, स्वत:च वकील आणि स्वत:च न्यायाधीश, अशा प्रकारे चालत आहे सर्व. स्वच्छंद म्हणजे स्वमती कल्पना, अरे! मग मरशील. स्वच्छंद तर कुठल्या कुठे नेऊन पछाडेल!

स्वत:च्या मर्जीप्रमाणेच वागायचे तो स्वच्छंद. स्वच्छंद थांबला तरच काम होईल. स्वत:च्या शहाणपणाने धर्म आणि ध्यान केले, त्यामुळे काहीच निष्पन्न झाले नाही. स्वत:च्या मतीनुसार वागल्याने अनंत अनंत अवतार संसार बंधनात बांधला जाशील, त्यापेक्षा तर 'हे' स्टेशन गाठले नाही तरच उत्तम. जिथे होतास तिथेच बसून रहा. नाही तर या धर्माच्या स्टेशनवर येऊन जर स्वच्छंदपणे वागलास, आणि स्वत:च्या मतीनुसार चाललास तर अनंतानंत जन्म संसाराच्या भटकंतीतच भटकत राहशील.

स्वच्छंदपणा गेला तर स्वत:चे कल्याण स्वत: करू शकेल परंतु

स्वत:च जर स्वच्छंद काढायला गेला तर निघेल असेही नाही ना? स्वच्छंद ओळखावा तर लागेल ना? तू जे काही करत आहेस तो स्वच्छंदच आहे. कृपाळूदेव (श्रीमद् राजचंद्र) यांनी म्हटले आहे की, 'सजीवन मूर्तीच्या लक्ष्याशिवाय जे काही केले जाते ते जीवासाठी बंधन आहे, हेच आमचे हृदय आहे. 'जे काही करशील ते सर्व बंधन आहे, तोच स्वच्छंद आहे.' एका केसाइतके केले तरी तो स्वच्छंदच आहे. व्याख्यानाला गेला, किंवा साधू झाला, तप-त्याग करून शास्त्रे वाचली, ते सर्वच स्वच्छंद आहे. तू जी जी क्रिया करशील, ती ज्ञानी पुरुषांना विचारून कर. नाही तर ती स्वच्छंद क्रियाच म्हटली जाईल. त्यामुळे तर बंधनात अडकशील.

'मी चंदुभाऊ आहे' हाच स्वच्छंद आहे, तो गेला की मग तप-त्याग किंवा शास्त्राची पण गरज नाही. स्वच्छंद होता म्हणून तर अजूनही मार्गी लागले नाहीत. स्वच्छंद सुटला तर तासाभरात मोक्ष होईल!

स्वच्छंद म्हणजे आंधळा छंद. 'मी चंदुभाऊ' हाच स्वच्छंद त्यामुळेच तर अनंत जन्म मार्ग सापडत नाही. स्वच्छंद गेला तर काम पार पडेल.

स्वत:च्या मतीने चालण्यासारखे हे जग नाही. स्वत:पेक्षा पाच अंश मोठा असेल अशा व्यक्तीला शोधून काढ आणि त्याच्या म्हणण्यानुसार वाग. कुठवर? तर जोपर्यंत ज्ञानी पुरुष भेटत नाहीत तोपर्यंत. 'दुसरे काही शोधू नकोस, मात्र एका सत्पुरुषाला शोधून त्यांच्या चरणकमलांवर सर्व भाव अर्पण करून त्यांच्या म्हणण्यानुसार वाग. आणि तरी जर मोक्ष मिळाला नाही तर माझ्याकडून घेऊन जा. असे श्रीमद् राजचंद्र म्हणत असत.

सध्या तर धर्म स्वच्छंदतेनेच करत आहेत. कित्येक वर्षांपासून तुम्ही तुमच्या गुरूंची आराधना करतच आहात, तरी पण 'चंदुभाऊ' म्हटल्यावर कान टवकारताच ना! चंदुभाऊसाठी बरे-वाईट बोलल्यावर लगेच राग-द्वेष चालू होतात. गुरूची इतकी आराधना केली तरीही राग-द्वेष गेले नाहीत तर त्याचा काय उपयोग? पण तरी तुमची

आराधना मोक्षासाठीच आहे, म्हणून कधी ना कधी तुम्हाला ज्ञानी पुरुष भेटतीलच.

स्वच्छंदेतेने कधीच वागू नये. जरी अजाणतेपणी अग्निमध्ये हात घातला तरी भाजते की नाही? अजाणतेपणी केलेल्या कर्मांचे फळ सुद्धा नक्कीच मिळेल, म्हणून प्रथम तू हे जाणून घे की तू कोण आहेस? आणि हे सर्व काय आहे?

स्वच्छंद नावाचा दोष गेल्यानंतर दादांचा छंद लागेल. स्वच्छंद गेल्यावर स्वरूप ज्ञान लाभते. कमी स्वच्छंद असलेला माणूस कसा असतो? तर त्याला जसे वाकवाल तसे तो वाकतो, असा लवचिक असतो, फ्लेक्सिबल असतो. त्यांना मोक्षमार्ग प्राप्त होतो. स्वच्छंदीला वाकवाल तसा वाकत नाही.

स्वच्छंद म्हणजे बुद्धीभ्रम. या जगात कोणीच दोषी नाही. स्वच्छंद हाच तुझा सर्वात मोठा दोष आहे.

भगवंतांनी मोक्षमार्गावर जाण्यासाठी सुंदर पद्धतशीर मिश्रण बनविले होते. आणि त्यांनी ते सर्वांसाठी उपलब्ध केले होते. त्यांनी या मिश्रणाचा फॉर्म्यूला दिला होता, आज तो फॉर्म्यूलाच नष्ट झाला आहे. कुणाकडेही हा फॉर्म्यूला नाही. आज आम्ही तुम्हाला तोच फॉर्म्यूला पुन्हा देत आहोत.

या मिश्रणामध्ये 20% 'शास्त्रांचे', 70% 'ज्ञानींचा परम विनय' आणि 10% 'संसारी भावना,' असे ठेवा आणि मग ते मिश्रण प्या. पण त्या ऐवजी लोक तर शास्त्रेच पीत राहिले. त्यामुळे अजीर्ण झाले. भगवंतांनी सांगितले होते की, हे औषध दिवसातून तीनदा हलवून प्या. यावर कित्येक लोक तर दिवसातून तीनदा औषध हलवतच राहिले! आणि कित्येक 'हलवून प्यावे, हलवून प्यावे' असे गातच राहिले, बस गातच राहिले!

हे कसे आहे? तर डॉक्टरी ज्ञानाचे पुस्तक वाचून स्वतःच औषध बनवून पिण्यासारखे आहे. पण मग तिथे तर कोणी स्वतः औषध तयार

करत नाही, कारण मृत्यूची भीती वाटते. एका जन्माचे मरण टाळण्यासाठी डॉक्टरांना विचारल्याशिवाय स्वत: औषध बनवत नाही आणि अनंत जन्मांचे मरण बिघडवण्यासाठी महावीरांच्या, वीतरागांच्या शास्त्रांचे स्वत:च औषध तयार करून प्यायले, त्यामुळे त्याचे विष झाले आहे. यालाच भगवंतांनी स्वच्छंद म्हटले आहे. आंधळा छंद म्हटले आहे.

मोक्षाची गल्ली तर अत्यंत अरुंद आहे, त्यात वाकडा होऊन चालायला गेलास तर फसलाच समज. त्यात तर सरळ होऊनच चालावे लागेल, तरच मोक्षापर्यंत पोहोचू शकाल. साप सुद्धा बिळात शिरताना सरळ होऊन शिरतो.

आडमुठेपणामुळेच सारा संसार उभा आहे. आडमुठेपणामुळेच मोक्ष अडकून राहिला आहे. भगवंतांनी साधू होण्यापूर्वी सरळ होण्यास सांगितले आहे. हवे तसे साधूपद प्राप्त झाले असेल, पण वाकडेपणा जर गेला नसेल तर ते साधूपद काय कामाचे? आडमुठेपणा हा भयंकर विकृत अहंकार आहे. आडमुठेपणा तर कसा आहे, की जेव्हा रियल सत्य समोरून भेटायला आले तरी त्यास भेटू देत नाही. आडमुठेपणा रियल सत्याला फेकून द्यायला लावेल.

बायको-मुलांना, अरे! स्वत:लाही जितके जपले नाही त्याच्या अनेक पटीने या आडमुठेपणाला जपून ठेवले आहे. त्यामुळेच अनंत जन्मांपासून भटकत राहिला आहे. आडमुठेपणा आंधळे बनवतो, खरा मार्ग सुचू देत नाही. आडमुठेपणाच त्याला स्वच्छंदी बनवतो. आणि स्वच्छंद हे तर प्रत्यक्ष विषसमानच आहे.

व्यवहारात जर कुणी आडमुठेपणा करत असेल तर कुणी त्याला विचारत सुद्धा नाही आणि जर आडमुठेपणा कमी असेल तर सगळेच त्याला विचारतात, त्याची पूजा करतात. तर मग मोक्षमार्गात आडमुठेपणा कसा काय चालेल?

केवळज्ञान होईपर्यंत आडमुठेपणा असतो. या आडमुठेपणाचा समुद्र पार करायचा आहे. आपण उभे आहोत आडमुठेपणाच्या या काठी आणि

जायचे आहे पैलतीरी. या जगात आडमुठेपणा समोर आडमुठेपणा कराल तर कधीही पार येणार नाही. आडमुठेपणा सरळ झाल्याने निघू शकेल. साप सुद्धा आपल्या बिळात शिरतो तेव्हा सरळ होऊन शिरतो. वाकडा-तिकडा जात नाही. मोक्ष गाठायचा असेल तर सरळ व्हावे लागेल. गाठी दूर करून अबुध व्हावे लागेल.

## शंका

जसजसे स्वत:च्या कल्पनेने, स्वमतीने शास्त्रे वाचतो तसतसा त्याच्या आडमुठेपणा वाढत जातो. उलट त्यामुळे तर आवरणे वाढली. अरे, वाचल्यामुळे जर प्रकाश प्राप्त झाला असेल, तर अजूनही ठोकरा का खाव्या लागतात? ठोकरा तर अंधारात लागतात. प्रकाशात कशा लागतील? जर तू 'काही जाणत' असशील तर त्यामुळे एक तरी चिंत्ता कमी झाली का? याउलट 'हे खरे की ते खरे' अशी द्विधा वाढत गेली, जास्त शंकाशील झालास. आणि जिथे शंका तिथे अज्ञान. शंकेपुढे आत्मा थांबत नाही. ज्ञान तर त्यास म्हणायचे की जे संपूर्ण नि:शंक बनविते.

आतील एकही परमाणू हलत नाही, त्याचे नाव ज्ञान. शंका ही तर आत्म्याची वैरीण आहे. पूर्ण आत्माच फेकून द्यायला लावते. म्हणून शंका उत्पन्न झाली की लगेच तिला मुळासकट उपटून टाकावी. आत्मा प्राप्त झाल्यानंतर, आत्म्यात स्थित झाल्यानंतर, मग अशी कोणती वस्तू असू शकते की जी आत्म्याला हलवून सोडेल? जगात असे कोणते तत्त्व आहे की जे 'तुमचे स्वत:चे' आहे त्यास हिसकावू शकेल? शंकेचा किडा हा तर भयंकर रोग म्हणायचा! कळत सुद्धा नाही की शंका केव्हा उत्पन्न झाली आणि किती नुकसान केले! एका जन्मापुरती आम्ही गॅरंटी देत आहोत की 'व्यवस्थित शक्ती'च्या नियमात काहीच फेरबदल होणार नाही, मग शंका करण्याचे कारणच काय? अरे ठावठिकाणा नसलेले हे जग, की जिथे घरातून बाहेर पडला की तो परत घरी येईल तेव्हा खरे, अशा या जगात कुठे शंका करायची आणि कुठे नाही? आणि जे काही घडत आहे ते काय पूर्वी घडले नव्हते? हे काय आज

नव्याने घडत आहे? याची फिल्म तर आधीच तयार झाली आहे ना! मग त्यात काय? कुणाच्याही बाबतीत शंका करण्यासारखी नाही, तिथे हे लोक मोक्षाची शंका करतात, वीतरागांवर शंका घेतात, धर्माच्या बाबतीत शंका करतात. अरे, कुठल्याकुठे फेकला जाशील, जर शंका केलीस तर!

अनंत जन्मांचा देहाध्यास सुटला तरच आत्मा प्राप्त होईल. देहात्मबुद्धी आत्मा प्राप्त होऊ देत नाही. उलटेच दाखवते. कारण देहात्मबुद्धी संसाराचेच रक्षण करते आणि संसारातच भटकवत ठेवते. ही देहात्मबुद्धी स्वत:च्याच स्वरूपाचे निरंतर अहित करत राहते. सरळ कधीच दाखवत नाही, नेहमी उलटेच दाखवते. एकदा सरळ मार्गाला लागला की मग सुटका होऊ शकते. सरळ मार्गाला लागणे म्हणजे समकित होणे. उलट मार्गावर चालणे म्हणजे देहात्म बुद्धीत राहणे आणि आत्म्यात आत्मबुद्धी होणे त्याचे नाव समकित. आत्म्यात आत्मरूप होणे अर्थात आत्मस्वरूप होणे, याचे नाव ज्ञान. देहात्म बुद्धीला फ्रॅक्चर करून आत्मबुद्धी उत्पन्न होते तेव्हाच मुक्तानंद प्रकट होतो. देहात्म बुद्धीच देहाध्यास करविते.

## मताग्रह

कित्येक तर मतातच गुंतून राहिले आहेत, पक्षात पडले आहेत, आणि त्यामुळे पक्षाचा पायाच मजबूत करत राहतात. मताग्रही झाल्यामुळे स्वत:च्या पक्षाचा पाया रात्रंदिवस मजबूत करण्यात संपूर्ण आयुष्य वाया घालवीत आहेत. अरे, मोक्षाला जायचे आहे की मत-पक्षातच पडून राहायचे आहे? मोक्ष आणि पक्ष, हा तर विरोधाभास आहे. पक्षातीत झाल्यानंतरच मोक्षमार्ग मिळू शकतो. जिथे निष्पक्षपातीपणा आहे तिथेच भगवंत आहेत, तिथेच मोक्ष आहे.

मतांध कधीही 'सत्य वस्तू'ला प्राप्त करू शकत नाही. कारण स्वत:च्याच मताचा आग्रही झालेला असतो, त्यामुळे समोरच्याचे सत्य कसे स्वीकारू शकेल? आणि हा जो आग्रह केला जातो, तो परमनन्ट

वस्तूसाठी असतो की टेम्पररी वस्तूसाठी? अरे! हवी आहे परमनन्ट वस्तू (आत्मा) आणि आग्रह करत राहतोस टेम्पररी वस्तूंसाठी, मग आत्मा कसा प्राप्त होईल? सर्व प्रकारे संपूर्ण निराग्रही बनून एकमात्र आत्मा जाणण्याचा आग्रह करशील, तरच मोक्ष प्राप्त होईल. इतर सर्व कामना सोडून फक्त 'सत्य' जाणण्याची कामना केलीस, तरच 'परम सत्य' प्राप्त होईल.

## दृष्टीराग

मतांधापेक्षाही दृष्टीरागाचा रोग खूप भयंकर असतो. जो अनंत जन्मांपर्यंत निघत नाही. जोपर्यंत सम्यकत्व होत नाही तोपर्यंत अंधश्रद्धा राहतेच. मिथ्यात्व असेल त्याला अंधश्रद्धा ही असतेच. भगवंतांना अंधश्रद्धेची एवढी हरकत नाही जितकी या दृष्टीरागाची आहे, असे म्हटले आहे. दृष्टीरागी म्हणजे काय? 360 डिग्री आहेत, व्ह्यू पॉइंट आहेत आणि त्यांच्या 360 दृष्टी आहेत. त्यात एक एक दृष्टीवर अनंत दृष्टी आहेत. त्यातील कोणत्याही एका दृष्टीवर, त्या व्ह्यू पॉइंटवर संपूर्ण राग उत्पन्न होणे तो दृष्टीराग आहे. तर हा असा दृष्टीराग कधीही जात नाही. अनंत जन्मांच्या भटकंती नंतर जेव्हा कधी ज्ञानी पुरुषांशी भेट होते, तेव्हा त्याचा दृष्टीरागरूपी रोग अपसेट होतो. (निघतो.)

दृष्टीरागीच्या आत्म्यावर आवरण आलेले असते. संसारातील राग–द्वेष निघू शकतात परंतु दृष्टीराग निघत नाही, त्यावर काही उपायच नाही. ह्या जन्मात आणि अनंत जन्मांत मेलो तरी सुद्धा हा रोग निघतही नाही आणि मिटतही नाही.

दृष्टीरागाची लक्षणे काय? तर त्यात वीतरागतेचे एक सुद्धा लक्षण नसते. ज्याला दृष्टीराग असेल त्याला आम्ही सांगितलेली गोष्ट समजत नाही. बाकी कितीही अशिक्षित असेल तरीही त्याला आमची गोष्ट समजते.

दृष्टीराग तर रागाचाही राग आहे. त्यास मुळासकट उपटून काढल्यानंतरच सत्य समजते.

## वैरभाव

**प्रश्नकर्ता :** जर साप चावायला आला, तर काय आपण त्याला मारायचे नाही?

**दादाश्री :** पण तेव्हा आपणच मागे सरकलो तर! समोरून ट्रेन येत असेल, तेव्हा काय कराल? तसेच इथेही बाजूला व्हावे.

साप तर पंचेंद्रिय जीव आहे. त्याला ठार मारले तर तो वैर बांधेल. त्याला कळते की माझा काही गुन्हा नसतानाही मला मारत आहेत. मग तो पुढच्या जन्मी परत आपल्यालाच मारतो.

वैरामुळे तर हे संपूर्ण जगत उभे आहे ना! अरे, या मुंगीला सुद्धा वाटते की माझ्याजवळ शक्ती असती तर तुलाच सतावून सोडले असते. हा ढेकूण सुद्धा दिवा लावला की घाबरून पळ काढतो, त्याला भीती वाटते की, मला मारून टाकतील. त्याचबरोबर त्याला असेही वाटते की मी तर माझा जो आहार आहे तोच खात आहे, मग मला का मारतात? तो जे रक्त पितो ते पण त्याच्या ऋणानुबंधाचेच आहे.

बंधन दोन प्रकारचे आहेत. एक वैरभावाचे आणि दुसरे प्रेमभावाचे. प्रेमभावात पूज्यभाव असतो. हे जग वैरामुळेच बांधले गेले आहे! स्नेह, तर चिकटणारे, चिकट स्वभावाचे असते, ते सुकूनही जाते पण वैर मात्र मिटत नाही, दिवसेन् दिवस वाढत जाते.

## संसारसागराची स्पंदने

संसारसागर हा परमाणूंचा सागर आहे. त्यात स्पंदने उठतात तिथे लाटा उसळतात आणि त्या लाटा परत दुसऱ्यांवर आदळतात, त्यामुळे दुसऱ्यांना सुद्धा स्पंदने निर्माण होतात आणि मग सुरुवात होते वादळाची. हे सर्व परमाणूंमुळेच उत्पन्न होत असते. आणि आत्मा जर त्यात तन्मयाकार झाला तर स्पंदने जोरात उत्पन्न होऊ लागतात.

हे जग सुद्धा सागरासारखेच आहे. एक स्पंदन उत्पन्न झाले तर समोर अनेक प्रतिस्पंदने उत्पन्न होतात. जग सारे प्रतिध्वनीनेच उत्पन्न

झाले आहे. सर्व प्रकारचे सर्वच प्रतिध्वनी खरे आहेत, आणि ते तालबद्ध ऐकू येतात.

एखाद्या विहीरीत तोंड घालून तू मोठ्याने ओरडलास की 'तू चोर आहेस' तर विहीरीतून तुला काय उत्तर मिळेल? 'तू चोर आहेस.' तू म्हणालास की, 'तू राजा आहेस' तर विहीर पण म्हणेल 'तू राजा आहेस' आणि 'तू महाराजा आहेस' असे म्हटलेस, तर विहीर 'तू महाराजा आहेस' असे उत्तर देईल! तसे हे जग सुद्धा विहीरीसारखे आहे. तू जशी स्पंदने निर्माण करशील तसे समोरुन प्रतिस्पंदन स्वरुपात उत्तर मिळेल. म्हणजे 'ॲक्शन ॲन्ड रिॲक्शन आर इक्वल ॲन्ड ऑपोजिट' हा नियमच आहे. म्हणून तुला ऐकायला आवडतील अशी स्पंदने सोड. समोरच्याला चोर म्हणशील तर तुला सुद्धा 'तू चोर आहेस' असे ऐकावे लागेल. आणि 'राजा आहेस' असे म्हटलेस तर तुला सुद्धा 'राजा आहेस' असे ऐकायला मिळेल. आम्ही तर तुला परिणाम दाखवले. परंतु स्पंदने निर्माण करणे हे तर तुझ्याच हातात आहे. म्हणून तुला अनुकूल वाटेल तशीच स्पंदने निर्माण कर.

आपण दगड टाकलाच नाही तर आपल्या आत स्पंदने उठणार नाहीत आणि समोरच्यात सुद्धा लहरी उठणार नाहीत मग आपल्यावर सुद्धा त्याचा काही परिणाम होणार नाही. पण काय करणार? सर्व जण स्पंदने निर्माण करतातच कोणी छोटी तर कोणी मोठी स्पंदने निर्माण करतात. कोणी एखादा खडा तर कोणी दगड फेकतात. अजून त्यात भर म्हणजे स्पंदनांसोबत अज्ञानही आहे, त्यामुळे फार गोंधळ उडतो. ज्ञान असेल आणि मग स्पंदन झाले तर हरकत नाही. भगवंतांनी सांगितले आहे की, तू स्पंदन करू नकोस. पण हा करंटा स्पंदन केल्याशिवाय राहतच नाही ना! देहाच्या स्पंदनांस हरकत नाही पण वाणी आणि मनाच्या स्पंदनाची हरकत आहे. म्हणून त्यांना तर बंदच करून टाकले पाहिजे, जर सुखी व्हायचे असेल तर. जिथे जिथे दगड टाकले आहेत, तिथे–तिथे स्पंदने निर्माण होतीलच. स्पंदने जास्त गोळा झाली की भोगण्यासाठी नरकात जावे लागते. आणि ते भोगून झाल्यावर

हलके होऊन परत इथे येतो. हलकी स्पंदने एकत्र केली असतील, तर तो देवगतीचे सुख उपभोगून येतो. समुद्र नडत नाही, पण आपण फेकलेल्या दगडांची स्पंदनेच आपल्याला नडतात. जर समुद्राकडे लक्ष दिले नाही तर तो शांतच आहे आणि आपण जिथे-जिथे गडबड केली होती, त्याचीच, त्या समुद्राचीच स्पंदने बाधक ठरतात.

भगवंतांनी काय सांगितले आहे की, एका *समय*साठी (काळचक्राचा सर्वात लहान, अविभाज्य भाग) सुद्धा स्वतः, स्वतःचा झाला नाही. स्पंदनातच सगळा वेळ घालवून टाकतो. तोही लाटा उसळवतो आणि आपणही लाटा उसळवतो. त्यामुळे बुडताही येत नाही आणि पोहताही येत नाही.

देहाची स्पंदने बंधन करणारी नाहीत पण वाणी आणि मनाची स्पंदने मात्र बंधन करणारी आहेत. म्हणून भगवंतांनी त्यास समरंभ, समारंभ, आणि आरंभाचे स्पंदन म्हटले आहे. मनात प्रथम स्पंदन निर्माण होते त्यास भगवंतांनी समरंभ म्हटले आहे. उदाहरणार्थ, चर्चगेटला जाण्याचा विचार प्रथम मनात येतो, तो समरंभ. नंतर तिथे जाण्याची योजना मनात तयार करतो आणि निर्णय घेतो, ठरवतो आणि म्हणतो, आपल्याला तर चर्चगेटला जायचेच आहे. तर हे बीज पेरले त्यास समारंभ म्हटले आहे आणि मग तो स्वतः निघाला चर्चगेटला जायला, पूर्णपणे तो त्या स्पंदनांच्या लाटांमध्ये खेचला गेला, त्यास आरंभ म्हटले आहे. आता हे कोडे कसे सोडवता येईल?

जर मनाचा तिरस्कार झाला तर मग पाहाच त्या तिरस्काराची स्पंदने! त्यागींचा तिरस्कार कठोर असतो. वीतरागांना तर लाख तिरस्कार मिळाले तरी ते स्पंदने निर्माण करत नाहीत. खोक्यात (देहात) कधी स्पंदने निर्माण करूच नका. त्याचा तर नाशच होणार आहे. मग ते खोके हिऱ्याचे असोत किंवा मोत्याचे असोत, त्यात स्पंदने निर्माण करण्यात काय अर्थ?

स्वतः स्वतःच्या मनामुळेच फसला आहे. त्यात लग्न केले, आणि

मिश्रचेतनात फसला. आणि ते सुद्धा परके. स्वतःच्या वडिलांबरोबर स्पंदने निर्माण होतात, तर काय बायकोबरोबर होणार नाहीत? बायको ही तर मिश्रचेतन आहे, मग तिथे काय कराल? स्पंदनच बंद करून टाका. वडिलांसोबत स्पंदने चालू ठेवलीत तर चालेल, परंतु बायकोसोबत स्पंदने निर्माण झाल्याशिवाय राहतच नाही ना!

जीभेची, वाणीची, भानगड-गडबड हा काय प्रकार आहे? तो अहंकार आहे पूर्वजन्मीचा. या अहंकारामुळेच जीभ हवे तसे बोलते आणि त्या स्पंदनात घर्षण निर्माण होते. सध्या जे काही दुःख आहे ते अधिकांश जीभेच्या आणि वाणीच्या स्पंदनामुळेच आहे!

या कलियुगात तर सत्कर्म करण्याचा योग मिळत नाही आणि वाईट कर्म करण्यात सहभागी व्हावे लागते. ज्ञान प्राप्तीनंतर महात्म्यांना चुकीचे कर्म करताना हे चुकीचे घडत आहे असे ज्ञानामुळे समजते, त्यामुळे त्यांना ते आवडत नाही. म्हणजे कार्य चांगले असो किंवा वाईट, पण त्यांच्यासाठी ती निकाली बाब आहे आणि तेवढ्यापुरतीच स्पंदने निर्माण होतात, की जी नंतर शांत होतात. परंतु ज्यांना मूढात्म दशेत, हे चुकीचे होत आहे, हे सुद्धा कळत नाही, त्यांच्याकडून तर ॲक्शन म्हणजे कार्याचे स्पंदन आणि अज्ञानतेमुळे नवीन निर्माण होणाऱ्या रिॲक्शनच्या भावाचे स्पंदन, अशी डबल स्पंदने उत्पन्न होत असतात. अज्ञान आहे, त्यामुळे स्पंदने केव्हा उठतील याचा काही नेम नाही. मग तो संसारी असो किंवा त्यागी असो, कुणीही असो. कारण जिथे अज्ञान आहे तिथे भीती आणि धास्ती असते, आणि जिथे भीती आणि धास्ती आहे तिथे स्पंदने अवश्य निर्माण होतातच.

एखादी चिमणी आरशासमोर बसली तर त्यात आरसा काय करेल? आरसा तर आपल्या जागी स्थिरच आहे पण आपोआपच दुसरी चिमणी आरशात दिसू लागते. अगदी त्या चिमणीसारखेच डोळे, तशीच चोच दिसू लागते म्हणून त्या चिमणीची बिलिफ (मान्यता) बदलते आणि तिला वाटते की आत आपल्यासारखी दुसरी चिमणी आहे. त्यामुळे आरशातल्या चिमणीला चोच मारतच राहते, असे आहे हे सर्व! स्पंदनामुळे

जगत उभे झाले आहे. बिलिफ जराशी बदलली की त्या बदललेल्या बिलिफ प्रमाणेच सर्व दिसू लागते. मग जशी कल्पना कराल तसेच समोर घडते! आरसा तर एक आश्चर्यच आहे! पण लोकांना त्याचा सराव झाल्यामुळे दिसत नाही. हे तर लोक दिवसभर आरशात चेहरा पाहत राहतात, केस विंचरतात, पफ-पावडर लावतात, त्यामुळेच आरशाची किंमत कमी झाली आहे. नाही तर आरसा ही तर अलौकिक वस्तू आहे! पाहा तरी, कशी आहे पुद्‌गलाची करामत! ही चिमणी जेव्हा आरशासमोर येऊन बसते तेव्हा तिचे ज्ञान बदलत नाही पण तिची मान्यता बदलते. तिला आत दुसरी चिमणी आहे अशी मान्यता बसते, म्हणून ती चोच मारतच राहते. तसेच आहे या जगाचे. एक स्पंदन उसळून वर आले त्यामुळे समोर किती तरी स्पंदने निर्माण होतात. ज्ञान बदलत नाही पण बिलिफ बदलते. बिलिफ क्षणोक्षणी बदलत राहते. जर ज्ञान बदलले असते तर आत्माही राहिला नसता. कारण आत्मा आणि ज्ञान हे एकमेकांपासून वेगळे नाहीत. आत्म्याचे स्वरूपच ज्ञान स्वरूप आहे. जसे वस्तू आणि वस्तुचे गुण सोबतच असतात, कधी वेगळे होतच नाहीत, तसे! हे तर असे आहे की मान्यतेनुसार कल्पना करतो आणि तसेच घडते.

## क्लेश

'क्लेशमय वातावरणात सुद्धा ज्याला जरा सुद्धा क्लेश होत नाही, त्याचेच नाव मोक्ष.'

क्लेशमय वातावरण तर येतच राहते. हे ऊन नाही का पडत? वाऱ्यामुळे दारे आपटत नाहीत का? असे तर होत राहते. दारे आपटत असतील तर आपण जरा लांब उभे राहावे. क्लेशाचे वातावरण जर नसते तर मुक्तीचा आस्वाद कसा घेता आला असता? दादांचा मोक्ष तर असा आहे की चोहीकडून क्लेशाचे वातावरण असूनही मुक्तता वाटते!

भगवंतांनी कोणत्याही परिस्थितीला बंधन म्हटले नाही! खातो, पितो ती प्रकृती आहे पण आत्म्याचा क्लेश मिटला तोच मोक्ष. बाकी, तर खिचडी असो किंवा कढी, त्यात काही फरक पडत नाही.

केव्हाही, कसेही वातावरण असले तरी पण तुला क्लेश झाला नाही, तर तू सर्व शास्त्रे शिकलास, असे समज. बाहेर वाटेल तशी परिस्थिती असेल, आणि त्यामुळे उलटी होईल असेही वाटत असेल तरीपण तोंडावर हात ठेवून त्यास आतल्या आत दाबून ठेवण्याचा प्रयत्न करून स्वत: स्वच्छ असल्याचे भासवतो, त्याचप्रमाणे आत क्लेश होत असूनही बाहेर भडका उडू देत नाही तेव्हा समजावे की त्याची सर्व शास्त्रे शिकून पूर्ण झाली. गुरू-शिष्यांमध्ये सुद्धा क्लेश होतो!

ज्ञानी पुरुष भेटल्यानंतर अतिशय क्लेशमय वातावरणात सुद्धा आत क्लेश उत्पन्न होतच नाही ना! या 'दादांनी' महात्म्यांना कसे ज्ञान दिले आहे! या ज्ञानामुळे कधीच क्लेश होत नाही आणि वीतराग सुख वाटते! क्लेश मिटला, त्याचे नावच मुक्ती! इथेच मुक्ती झाली!

क्लेशात तर काय होत असते? जीव जळतच राहतो. विझवल्यानेही विझत नाही. जीव ही काही जाळण्याची वस्तू नाही. कापड जळत असेल तर जळू दे पण जीव जाळू नकोस. हा तर दिवसभर, रात्रंदिवस क्लेशच करत असतो. थोडा वेळ मोहात बुडतो आणि नंतर परत क्लेशातच जळत राहतो. जग सारे क्लेशातच बुडलेले आहे. आज तर सर्वच 'क्लेशवासी' झाले आहेत. हे तर मुर्छेमुळे विसरतात. बाकी क्लेश काही संपत नाही, क्लेश संपला तर मुक्ती!

या काळात तर सर्वत्र क्लेशच पसरला आहे. जेवताना सुद्धा क्लेश. आणि जर क्लेश वाढला तर ढेकूण मारायचे औषध आणतो. सध्या तर सहन होत नाही म्हणून मेला ढेकूण मारण्याचे औषध पितो. त्यामुळे काय समस्येचे समाधान झाले? हे तर पुढे ढकलले, ते मग अनेकपटीने भोगावे लागेल, त्यापेक्षा कसेही करून वेळ निभावून घे ना! ही तर निव्वळ अज्ञानताच आहे!

हे दु:ख आले कुठून? दु:खी माणसांच्या शरणी गेलो, म्हणूनच ना! सुखी माणसांच्या शरणी गेलो तर दु:ख येईलच कसे? 'दादा' तर संपूर्ण सुखी आहेत, म्हणून त्यांच्या शरणी गेल्यानंतर कसली

काळजी? जे स्वार्थी आहेत, ज्यांना काही तरी स्वार्थ आहे ते सर्व दु:खीच आहेत. मग त्यांच्या शरणी गेल्यावर दु:खीच होईल ना! जो दु:खी आहे तो स्वत:चेच दु:ख दूर करू शकला नाही, मग तो आपले दु:ख कसे दूर करू शकेल? जे पूर्ण स्वरूप आहेत, अनंत सुखाचे धाम आहेत, ज्यांना कोणत्याही प्रकारचा स्वार्थ नाही, कोणतीही इच्छा उरली नाही, त्यांच्याकडे जाऊन त्यांचे शरण स्वीकारले तरच पूर्णता प्राप्त करू शकतो.

क्लेश जेव्हा वाढतो तेव्हा त्यास कलह म्हटले जाते. मग कलह करणाऱ्यांसोबत मैत्रीभाव कसा राहू शकेल? हे तर आंबट ताकाला गोड करण्यासारखे झाले, त्यामुळे तर ते स्वत:ही आंबट होऊन जातात. तेव्हा अशा लोकांपासून दूर राहिलेलेच बरे, किंवा मग ज्ञानी झालेले बरे. ज्ञानी तर हे जाणतात की अशी रेकॉर्ड तर चोहीकडे वाजत आहे. आत आत्मा तर शुद्धच आहे ना! परंतु तुरुंगात फसले आहेत, त्याचे काय? क्लेशाचे जंजाळ कसे आहे ते पाहा! घरातील सर्व जण एका वरच तुटून पडतात, मग काय? त्यामुळे घरातच युद्ध! तर काय अवस्था होईल? मित्र म्हणाला की, 'माझ्या घरी जेवायला ये.' त्यावर तो बिचारा म्हणेल, 'नको रे बाबा, मला नाही जमणार. मी आलो तर घरात क्लेश होईल.' त्या बिचाऱ्याला निवांत झोपायला सुद्धा मिळत नाही. क्षणोक्षणी क्लेश, आणि ते सुद्धा अनिवार्यपणे भोगावेच लागते. त्याच घरात, त्याच क्लेशमय वातावरणात राहावे लागते. कसा हा कर्मांचा उदय! ते सुद्धा आपल्या आपसातल्या माणसांना सोबत! वेदनेपासून मुक्त होता येतच नाही, असा हा संसार आहे!

एक गृहस्थ माझ्याकडे आले होते. ते मला म्हणाले 'दादाजी, मी लग्न तर केले, पण मला माझी बायको आवडत नाही.'

**दादाश्री :** का बरे, न आवडण्याचे काय कारण?

**प्रश्नकर्ता :** ती जरा पायाने लंगडी आहे, लंगडत चालते.

**दादाश्री :** मग तुझ्या बायकोला तू आवडतोस की नाही?

**प्रश्नकर्ता :** दादाजी, मी तर आवडेल असाच आहे ना! देखणा आहे, शिकला-सवरलेला आहे, कमावत आहे आणि कसली खोड सुद्धा नाही.

**दादाश्री :** मग तर चूक तुझीच आहे. तू अशी कोणती चूक केली होतीस की तुला लंगडी बायको मिळाली आणि तिने असे कोणते पुण्य केले होते की तिला तुझ्यासारखा चांगला नवरा भेटला!

अरे, हे सर्व तर आपण केलेली कर्मेच आपल्या पुढे येतात त्यात समोरच्याचा दोष का पाहतोस? जा, आता तुझी चूक भोगून घे आणि परत नवीन चूक करू नकोस. तो समजून गेला आणि त्याचा संसार उध्वस्त होता होता वाचला, आणि संसार सुखाचा झाला.

मुक्तीचे सर्वश्रेष्ठ अंग म्हणजे क्लेश मिटवणे. क्लेश मिटला हेच सर्वात मोठे सुख. हे ज्ञान जरी नसले पण घरात धर्माचे काही होत आहे असे केव्हा म्हणता येईल? तर घरात जरी वाटेल तशा वातावरणात असला तरी जो स्वत: सहन करतो, आणि संघर्षातही क्लेश करत नाही, भडका उडू देत नाही, त्यालाच खानदानी माणूस म्हणतात. आणि तोपर्यंत घरात भगवंताचा वास असतो. घरात क्लेश असेल तर सर्वच नष्ट होईल. भगवंताचा वास तर राहतच नाही, शिवाय लक्ष्मी पण निघून जाते!

धर्मनिष्ठ घर असेल तर क्लेश होऊ देत नाही आणि क्वचित कधी झालाच, तर दार बंद करून घरातल्या घरातच मिटवून टाकतात. आणि पुन्हा कधी असा क्लेश होणार नाही हेही लक्षात ठेवतात.

संपूर्ण प्रामाणिकपणा, घेण्यापूर्वीच परत करायचे आहे, अशी भावना वगैरे सर्व आणि लक्ष्मीचे नियम पाळले, तर लक्ष्मी प्रसन्न राहते. बाकी, लक्ष्मीचे नियम तर पाळत नाही आणि लक्ष्मीची पूजा करतो, तर ती कशी काय प्रसन्न होईल?

भगवंत म्हणतात, की हा संसार कुठपर्यंत आहे? तर म्हणे, मन क्लेशयुक्त आहे तोपर्यंत. मन क्लेशरहित झाले की मुक्ती. मग मन जिथे जाईल तिथे समाधान राहते.

हे लहान मूल इथे आमची वाणी ऐकत आहे, तर त्यालाही शांती वाटते. तो सुद्धा गार पाण्याला गार आणि गरम पाण्याला गरम, असे समजू शकतो. घरी जेव्हा भांडण होते तेव्हा तो पाहतो की, वडील आईला असे बोलले आणि आई वडिलांना असे बोलली, हे त्याला बरोबर समजते. तो मग आतल्या आत ठरवतो की, यात चूक कुणाची आहे. आज तर मी लहान आहे म्हणून माझे काही चालत नाही पण मोठा झाल्यावर मी बघून घेईन. मुलाला तर क्लेशयुक्त डोळेही ओळखता येतात आणि शांत डोळेही ओळखता येतात!

क्लेशाचा काळ तर कसेही करून निघून जातो परंतु त्यावेळी अनंत जन्मांचे बंधन बांधून घेतो. अनंत जन्मांपासून क्लेशाचे बीज भरलेले आहेत म्हणून निमित्त भेटताच क्लेश उत्पन्न होतो. ज्ञानी पुरुष भरलेल्या क्लेशाच्या बीजांना जाळून टाकतात, त्यामुळे मग कधी क्लेश होत नाही.

श्रीमद् राजचंद्र म्हणतात की, 'ज्यांच्या घरात एक दिवस बिन क्लेशाचा जाईल, त्यांना आमचा नमस्कार आहे!'

## वास्तवात सुख-दुःख म्हणजे काय?

दुःख तर कशास म्हणावे? ज्ञानींच्या संज्ञेत तर दुःखाचे अस्तित्वच नाही. लोकसंज्ञेतच दुःख आहे. ज्ञानींच्या संज्ञेनुसार दुःख कधी येतच नाही आणि लोक संज्ञेनुसार तर इकडे गेला तरी दुःख आणि तिकडे गेला तरी दुःख, तिकडे कधी सुख नाहीचमुळी.

दुःख तर केव्हा म्हटले जाईल? तर खाण्यासाठी गेला असेल पण खायला मिळाले नाही, आणि पोटात आग लागली असेल त्यास दुःख म्हणायचे. तहान लागली असेल तरी प्यायला पाणी मिळत नाही, त्यास दुःख म्हणायचे. नाक दाबले तर पाचच मिनिटात गुदमरायला होते, त्यास दुःख म्हणायचे. हे बाहेरून वाटेल तितके टेन्शन आले तरी चालेल पण भूक, तहान आणि हवेच्या बाबतीत चालत नाही. कारण दुसरे टेन्शन जरी कितीही आले तरी ते सहन होऊ शकते, त्यामुळे

काही मरण ओढवणार नाही, पण लोक तर विनाकारण डोक्यावर टेन्शन घेऊन फिरत असतात.

**प्रश्नकर्ता :** एकाला सुख वाटते आणि दुसऱ्याला दु:ख वाटते, यास काय म्हणावे?

**दादाश्री :** सुख-दु:ख दोन्हीही कल्पित आहे, आरोपित आहे. ज्याने अशी कल्पना केली की, हे चांगले आहे, तर त्याला त्यात सुख वाटते. समोरच्याला जसे आवडत असेल तसे केले तर पुण्य बांधले जाते. बुद्धीचा आशय बदलत राहतो परंतु मृत्यूवेळी जो आशय असेल त्यानुसार परिणाम प्राप्त होतो.

हे इव्होल्युशन (उत्क्रांती) आहे. पहिल्या मैलावरचे ज्ञान असेल ते मग दुसऱ्या मैलावर उत्क्रांत होते. हा उत्क्रांतिवाद आहे. गेल्या जन्मी चोरी करण्याचा अभिप्राय झाला असेल, परंतु या जन्मात असे ज्ञान मिळते की चोरी करणे हे चुकीचे आहे. त्यामुळे त्याला मनात वाटत राहते की हे चुकीचे आहे, पण चोरी तर पूर्वीच्या आशयात एडजस्ट (निश्चित) झालेली आहे, त्यामुळे चोरी करत राहतो चोरीचा करार फाडून टाकणे शक्य नाही. तो करार अपूर्ण राहतच नाही, पूर्ण होतोच. त्या आधी मरतही नाही. आम्ही काय म्हणतो की, तुझा जो चुकीचा आशय आहे, तो तू बदल. चोरी करायची नाही, असे पुन्हा पुन्हा ठरव. जेव्हा जेव्हा तुला चोरी करण्याचे विचार येतात तेव्हा तेव्हा तू त्यास मुळासकट उपटून टाक, तर तुझे काम होईल मग सुलट होत जाईल.

संसारी लोकांना व्यवहारधर्म शिकवण्यासाठी आम्ही सांगतो की तू परानुग्रही हो. स्वत:साठी विचार सुद्धा न येवो! लोक कल्याणासाठी परानुग्रही हो. तू जर स्वत:साठी खर्च केलास तर ते गटारात जाईल आणि दुसऱ्यांसाठी काहीही खर्च करणे ते पुढचे एडजस्टमेंट आहे.

शुद्धात्मा भगवंत काय म्हणतात की, 'जो दुसऱ्यांना सांभाळतो त्याचा सांभाळ मी करतो. आणि जो स्वत:चेच सांभाळतो, त्याला मी त्याच्या परिस्थितीवर सोडून देतो.'

## दोषदृष्टी

**प्रश्नकर्ता :** समोरच्या व्यक्तीचे जे दोष दिसतात, ते दोष स्वत:मध्ये असतात?

**दादाश्री :** नाही. तसा काही नियम नाही, पण तरी तसे दोष असतात खरे. ही बुद्धी काय करते? तर नेहमी स्वत:चे दोष झाकत राहते आणि दुसऱ्यांचे दोष पाहते. हे तर वाईट माणसाचे काम. ज्याच्या चुका संपल्या असतील तो दुसऱ्यांच्या चुका बघत नाही. त्याला अशी वाईट सवयच नसते. तो सहजपणे सर्वांना निर्दोषच पाहतो. ज्ञान असे असते की कुणाची थोडी सुद्धा चूक पाहत नाही.

दोष हे तर सर्वांचे गटार आहेत. बाहेरचे गटार आपण उघडत नाही. लहान मुलालाही हा अनुभव आहे. हे आपण स्वयंपाकघर बनवले आहे म्हणजे गटार सुद्धा असलेच पाहिजे ना! पण ते गटार उघडूच नये. कुणात काही दोष असेल, कुणी चिडत असेल, कुणी धांदरट असेल, तर त्याचे दोष पाहणे म्हणजे गटार उघडले असे म्हणायचे. त्यापेक्षा कुणाचे गुण पाहिलेले बरे. गटार तर स्वत:चेच पाहण्यासारखे आहे. पाणी तुंबले असेल तर स्वत:चे गटार साफ करावे. इथे तर गटार तुंबते पण लक्षातच येत नाही. आणि लक्षात आले तरी काय करणार? शेवटी त्याचा सराव होतो, त्यामुळेच तर हे सर्व रोग उत्पन्न झाले आहेत. शास्त्रे वाचून बोलत राहतो की, 'कुणाची निंदा करू नका.' पण निंदा तर चालूच असते.

कुणाविषयी थोडे जरी वाईट बोलले गेले की तेवढे नुकसान झालेच समजा. या बाहेरच्या गटारांची झाकणे कोणी उघडत नाही, पण लोकांच्या गटारांची झाकणे मात्र उघडतच राहतात.

कुणाची निंदा-टीका करणे, म्हणजे आपली दहा रुपयांची नोट वटवून एक रुपयाची नोट मिळवण्यासारखे आहे. टीका करणारा नेहमी स्वत:चेच गमावत असतो. ज्यामुळे काहीच हाती लागत नाही. तेव्हा अशी मेहनत आपण करूच नये. टीकेमुळे तुमचीच शक्ती वाया जाते.

आपल्याला जर दिसले की, हे तीळ नाही, रेती आहे, मग रेतीला पिळण्याची मेहनत का करावी? टाईम आणि एनर्जी (वेळ आणि शक्ती) दोन्ही वाया जातात. टीका करून तर दुसऱ्यांच्या कपड्यांचा मळ धुऊन दिलास आणि स्वत:चे कपडे मळवलेस, अरे मेल्या, मग ते आता केव्हा धुशील?

आमच्या ह्या 'मेल्या' शब्दाचे भाषांतर किंवा अर्थ तुम्ही काय कराल? या शब्दाचा तर गूढ अर्थ आहे. त्यात ठपका असतो पण तिरस्कार नाही. फार खोलवरचा शब्द आहे. ही आमची ग्रामीण भाषा आहे, तरी पण पॉवरफुल आहे! एका-एका वाक्यावर विचार करत राहील, असे आहे. कारण ही ज्ञानींची हृदयस्पर्शी वाणी आहे, साक्षात् सरस्वती!

## स्मृती

**प्रश्नकर्ता :** दादा, भूतकाळ विसरला जात नाही, असे का?

**दादाश्री :** भूतकाळ म्हणजे आठवायचे म्हटले तरी आठवत नाही आणि विसरायचे म्हटले तरी विसरता येत नाही, त्याचेच नाव भूतकाळ. साऱ्या जगाची इच्छा तर फार असते की, भूतकाळाला विसरललेच बरे, परंतु ज्ञानाशिवाय जगाची विस्मृती होत नाही.

ही जी आठवण येते ती राग-द्वेषाच्या कारणामुळे येत असते. ज्याला ज्या वस्तूवर जितका राग असतो तितकी ती वस्तू त्याला आठवत राहते. आणि द्वेष असेल तरी पण ती वस्तू वारंवार आठवत राहते. सून सासूला विसरण्यासाठी माहेरी जाते, तरी पण ती सासूला विसरु शकत नाही, कारण सासूवर द्वेष आहे, ती आवडत नाही. पण तिला नवऱ्याची आठवण मात्र सतत येत राहते. कारण नवऱ्याने सुख दिले आहे म्हणून राग (आसक्ति, मोह) आहे. ज्याने जास्त दु:ख दिले असेल किंवा जास्त सुख दिले असेल त्याचीच आठवण येते; कारण राग-द्वेषाने बांधले गेले आहेत. राग-द्वेषाचे बंधन मिटवले की सर्व विस्मृत होते. आपणहूनच विचार येतात त्यास 'आठवण आली' असे म्हणतात. ते सर्व जेव्हा धुतले

जाईल. तेव्हा स्मृती बंद होते, आणि त्यानंतर मुक्त हास्य उत्पन्न होते. स्मृती म्हणजे ताण राहतो. मन ताणलेले राहते, त्यामुळे मुक्त हास्य उत्पन्न होत नाही. प्रत्येकाच्या आठवणी वेगवेगळ्या असतात. तुला जे आठवते ते दुसऱ्याला आठवत नाही. कारण प्रत्येकाला वेगवेगळ्या जागी राग-द्वेष असतात. स्मृती, ही राग-द्वेषामुळे असते.

**प्रश्नकर्ता :** दादा, स्मृतीला काढावी तर लागेल ना?

**दादाश्री :** स्मृती स्वतःच म्हणते की आम्हाला काढ, धुऊन टाक. जर स्मृती येत नसेल तर मोठी अडचण होईल. ती जर आली नाही तर तुम्ही कुणाला धुवाल? तुम्हाला कसे कळणार की, कुठे राग-द्वेष आहेत? स्मृती येते ती तर निकाल होण्यासाठीच येते, बंधनातून सोडवण्यासाठी येते. स्मृती आल्यावर तुम्ही तिला धुऊन टाकली, साफ करून टाकली तर ती धुतली जाते व विस्मृती होते. आठवण एवढ्यासाठीच येत असते की इथे तुमची ओढ आहे, ती ओढ मिटवून टाका, त्याचा पश्चाताप करा आणि परत असे होणार नाही असा दृढ निश्चय करा. एवढे केल्याने ती पुसली जाते, आणि मग विस्मृत होते. जे ज्ञान जग विस्मृत करविते, ते यथार्थ ज्ञान.

## असुविधेत सुविधा

भगवतांनी सांगितले होते की, असुविधेत सुविधा शोधून काढ. असुविधेतच सुविधा असते, पण ती शोधता येईल तर ना?

सोफा पाच वर्ष जुना झाला की मालकाला त्याची अडचण वाटते, जुन्या टाईपचा झाला असे वाटते. ही तर सुविधेत सुद्धा असुविधा उभी केली. आजकाल तर इझी चेयरमध्ये बसून सुद्धा अनइझी होतात. अरे मूर्खा, संपूर्ण आयुष्यात एकदाच अनइझी व्हायचे असते, तिथे हा तर दिवसभर अनइझी राहतो. दिवसभर बेचैन राहतो! या मुंबईत तर सुख खच्चून भरलेले आहे, पण हा संपूर्ण दिवस दुःखातच घालवतो. जर नवीन सोफ्याचे पाय पाचच दिवसात तुटले, तर ती असुविधा म्हणायची. पण ही तर नवीन सोफ्याच्या सुविधेत असुविधा उत्पन्न केली! शेजाऱ्याने

नवीन सोफा सेट आणला, तर सहा महिने नवऱ्याबरोबर कटकट करून शेवटी पैसे उधार घेऊन बायकोने नवीन सोफा सेट आणला. पण तो जेव्हा तुटला तेव्हा तिचा जीव जळला. अरे, जीव काय जाळायचा असतो? कापड जळाले तर हरकत नाही पण जीव जाळायचा नसतो. आपण कुणाची नक्कल करू नये. जो बेअक्कल असतो तोच नक्कल करतो आणि दु:खी होतो. आजकाल कुणाकडे सोफासेट नाही? आणि त्यांनी केले म्हणून काय आपणही करावे? आपण तर नक्कल नव्हे पण अस्सल असावे. घरात, बैठकीत अस्सल भारतीय बैठक करावी, गादी, उशी आणि स्वच्छ शुभ्र चादर, म्हणजे मग कुणाचीही नक्कल करावी लागणार नाही आणि बसायला पण किती सोईचे! खरे तर किती गोष्टी असाव्यात? तर खाण्या-पिण्याचे, कपडा-लत्ता आणि राहण्यासाठी घर. तिथे आज तर नवीन दु:खे उभी करतात. वास्तवात या जगात दु:ख नावालाही नाही. पण इथे तर समजच नसल्यामुळे दु:खं उत्पन्न केली जातात.

शेजारी आज आपल्याला बोलवेल आणि उद्या नाही सुद्धा बोलवणार. आणि जरी रोजच बोलवले तरी त्यात कसली सुविधा? बोलावले तर वाटते त्याला माझी किंमत आहे म्हणून चांगले वाटते. आणि नाही बोलावले तर वाईट वाटते. अरे, मग असेच ठरव ना की, बोलावले तरी ठीक आणि नाही बोलावले तरी ठीक.

स्वत:जवळ तर सुख खच्चून भरलेले आहे पण ते कसे बाहेर काढायचे हेच माहीत नाही. एकाच प्रकारचे सुख, एकाच प्रकारचा माल आहे, पण इथे तर समाजाने त्याचे स्तर केले. वास्तविकता समजल्यानंतर सुख प्राप्त होते. कुठवर या कल्पित सुखात राहायचे? पण काय करणार? फसलो रे बाबा फसलो, आता काय करावे? ही कशासारखी गोष्ट आहे ते मी तुम्हाला सांगतो.

एक वाणी होता. त्याची एका मियाँभाईशी मैत्री होती. फार घट्ट मैत्री होती. एकदा मोहोरमच्या वेळी तो वाणी आणि मियाँभाई हिंडायला निघाले. रस्त्याने ताबूत निघाला होता. मियाँभाईंना तर ताबूत पाहताच

मनात केव्हा त्यांच्यात मिसळू असे झाले व तो काहीही केल्या स्वत:ला रोखू शकला नाही, आणि वाण्याला म्हणाला की, मी आत्ताच, दोन मिनिटातच येतो. असे म्हणून तो त्या टोळीत शिरला आणि 'हौसे, हौसे....' करू लागला. दोन मिनिटे झाली, दहा मिनिटे झाली, अर्धा तास झाला पण मियाँभाई तर बाहेर निघण्याचे नावच घेईना. त्यात अगदी रमूनच गेला. वाणी मियाँभाईला पाच-पाच मिनिटांनी सांगत होता की, 'बाबा, चल आता, निघ बाहेर!' परंतु मियाँभाई तर 'हौसे, हौसे' करतच राहिले. शेवटी एक तास झाला तेव्हा वाण्याने मियाँभाईचा हात धरुन त्याला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला परंतु मियाँभाईंनी तर उलट वाण्यालाच टोळीत खेचून घेतले आणि त्याला सांगितले की दोनच मिनिट 'हौसे, हौसे...' करू या. नंतर आपण दोघेही निघून जाऊ. सर्व जण 'हौसे हौसे' बोलत होते आणि वाणी तर हिरमुसल्या तोंडाने बोलत होता, 'फसलो रे, बाबा, फसलो!'

असे आहे हे जग! इथे एकदा फसल्यानंतर बाहेर निघणे फार कठीण. ते तर ज्ञानी पुरुष भेटले आणि त्यांनी हात ओढून बाहेर काढले तरच निघणे शक्य आहे. या भ्रांतीच्या फसवणुकीतून तर भ्रांती निघाल्यावरच सुटणे शक्य आहे. पण ही भ्रांती निघेल कशी? तर जेव्हा ज्ञानी पुरुष गदगदा हलवून जागे करतील तेव्हाच भ्रांती निघेल, त्यांच्याशिवाय इतर कुणाचेही हे काम नाही. एरव्ही तर जसजसे सुटण्याचा प्रयत्न कराल तसतसे अधिकच फसत जाल.

## चार्ज आणि डिस्चार्ज

दर्शन मोह हा चार्ज मोह आणि चारित्र्य मोह हा डिस्चार्ज मोह. पाणी हे दर्शन मोह आणि बर्फ हा चारित्र्य मोह, चार्ज कशामुळे होते?

चेतनाने जडाला स्पर्श केला की स्वत:च्या स्वरूपाचे भान हरपते आणि त्यामुळे (कर्म) चार्ज होते. ज्याची ज्याची फार आठवण येते त्यात तन्मयाकार होतो, त्यामुळे चार्ज होत राहते. आठवण कशाची येते? तर ज्याच्यावर जास्त राग (आसक्ती, मोह) असेल किंवा जास्त द्वेष

असेल त्याची. जे डिस्चार्ज होत आहे त्यावर राग–द्वेष करतो, तेव्हा आत्म्याची स्वाभाविक कल्पशक्ती विभाविकपणे विकल्प होऊन त्यात मिसळते, त्यामुळे चार्ज होत राहते. अशा प्रकारे संसारक्रम चालतच राहतो. चुकीमुळे चार्ज झालेले आहे, भ्रांतीने भरलेले आहे, ते डिस्चार्ज होत राहते.

रस्त्याने जातांना चंदनने दुकानात साडी पाहिली आणि त्यात तन्मयाकार झाली. दुकानात साडी पाहिली त्याला हरकत नाही पण साडीचा मोह उत्पन्न झाला, तिथेच अडचण आहे. साडी पाहिली आणि आवडली तो डिस्चार्ज मोह आहे पण त्यात चंदन अशी तन्मयाकार होते की ज्या मोहाचा डिस्चार्ज होत होता, तो परत चार्ज झाला. चंदन साडीत अशी तन्मयाकार होते की, साडी सव्वा सहा मीटरची असेल तर चंदन सुद्धा सव्वा सहा मीटरची होते! साडे तीन मीटर रुंद असेल तर ती पण साडे तीन मीटर रुंद होते! आणि त्या साडीच्या डिजाईनमध्ये जितकी फुले असतील किंवा टिकल्या असतील तितक्या चंदनवर पण होतात. त्यातच प्रतिष्ठित आत्मा रमत राहतो. म्हणून चंदन तर घरी येते पण तिचे चित्त मात्र तिथल्या तिथेच, दुकानाच्या साडीतच असते. नवरा सुद्धा तिला विचारतो, अग का? आज तुला बरे वाटत नाही का? तुझा चेहरा का उतरला आहे? त्या बिचाऱ्याला कसे कळेल की हे जे घरात हिंडत–फिरत आहे, ते तर फक्त शरीरच आहे, चंदनचे चित्त तर दुकानातल्या साडीतच आहे! यालाच भगवंतांनी 'चार्ज मोह' म्हटला आहे.

चविष्ट भजी आणि उत्तम पुरणपोळी मिळाली आणि ती खाल्ली त्यास हरकत नाही पण जर त्यात स्वाद राहिला तर चार्ज होतो. तन्मयाकार होऊन भजी आणि पुरणपोळी खाल्ली म्हणजे भजी आणि पुरणपोळी सारखाच होऊन जातो. आणि पुन्हा मोह चार्ज करतो.

धंदा करत आहे तो डिस्चार्ज होत आहे. पूर्वी चार्ज केले होते म्हणून धंदा सुरू केला आणि सुरू केला तेव्हापासूनच डिस्चार्ज सुरू होतो, त्यात तन्मयाकार झाल्याने पुन्हा चार्ज होते.

जन्मापासून मृत्यूपर्यंत सर्वच डिस्चार्ज होत आहे. आजचा मनुष्यजन्म

हा डिस्चार्ज आहे. मागच्या जन्मी मनुष्य व्हायचे चार्ज केले होते, ते आता डिस्चार्ज होत आहे. डिस्चार्जची तर भगवंतांनाही हरकत नाही, परंतु डिस्चार्जच्या वेळी तुझे ध्यान कुठे वर्तत आहे त्याची किंमत आहे. भगवंतांचे दर्शन घेण्यासाठी देवळात गेला आणि भगवंतांच्या मूर्तीचे दर्शन केले त्याचबरोबर बाहेर काढलेल्या चपलांचाही फोटो काढला (माझ्या चपला सुरक्षित आहेत ना?) त्याने दर्शन केले तो डिस्चार्ज झाला आणि चपलांचा फोटो काढला ते चार्ज झाले.

पाणी प्यायला हे चार्ज केले म्हणायचे. कारण तो स्वत:ला कर्ता मानत आहे. मग त्या पाण्याची लघवी होते. ती जेव्हा बाहेर पडते ते डिस्चार्ज.

माणूस खाजवत असतो ते डिस्चार्ज आहे. परंतु खाजवताना त्याला आनंद वाटतो. देहाच्या ज्या स्थूल क्रिया आहेत त्या डिस्चार्ज स्वरूप असतात, त्यात आनंद घेण्यासारखेही नाही आणि शोक करण्यासारखेही नाही. आनंद वाटतो तो 'प्रतिष्ठित आत्म्याला' वाटतो. त्याला जाणणारा स्वत: 'शुद्धात्मा' आहे, त्याला समजते की खाजवल्यावर आग व्हायला लागली की समजेल. पण जर त्या आनंदात तन्मयाकार झाला तर पुन्हा चार्ज होते. डिस्चार्ज मोह खपला जात आहे पण हा त्यात तन्मयाकार होऊन पुढच्या जन्मासाठी पुन्हा चार्ज करतो. मनुष्यपणा चार्ज करायला जातो पण होतो गाढव! असे ठावठिकाणा नसलेले आहे हे सर्व! हिताहिताचे भानच नाही त्यामुळे करायला जातो एक आणि होते दुसरेच! लोकनिंद्य कार्य होत असेल, तेव्हा मन-वचन-कायेला बजावून सांगावे व त्यांना परत वळवावे. परंतु लोकमान्य असेल तर काही हरकत नाही. लोकांना मान्य नसेल तर तिथे उपाय करावा लागतो. मेकॅनिकल 'मी'ला कंट्रोलमध्ये ठेवण्याची सत्ता मूळ 'मी'मध्ये (मूळ आत्म्यात) नाही. इंजिन चालू झाल्यानंतर बंद करण्याची सत्ता राहत नाही. एकदा चार्ज झाल्यानंतर डिस्चार्ज होणारच, त्यात तर भगवंताचीही सत्ता नव्हती. डिस्चार्जमध्ये तर बॅटरी जशी चार्ज झाली असेल तशीच डिस्चार्ज होईल. मूळ स्वरुपात 'मी'ला (मूळ आत्म्याला) जाणल्यानंतर नवीन बॅटरी चार्ज

होत नाही. चार्ज होणे बंद होते. स्वरूपाचे ज्ञान प्राप्त झाल्यानंतर डिस्चार्जमध्ये ढवळाढवळ नसते. पण बरेचसे तर पुरुषार्थामुळेच संपून जाते.

चार्जेबल मोह चार्ज होत असतो, पूरण होत असतो. 1 अंश, 2 अंश, 3 अंश, अशा प्रकारे पूरण होत होत 500 पर्यंत पोहोचतो. आता हा डिस्चार्ज मोह कसा असतो की आधी एकदम 500 वर जाईल. उदाहरणार्थ, क्रोध 500 डिग्रीचा येतो मग 450 वर येतो, मग 400 वर येतो आणि शेवटी 1 वर येतो आणि त्यानंतर संपतो. पूर्णपणे डिस्चार्ज होतो. प्रत्येक वस्तू डिस्चार्जमध्ये फार मोठ्या प्रमाणात येते, नंतर हळूहळू प्रमाण कमी होत जाते. क्रोध आधी 500 वर येतो आणि एकदम धमाका करतो. 500 पासून सुरू होऊन मग हळूहळू संपत जातो.

रस्त्याने जाताना रुची-अरूची उत्पन्न होईल असे घडते. आपली इच्छा नसताना सुद्धा रुची-अरुची होत राहते, पण ही रुची कशामुळे होते आणि अरुची कशामुळे होते? याचा कोणी विचारच करत नाही. तुझी तशी इच्छा नसली तरी पण त्यात काही बदल होऊ शकत नाही. ही तुझ्या इच्छेची गोष्ट नाही. जन्म झाला तेव्हापासून मन-वचन-कायेच्या तिन्ही बॅटऱ्या डिस्चार्ज होत राहतात. कारण पूर्वी चार्ज केलेले आहे म्हणून. डिस्चार्ज होते तेव्हा कळते की उलटे चार्ज केले होते. म्हणून आता सुलट चार्ज केले तर आयुष्य सुलट व्यतीत होईल. बाकी, आत्ताची सर्व फिल्म तर तयार झालेलीच आहे. तेव्हा आता जी भूमिका साजरी करायची आहे ती साजरी करा. आत्ता जी फिल्म पडद्यावर दिसत आहे त्याचे शूटिंग तर पूर्वी कधीच झालेले आहे पण आज तो त्या फिल्मला पडद्यावर पाहत आहे. म्हणून त्यात जेव्हा नावडते (दृश्य) येते तेव्हा म्हणतो की, फिल्म कट करा, कट करा. तर शहाण्या, आत्ता कशी कट होणार? ते तर जेव्हा शूटिंग करत होतास, चार्ज करत होतास तेव्हाच विचार करायचा होता ना! आत्ता तर कोणी बापही त्यास बदलू शकणार नाही. तेव्हा आता राग-द्वेष न करता मुकाट्याने फिल्म पूर्ण करून टाक.

संपूर्ण जगत चार्जलाच वश झालेले आहे.

रुची–अरुची, आवड–नावड हा सर्व आता डिस्चार्ज मोह आहे आणि राग–द्वेष चार्ज मोह आहे. चार्ज हे भगवंताच्या आज्ञेविरुद्ध आहे. डिस्चार्ज हे भगवंताच्या आज्ञेविरुद्ध नाही.

लोक डिस्चार्ज मोहाची पाने कापतच राहतात आणि चार्ज मोह तर चालूच आहे, तर केव्हा पार येईल? कित्येक तर फांद्या कापत राहतात, कित्येक झाडाचे खोड पूर्णपणे कापून टाकतात, परंतु जोपर्यंत मुख्य मूळ आहे तोपर्यंत ते पुन्हा वाढणार. लोकांनी या संसार–वृक्षाला निर्मूळ करण्यासाठी कितीही प्रयत्न केले, तरी पण त्यातून काहीही निष्पन्न होत नाही. हे तर ज्ञानी पुरुषांचेच काम आहे. ज्ञानी पुरुष झाडाच्या पानांना हात सुद्धा लावत नाहीत तसेच फांद्याना किंवा खोडालाही शिवत नाहीत. अरे, छोट्या छोट्या असंख्य मुळांना सुद्धा शिवत नाहीत. ते तर वृक्षाच्या मुख्य मुळाला जाणतात आणि ओळखतात. त्या मुख्य मुळातच चिमुटभर औषध टाकतात, त्यामुळे संपूर्ण वृक्षच सुकून जातो!

ज्ञानी पुरुष दुसरे काहीच करत नाहीत. ते फक्त तुमच्या चार्ज बॅटरीला सरकवून आठ फूट लांब ठेवून देतात, ज्यामुळे परत चार्जच होत नाही. तुमचे चार्जिंग पॉइंट पूर्णपणे उडवून टाकतात.

बाकी, कोणताही उपाय केला, पण जोपर्यंत चार्ज बंद होत नाही तोपर्यंत मोह सुटत नाही. मग तू वाटेल त्याचा त्याग करशील, काहीही करशील, किंवा उलटा लटकशील तरी पण मोह सुटणार नाही. उलट जास्त फसशील. पन्नास प्रकारचे मोह (पंचवीस चार्ज आणि पंचवीस डिस्चार्ज) जातील तेव्हा सुटका होईल.

'मी हे केले' असे म्हटले की चार्ज झाले! मी दर्शन केले, प्रतिक्रमण केले, सामायिक केले, असे म्हटले की चार्ज झाले. नाटकीय भाषेत बोलला तर हरकत नाही पण निश्चयाने बोलला की मग त्याची नशा चढते. त्यामुळे डिस्चार्ज होते वेळी नवीन कर्मही चार्ज होते. चार्ज आपल्या हातात आहे, डिस्चार्ज आपल्या हाती नाही. फक्त एक मोक्षाचीच इच्छा करण्यासारखी आहे, तर मोक्षमार्ग सापडेल. मोक्षाचीच इच्छा चार्ज कर की!

पाहण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे परंतु चिंतन करण्याचा नाही, त्यात तन्मय होण्याचा अधिकार नाही. तसे तर ज्ञानी पुरुष सुद्धा पाहतात, पण चिंतनात फरक आहे. या मोहमयी नगरीत (मुंबईत) सर्वजण हिंडतात आणि ज्ञानी पुरुष सुद्धा हिंडतात पण कोणत्याही वस्तूत त्यांचे चिंतन नसते! त्यांचे चित्त कुठेही जात नाही.

भावकर्म ही चार्ज बॅटरी आहे. ती आत्म्याच्या अत्यंत निकट असल्यामुळे निरंतर चार्ज होत राहते. त्या बॅटरीचे चार्जिंग होणे आम्ही बंद करून टाकले आहे. त्यामुळे महात्म्यांना आता डिस्चार्ज बॅटरीच राहिली. आता तर ज्या भावाने डिस्चार्ज व्हायचे असेल त्या भावाने होऊ दे. 'आम्ही' त्यास पाहू. मन पुढे-मागे होत असेल, तर त्यास जाणायचे आणि सरळ असेल त्यास जाणायचे. म्हणजे मग चार्ज होणार नाही. आता तर जे यायचे असेल ते येवो. हे असले तरी ठीक, आणि नसले तरी ठीक आहे.

'भाव कर्म हीच चार्ज बॅटरी आहे.' या पाच शब्दात भगवंताचे सर्व पंचेचाळीस आगम सामावले! बाकी, एक एक मोह काढायला लाख लाख जन्म जातील!

**प्रश्नकर्ता :** कल्पना आणि इच्छा, यात नेमका काय फरक आहे?

**दादाश्री :** कल्पना ही मूळ स्वरुपाच्या अज्ञानतेमुळे उत्पन्न होते आणि इच्छा डिस्चार्जमुळे होत असते. परंतु मूळ इच्छा जी उत्पन्न होते ती कल्पनेतून उत्पन्न होते. असे आहे की आकाशातून पाणी पडत राहते, आकाश आपल्या जागेवरच आहे, वारा फिरत राहतो, आणि वरचे पाणी खालच्या पाण्यात पडते, तेव्हा बुडबुडे होतात. तर हा पाऊस पडतो त्यात कुणाचीच इच्छा नाही, हवेचीही इच्छा नाही किंवा पाण्याचीही इच्छा नाही. असे आहे हे सर्व!

**प्रश्नकर्ता :** चार्ज झाले की डिस्चार्ज झाले, हे कसे लक्षात येईल?

**दादाश्री :** 'मी चंदुलाल आहे' असे भान होते तेव्हापासून चार्ज

झाले. ‘मी शुद्धात्मा आहे’ असे भान राहिले तर काहीच चार्ज होणार नाही, परंतु त्यात जर अजागृत राहिला तर चार्ज होईल. पण असे कोण करणार? जितकी जितकी चार्जची लक्षणे दिसत आहेत, ते सर्व डिस्चार्ज आहे. चार्ज होत आहे की डिस्चार्ज होत आहे, हे कळत नाही. ते जर कळले असते तर सगळ्यांनीच चार्ज करणे बंद केले असते. हे तर ज्ञानी पुरुषाशिवाय कुणीही त्याचे स्पष्टीकरण देऊ शकत नाही. स्वत: ‘शुद्धात्मा’ आहे, त्यामुळे सर्व डिस्चार्जच आहे. जर चंदुलाल झाला तर चार्ज आहे. जेव्हा डिस्चार्ज होत असते तेव्हा जुन्या बॅटरीचा परिणाम सहन होत नाही, म्हणून त्या परिणामामुळेच नवीन बॅटरी चार्ज होत राहते.

चार्ज व्हायचे सुरू झाले की मग चिंता सुरू होते. आत जळजळ होते. अग्नि पेटण्याचे सुरू होते. आकुळता आणि व्याकुळता वाटत राहते. त्याउलट नुसत्या डिस्चार्जमध्ये तसे घडत नाही. निराकुळता असते, कारण त्यात तन्मयाकार झालेला नसतो.

भगवंत म्हणतात की, ‘जर डिस्चार्ज होत असेल तर ती आमची जबाबदारी आहे, परंतु चार्ज होऊ देऊ नकोस.’ या दोन वाक्यातच जगातील सर्व शास्त्रांचे ज्ञान सामावलेले आहे.

चार्ज बंद झाले म्हणजे डिस्चार्ज बंदच झाले म्हणायचे. मोह, जो चार्ज केला, ती प्रोमिसरी नोट आहे आणि जो डिस्चार्ज केला, ती कॅश इन हॅन्ड आहे.

जा, ‘आम्ही’ तुला गॅरंटी देत आहोत की, ‘दादा भगवान’ भेटल्यानंतर तुझे चार्ज होणार नाही!

## मोहाचे स्वरूप

मोहाचे मुख्य दोन प्रकार आहेत.

दर्शन मोह, म्हणजे चार्ज मोह आणि चारित्र्य मोह, म्हणजे डिस्चार्ज मोह.

दर्शनमोह रुचीवर आधारीत असतो, अर्थात रुची कुठे आहे, त्यावर आधारीत असतो. संसारातील विनाशी वस्तूंवरच रुची असेल, तर तो मिथ्यात्व मोह.

आत्मा जाणण्याची रुची, आणि त्याचबरोबर संसारातील विनाशी वस्तुंची सुद्धा रुची असेल, तर तो मिश्र मोह. हेही सत्य आहे आणि तेही सत्य आहे, असे वाटते, तो मिश्र मोह.

आत्मा जाणून घेण्याची उत्कंठा असेल आणि हेच सत्य आहे असे ठामपणे मानतो, तो समकित मोह. आत्म्यात आत्मबुद्धी होणे, त्याचे नाव समकित. आत्म्यात आत्मरुप होणे त्याचे नाव ज्ञान.

ज्ञान आणि ज्ञानीवरचा मोह, हा अंतिम मोह आहे. त्यास सम्यक् मोह म्हणतात, आणि अन्य सर्व मोह मिथ्या मोह आहेत.

जसे आहे तसे दर्शनात येत नाही ते दर्शनमोहामुळे. दर्शनाच्या आवरणामुळे 'मी चंदुलाल आहे' असे दिसते.

हे जग कोणत्या आधारावर टिकून राहिले आहे ? तर दर्शनमोहामुळे. भगवंत म्हणतात की, चारित्र्यमोहाची आम्हाला हरकत नाही, तो निघत असलेला डिस्चार्ज मोह आहे. अज्ञानीचाही भरलेला मालच निघत असतो, पण तो परत 'मी चंदुलाल आहे' असे म्हणतो, त्यामुळे नवीन माल भरत राहतो.

मन-वचन-कायेच्या योगांचे मूर्छित प्रवर्तन, हा चारित्र्यमोह आहे. 'मी करत आहे' आणि 'माझे आहे,' असे प्रवर्तन तोच चारित्र्य मोह आहे. भगवंत म्हणतात तशी चारित्र्यमोहाची यथार्थ समज समजून घेण्यासारखी आहे. 'मी सामायिक करत आहे' असे जे भान आहे तो चारित्र्यमोह.

सामायिक, प्रतिक्रमण किंवा संसारातील कुठल्याही क्रियेत कर्ताभाव, तो चारित्र्यमोह आणि रुचीभाव तो दर्शन मोह.

चारित्र्यमोह म्हणजे परिणमित झालेला मोह. जो फळ देण्यासाठी

सन्मुख झाला असेल तो चारित्र्य मोह, म्हणजेच डिस्चार्ज मोह. जो मोह चार्ज होत राहतो तो दर्शनमोह आणि डिस्चार्ज होत राहतो तो चारित्र्यमोह.

डिस्चार्ज मोह वाट चुकवतो.

आत्म्याच्या हजेरीत पुद्‌गलामध्ये चेतनभाव चार्ज होतो आणि तोच परत डिस्चार्ज होतो. पुद्‌गल चेतनच्या संसर्गात आल्यामुळे त्यात चेतन चार्ज होते! परंतु त्यात चेतनाचे काहीच जात नाही. या शरीरातून डिस्चार्ज होत असलेली प्रत्येक वस्तू अनुभवात येत असलेली पाहायला मिळते. म्हणून (पूर्वी) चार्ज झालेले होते असे आम्ही म्हणतो. गलनचा अर्थच डिस्चार्ज आहे. आम्ही त्यास भावाभाव म्हणतो. त्यात चेतन नसते.

एका माणसाला आयुष्यभर जेलमध्येच बसून राहायचे झाले आणि त्याला तिथे खायला मिळते, पण जिलेबी-लाडू मिळत नाही, त्यामुळे काय त्याचा मोह कमी झाला किंवा निघून गेला? नाही, आत मोह तर असतोच. मिळत नाही, म्हणून मोह गेला असे म्हणता येणार नाही.

**प्रश्नकर्ता :** दादा, माझ्यात मोह जास्त असेल आणि इतरांच्यात कमी असेल?

**दादाश्री :** एक इवलेसे मोहाचे बीज असेल, ते जेव्हा व्यक्त होते तेव्हा संपूर्ण जगात व्याप्त होत असते. त्यामुळे कमी असो किंवा जास्त, त्यात काही फरक नाही. जेव्हा संपूर्ण मोह क्षय होतो तेव्हाच काम होते.

भगवंत आणि सत्पुरुषांच्या सत्संगाचा मोह आहे, तो प्रशस्त मोह, आणि प्रशस्त मोहामुळे मोक्ष.

मोहाचे तर अनंत प्रकार आहेत. त्याचा अंतच नाही. एक मोह सोडण्यासाठी तर लाख जन्म घ्यावे लागतात. मनुष्यजन्म हे तर मोहाचे संग्रहस्थानच आहे! 'स्वरूपज्ञानाशिवाय मोह निघेल असा नाही.'

## माया

**प्रश्नकर्ता :** मायेच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी काय करावे?

**दादाश्री :** अज्ञान हीच माया आहे. स्वतःच्या निज स्वरूपाचे अज्ञान म्हणजेच माया आणि ती माया तर मुका मार मारते. या जगात कोणीही *उपरी* (वरिष्ठच) नाही. मायेमुळेच वरिष्ठपणा जाणवतो.

माया काय आहे? भगवंतांचे रिलेटिव्ह स्वरूप तीच माया आहे. ही माया आम्हाला फसवते असे लोक म्हणतात, तर ते काय आहे? हे सर्व कोण चालवत आहे? हे जाणत नसल्यामुळे, 'मी चालवत आहे' असेच मानतो. हीच माया आहे आणि मग त्यात फसतो.

या जगात जर कुणी कच्ची माया नसेल तर तो देवच आहे! कच्चे सर्व मार खातच राहतात, देवाच्या मायेचाच तर! हा मार अनहद आहे की बेहद आहे, हे सांगता येत नाही, पण हा मारच त्यांना मोक्षाला जाण्याची प्रेरणा देईल.

स्वतः स्वतःला ओळखत नाही हीच तर सर्वात मोठी माया आहे. अज्ञान दूर झाले की माया गेली.

जिथे जी वस्तू नाही, तिथे त्या वस्तूचा विकल्प होतो, त्याचेच नाव माया.

आमच्या उपस्थितीत तुमची माया टिकत नाही. ती बाहेरच थांबते. ते कुठपर्यंत की तुम्ही आमच्या उपस्थितीतून बाहेर निघालात की तुमची माया तुम्हाला घेरेल! हो, आमच्याकडून एकदा 'स्वरूप ज्ञान' घेऊन जा, त्यानंतर तुम्ही कुठेही गेलात तरी माया तुम्हाला शिवणारही नाही!

भगवंत म्हणतात की हे सर्व नाटकीय आहे. तू त्यात नाटकीय होऊ नकोस, शहाण्या! मुळात मनाचीच भानगड आहे, म्हणून लोक मनाच्या मागे लागले आहेत पण मन काही त्रास देत नाही, मनामागे माया आहे, ती त्रास देते. माया जर गेली तर मन सुंदर ॲन्डलेस फिल्म आहे! कित्येकांनी संसाराची माया सोडून त्यागीपणा स्वीकारला, तर

काय त्यांची माया निघून गेली? नाही. उलट डबल माया चिकटली आहे! माया सोडली असे केव्हा म्हणता येईल? तर संसार वैभव उपभोगत असताना सोडली, तर त्यास माया सोडली, असे म्हणता येईल. इथे तर बायका–मुलांना सोडले आणि सोबत अज्ञानाचे गाठोडे बांधले. त्यास माया सोडली असे कसे म्हणता येईल?

कुठेही गेलास पण 'तुझे–माझे' गेले नाही आणि 'मी' गेला नाही, तर तुझी माया आणि ममता सोबतच राहणार!

एक गृहस्थ माझ्याकडे आला आणि खूप रडू लागला. तो म्हणाला, 'आता तर जगणे फारच कठीण वाटते, मला आत्महत्या करावीशी वाटते.' मला हे माहीत होते की या माणसाची बायको साधारण पंधरा दिवसांपूर्वी मृत्यू पावली होती आणि माघारी चार मुलांना सोडून गेली होती. तर मी त्याला विचारले, 'बाबा, तुझ्या लग्नाला किती वर्ष झाली?' तो म्हणाला, 'दहा वर्ष'. तर दहा वर्षांपूर्वी तू जेव्हा तिला पाहिले नव्हते तेव्हा तिचा मृत्यू झाला असता तर तू रडला असतास का? तर म्हणे 'नाही,' तेव्हा कसा रडेन? तेव्हा तर मी तिला ओळखत नव्हतो! मग आता तू कशासाठी रडतोस हे मी तुला समजावून सांगतो. हे बघ, तू जेव्हा लग्न करायला गेलास, वाजत–गाजत गेलास आणि जेव्हा सप्तपदीचे पाऊल टाकत होतास तेव्हापासून 'ही माझी बायको, ही माझी बायको' असे वेढे घेतलेस. लग्न मंडपात तिला पाहत राहिलास आणि 'ही माझी बायको' असे मनात बोलत बोलत ममतेचे वेढे घालत राहिलास. बायको जर खूप चांगली निघाली तर रेशमाचे वेढे आणि जर वाईट निघाली तर सुताचे वेढे. तुला जर यातून सुटायचे असेल तर जितके वेढे 'माझी, माझी'चे घेतले होतेस तितकेच 'माझी नव्हे, माझी नव्हे' असे म्हणत म्हणत उलगडून टाक, तरच या ममतेतून सुटता येईल.

माझी ही गोष्ट ठामपणे त्याच्या लक्षात आली आणि त्याने तर 'माझी नव्हे, माझी नव्हे'चे हँडल असे फिरवले, असे फिरवले की त्याचे सर्व वेढे उलगडले. मग पंधरा दिवसानंतर तो परत माझ्याकडे आला आणि आनंदाश्रूंसहित माझ्या पाया पडला आणि सांगू लागला,

'दादा, तुम्ही मला वाचवले. माझ्या ममतेचे सर्व वेढे उलगडण्याचा मार्ग दाखवला, त्यामुळे मी सुटलो.'

माझी ही सत्य घटना ऐकून तर कित्येकांचे वेढे उलगडले गेले आहेत.

## क्रोध

जगात कुणीही क्रोध जिंकू शकत नाही. क्रोधाचे दोन भाग, एक, कढापा (बाहेरून दिसणारा क्रोध) आणि दुसरा अजंपा (आतल्या आत होणारा क्रोध). जी माणसे क्रोध जिंकतात, ती क्रोधाच्या बाह्यरूपाला जिंकतात. त्यात असे घडते की एकाला दाबले तर दुसरा वाढतो. जर म्हणाला की मी क्रोध जिंकला आहे तर मग मान वाढतो. खरे तर क्रोध संपूर्णपणे जिंकता येत नाही. हे तर बाहेर दिसणाऱ्या दृश्यमान क्रोधाला जिंकला म्हणायचे. क्रोध हा तर अग्निसारखा आहे. स्वत: जळतो आणि समोरच्याला सुद्धा जाळतो.

जिथे क्रोध येत असेल तिथे क्रोध करत नाही, ते शुभ चारित्र्य म्हणायचे. शुभ चारित्र्यामुळे संसार मार्ग सुधारतो, परंतु मोक्ष तर शुद्ध चारित्र्यानेच होतो.

क्रोध म्हणजे उग्र परमाणू. फटाक्यांमध्ये दारु भरलेली असते ती फुटते तेव्हा अग्नि पेट घेतो आणि आतील सर्व दारु संपल्यावर फटाका आपोआप शांत होतो. तसेच क्रोधाचेही आहे. क्रोध म्हणजे उग्र परमाणू, तो जेव्हा 'व्यवस्थित शक्तीच्या' नियमानुसार फुटतो तेव्हा सगळीकडून जळतो. उग्रता राहते त्यास आम्ही क्रोध म्हणत नाही, क्रोधात तंत (सातत्य) राहिला तरच त्यास क्रोध म्हणता येईल. क्रोध तर केव्हा म्हणता येईल की आत्म्याची लाही लाही होते. लाही झाल्यामुळे दुसऱ्यांवर सुद्धा त्याचा परिणाम होतो. त्यास कढापा (दृष्यमान क्रोध) म्हणतात आणि अजंपारूपात तर स्वत: एकटाच आतल्या आत जळत राहतो, परंतु तंत तर दोन्हीही रूपात असतो. उग्रता ही वेगळी गोष्टी आहे, क्रोधात तंत असेल तरच त्यास क्रोध म्हणतात. उदाहरणार्थ, नवरा-बायकोचे

रात्री खूप जोराचे भांडण झाले, क्रोध जबरदस्त भडकला, दोघेही रात्रभर झोपू शकले नाहीत. आणि सकाळी बायकोने चहाचा कप जरा आपटूनच ठेवला. तर नवऱ्याला लगेच कळते की अजून तंत आहे. (राग गेलेला नाही.) याला म्हणतात क्रोध. मग तंत कितीही वेळेसाठी असो! अरे, कित्येकांना आयुष्यभरासाठी तंत असतो! बाप मुलाचे तोंड बघत नाही आणि मुलगा बापाचे तोंड बघत नाही! क्रोधाचा तंत तर बिघडलेल्या तोंडावरूनच कळतो.

## लोभ

क्रोध-मान-माया-लोभ, यात लोभाचा तंत भारी असतो. लोभ म्हणजे काही तरी इच्छा ठेवावी. लोभ्याला कोणी खडसावले तरी तो हसतो. ज्ञानी सुद्धा हसतात पण लोभी लोभाची गाठ जास्त मोठी करून हसतो!

शेठ दुकानात बसला असेल आणि कुणी ग्राहक भांडायला आला की तुम्ही माझ्या मुलाला फसवून आठ आणे जास्त घेतले. तर शेठ गादीवर बसल्या बसल्या हसतच राहतो, पोटाचे पाणी सुद्धा हलत नाही. रस्त्यावर जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांचा जमाव होतो, ते शेठजीची आणि ग्राहकाची अवस्था पाहतात. शेठजींना शांत, गंभीर पाहतात आणि ग्राहकाला बावरलेला, आरडाओरडा करताना पाहतात. तर जमावातील लोक सुद्धा काय म्हणतात की, या माणसाचेच डोके फिरले वाटते! लोक वरून त्यालाच चोप देऊन जातात की मुकाट्याने घरी जा. एवढे मोठे शेठ काय असले काम करतील? आणि शेठ मनातल्या मनात हसत राहतो. ते कशामुळे? कारण त्याचा लोभ त्याला सांगत असतो की, 'हा वेडा तर आरडाओरडा करून निघून जाईल, त्यात माझे काय जाते?' माझ्या खिशात तर आठ आणे आले ना! लोभी खरोखर ज्ञानीसारखाच दिसतो!

तिथे मानीला कोणी झिडकारले तर तो हसत नाही. लगेच त्याचा क्रोध भडकतो. परंतु लोभ्याला मात्र क्रोध येत नाही.

भगवंतांनी सांगितले की, क्रोध आणि मान, यामुळेच लोक दुःखी

होतात. मानामुळे तिरस्कार होतो. मान प्रकट तिरस्कार करतो. क्रोध जळतो आणि जाळतो. भगवंतांची ही वाक्ये ऐकून लोक त्यावर उपाय करायला गेले. क्रोध करू नये, मानी होऊ नये, म्हणून त्रियोग साधना करू लागले. त्रियोग साधनेमुळे क्रोध-मान थोडेसे कमी झाले आणि बुद्धीचा प्रकाश वाढला. बुद्धीचा प्रकाश वाढल्यामुळे लोभाचे रक्षण करण्यासाठी कपट वाढवले. क्रोध आणि मान, हे भोळे असतात. म्हणून कुणी त्याला दाखवणाराही भेटतो, परंतु लोभ आणि कपट हे तर असे आहेत की स्वत:ला सुद्धा कळत नाहीत. एकदा ते शिरले की मग निघायचे नावच घेत नाहीत.

लोभी केव्हा क्रोध करतो? तर अगदी शेवटच्या क्षणी, जेव्हा मोठ्या लोभाचे हनन होत असेल आणि तिथे कपट सुद्धा काम करत नसेल, तेव्हा तो क्रोधाचा आसरा घेतो.

जन्मापासूनच लोभ्याच्या लोभाचा दोर कधी तुटतच नाही. एक क्षण सुद्धा त्याचा लोभ जात नाही. लोभ्याची जागृती निरंतर लोभातच असते. मानी तर बाहेर निघाला की आपल्या मानाच्या ताठातच असतो. रस्त्यात सुद्धा जिथे जाईल तिथे मानातच आणि परत आला तरी मानातच. पण जर कुणी अपमान केला तर मात्र क्रोध करतो.

मोक्षाला जाताना अडवणारे कोण? तर क्रोध-मान-माया-लोभ. लोभाचे रक्षण करण्यासाठी कपट आहे. कापड विकताना बोटभर कापड कापून घेतो. (कमी देतो.) मानाचे रक्षण करण्यासाठी क्रोध आहे. या चारांच्या आधारावर लोक जगत आहेत!

क्रोध-मान-माया-लोभ दोन प्रकारचे आहेत : एक वळवता निवारता येईल असे निवार्य. दुसरे निवारता येत नाही असे अनिवार्य! उदाहरणार्थ, कोणावर क्रोध आला तर त्यास आतल्या आत वळवून शांत करता आले तर तो निवारता येईल, असा क्रोध म्हणायचा. या स्टेजपर्यंत पोहोचला तर व्यवहार फारच सुंदर होईल.

दुसऱ्या प्रकारचा क्रोध म्हणजे त्यास वळवता येत नाही. लाख

प्रयत्न केले तरी फटाका फुटल्याशिवाय राहतच नाही! तो वळवता येत नाही असा अनिवार्य क्रोध. हा क्रोध स्वत:चे अहित करतो आणि समोरच्याचे सुद्धा अहित करतो.

क्रोध-मान, यापेक्षा कपट आणि लोभाच्या गाठी भयंकर असतात. त्या लवकर सुटत नाहीत. लोभाला गुन्हेगार का म्हटले आहे? लोभ केला म्हणजे दुसऱ्यांचे लुटून घेण्याचा विचार केला. पिण्याच्या पाण्याचे सर्व नळ एकाच माणसाने उघडून टाकले तर दुसऱ्यांना पाणी मिळेल का?

## कपट

कपट म्हणजे जसे आहे तसे न बोलणे! कपट मन-वचन आणि काया या तिघांनाही स्पर्श करतो! स्त्री जातीमध्ये कपट आणि मोहाचे परमाणू विशेष प्रमाणात असतात. पुरुष जातीमध्ये क्रोध आणि मानाचे परमाणू विशेष प्रमाणात असतात. जर कपट आणि मोहाचे परमाणू विशेष खेचले गेले, तर पुढचा जन्म स्त्री रूपात येतो आणि क्रोध आणि मानाचे परमाणू विशेष खेचले गेले, तर पुढचा जन्म पुरुष रुपात येतो.

स्त्री जाती भीतीमुळे कपट करते. त्यामुळे फार आवरण येतात. मोहामुळे मूर्च्छा वाढते. पुरुषांमध्ये मान जास्त असतो. मानामुळे जागृती वाढते. जसजसे कपट वाढते तसतसा मोह वाढत जातो.

## क्रोध-मान-माया-लोभाचा आहार

क्रोध-मान-माया-लोभ हे निरंतरपणे स्वत:चेच चोरून खातात, पण लोकांना हे समजत नाही. या चारांना जर तीन वर्ष उपाशी ठेवले तर ते पळ काढतील. पण ते ज्या आहारावर जगत आहेत तो आहार कोणता? हे समजल्याशिवाय ते उपाशी कसे राहतील? हे समजत नसल्यामुळे त्यांना आहार मिळतच राहतो. ते जगतात कसे? आणि ते सुद्धा अनादि काळापासून जगत आहेत! म्हणून आता त्यांचा आहारच बंद करून टाका. असा विचार तर कुणालाही येत नाही आणि सगळेच त्यांना मारहाण करून हाकलून लावण्याचे प्रयत्न करतात. पण तसे काही

हे चारही जाण्यातले नाहीत. हे तर जेव्हा (मृत्यूवेळी) आत्मा बाहेर निघतो तेव्हा सर्व झाडून-पुसून, साफ करून मग निघतो. त्यांना हिंसक माराची गरज नाही. त्यांना तर अहिंसक मार हवा असतो.

आचार्य शिष्याला केव्हा रागवतात? क्रोध येतो तेव्हा. कदाचित त्यावेळी कुणी म्हटले, की, 'महाराज, यांना का रागवता?' तर महाराज म्हणतात, 'त्यांना रागवण्यासारखेच आहे?' बस, झाले मग, असे बोलले म्हणजे क्रोधाला आहार दिला. केलेल्या क्रोधाचे रक्षण करणे हाच त्याचा आहार.

कुणी कंजूस स्वभावाच्या माणसाने तुम्हाला चहाची पुडी आणायला सांगितली आणि तुम्ही 30 पैशाची पुडी आणली, तर तो म्हणेल इतकी महाग आणायची असते का? असे बोलल्यामुळे लोभाचे पोषण होते, आणि जर कुणी ऐंशी पैशांची पुडी घेऊन आला तर उधळपट्टी करणारा माणूस म्हणेल, ही तर चांगली आहे, तर तिथेही उधळपणाचा लोभ पोषला जातो. हा झाला लोभाचा आहार. आपण नॉर्मल राहावे.

आता कपट काय खात असेल? रोज काळाबाजार करत असेल पण कपटाची गोष्ट निघाली तर तो लगेच बोलेल की आम्ही कधी असला काळाबाजार करत नाही. वरुन अशी सावकारी दाखवतो, तोच कपटाचा आहार.

आणि मानाचा आहार काय? चंदुलाल समोर भेटले आणि आपण म्हणालो 'या, या चंदुलाल,' तेव्हा चंदुलालची छाती फुगते, अक्कड होतो आणि खूश होतो, हा मानाचा आहार.

आत्म्याशिवाय सर्वच आहारावर जगतात.

आपण तर या चारांना, क्रोध-मान-माया-लोभ यांना म्हणायचे की या, बसा, पण त्यांना खायला घालायचे नाही.

क्रोध-मान-माया-लोभ हे चारही कशामुळे उत्पन्न होतात? तर स्वत:च्याच प्रतिष्ठेमुळे. ज्ञानी पुरुष त्या प्रतिष्ठेतून उठवून, त्याची

जगतनिष्ठेतून उठवून, त्याला ब्रह्मात, स्वरूपात बसवतात आणि ब्रह्मनिष्ठ बनवितात, तेव्हा या चारहींपासून सुटका होते!

ज्ञानी पुरुष हवे ते करू शकतात! क्रोध-मान-माया-लोभ ह्या तर आत्मा-अनात्म्याला, ज्ञान-अज्ञानाला जोडणाऱ्या कड्या आहेत, साखळ्या आहेत. नाही तर अनासक्त भगवंतांना आसक्ती कुठली?

## होम डिपार्टमेंट : फॉरेन डिपार्टमेंट

परदेशात पेरु किंवा दुसऱ्या कोणत्या देशात वादळ येते किंवा ज्वालामुखी फुटतो, तेव्हा आपल्या देशाचे प्रधानमंत्री मिटिंग बोलवून देशाच्या विदेशमंत्र्याकडून पेरूच्या विदेशमंत्र्यांना आश्वासन पत्र लिहून पाठवतात की, तुमच्या देशात मोठे वादळ आल्यामुळे हजारो लोक मृत्यूमुखी पडले. लाखो माणसे बेघर झाली, हे समजल्यावर आम्हाला अत्यंत दु:ख झाले आहे. आमच्या देशाची प्रजाही शोकाकुल आहे. आमच्या देशाच्या ध्वजा सुद्धा आम्ही खाली उतरवल्या आहेत, तुमच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. इत्यादी इत्यादी. तर एकीकडे असे आश्वासन देणारे पत्र पण लिहिले जाते आणि दुसरीकडे नाश्ता-पाणी, खाणे-पिणे सर्वच चालत असते! हे तर असे आहे की फॉरेन अफेअर्समध्ये (विदेशच्या बाबतीत) सर्व वरकरणी असते. आणि होम अफेअर्समध्ये सावध! फॉरेनची गोष्ट आली म्हणजे वरवरचा शोक व वरवरचे आश्वासन. आत काहीच नसते. आत तर चहा-नाश्ताच चालत असतो. तिथे तर कंप्लीट सुपरफ्ल्युअस राहतात!

तसेच आपल्या आत सुद्धा दोन डिपार्टमेंट आहेत, होम आणि फॉरेन. फॉरेन डिपार्टमेंटमध्ये सुपरफ्लुअस राहण्यासारखे आहे आणि होम डिपार्टमेंटमध्ये सावधगिरीने राहण्यासारखे आहे! फक्त स्वत:च्या आत्म्यासाठीच जागृत राहण्यासारखे आहे. बाकी मन-वचन-कायेच्या संसार व्यवहारात फॉरेन अफेअर्सप्रमाणे सुपरफ्लुअस राहण्यासारखे आहे.

''संयोग निरंतर बदलतच राहतील. पण त्यातील 'शुद्ध हेतूयोग्य संयोगातच' मिसळण्यासारखे आहे. अन्य सर्व संयोगात सुपरफ्लुअसच राहण्यासारखे आहे.''

## संयोग

या जगात संयोग आणि आत्मा दोनच आहेत. संयोगांशी ऐक्य झाले तर संसार आणि संयोगांचा ज्ञाता झाला, तर भगवंत!

या जगात निरंतर परिवर्तन होतच राहते. कारण ते संसरण (परिवर्तन) स्वभावी आहे. संयोग हे वियोगी स्वभावाचे आहेत. संयोग तर परिवर्तित होतच राहतात.

सर्व जग संयोग-वियोगानेच चालत आहे. या जगाचा कर्ता कोण? कोणी बापही कर्ता नाही. सांयोगिक पुराव्यानींच सर्व चालत आहे. 'सायन्टिफिक सरकमस्टेन्सियल एविडन्स'मुळेच चालत आहे.

वस्तूंचे संमेलन जसे होत असते तसेच दिसते, त्यात कुणाला काहीच करावे लागत नाही. हे इंद्रधनुष्य दिसते, तर त्यात रंग कोणी भरले? ते तर सांयोगिक पुरावे (सायन्टिफिक सरकमस्टेन्सियल एविडन्स) एकत्र झाले, वस्तूंचे संमेलन झाले, तेव्हा इंद्रधनुष्य दिसले. सांयोगिक पुराव्यात सूर्य असेल, ढग असतील, पाहणारा असेल, असे अनेक पुरावे एकत्र येतात तेव्हा इंद्रधनुष्य दिसते. त्यात जर सूर्याने अहंकार केला की मी नसतो तर घडले नसते, तर तो अहंकार चुकीचा आहे. कारण ढग नसते तरी सुद्धा इंद्रधनुष्य झाले नसते आणि जर ढगांनी अहंकार केला की मी नसतो तर इंद्रधनुष्य झालेच नसते, तर तेही चुकीचे आहे. हे तर वस्तूचे संमेलन होते तेव्हाच रूपकात येते. संमेलन विखुरले जाते तेव्हा विसर्जन होते. संयोगांचा वियोग झाल्यानंतर इंद्रधनुष्य दिसत नाही.

संयोग मात्र वियोगी स्वभावाचे आहेत. आणि परत 'व्यवस्थित शक्तीच्या' हातात आहेत. संयोग केव्हा व कोणत्या भावाने एकत्रित

होतील ते 'व्यवस्थित' आहे. तेव्हा आता तुझे शहाणपण सोड ना! हे जग कसे निर्माण झाले? तर 'सायन्टिफिक सरकमस्टेन्सियल एविडन्स' मुळेच! बट नॅचरल आहे. मुख्य वस्तू 'व्यवस्थित शक्ती' आहे. संयोग-वियोगाच्या अधीन राहून 'व्यवस्थित शक्ती' चालवत आहे. किती तरी संयोग एकत्र येतात तेव्हा एविडन्स तयार होतो, किती तरी संयोग एकत्र होतात तेव्हा झोप येते आणि किती तरी संयोग एकत्र होतात तेव्हा जाग येते. 'व्यवस्थित शक्ती' अशी सुरेख आहे की संयोग एकत्र करूनच देते.

धबधबा पडतो तिथे बुडबुडे दिसतात, ते कसे वेगवेगळ्या प्रकारचे असतात. काही अर्धगोल असतात, छोटे असतात, मोठे असतात, ते कोणी बनविले? कोणी रचले? ते तर आपणहूनच निर्माण झाले. वारा, जोरात पडणारे पाणी, लाटा वगैरे संयोग एकत्र होतात तेव्हा बुडबुडे तयार होतात. ज्यात जास्त हवा भरते, तो मोठा बुडबुडा आणि ज्यात कमी हवा भरते, तो लहान बुडबुडा होतो. तसेच हे सर्व मनुष्य सुद्धा बुडबुडेच आहेत ना? संयोगांमुळेच उत्पन्न होतात ना!

एकाच प्रकारचा संयोग, एकाला आवडतो आणि दुसऱ्याला आवडत नाही. प्रत्येक संयोगाचे असेच आहे. एकाला आवडतो तर दुसऱ्याला आवडत नाही. जे आवडते त्यास जमा करून ठेवले, त्याचा वियोग केव्हा होईल काय भरवसा? परत असे आहे की, एक संयोग येतो मग दुसरा येतो, परत तिसरा येतो. पण एक संयोग आला, त्याचा वियोग झाल्याखेरीज दुसरा संयोग येत नाही.

संयोगमात्र दु:खदायी आहेत, मग ते आवडते असोत किंवा नावडते असोत. आवडत्याचा वियोग झाला तेही दु:ख आणि नावडत्याचा संयोग झाला तेही दु:ख. खरे तर नियमाने दोघांचेही संयोग-वियोग, वियोग-संयोगच आहेत.

भगवंतांनी सांगितले की, सुसंयोग आहेत आणि कुसंयोग आहेत, तिथे कुसंयोगास लोक असे म्हणतात की याची बुद्धी बिघडली आहे. फौजदार येऊन पकडून जातो, तो कुसंयोग आणि सत्संगात जायला

मिळते तो सुसंयोग. या जगात संयोग म्हणजे पूरण आणि वियोग म्हणजे गलन, याखेरीज दुसरे काहीच नाही.

वियोग करणे जितके कठीण आहे, तितकेच संयोग करणे कठीण आहे.

स्वाद (आनंद), नेहमी संयोग येण्यापूर्वीच येतो. जोपर्यंत शिल्लक असेल तोपर्यंत स्वाद येतो. जेव्हापासून शिल्लक खर्च करण्याचे सुरू होते तेव्हापासून स्वाद कमी होत जातो. रविवारी यात्रेला आहोत, तेव्हा आत्ता सर्वांना विशेष स्वाद येत आहे, पण रविवारी साडे सात वाजता गाडी निघेल तशी शिल्लक खर्च होत जाईल आणि मग संपेल.

संयोग जेव्हापासून सुरू होतो तेव्हापासूनच वियोगाकडे चालू लागतो आणि जेव्हा वियोग येतो तेव्हापासून संयोग जवळ येऊ लागतो. एकाचा एविडन्स जुळून येतो, त्याचा वियोग झाला की मग दुसऱ्याचा एविडन्स जुळू लागतो.

जगात संयोग, हे तर सार काढण्यासाठी आहेत, अनुभव घेण्यासाठी आहे. परंतु लोक कोपऱ्यात शिरले आहेत. लग्न करून शोधतात की सुख कशात आहे? बायकोत आहे? मुलात आहे? सासऱ्यात आहे? सासूत आहे? कशात सुख आहे? याचे सार काढ की! लोकांना द्वेष होतो, तिरस्कार वाटतो पण सार काढता येत नाही. या जगातील नाती ही रिलेटिव्ह नाती आहेत, रियल नाहीत. मात्र सार काढण्यासाठीच या नाती आहेत! सार काढणाऱ्या माणसांचे राग-द्वेष कमी होतात आणि ते मोक्षमार्गाचे शोधक होतात.

मनुष्य देहाशिवाय दुसरा कोणताही देह असा नाही की जो मोक्षाचा अधिकारी असेल. मनुष्य देह मिळाला आणि मोक्षप्राप्तीचे संयोग मिळाले, साधने मिळाली, तर कामच झाले म्हणायचे.

शुद्ध संयोग भेटतो तेव्हाच मोक्ष प्राप्त होतो. ज्ञानी पुरुषांचा सत्संग हाच शुद्ध संयोग आहे. कारण ज्ञानी पुरुषांसाठी काय लिहिले गेले आहे?

*'शुद्धात्मा मूळ उपादानी, अहं ममतना अपादानी.*
*मूळ निमित्त शुद्ध संयोगी, छोडाव्यो भवसंसारे,*
*वंदु कृपाळु ज्ञानीने.... '*

('शुद्धात्मा मूळ उपादानी, अहम् ममतेचे अपादानी,
मूळ निमित्त शुद्ध संयोगी, सोडवले भवसंसारातून,
वंदन कृपाळू ज्ञानींना....')

ज्ञानी पुरुष, हाच एक असा संयोग आहे, मूळ निमित्त आहे की जे शुद्धात्म्याचे उपादान (प्राप्ती) करवितात. तसेच अहंकार आणि ममतेचे, 'मी' आणि 'माझे' यांचे अपादान करवितात (सोडवतात). दुसऱ्या शब्दात सांगितले तर शुद्धात्म्याचे ग्रहण करवितात. आणि अहंकार व ममतेचा त्याग करवितात म्हणून त्यांना मूळ निमित्त आणि मोक्ष प्राप्तीचे एकमेव शुद्ध संयोगी म्हटले आहे.

आत्मा आणि संयोगांचा तर ज्ञाता-ज्ञेयाचा संबंध आहे. आत्म्याचा सर्वांशी केवळ संयोग संबंधच आहे. 'शुद्धात्मा' स्वतः असंयोगी आहे आणि त्याशिवाय बाकी सर्वच संयोग संबंध आहेत. संयोग-वियोग हे तर ज्ञेय आहेत आणि 'तू स्वतः' ज्ञाता आहेत, परंतु ज्ञाता ज्ञेयाकार होऊन जातो, म्हणून तर अनंत जन्म भटकत राहिला आहे. पाच करणांमुळे जे दिसत आहे, अनुभवात येत आहे, ते स्थूल संयोग, आणि अंतःकरणाचे सूक्ष्म संयोग आणि वाणीचे संयोग, या सर्व संयोगांबरोबर आत्म्याचा केवळ संयोग संबंधच आहे. नात्याचा संबंध नाही. ज्ञाता-ज्ञेयाचा 'संयोग संबंधमात्र' आहे. आत्मा जर केवळ ज्ञाता-ज्ञेयाच्या संयोग संबंधातच राहिला, तर तो अबंधच आहे.

परंतु इथे तर लोकांनी संयोगांशी 'लग्न संबंधाची' कल्पना केली, त्यामुळे असे फसलेत की आता बाहेर निघताच येत नाही!

आत्मा अगदी निराळाच आहे. संयोगांना सर्व प्रकारे पाहू शकेल, समजू शकेल असा आहे. परंतु संयोगातच एकाकार झालात आणि संयोगाशीच लग्न लावून बसलात तर काय होईल?

सर्वच संयोग पौद्‌गलिक आहेत, अनात्म्याचे आहेत. गाढव भेटले तर पौद्‌गलिक म्हणता येणार नाही. कारण आत अनात्मा आणि आत्मा, या दोघांचा संयोग एकत्र झाला आहे. खरे तर, त्यात आत्मा एकाकार झालेला नाही, पण भ्रांतीमुळे तुम्हाला तसे दिसते, तर ती भयंकर चूक आहे.

सर्व संयोग ऑटोमॅटिक एकत्र येतात आणि ज्ञान सुद्धा त्यामुळे ऑटोमॅटिक विभाविक झाले आहे. बाकी, द्रव्य काही बदललेले नाही, गुण बदललेले नाहीत, मात्र पर्याय बदलले आहेत. दर्शन-ज्ञान पर्याय विभाविक झाले आहेत.

समजा एका लॅबोरेटरीमध्ये एक सायन्टिस्ट प्रयोगाची सर्व साधने घेऊन बसला आहे, आणि प्रयोग करत असताना अचानक एखाद्या चंबुतून गॅस लीक झाला त्यामुळे तो माणूस आतल्या आत गुदमरू लागला आणि बेशुद्ध झाला, तर तो सर्वच विसरून जातो. संपूर्ण भान गमावून बसतो, पण नंतर जसजसा शुद्धीवर येतो तसतसा त्याचा प्रकाश वाढत जातो आणि त्याला अधिकाधिक कळू लागते. सुरुवातीला त्याला असे वाटते की हे सर्व माझ्याच हातात आहे. माझ्याच सत्तेत आहे. मग जशी समज वाढू लागते, तसे त्याला कळते की नाही, हे तर कोणी भगवंताच्या सत्तेत आहे, माझ्या हातात नाही.

मग जेव्हा जास्त शुद्धीवर येतो तेव्हा त्याला कळते की हे सर्व तर भ्रांती स्वरूपच आहे! हे भगवंताच्या सत्तेतही नाही आणि शेवटी जेव्हा संपूर्ण शुद्धीवर येतो तेव्हा संयोगच कर्ता आहेत असे त्याला भान (ज्ञान) होते आणि तेव्हाच त्याला संयोगांपासून मुक्ती सुख अनुभवास येते. तर अशी ही समजच बदलत जाते. प्रयोगकर्ता जर संयोगात संयोगी झाला, एकाकार होऊन गेला तर त्यास भयंकर बेभानपणाच म्हणायचा. आणि जेव्हा संयोग वेगळा आणि मी वेगळा, असे ज्ञान होते तेव्हा मुक्तीसुख चाखायला मिळते.

अनेक संयोग उत्पन्न होतात. त्यात मग तन्मयाकार झाला की

नवीन बीजे पडतात, तर या परिस्थितीतून कसा बाहेर येईल? जर संयोगाचे ज्ञाता-द्रष्टा राहता आले तर नवीन बीज पडत नाही. अनंत संयोग आहेत पण ते सर्व उगवण्यायोग्य राहिले नाहीत याचाच अर्थ मोक्ष.

मनुष्यमात्र संयोगांनी बांधलेला आहे. आमच्या महात्म्यांना संयोगांनी घेरले आहे पण ते प्रत्येक संयोगांचे केवळ ज्ञाता-द्रष्टा आहेत. संयोगात फसला, बांधला गेला, तर शक्ती कुंठित होते. त्याउलट ज्ञानींना संयोग येतात आणि जातात, परंतु ज्ञानी त्यांच्याबरोबर हस्तांदोलन करण्यास थांबतच नाहीत. आम्ही तर दुरूनच पाहतो म्हणून संयोगांचा वियोग होऊन जातो. आत्मा स्व-पर प्रकाशक असल्यामुळे त्यात संयोग केवळ झळकतात. मात्र, प्रकाश प्राप्त झाला असला पाहिजे.

संयोग हे चेतन नाहीत. असंयोगी तेच 'आपले' द्रव्य आहे. मनात कोणासाठी चांगले भाव येतात किंवा वाईट भाव येतात, ते केवळ संयोगच आहेत, ते 'आपले' नाहीत. संयोग कायम टिकून राहत नाहीत. जे येतात आणि जातात, ते आपले स्वरूप नव्हे. जे आपले स्वरूप नाही, त्यास आपले कसे म्हणता येईल? ते तर आपले शेजारी येतात व जातात, तसेच या संयोगांचे आहे. अज्ञानी मनुष्याला जेव्हा विचार येतात, त्यात जर चांगले विचार आले, कुणाचे भले करण्याचे विचार आले, तर त्यास आत्मा म्हणतो, पण तो आत्मा नव्हे. तुम्हाला जरी कसेही भाव आले, तरी ते 'माझे नाहीत!' इतकेच समजून घेण्याची आवश्यकता आहे. स्वामित्वभाव कोणत्याही संयोगासाठी नसावा, मग ते शुभविचार असोत किंवा अशुभ विचार असोत. आम्ही स्पष्टपणे जगाला सांगत आहोत, वास्तविकपणे जसे आहे तसे सांगत आहोत की, स्थूल संयोग, सूक्ष्म संयोग, वाणीचे संयोग, पर आहेत आणि पराधीन आहेत.

आत्मा आणि संयोग, दोनच आहेत. कार्य-अकार्य संयोगांच्या अधीन आहेत, पराधीन आहेत, स्वाधीन नाहीत. स्वाधीन असते तर नावडत्या संयोगांना कुणी जवळच येऊ दिले नसते आणि आवडत्या संयोगांचा कुणी वियोगच होऊ दिला नसता आणि त्यामुळे मग कोणीच मोक्षाला जाऊ शकले नसते!

जे काही टेम्पररी आहे, संयोग-वियोग (स्वरूप) आहे, ते 'माझे नाही,' असे जे जाणते, ते 'ज्ञान.' सर्व पर्याय शुद्ध झाल्यानंतर अनंत ज्ञान म्हटले जाते. सूक्ष्म संयोग तर जेव्हा त्या ज्ञानाचे शुद्ध पर्याय उत्पन्न होतात तेव्हाच झळकतात आणि ज्याचे सर्वच पर्याय शुद्ध होतात ते अनंत ज्ञानी! परमात्मा स्वरुप!

'संयोगच कर्ता आहेत' असे ज्ञान नसेल पण अहंकारानेही असे मानत असेल तरीही फार मोठे पुण्य बांधले जाते. उच्च श्रेणीचे देव होतात. हे तर काही केले असेल आणि ते जर उलट झाले तर म्हणेल की संयोगाधीन करावे लागले आणि तेच उलट केलेले स्वत:च्या फेवरचे (फायद्याचे) झाले तर म्हणतो की, असेच करण्यायोग्य होते! बस, एवढे म्हटले की त्याची सही झाली आणि त्याच्यावर जबाबदारी आली! आमच्या महात्म्यांची तर रॉंग बिलिफ उडाली आहे! त्यांचे सर्वच संयोग तेच ते आहेत, प्रकृती त्याची तीच, सासरा-जावई, बायको-मुले इत्यादी सर्व काही तेच ते, तरी सुद्धा किती अपूर्व सुख त्यांच्या अनुभवास येत आहे.

संयोग, की ज्याचा वियोग होणार आहे, त्याला घाबरायचे कशाला?

'आपल्याला' तर म्हातारपण नाही, मरण नाही, जन्म नाही. केवळ संयोग येतात आणि जातात. ज्ञानी पुरुषाला तर मरण आणि जेवण दोन्ही संयोग सारखेच वाटतात. केवळ संयोगच असतात.

प्राप्त संयोगांशिवाय जगात कोणतीही वस्तू नाही. 'प्राप्त संयोगांचा सुमेळ ठेवून समताभावे निकाल करा.' हे अजब वाक्य बाहेर पडले आहे. ह्या एकाच वाक्यात जगातील सर्व शास्त्रांचे ज्ञान साररूपाने सामावले आहे. प्राप्त संयोगांचे आपण ज्ञाता-द्रष्टा, अप्राप्तचे नाही.

अकरा वाजता कोर्टात जायचे असेल आणि अकरा वाजता जेवणाचे ताट पुढ्यात आले तर त्यावेळेस तो संयोग प्राप्त झाला असे म्हणायचे. तर आधी त्याचा सुमेळसहित समभावे निकाल करावा लागतो. तेव्हा आधी शांतपणे जेवून घ्यावे. दोन हातांनी थोडेच जेवता येते? शांतपणे

जेवायचे म्हणजे चित्त तेव्हा कोर्टात जाता कामा नये. नाही तर देह इथे खात असेल आणि तुम्ही असाल कोर्टात. आधी सावकाश जेवा आणि मग निवांतपणे कोर्टात जा. मात्र लोक काय करतात की ते प्राप्त संयोगांचा उपभोगच घेऊ शकत नाहीत आणि अप्राप्तच्या मागे धांदरटासारखे पळतात. त्यामुळे दोन्हीही गमावून बसतात. अरे, शहाण्या, जेवण प्राप्त झाले आहे, त्याचा नीट, सुमेळसह उपभोग घे. तरच त्याचा निकाल होईल. कोर्ट तर अजून दूर आहे, अप्राप्त आहे. मग कोर्टामागे कशाला धावतोस? संयोगानुसार काम करून घ्यावे. ज्ञानी पुरुषाचा संयोग प्राप्त झाला असेल तेव्हा जर (मोक्षाचे) काम करून घेता आले नाही तर मग काय उपयोग? अशी यथार्थ आणि अचूक समज कोण देऊ शकेल? हे तर आत्मानुभवीचेच काम.

जगातील सर्व जीवांसाठी हे 'ज्ञानी पुरुष' एक उत्तम निमित्तांचा संयोग आहे.

*'तेम भवि सहज गुण होवे, उत्तम निमित्त संयोगी रे.'*
('तसे भवि सहज गुणसह, उत्तम निमित्त संयोगी रे.')

भवी जीवास, म्हणजे अल्पकाळात मोक्षात जाणाऱ्यास सहजासहजी उत्तम निमित्त लाभते! मोक्ष अति सुलभ आहे, आणि मोक्षदात्याचा संयोग प्राप्त होणे अति अति दुर्लभ आहे. त्याची दुर्लभता अवर्णनीय आहे.

जीव प्रत्येक योनीत भटकून भटकून आला आहे, त्याला कुठेही खरे सुख सापडले नाही. तिथे अहंकाराची गर्जना आणि विलापच केला आहे. सुटण्याची इच्छा तर आहे परंतु मार्ग सापडत नाही. मार्ग सापडणे अति अति दुर्लभ आहे. या 'ज्ञानी पुरुषाचा' संयोग प्राप्त होणेच फार कठीण आहे. सर्वच संयोग एकत्रित होऊन विखुरले जातील परंतु ज्ञानी पुरुषाच्या संयोगामुळे कायमची 'शीतलता' प्राप्त होते. आता तरी मोक्षाचे काम करून घ्यायचे आहे. ज्ञानी पुरुषांजवळच पडून राहायचे आहे, अशी भावना झाल्याने पराक्रम उत्पन्न होतो. मग जरी वाटेल तसे संयोग आले तरी पण पराक्रमाने पार पडता येईल.

## प्राकृत संयोग

तुम्हाला इथे जे जे काही येऊन मिळते ते सर्व तुमच्या प्रकृतीच्या हिशोबानुसारच मिळत असते. प्रकृतीनुसारच सर्व वस्तू मिळतात. मिरीवाल्याला मिरी मिळते, वेलदोडेवाल्याला वेलदोडे मिळतात, वांगीवाल्याला वांगी, चहा पीत असेल त्याला चहा मिळतो आणि सुंठ घातलेला चहा जर प्रकृतीत असेल तर त्याला सुंठ घातलेला चहा सुद्धा मिळतोच. परंतु आत जे क्रोध-मान-माया-लोभ आहेत ते ढवळाढवळ करतात. लोभ संग्रह करायला शिकवतो. वर आणि त्यासाठी कपट करतो, भयंकर घडपडही करतो. अरे, असे काही करण्याची गरजच नाही. प्रकृतीनुसार, आतील डिमांडनुसार सर्वच तुला येऊन मिळेल. या लोकांना जर असा विचार आला की उद्या सूर्यनारायण उगवला नाही तर काय होईल? वेड्या, हे सर्व तुझ्यासाठीच आहे. तुला उपभोगता आले पाहिजे. सूर्य, चंद्र, तारा, हवा, पाणी हे सर्व तुझ्यासाठीच आहे.

प्रकृतीनुसार दहा दिवसांसाठी हिल स्टेशनवर जायचे झाले, तर आणखी दहा दिवस जास्त राहायला मिळाले असते तर बरे, असे त्याला वाटते, आणि इतर जागी दोन दिवस जास्त राहायला आवडत नाही. हे खात आहे, पीत आहे ते सर्वच प्रकृतीनुसार मिळत असते. हो, जितके लोभात असेल तितके मिळणार सुद्धा नाही. हा जो त्याग करतात, उपवास करतात, ते सुद्धा प्रकृतीनुसारच होत असते पण अहंकार करतो की 'मी' केले. त्याग होतो तो सुद्धा प्रकृतीनुसार! आणि त्याग होत नाही ते सुद्धा प्रकृतीनुसार!

बडोद्यात एक शेठ होते. त्यांची बायको फार कटकट करायची. घरी पाच-सहा मुले, खाऊन-पिऊन सुखी पण बायको फार कजाग. त्यामुळे शेठ कंटाळून गेले. त्यांनी विचार केला, ''यापेक्षा साधू झालो तर लोक 'महाराज, महाराज' तरी करतील!'' तर शेठ गुपचुप पळून गेले, आणि साधू बनले. पण बायको फार हुशार निघाली. तिने तर शेठजींना शोधून काढले! ती बाई थेट दिल्लीच्या उपाश्रयात अचानकच जाऊन ठेपली. तिथे साधू महाराजांचे व्याख्यान सुरू होते. शेठ सुद्धा

मुंडन करून साधूवेशात बसले होते. शेठाणीने तर तिथल्या तिथेच शेठजींना फैलावर घेतले, 'अरे, तुम्ही माझ्याशी हा कसला खेळ मांडला आहे? घरात सहा मुलांना माझ्या डोक्यावर टाकून भित्र्यासारखे पळून का आलात? त्यांचे शिक्षण, त्यांचे लग्न कोण लावणार?' ती तर शेठजींना हात धरून ओढायलाच लागली! शेठ समजून गेले. जास्त ओढाताण केली तर इथे फजिती होईल. म्हणून तिला म्हणाले, 'अरे, पण जरा थांब तरी! मला कपडे तरी बदलू दे.' तेव्हा शेठाणी म्हणाली, 'नाही, मी काय आता तुम्हाला सोडणार नाही, असेच्या असेच चला. घरातून पळून जाताना लाज नाही का वाटली?' उपाश्रयाचे साधू महाराज सुद्धा समजून गेले, शेठजींना निघून जाण्याचा इशारा केला आणि शेठाणीने तर त्याच साधूवेशात शेठजींना घरी आणले. प्रकृतीत त्याग नव्हता म्हणून साधू झाल्यानंतर सुद्धा परत यावे लागले.

एक महाराज फार वृद्ध झाले होते. त्यांचे हिंडणे-फिरणे सुद्धा बंद झाले होते. कुणी सेवा-चाकरी करणारा सुद्धा नव्हता. त्यामुळे महाराजांना घर आठवले. बिचारे कसेबसे कुणाच्या तरी मदतीने घरी पोहोचले. निदान सून-मुलगा तरी सेवा करतील अशा आशेनेच तर! परंतु घरी आल्यावर सून-मुलाने घरी ठेवण्यास चक्क नकार दिला. प्रकृतीत त्याग होता, तोच त्यांच्या पुढ्यात आला!

असे विचित्र आहे प्रकृतीचे कामकाज! तर ही प्रकृती काय असेल? ती जर एखादी वस्तू असेल तर आपण तिचे नाव गंगाबाई ठेवू. पण नाही, प्रकृती म्हणजे 'सरकमस्टेन्सियल एविडन्स.' हा तर प्रकृती नाचवते तसा नाचतो आणि म्हणतो कसा, 'मी नाचलो, मी त्याग केला.' प्रकृतीत त्याग असेल तर होईल नाही तर बायको सुद्धा शेवटी उचलून घेऊन येईल!

प्रकृतीचा अंतच नाही. स्वत: जर पुरुष पदावर बसला तर प्रकृती प्रकृतीचे काम करेल आणि पुरुष पुरुषाच्या विभागात राहील. पुरुष म्हणजे परमात्मा. जोपर्यंत परमात्मा झाला नाही तोपर्यंत प्रकृती जशी नाचवेल तसा नाचत राहतो.

सर्व ग्रंथांनी पुरुषाचे, आत्म्याचे ज्ञान जाणून घेण्यास सांगितले, परंतु प्रकृतीला जाणून घेण्यास कोणीही सांगितलेले नाही. अरे, पर–कृती जाणून घे, तर आत्मा समजेल. जर तेल आणि पाणी एकत्र झाले असतील तर पाण्याला समजून घे आणि वेगळे कर, तेव्हा तू तेलाला जाणू शकशील. म्हणून आम्ही म्हणतो की प्रकृती ज्ञानाला जाणा. जो चंचल भाग आहे तो सर्वच प्रकृती भाग आहे, त्यास तू जाणून घे. चंचल भागात काय–काय येते? तर पाच इंद्रिये. डोळे, पाहायचे नसेल तरी पाहतात, वांद्र्याची खाडी आली की नाक, वास घ्यायचा नसेल तरी वास घेते. देह चंचल तो कशा प्रकारे? समोरून मोटार धडक द्यायला आली की मेला पटकन बाजूला होतो आणि त्यावेळी मन–बिन काहीच करत नाही. मन चंचल, चित्त चंचल, म्हणून बसलो असू इथे आणि चित्त स्टेशनवर फिरून येते. बुद्धी सुद्धा चंचल. स्त्री अंघोळ करत असेल तेव्हा पाहू नये असे म्हणतात, तरी बुद्धी पटकन पाहते. आणि जर कुणी म्हणाले की 'या, चंदुभाऊ, या' तर एकदम छाती फुगते, ही अहंकाराची चंचलता. हा सर्वच चंचल भाग आहे. त्या चंचल भागाला संपूर्णपणे जाणून घेतले तर शेष उरला अचंचल भाग, तोच आत्मा. दया, मान, अहंकार, हर्ष–शोक, सुख–दुःख, हे सर्व द्वंद्वगुण आहेत. हे सर्व प्रकृतीचे गुण आहेत. प्रकृती धर्म आहे. प्रकृती म्हणजे चंचल विभाग–ॲकटिव्ह विभाग आणि आत्मा पुरुष, जो अचंचल आहे. जर पुरुषाला जाणले तर आत्मज्ञान होईल आणि तेव्हाच परमात्मा होता येईल.

## योग–एकाग्रता

एक इंजिनियर माझ्याकडे आले होते. ते मला म्हणाले, 'दादाजी, मला मोक्षाचे साधन हवे आहे?' मी त्यांना विचारले, 'आत्तापर्यंत तुम्ही कोणते साधन केले?' ते म्हणाले, 'मी एकाग्रता करत आहे.' मी त्यांना म्हणालो, जो व्यग्रतेचा रोगी आहे, तो त्यावर एकाग्रतेचे औषध लावतो. एकाग्रता कोण करतो? ज्याला व्यग्रतेचा रोग आहे तो. या मजूरांना एकाग्रता का करावी लागत नाही? कारण त्यांना व्यग्रता नाही म्हणून. आम्ही ज्ञानी पुरुष सुद्धा एकाग्रता करत नाही. आम्हाला व्यग्रता नावालाही

नसते. ही तर जळजळ होते त्यावर शीतलतेसाठी औषध लावतात. त्यात आत्म्यावर काय उपकार केले? एक तरी चिंता कमी झाली? इंजिनियर फार कुशाग्र होते. ते दादाला म्हणाले, 'माझी बुद्धी फ्रॅक्चर होऊन गेली. तुम्ही सांगितले ते मला पूर्णत: ॲक्सेप्ट झाले आहे. माझा तर तो रोगच निघून गेला!'

तरी पण सांगताना काही तरी सुटले म्हणून मला परत म्हणाले, 'पण दादाजी, मी रोज चार तास योगसाधना तर करतोच ना?' मी विचारले, 'कसली योगसाधना करता? माहीत असलेल्याची की माहीत नसलेल्याची?' तू आत्म्याला तर ओळखत नाहीस. ओळखतोस तर फक्त देहाला. त्यामुळे देहाला जाणून देहाची साधना केलीस. कुणी अनोळखी माणसाच्या मुखाचे ध्यान करू शकतो का? नाही करता येत. आत्म्यापासून अजाण, तो आत्म्याचे ध्यान कसे करू शकेल? ही जी केली ती तर देह साधना झाली, त्यात आत्म्यावर काय उपकार केले? आत्मयोग उत्पन्न झाला तरच मोक्ष होणार. देहयोगामुळे तर संसार फळ मिळते. हे आमचे सगळे महात्मा आत्मयोगी आहेत आणि आम्ही आत्मयोगेश्वर आहोत.

योग म्हणजे टू जॉईन, युज धातूवरुन आलेला शब्द आहे. जाणलेल्याचाच योग होतो. देहाचा योग, वाणीचा योग, तर कुणी मनाचा पण योग करतात. अशा योगामुळे भौतिक शक्ती वाढते पण मोक्ष मिळत नाही. आत्मयोगानेच मोक्ष होतो.

या जगात मनोयोगी आहेत, बुद्धीयोगी आहेत, उलट-सुलट बुद्धीवाले, कित्येक सम्यक् बुद्धीवाले आणि कित्येक विपरीत बुद्धीवाले आहेत. देहयोगी तपस्वी आणि वचनयोगी वकील इत्यादी. वेगवेगळ्या जातीचे आणि वेगवेगळ्या प्रकाराचे योगी आहेत. आत्मयोग हा एकच खरा योग आहे, दुसरे सर्व अयोग आहेत. आत्मयोगात बसले असू तेव्हा जर मन फाईली (कामे) दाखवत असेल तर त्यावेळी त्याला सरळ सांगायचे की निघून जा इथून, नाही तर तुझा अपमान करेन. आता येऊ नकोस, नंतर ये. आत्मयोगाच्या ध्यानात असताना अनुभूती होते आणि

ती अनुभूती मग कधीही जात नाही. स्वरूपाच्या भानाखेरीज जे जे जाणत आहात ते सर्व अज्ञान आहे. स्वरूपाचे भान झाल्यानंतर जे जे जाणले जाते त्यासच जाणले असे म्हणता येईल. आत्मयोग झाला तेच स्वरूपाचे भान झाले. ज्ञानयोग हाच सिद्धांत आहे. त्रियोग (मन-वचन-कायेचा योग) हा असिद्धांत आहे.

## निर्विकल्प समाधी

योग मार्गाच्या समाधीत मन-वचन-कायेची जळजळ होते तेव्हा योगसाधनेमुळे देहाला शांती वाटते खरी, पण 'मुक्तीसुख' अनुभवास येत नाही. ते सुख तर आत्मयोगीच अनुभवू शकतात.

समाधी कशाला म्हणतात? या देहयोगाने कष्ट करून प्राप्त केलेली समाधी, म्हणजे जोपर्यंत हॅन्डल माराल तोपर्यंत शांती वाटते. कायमची शांतता तर निर्विकल्प समाधी उत्पन्न होते तेव्हाच मिळते. निर्विकल्प समाधी म्हणजे सहज समाधी, उठता-बसता, खाता-पिता, अरे भांडण करताना सुद्धा समाधी जात नाही. अशी समाधी उत्पन्न होते, तेव्हाच मोक्ष प्राप्त होतो.

विकल्पी केव्हाही निर्विकल्पी होऊ शकत नाही. जे स्वतः निर्विकल्पी नॅचरली झाले आहेत, तेच दुसऱ्यांना निर्विकल्प पद देऊ शकतात. देह आणि आत्मा अगदी भिन्न-भिन्नच राहतात, कधीच तन्मयाकार होत नाहीत. मग ती कोणतीही अवस्था असो, त्याचेच नाव निर्विकल्प समाधी.

संकल्प-विकल्प बंद होतात तेव्हाच आत्मा निर्विकल्प होतो. निर्विकल्पाचे ज्ञान मिळाल्याशिवाय निर्विकल्प होता येत नाही. असे कितीतरी योगी आहेत की जे सर्व संकल्प-विकल्प मिटवून एकाच संकल्प-विकल्पावर येतात आणि ते म्हणजे 'मी आहे' असेच असते, लाईट (ज्ञानप्रकाश) नसतो. परंतु उच्च दशा येते, तेज येते परंतु ज्ञान होत नाही. वस्तूचे (आत्म्याचे) स्वतःचे स्वगुण असतात, स्वधर्म असतो, स्व-अवस्था असते. भगवंत अलख निरंजन आहेत, हे ज्ञानी पुरुषाच्या

लक्षात येते. जोपर्यंत ध्येय जाणले नाही तोपर्यंत ध्येयस्वरूप होता येत नाही. हजारो उल्कापात झाले तरी पण सहज समाधी जात नाही. धारणा तर कल्पित असते. इंडिरेक्ट प्रकाश हा रिलेटिव्ह आत्मा आहे. रियल आत्मा एन्डलेसच (सतत) राहतो. त्यात फक्त ज्ञाता–द्रष्टापणाच असतो. सर्व प्रकारे मनाचे समाधान राहते, त्याचेच नाव ज्ञान. पाचही इंद्रिये जागृत असून समाधी राहते तीच खरी समाधी आहे.

प्रत्येक अवस्थेत अनासक्त योग हीच पूर्ण समाधी.

नाक दाबून काय समाधी घेता येते? या लहान मुलाचे नाक दाबून पाहा, तो लगेच चावेल. त्यामुळे तर गुदमरायला होते. आधी–व्याधी–उपाधी नसेल, त्यास समाधी म्हणता येईल. शेवटचा निरोप घेतेवेळी (मृत्यूच्या वेळी) 'स्वतःचा' भाग पूर्णपणे संकोचून घेतो आणि त्याच्याच समाधीत राहतो. आमच्या सम्यक् दृष्टी असलेल्या महात्म्यांना समाधी मरण असते. 'शुद्धात्म्या'च्या लक्ष्यासहितच देह सुटतो.

**प्रश्नकर्ता :** वृत्ती स्थिर न राहण्याचे काय कारण?

**दादाश्री :** तुम्ही स्वतः स्थिर बसू शकता का? तर मग वृत्ती स्थिर कशी राहू शकेल? वृत्तींना स्थिर करण्यासाठी अपार साधने आहेत. पण अडचणी सुद्धा अपार आहेत. त्रिविध तापातही समाधी राहू शकेल, असे आहे.

## ध्याता–ध्येय–ध्यान

**प्रश्नकर्ता :** दादाश्री, ध्यान बरोबर लागत नाही, तर काय करावे?

**दादाश्री :** ध्यानात तर मी तुम्हाला आत्ताच बसवू शकतो परंतु त्यानंतर तर अनंत पायऱ्या बाकी आहेत! तर मग त्या ध्यानाचा काय उपयोग? मी तुम्हाला सरळ मोक्षातच बसवून देईन, या तर. आपण तर पूर्ण रियलच मागून घ्यावे. रिलेटिव्ह ध्यान कशाला मागायचे. ते तर अपूर्ण ध्यान आहे.

**प्रश्नकर्ता :** पण ते फार कठीण आहे ना!

**दादाश्री :** देणारा मी आहे, मग कसली अडचण? एका प्रधानांच्या ओळखीमुळे सर्व कामे होतात, तर ज्ञानी पुरुषांच्या 'ओळखीने' काय होऊ शकणार नाही? आमच्याजवळ पक्षपात नसतो, वीतरागता असते. जो खरा असेल आणि त्याची भेट झाली की आम्ही त्याला ज्ञान देतो.

हे तुम्ही ध्यान करत आहात पण कशाचे ध्यान? ध्येय काय? ध्याता कोण? ध्येयाला ओळखल्याशिवाय, निश्चित केल्याशिवाय ध्यान कशाचे करावे? ध्यान हे ध्येय स्वरूपाचे साधन आहे, आणि ध्याता 'शुद्धात्मा', असे असेल तरच ते ध्यान फळते. बाकी, 'मी चंदुलाल' आणि त्यालाच ध्याता मानून स्वतःच्या कल्पनेने ध्येय ठरवून, स्वतःच्या कल्पनेनेच ध्यान केले, त्याचा काय फायदा? असे कसे काम होईल? आम्ही तुम्हाला ज्ञान देतो तेव्हा तुम्हाला रियल ध्याता बनवून, तुमच्या स्वरूपातच बसवतो. ध्येय, ध्यान आणि ध्याता एकाच स्वरूपाचे होतात. स्वरूप, स्वरूपातच राहते तेव्हाच मोक्ष अनुभवास येतो. बाकी, इथे तर तुम्ही ध्यान करायला बसले असाल आणि तुम्ही ठरवता की आज ध्यान करतेवेळी अमुक इन्कमटॅक्सचा किंवा विषयविकाराचा विचार आला नाही तर बरे. पण बसल्याबरोबरच नावडत्या विचारांचाच बार होतो! मग त्याला ध्यान कसे राहील?

एक शेठ ध्यानात बसले होते. बाहेर कुणी त्यांच्याबाबतीत चौकशी केली, की शेठ कुठे गेले आहेत? तर शेठाणीने उत्तर दिले, 'उकिरड्यावर.' हे ऐकल्यावर शेठजींनी मनातल्या मनात पत्नीला नमन केले. खरोखरच त्यावेळी शेठच्या ध्यानात विषयविकारच होता!

जर या ध्यानाला यथार्थपणे करता आले तर त्यात अद्‌भुत शक्ती आहे! ध्यानाची व्याख्या समजून घ्या. ध्येय निश्चित झाले, त्यामुळे ध्याता होतो. ध्याता आणि ध्येयाला जे जोडते, ते ध्यान आहे. जर तासभर हुक्क्याला पाहिल्यानंतर, ध्येय निश्चित करून मग म्हणेल की हा हुक्का मला पाहिजे, मग जरी तो दुकानात असू दे. मला हुक्का पाहिजे, असे ध्येय निश्चित केल्यानंतर पन्नास मिनिटे कंटीन्युअस

(सातत्याने) त्याचे ध्यान करा. एक सेकंड पण ब्रेक होता कामा नये. तर पन्नास मिनिटात तो हुक्का तुमच्या हातात येईल. कुठून येईल? याचा विचार करू नका. ध्यानाची इतकी प्रचंड शक्ती आहे! पद्धतशीरपणे ध्यान झाले तर ध्येयाचा साक्षात्कार अवश्य झालाच पाहिजे, पण जर पद्धतच चुकीची असेल तर उत्तर कसे मिळेल? ध्यानाने तर परमात्मा सुद्धा प्राप्त होऊ शकेल असे आहे. ध्यानात अद्भुत शक्ती आहे, परंतु ध्यान नीट समजले तरच काम होईल. हे 'दादा,' कधीही घडले नाही असे भगवंतपद पन्नास मिनिटात तुमच्या हाती देतात. तर दुसरे काय मिळू शकणार नाही?

जरी आठ मिनिटांपर्यंत ध्यान राहिले तरी ते जमा होत होत पन्नास मिनिटांपर्यंत जाते. आठ मिनिटांचे ध्यान जमा होते, सात मिनिटांचे नाही.

**प्रश्नकर्ता :** 'स्वत:चे' (शुद्धात्माचे) गुणधर्म अनंत ज्ञान, अनंत दर्शन, त्यांचे ध्यान केले तर ते प्राप्त होतील का?

**दादाश्री :** होतील, अवश्य होतील, आत्म्याचे जेवढे गुण जाणले आणि जर त्या गुणांचे ध्यान केले, तर तेवढे गुणधर्म प्राप्त होतात.

भगवंत हे नाव आहे की विशेषण?

**प्रश्नकर्ता :** नाव

**दादाश्री :** जर ते नाव असेल तर आपण त्यांना भगवंतदास म्हणावे लागेल. भगवंत हा शब्द तर विशेषण आहे, जसे भाग्यवरून भाग्यवान विशेषण झाले आहे, तसे भगवत् या शब्दावरून भगवंत झाले आहे. जो कुणी भगवंताच्या गुणांना प्राप्त करतो, त्याला हे विशेषण लागू पडते. आम्हाला सर्व भगवान म्हणतात, परंतु 'आमचे पद' निर्विशेष अनुपमेय आहे. मग त्याला कोणते विशेषण द्याल? या देहाला द्याल? हा (बुडबुडा) तर फुटणार आहे. आत जे प्रकट झाले आहेत, तोच परमात्मा आहे. गजब प्रकाश झालेला आहे!

शुद्ध ज्ञान तोच परमात्मा आहे. 'आत्मा' हा सुद्धा शब्द ठेवण्यात

आला आहे. हा संज्ञासूचक शब्द आहे, 'ज्ञान' हाच परमात्मा आहे. ज्ञान सर्व काही चालवत आहे परंतु शुद्ध ज्ञानाचे दर्शन झाले पाहिजे. शुद्ध ज्ञानाने मोक्ष आहे. सद्ज्ञान ठेवाल तर सुख मिळेल. विपरीत ज्ञान ठेवाल तर दुःख मिळेल. कुणी बापही वरिष्ठ नाही. भगवंत कुणास म्हणतात? जो या दुनियेत स्वत्रंत झाला आहे आणि ज्याचा कुणीही *उपरी* (वरिष्ठ) नाही, तो भगवंत. कुणी *उपरीही* नाही आणि कुणी अंडरहॅन्ड सुद्धा नाही. परंतु जिथे स्वतःची 'परवशता'च समजत नाही, तिथे 'स्वातंत्र्य' कसे समजणार? संसार हा तर परवशतेचे संग्रहस्थान आहे आणि परवशता हेच दुःख आहे. खरे तर, हे लोक स्वतःच स्वतःपासून गुप्त राहिले आहेत! जितके विचार येतात तितके जगात मार्ग आहेत. तुला अनुकूल वाटेल त्या मार्गाने भटकत रहा आणि जेव्हा दमशील तेव्हा 'या' मोक्षाच्या मार्गावर ये. तुला स्वतंत्र व्हायचे असेल तेव्हा ये. वेड्या, संसार खोटा नाही, जग खोटे नाही, जगात काहीच खोटे नाही, परंतु तुझी समजूतच चुकीची आहे. जगात क्षणोक्षणी भय आहे, क्षणोक्षणी परवशताच आहे, त्यामुळेच तुला सतत भीती वाटत राहते.

कित्येकांनी तर 'यमराज, यमराज' असे म्हणून लोकांना घाबरवले आहे. मग लोकांनी यमराजाचे वेगवेगळ्या प्रकारचे चित्र काढले. रेड्याचे चित्र काढले आणि यमाचे मोठमोठे दात असलेले राक्षसीरुप चित्रित केले आणि लोकांना घाबरवून सोडले! अरे, यमराज नावाचे कुणी जनावर नाही. ते तर नियमराज आहेत. नियमराज सर्व काही चालवत आहे. नियमराजच जिवंत ठेवतात आणि नियमराजच मारतात. जर अशी खरी समज मिळाली तर मग कसलीही भीती वाटेल का?

कुणी सांगितले असेल की या जंगलाच्या वाटेने तुला जायचे आहे, तिथे वाघ-सिंह नाहीत. पण तेव्हा तो इतके सांगायचे विसरला की एका जागी वाघ-सिंह आहेत, पण ते पिंजऱ्यात आहेत. बस, इतकेच सांगायचे राहिले आणि तो जंगलाच्या वाटेने चालू लागला. तेव्हा तिथे एका वाघाने डरकाळी फोडली आणि त्याची भीतीने गाळण उडाली. आणि तो तिथून पळत सुटला. जर त्या माणसाने त्याला आधीच सांगितले

असते की वाघ-सिंह आहेत पण ते पिंजऱ्यात आहेत, तर तो घाबरला नसता. असल्या अर्धवट ज्ञानाचा काय फायदा? सांगणाऱ्याच्या अर्धवट ज्ञानामुळे तो बिचारा घाबरुन पळून गेला!

## गुरूकिल्ली

भगवंतानी सांगितले होते की, गुरू होऊ नका आणि झालात तर गुरूकिल्ली सोबत ठेवा, कारण जर नशा चढली तर बुडाल. भगवंत कुणाचेही गुरू नव्हते आणि हे तर सर्व ठिकठिकाणी गुरू होऊन बसले आहेत. घरात दोन मुले आणि बायको होती त्या तीन घंटांना सोडून इथे दोनशे-पाचशे शिष्यांची घंटा गळ्यात बांधली! मेल्या, बुडशील. गुरू म्हणजे जड, जड स्वत: तर बुडतोच पण सोबत दुसऱ्यांनाही बुडवतो. आम्ही लघुतम आहोत. 'आम्ही' स्वत: बुडत नाही आणि कुणाला बुडवतही नाही. आम्ही हलके फुलासारखे असतो. आम्ही तरलो आणि सर्वांना तारतो. कारण आम्ही तारणहार आहोत! स्वत: तरलो आणि अनेकांना तारण्याचे सामर्थ्य आमच्यात आहे!

भगवंतांनी पण सांगितले होते की, गुरूपदात जोखीम आहे हे लक्षात ठेवून गुरू हो, नाही तर मेलाच समज. जर गुरू व्हायचे असेल तर ज्ञानी पुरुषांकडून गुरूकिल्ली मिळवून घे, तरच काम होईल, नाही तर भयंकर नशा चढेल असे हे पद आहे. गुरूपद ही तर मोठी रिस्पॉन्सिबिलिटी (जबाबदारी) आहे!

लोकांचे गुरू होऊन बसलेले पाच-सहा गुरू एकदा माझ्याकडे आले. ते मला विचारू लागले 'लोकांना काय गुरूंची गरज नसते?' मी म्हणालो की, खरे गुरू असतील तरच कामाचे. बाकी, गुरू म्हणजे जड आणि जड तर स्वत:ही बुडतो आणि दुसऱ्यांनाही बुडवतो. मी तर लघुतम पुरुष आहे. गुरूतम पुरुष आहे. मी कच्चा नाही की गुरू होऊन बसेन. तू गुरू होऊन बसलास तर समजून घे की तू लघू आहेस! आणि जर लघुत्तेचे भान नसून गुरू बनलास तर बुडशील आणि बुडवशील.

अगम ज्ञान तर सर्वांच्या लक्षाबाहेरच गेलेले आहे. कधीच गम

पडत नाही (समजत नाही) ते अगम. आम्ही तुम्हाला अगमचे ज्ञान दिले आहे. लोकांना निगमचे ज्ञान असते पण अगमचे ज्ञान नसते. गुरूगम शब्द आहे परंतु गुरू स्वत:च उत्तरेला दक्षिण समजत असेल तर मग काय होईल?

शुष्क ज्ञान म्हणजे परिणमित होत नाही असे ज्ञान. झाडाला फुले येतात पण फळे धरत नाहीत. तसेच आजकाल ठिकठिकाणी शुष्क ज्ञान पसरले आहे. काळाची विचित्रता आहे ही!

## 'अक्रम ज्ञान' - 'क्रमिक ज्ञान'

'क्रमिक मार्गा'त, रिलेटिव्ह धर्माच्या भाषेत, जे व्यवहार-निश्चयाचे विभाजन करण्यात आले आहे, ती समजूत बरोबर आहे, परंतु अक्रम मार्गाच्या रियल धर्माच्या ज्ञानभाषेत तर निश्चय व्यवहार आहे, अर्थात यथार्थ निश्चय प्रकट झाल्यानंतरच यथार्थ व्यवहारास सुरुवात झाली, असे मानले जाते. अशा निश्चय-व्यवहार संबंधातच यथार्थ निश्चयाने यथार्थ व्यवहार असतो. आणि म्हणून कोणतीही जाती असो, वेश असो किंवा श्रेणी असो, की मग कुठल्याही प्रकारची अवस्था असो, परंतु त्या प्रत्येक प्रसंगात, संयोगात संपूर्ण, समाधानकारी ज्ञान जागृती राहते. अर्थात कोणत्याही असमाधानापासून विराम पावणे शक्य असते! तात्पर्य हेच की, व्यवहार यथार्थ तेव्हाच म्हणता येईल की जेव्हा यथार्थ निश्चय प्रकट झाला असेल. सर्व अवस्थांमध्ये सर्व समाधान राहील असे 'ज्ञान' आहे हे!

## लक्षचौऱ्यांशी-चार गतींची भटकंती कशामुळे?

आत्मा स्वत: पुद्‌गलाला उर्ध्वगामी खेचत आहे. जेव्हा पुद्‌गलाचे ओझे वाढते तेव्हा पुद्‌गल आत्म्याला अधोगतीत घेऊन जातो. म्हणून सध्या कलियुगात तर धर्म असा द्यायला हवा की 'बाबा, हिंसा-चोरी इत्यादीचे भाव (मनात) आले तर त्यांना मिटवून टाक की ज्यामुळे अधोगती होणार नाही! पाशवी आणि राक्षसी विचारांना मिटवून टाक. असे केलेस तर आत्म्याचा तर स्वभावच आहे की उर्ध्वगामी होणे.'

यामुळे चांगली गती होईल. दिवसभर पाशवतेचे आणि राक्षसी विचारच करत राहतो, त्यामुळे दिवसभर आत्म्यावर आवरणाचा लेप चढवतच राहतो. स्वतःच्या स्वार्थातच रमत राहतो! हीच पाशवता आहे.

जसा या टेपचा आवाज मिटवता येतो, तसे आत सुद्धा मिटवता येते. अकरा वाजता जेवण्यापूर्वी जो विचार आला तो प्रकट होण्यापूर्वी मिटवता येतो. आम्ही हेच सांगत आहोत की, बाबा, त्यास मिटवून टाका!

'ज्ञान हाच आत्मा आहे.' ज्याला जसे ज्ञान असेल तसा त्याचा आत्मा होतो. विपरीत ज्ञान असेल तर विपरीत आत्मा होतो. ज्या ज्ञानावर श्रद्धा बसते तसा तो होऊन जातो. श्रद्धा बसली म्हणजे श्रद्धेला मदत करणारे ज्ञान मिळते, आणि ज्ञान व श्रद्धा एकत्र आले की मग चारित्र्यही तसेच होते. आत्मा तसाच होऊन जातो. सासू आपल्या सुनेला वेडी म्हणत असेल पण जोपर्यंत सुनेला श्रद्धा बसत नाही तोपर्यंत तिच्यावर कोणताही इफेक्ट (परिणाम) होत नाही. जरी संपूर्ण जग तिला वेडी म्हणत असेल तरी पण तिच्यावर सायकॉलॉजिकल इफेक्ट होत नाही. परंतु जर तिची श्रद्धा बदलली तर ती खरोखरच वेडी होईल! म्हणून या जगात आपल्यावर कुणाचाही प्रभाव पडू देऊ नये.

जशी तू प्रतिष्ठा केलीस तसाच तुझा प्रतिष्ठित आत्मा होईल.

**प्रश्नकर्ता :** श्रद्धा आणि ज्ञानात काय फरक?

**दादाश्री :** 'श्रद्धा' हे अनडिसायडेड ज्ञान आहे, 'ज्ञान' हे डिसायडेड ज्ञान आहे, म्हणजेच 'अनुभवाचे ज्ञान' आहे. बागेत बसलो असू आणि काही तरी खुडबुडले तर मी म्हणेल की तिथे काही तरी आहे, तुम्ही सुद्धा म्हणाल, काही तरी आहे. तर हे कोणते ज्ञान आहे? 'याचे नाव श्रद्धा' किंवा 'दर्शन'. मग सगळे तिथे काय आहे ते बघण्यासाठी गेले. हात फिरवून सर्वांनी ठरवले ही गाय आहे, त्यास 'ज्ञान' म्हणायचे. बिलिफमध्ये म्हणजे दर्शनात कधी तरी रॉंग (चुकीचे)ही असू शकते. सामान्यरूपाने जाणणे त्यास 'दर्शन' म्हणतात आणि विशेष रूपाने जाणणे त्यास 'ज्ञान' म्हणतात.

खिसेकापूला खिसे कसे कापता येतात? तर आधी श्रद्धा उत्पन्न होते, त्यानंतर ज्ञान मिळते आणि चारित्र्य तर आपणहूनच येते.

ज्ञान दर्शनाचे फळ क्रियामान. लोक त्यास चारित्र्य म्हणतात. सम्यक् म्हणजे यथार्थ, रियल. सम्यक् ज्ञान, आणि सम्यक् दर्शनाने सम्यक् चारित्र्य उत्पन्न होते. ज्याच्यात रियल चारित्र्य असते तो संपूर्ण भगवंत. रियल चारित्र्याने कुणालाही दुःख होत नाही.

वर्तन, बिलिफ (मान्यता) आणि ज्ञान एकमेकांवर आधारित आहेत. जशी बिलिफ असते तसे ज्ञान मिळते आणि तसेच वर्तन होत असते, वर्तन करावे लागत नाही.

क्रिया म्हणजे आत्मा नाही, आत्म्याचे स्वतःचे गुणधर्म आहेत. परंतु आत्म्याची सक्रियता नाही. जी जी कल्पना करतो तसा अनुभव होतो. दुःख-सुख या वस्तू नाहीत, कल्पना आहेत. आत्म्याची इतकी प्रचंड शक्ती आहे, पण स्वतः निर्लेप आहे. आत्म्याच्या उपस्थितीमुळेच इतर सर्वांची सक्रियता दिसते.

भगवंत काय म्हणतात की, ज्या सर्व क्रिया केल्या गेल्या आहेत त्याचे फळ येईल. ज्या क्रियेचे फळ येत नाही त्या क्रियेने मोक्ष होतो. परम विनयाने मोक्ष, त्याशिवाय बाकी सर्व जंजाळच आहे आणि त्याचा कधी अंतच येत नाही. गुहेत राहिला तर गुहेच्या जंजाळात शिरतो आणि संसारात असेल तर संसाराच्या जंजाळात शिरतो. जिथे असेल तिथे जंजाळातच शिरतो.

लोक म्हणतात की क्रिया करा परंतु ज्ञानाशिवाय क्रिया कसली? क्रिया तर ज्ञानाची दासी आहे. भगवंतांनी सांगितले की ज्ञानक्रिया करा. 'ज्ञान क्रियाभ्याम् मोक्ष.'

'ज्ञानक्रिया' म्हणजे काय? स्वतःच्या स्वरूपात राहावे आणि जाणावे. दर्शन क्रियेत पाहायचे आणि ज्ञान क्रियेत जाणायचे. पाहावे आणि जाणावे हीच आत्म्याची क्रिया आहे, आणि आत्म्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही तत्त्वात ज्ञान-दर्शनक्रिया नसते. अन्य सर्व क्रिया असतात.

**दादाश्री :** आत्मा तर देहापासून वेगळाच असेल, नाही का?

**प्रश्नकर्ता :** वेगळाच आहे.

**दादाश्री :** तर हा देह तू चालवत आहेस, तो कोणाच्या मदतीने चालत आहे? हे तर सर्व 'व्यवस्थित शक्ती'च्या मदतीने चालत आहे. हे सर्व करत आहे, ती 'व्यवस्थित शक्ती' करत आहे. यात आत्मा काहीच करत नाही. तो तर केवळ पाहतो आणि जाणतो.

जो जाणतो तो करत नाही आणि जो करतो तो जाणत नाही. जो करणारा असतो तो जाणणारा होत नाही. आणि जो जाणणारा असतो तो करणारा नसतो. या इंजिनला विचारले, तर ते म्हणेल की, नाही बाबा, मी काहीच जाणत नाही. हा इलेक्ट्रिक बल्ब प्रकाश देतो पण तो जाणत नाही.

समुद्रातून नाव तुम्हाला किनाऱ्यावर घेऊन आली की तुम्ही नावेला आणले? तर नाव घेऊन आली. करणारी नाव पण ती जाणत नाही. तर अशा प्रकारे 'जाणणारा' आणि 'करणारा' या दोन्ही धारा वेगळ्याच असतात. पण जो करतो तो जाणतो असे जर म्हटले की दोन्ही धारा ज्या वेगळ्या वाहत होत्या, त्या एक होतात आणि त्यामुळेच तर सर्व बेचव लागते ना! कर्ताधारा आणि ज्ञाताधारा, दोन्ही वेगळ्याच आहेत.

जो करतो तो जाणत नाही आणि जो जाणतो तो करत नाही. कारण कर्तेपणात एविडन्सची गरज असते तिथे ज्ञातापणात एविडन्सची गरज नसते. काहीही करावे लागते, त्यात संयोगिक पुरावे लागतात. असेच काही होत नाही.

## प्रज्ञा

प्रज्ञा आत्म्याचा डिरेक्ट प्रकाश आहे, आणि बुद्धी इंडिरेक्ट प्रकाश आहे, मिडियम थ्रू (माध्यमातून) येणारा प्रकाश आहे.

केवळज्ञानाच्या अंश स्वरुपाला आम्ही प्रज्ञा म्हणतो. प्रज्ञा ही ज्ञान

पर्याय आहे. जसजशी आवरणे तुटत जातात तसतसा प्रकाश वाढत जातो. आणि तितके केवळज्ञान अंशाअंशाने वाढत जाते. संपूर्ण केवळज्ञान तर 360 अंश पूर्ण झाल्यानंतर होते.

एका मडक्यात हजार वॉल्टचा बल्ब फिट केला असेल आणि मडक्याचे तोंड बंद केले, तर प्रकाश मिळेल का? नाही मिळणार. तसेच या मूढात्म्याचेही आहे. आत तर अनंत ज्ञानप्रकाश आहे परंतु आवरणाने आच्छादित असल्यामुळे घोर अंधकार आहे. ज्ञानी पुरुषाच्या कृपेमुळे, त्यांच्या सिद्धीबळाने जर मडक्यात जरासे भोक पडले, तर संपूर्ण खोलीत प्रकाश पसरेल. म्हणजे तितके आवरण तुटले आणि तितका डिरेक्ट प्रकाश प्राप्त झाला. जसजशी आवरणे तुटत जातात, जसजशी जास्त भोके पडत जातात, तसतसा प्रकाश वाढत जातो. आणि जेव्हा संपूर्ण मडके फुटते आणि बल्बपासून वेगळे पडते तेव्हा संपूर्ण प्रकाश सगळीकडे पसरतो झगमगाट होतो!!

डिरेक्ट ज्ञानकिरणे फुटतात त्यासच प्रज्ञा म्हणतात. आत्मा जेव्हा सर्व आवरणांपासून मुक्त होतो, तेव्हा त्याला संपूर्ण ब्रह्मांडाला प्रकाशित करण्याची शक्ती प्राप्त होते, संपूर्ण ब्रह्मांडाला प्रकाशित करतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर ब्रह्मांडातील सर्व ज्ञेयांना पाहण्याची-जाणण्याची शक्ती प्राप्त होते, त्यासच केवळज्ञान म्हटले जाते.

आत्म्याची स्वत:ची जी संपूर्ण ब्रह्मांडाला प्रकाशित करण्याची शक्ती आहे, त्यास केवळज्ञान म्हणतात.

या प्रज्ञेचे फंक्शन काय? कार्य काय? प्रज्ञा, ही तर 'पती हाच परमेश्वर' असे मानणाऱ्या प्रामाणिक पत्नीचे काम करते. आत्म्याच्या संपूर्ण हिताचेच दाखवते आणि अहितापासून सोडवते. जितके जितके बाह्य संयोग येतील, तेवढ्यांचा समभावे निकाल करून देते आणि मग स्वत:च्या स्वरूपाच्या ध्यानात मग्न होते. अर्थात आतील कार्यही करते आणि बाहेरचे कार्यही करते. 'इंटरिम गव्हर्नमेंट' सारखे. आणि ते सुद्धा जोपर्यंत फुल्ली इंडिपेंडट गव्हर्नमेंट स्थापित होत नाही तोपर्यंत.

प्रज्ञा म्हणजे काय? आत्म्याला जे परके आहे, त्यास कधीच स्वत:चे होऊ देत नाही आणि स्वत:चे आहे त्यास कधीच परके मानू देत नाही, ती प्रज्ञा! प्रज्ञा तर आत्म्याचे अंगच आहे आणि ती निरंतर आत्म्याला मुक्ती देण्याचेच कार्य करते. जसजशी प्रज्ञा उमलत जाते, तसतसे वर्तन सुद्धा बदलत जाते. वर्तन बदलले की ओझे कमी होते. 'स्वत:चे' आणि 'परके', असे होम डिपार्टमेंट आणि फॉरेन डिपार्टमेंट दोन्हींना वेगळेच ठेवते, ती प्रज्ञा आहे, तोच आत्मा आहे, तेच चारित्र्य आहे. वर्तन हेच चारित्र्य. वर्तन म्हणजे जे 'स्व' आणि 'पर' यास एकाकार होऊ देत नाही ते.

आम्ही जेव्हा ज्ञान देतो तेव्हा सरळ अनुभूतीच होत असते, त्यास परमार्थ समकित म्हणतात. त्यामुळे तुम्हाला प्रज्ञाभाव त्याच वेळेस उत्पन्न होतो. सारे जग जे चालत आहे, तो सर्वच चंचल भाग आहे, मात्र प्रज्ञाभाव हा स्थायी राहू शकेल असा भाव आहे. प्रज्ञा उत्पन्न झाली की मग शिडी किंवा पायऱ्या चढाव्या लागत नाही, सरळ वरती पोहोचता येते. प्रज्ञेशिवायचे जे अन्य सर्व भाव आहेत ते भावाभाव मानले जातात आणि त्या सर्वांचाच चंचल भागात समावेश होतो. प्रज्ञाभावास आत्मभाव म्हणता येणार नाही. प्रज्ञाभाव अचंचल भागात येतो. प्रज्ञेचे कार्य केवळज्ञान होताच समाप्त होते. म्हणून त्यास आत्मभाव म्हणताच येणार नाही. कारण तसे जर म्हटले तर तो अन्वयगुण झाला म्हणायचा आणि जर अन्वयगुण म्हटला तर सिद्धक्षेत्रात विराजमान सिद्ध भगवंतांना सुद्धा प्रज्ञा असावी, पण तसे नाही. कारण तिथे तिचे (प्रज्ञेचे) काहीच कार्य नसते. फुल्ली इंडिपेंडट गव्हर्नमेंटची स्थापना झाल्यानंतर इंटरिम गव्हर्नमेंट आपोआपच विसर्जित होते. तसेच प्रज्ञेचे सुद्धा आहे.

आम्ही 'स्वरूपज्ञान' देतो तेव्हा प्रज्ञेला बसवतो, मग ती प्रज्ञा तुम्हाला क्षणोक्षणी सावधान करते. भरत राजाला चोवीस तास (आत्म्यात राहण्याकरिता) स्वत:ला सावधान करण्यासाठी नोकर ठेवावे लागत होते! परंतु इथे तर कितीही विकट संयोग आले तरी त्यावेळी आमचे ज्ञान हजर होते, आमची वाणी हजर होते, आम्ही हजर होऊन जातो आणि

तुम्ही जागृतीत येतात! क्षणोक्षणी जागृत ठेवेल असे हे आमचे 'अक्रम ज्ञान' आहे. तेव्हा इथे (मोक्षाचे) काम काढून घेण्यासारखे आहे. एकदा जर तार जोडली गेली असेल तर कायमी समाधान होईल.

या शरीरात दोन विभाग आहेत. एक चंचल विभाग आणि दुसरा अचंचल विभाग. अचंचल तो आत्मा आहे. जितकी तुम्हाला तुमच्या व्यापारात सखोल दृष्टी आहे तितकी जर आत्म्यात असेल तर कामच झाले! सर्व विषयात खोलवर जातात, पण यात कसे जावे? हे तर निर्विषय ज्ञान म्हटले जाते, पण निर्लेप आणि निर्विकारी!

आपण अगदी भेसळयुक्त सोने घेऊन सोनाराकडे गेलो, तरीही सोनार रागवत नाही. तो मात्र सोन्यालाच पाहतो. भेसळ करणे हा तर लोकांचा स्वभावच आहे. तरी पण सोनार तर सोन्यालाच पाहतो. हे डॉक्टर तर रागावतात सुद्धा की शरीराची काळजी का घेतली नाही? परंतु सोनार रागवत नाही. ज्ञानी पुरुष सुद्धा सोनाराप्रमाणे आत्माच पाहतात, बाहेरचा माल पाहत नाहीत. सोन्याच्या अवस्था बदलत राहतात, भेसळ होते, वितळल्यावर पाणी होते, पावडर होते आणि त्यातून परत शुद्ध सोने होते. अशा प्रकारे अवस्था बदलत राहतात, तरी पण सोने ते सोनेच राहते! सोनाराचे लक्ष जसे सोन्यात असते, तसेच तुमचे लक्ष आत्म्यात राहिले तर काम होईल! सोनाराचे लक्ष सोन्यातच असते. बाहेरुन जरी कितीही भेसळयुक्त दिसले तरी पण सोनाराचे लक्ष तर सोन्यातच असते. तसेच ज्ञानी पुरुषाचे लक्ष चैतन्यातच असते.

कुणी शास्त्र वाचतो धारण करतो, पण मग समजूत तर त्याची स्वत:चीच ना! लोक स्वत:च्या भाषेत समजले आहेत. जीवाजीव तत्त्वाची गोष्ट खरी आहे, परंतु लोक त्यास स्वत:च्या समजुतीने समजले आहेत. अजीव तर कशास म्हणतात, कुणास ठाऊक? आणि जर अजीवच समजले नाही तर मग जीव कसा समजेल? भगवंत प्रत्यक्ष हजर होते, तेव्हा सुद्धा आत्म्याचे लक्ष्य बसले नव्हते. लक्ष्य बसते पण ते शब्दब्रह्माचे लक्ष्य बसते आणि ते तर विसरायला किंवा चुकायलाही होते. वाचलेल्या

वर्णनाचे शब्दब्रह्म आणि पाहिलेले ब्रह्म, यात तर फार मोठा फरक आहे. ज्याचे वर्णन वाचले असेल असे शेत लक्षात राहील किंवा राहणारही नाही, पण पाहिलेले शेत लक्षात राहतेच. इथे तर आमच्या महात्म्यांनी शुद्धब्रह्म पाहिला आहे, त्यामुळे त्याचा आनंद असतो.

जर संयोग जुळला नसता तर समसरण मार्गच राहिला नसता. हे तर संयोगामुळे बिलिफच बदलली आहे आणि त्यामुळेच तृतीयम् (वेगळेच) जीव उत्पन्न झाले आहेत आणि म्हणूनच अनंत शक्तीवर आवरण आले. हे जीव ज्या प्रकारे उत्पन्न झाले आहेत त्याचप्रकारे विसर्जित झाले तरच आत्मा स्वतंत्र होईल. ज्ञानी पुरुष तर समसरण मार्गाचा अंत आहेत. ते तर चरम निमित्त आहेत, मुक्तीचे! धर्म प्राप्तीचे!

*'जेणे आप्युं भान निज, तेने आत्म अभिनंदन,*
*रणके घंट-घंटडीओ, जय सच्चिदानंद.'*

('ज्यांनी दिले भान निज, त्यांना आत्म अभिनंदन,
दुमदुमे घंट-घंटिका, जय सच्चिदानंद.')

**जय सच्चिदानंद**

## संपर्क सूत्र

### दादा भगवान परिवार

| | | |
|---|---|---|
| **अडालज** | : | **त्रिमंदिर**, सीमंधर सिटी, अहमदाबाद-कलोल हाईवे, पोस्ट : अडालज, जि.-गांधीनगर, गुजरात - 382421. फोन : (079) 39830100 |
| **राजकोट** | : | **त्रिमंदिर**, अहमदाबाद-राजकोट हाईवे, तरघड़िया चोकड़ी (सर्कल), पोस्ट : मालियासण, जि.-राजकोट. फोन : 9924343478 |
| **भुज** | : | **त्रिमंदिर**, हिल गार्डनच्या मागे, एयरपोर्ट रोड. फोन : (02832) 290123 |
| **अंजार** | : | **त्रिमंदिर**, अंजार-मुंद्रा रोड, सिनोग्रा पाटीया जवळ, सिनोग्रा गाँव, ता-अंजार. फोन : 9924346622 |
| **मोरबी** | : | **त्रिमंदिर**, मोरबी-नवलखी रोड, पो-जेपुर, ता-मोरबी, जि-राजकोट, फोन : (02822) 297097 |
| **सुरेन्द्रनगर** | : | **त्रिमंदिर**, सुरेन्द्रनगर-राजकोट हाईवे, लोकविद्यालय जवळ, मुळी रोड. फोन : 9737048322 |
| **अमरेली** | : | **त्रिमंदिर**, लीलीया बायपास चोकडी, खारावाडी. फोन : 9924344460 |
| **गोधरा** | : | **त्रिमंदिर**, भामैया गाँव, एफसीआई गोडाउन समोर, गोधरा, (जि.-पंचमहाल). फोन : (02672) 262300 |
| **बडोदा** | : | **त्रिमंदिर**, बाबरिया कोलेज जवळ, बडोदा-सुरत हाई-वे NH-8, वरणामा गाँव. फोन : 9574001557 |
| **जामनगर** | : | **त्रिमंदिर,** व्रजभूमि-1 च्या समोर, TGES स्कूल जवळ, माणेक नगर, राजकोट रोड. |
| **अहमदाबाद** | : | **दादा दर्शन**, ५, ममतापार्क सोसाइटी, नवगुजरात कॉलेजच्या मागे, उस्मानपुरा, अहमदाबाद-380014. फोन : (079) 27540408 |
| **बडोदा** | : | **दादा मंदिर**, १७, मामानी पोळ-मुहल्ला, रावपुरा पुलिस स्टेशन समोर, सलाटवाड़ा, बडोदा. फोन : 9924343335 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **मुंबई** | : 9323528901 | | **दिल्ली** | : 9810098564 |
| **कोलकता** | : 9830093230 | | **चेन्नई** | : 9380159957 |
| **जयपुर** | : 9351408285 | | **भोपाल** | : 9425024405 |
| **इन्दौर** | : 9039936173 | | **जबलपुर** | : 9425160428 |
| **रायपुर** | : 9329644433 | | **भिलाई** | : 9827481336 |
| **पटना** | : 7352723132 | | **अमरावती** | : 9422915064 |
| **बेंगलूर** | : 9590979099 | | **हैदराबाद** | : 9989877786 |
| **पूणे** | : 9422660497 | | **जालंधर** | : 9814063043 |

| | | | |
|---|---|---|---|
| **U.S.A.** | : **(D.B.V. I.)** +1 877-505-DADA (3232) | | |
| **U.K.** | : +44 330-111-DADA (3232) | **UAE** | : +971 557316937 |
| **Kenya** | : +254 722 722 063 | **Singapore** | : +65 81129229 |
| **Australia** | : +61 4211277947 | **New Zealand** | : +64 210376434 |

**Website : www.dadabhagwan.org**

## ज्ञान स्थापना युगानुयुगे, आप्तवाणी द्वारा!

जगाबद्दल 'जसे आहे तसे' सगळे स्पष्ट झाले आहे. सगळेच स्पष्ट होऊ द्या. जितकी वाणी निघेल तितकी एकदा निघू द्या. लोक विचारत जातील आणि नवीन नवीन स्पष्टीकरणे मिळत जातील. रोजच मिळतात. ते सर्व छापले जाईल. त्यानंतर लोक त्यातून पूर्ण निष्कर्ष काढून ज्ञानाची प्रतिस्थापना करतील. म्हणजे या सर्व आप्तवाणींमधून आत्म्याचा अनुभवच सांगितला गेला आहे. यात सर्व काही येऊन जाते.

मी जे बोलतो त्यातील एक शब्द सुद्धा यांनी वाया घालविला नाही. एकूणएक शब्दांची टेप रेकॉर्डरमध्ये नोंद करून ठेवली आहे. आणि हे तर विज्ञान आहे ना! या जगात जेवढी शास्त्रे आहेत, जेवढी पुस्तके आहेत ती सर्व ज्ञानमय आहेत, केवळ हे एकमेव विज्ञानमय आहे. विज्ञान म्हणजेच इटसेल्फ ( स्वयं ) क्रियाकारी! त्वरित फळ देणारे आहे. त्वरितच मोक्ष देते.

– दादाश्री

आत्मविज्ञानी 'ए.एम.पटेल'च्या आत प्रकट झाले

# दादा भगवानना असीम जय जयकार हो

9 789387 551503

Printed in India

Price ₹100

dadabhagwan.org